मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे

चरित्र ८६ स. ७८१६

ले. चिंतामण गंगाधर गोखले

औरंगजेब बादशाहाचे चरीत्र

उत्तरभाग.

( श्री प्रिंटर्स ॲण्ड स्टेशनर्स, ठाणे )

औरंगजेब

(चरित्र)

चारेम ८६

मराठी ग्रंथ संग्रहालय.
ठाणे.

१२२

# राजपुत्र औरंगजेब.



राज्यारोहण.

जन्म. [२१ जुलै इ. स. १६५८.] मृत्यु.

. १६१८. इ.स. १७०७.

[library stamp]

श्रीमंत राजराजेश्वर

# सयाजीराव महाराज गायकवाड,

जी. सी. एस्. आय्., सेनाखासखेल समशेरबहादर,

## बडोदें राज्याचे अधिपति,

यांचे,

परम थोर औदार्य, असामान्य गुणग्राहकत्व, आणि
विशेषेंकरून आपल्या प्रजेच्या कल्याणाविषयीं
व शिक्षणाविषयीं अश्रांत परिश्रम, व देश-
भाषेच्या उन्नतीकरितां पराकाष्ठेची कळ-
कळ, इत्यादि अनेक सद्गुण मनांत
आणून त्यांच्या परवानगीनें
हा ग्रंथ,

त्यांचे सेवेशीं परमादरपूर्वक
अर्पण केला असे.

महाराजांचा नम्र सेवक

ग्रंथकर्ता.

# प्रस्तावना.

हा ग्रंथ बरनीर, एल्फिन्स्टन, ग्रांट डफ, कीन, टॉड, डा० हंटर इत्यादि इतिहासकारांचे इंग्रजी ग्रंथ व काव्येतिहाससंग्रह, लोकहितवादींचे लेख, इत्यादि मराठी ग्रंथ यांचे आधारानें लिहिला आहे.

औरंगजेबाच्या पुष्कळ वर्षांच्या कारकीर्दींत त्यानें केलेल्या बऱ्यावाईट गोष्टी, त्यानें राजनीतींत केलेले प्रमाद, त्यानें हिंदु लोकांचा केलेला छल व त्यांनीं केलेला प्रतीकार, त्यानें केलेल्या चुक्यांचा योग्य फायदा घेऊन छत्रपति शिवाजी महाराज यांनीं घातलेला मराठी राज्याचा खंबीर पाया, मोंगलांचे राज्यास लागलेली उतरती कळा, औरंगजेबाचा पडता काळ, मराठ्यांचा उदय, इत्यादि गोष्टींचें या पुस्तकांत यथाशक्ति विवेचन केलें आहे.

ह्या पुस्तकास ' **औरंगजेब बादशाहाचें चरित्र—उत्तरभाग** ' असें जरी नांव दिलें आहे, तरी त्या बादशाहाचें वास्तविक सर्व चरित्र याच भागांत आलें असून ' पूर्वभाग ' हें या संबंधाचें एक उपोद्घातरूप प्रकरण आहे असें म्हटलें तरी चालेल.

या चरित्राचा हा उत्तरभाग इतका लौकर प्रसिद्ध झाला

नसता. परंतु गेल्या नवंबर महिन्यांत श्रीमंत राजराजेश्वर **सयाजीराव महाराज गायकवाड**, जी. सी. एस्. आय्., सेनाखासखेल समशेरबहादर, यांची स्वारी पुणें मुक्कामीं आली होती तेव्हां या चरित्राचा पूर्वभाग त्यांचे अवलोकनांत आला, व त्या वेळीं हा संपूर्ण ग्रंथ प्रसिद्ध करण्याविषयीं त्यांनीं मला स्वदस्तुरचा लेखी हुकूम दिला, त्यामुळेंच हा भाग मला इतका लौकर छापून प्रसिद्ध करतां आला; तेव्हां याचें सर्व श्रेय श्रीमंत महाराज सरकार यांसच दिलें पाहिजे.

आजकाल आमचे एकंदर राजेरजवाडे पाहूं गेलें तर त्या सर्वांत, मराठी भाषेंत होणाऱ्या हजारों ग्रंथांस आपला उदार आश्रय देऊन, व स्वतः पुष्कळ उपयुक्त ग्रंथ प्रसिद्ध करून या भाषेंत उपयुक्त ज्ञानाचा सांठा करून तिला ऊर्जित दशेस आणण्याचें अत्यंत स्तुत्य काम एक फक्त **बडोदें सरकारच** करीत आहे, असें म्हटलें तर केवळ धाडस होईल असें वाटत नाहीं.

बडोदें सरकारानें आजपर्यंत प्रसिद्ध केलेल्या ग्रंथ-मालेवरून श्री० सरकार **सयाजीराव महाराज** यांस ऐतिहासिक ग्रंथांची विशेष अभिरुचि आहे असें दिसतें. त्यांनीं ग्रंथकर्त्यास दिलेल्या आपल्या पत्रांत ते असें लिहितात कीं, " ऐतिहासिक पुस्तकें कोण-त्याही देशास विशेष उपयोगाचीं असतात. हिंदुस्था-नास तीं तर फारच महत्त्वाचीं आहेत. " वरील दोन ओळींच्या सत्यतेबद्दल ज्यास्त कांहीं लिहिलें पाहिजे असें वाटत

हीं. याकरितां आमचे इतर राजेरजवाडेही बडोदें सरकारा-
प्रमाणेंच, मराठी भाषेंत निरनिराळ्या विषयांवर उप-
युक्त ग्रंथ, व विशेषतः आमच्या **हिंदुस्थानच्या** संबंधाचे
ऐतिहासिक ग्रंथ, यांस उत्तेजन देऊन स्वभाषेस तिच्या
इच्छेनाप्रमाणें वस्त्राभरणें घालून तिचें कोड पुरवितील, व
या कामीं त्या सरकारानें घालून दिलेल्या स्तुत्य मार्गाचें
अवलंबन करितील अशी आशा आहे.

हें चरित्र अर्पण करण्याविषयीं श्रीमंत सरकार **सयाजी-
राव महाराज** यांनीं आपली परवानगी दिली याबद्दल
ग्रंथकर्ता त्यांचा अतिशय आभारी आहे.

ग्रंथप्रकाशनाचे कामीं आमचे मित्र रा० रा० हरि
कृष्ण दामले यांनीं वेळोवेळीं कांहीं उपयुक्त सूचना केल्या
त्यांबद्दल ग्रंथकर्ता त्यांचाही फार आभारी आहे.

**चिंतामण गंगाधर गोगटे.**

नसता. परंतु गेल्या नवंबर महिन्यांत श्रीमंत राजराजेश्वर **सयाजीराव महाराज गायकवाड**, जी. सी. एस्. आय्., सेनाखासखेल समशेरबहादर, यांची स्वारी पुणें मुक्कामीं आली होती तेव्हां या चरित्राचा पूर्वभाग त्यांचे अवलोकनांत आला, व त्या वेळीं हा संपूर्ण ग्रंथ प्रसिद्ध करण्याविषयीं त्यांनीं मला स्वदस्तुरचा लेखी हुकूम दिला, त्यामुळेंच हा भाग मला इतका लौकर छापून प्रसिद्ध करतां आला; तेव्हां याचें सर्व श्रेय श्रीमंत महाराज सरकार यांसच दिलें पाहिजे.

आजकाल आमचे एकंदर राजेरजवाडे पाहूं गेलें तर त्या सर्वांत, मराठी भाषेंत होणाऱ्या हजारों ग्रंथांस आपला उदार आश्रय देऊन, व स्वतः पुष्कळ उपयुक्त ग्रंथ प्रसिद्ध करून या भाषेंत उपयुक्त ज्ञानाचा सांठा करून तिला ऊर्जित दशेस आणण्याचें अत्यंत स्तुत्य काम एक फक्त **बडोदें सरकारच** करीत आहे, असें म्हटलें तर केवळ धाडस होईल असें वाटत नाहीं.

बडोदें सरकारानें आजपर्यंत प्रसिद्ध केलेल्या ग्रंथ-मालेवरून श्री० सरकार **सयाजीराव महाराज** यांस ऐतिहासिक ग्रंथांची विशेष अभिरुचि आहे असें दिसतें. त्यांनीं ग्रंथकर्त्यास दिलेल्या आपल्या पत्रांत ते असें लिहितात कीं, " ऐतिहासिक पुस्तकें कोण-त्याही देशास विशेष उपयोगाचीं असतात. हिंदुस्था-नास तीं तर फारच महत्त्वाचीं आहेत." वरील दोन ओळींच्या सत्यतेबद्दल ज्यास्त कांहीं लिहिलें पाहिजे असें वाटत

नाहीं. याकरितां आमचे इतर राजेरजवाडेही बडोदें सरकाराप्रमाणेंच, मराठी भाषेंत निरनिराळ्या विषयांवर उपयुक्त ग्रंथ, व विशेषतः आमच्या हिंदुस्थानच्या संबंधाचे ऐतिहासिक ग्रंथ, यांस उत्तेजन देऊन स्वभाषेस तिच्या मनाप्रमाणें वस्त्राभरणें घालून तिचें कोड पुरवितील, व या कामीं त्या सरकारानें घालून दिलेल्या स्तुत्य मार्गाचें अवलंबन करितील अशी आशा आहे.

हें चरित्र अर्पण करण्याविषयीं श्रीमंत सरकार **सयाजीराव महाराज** यांनीं आपली परवानगी दिली याबद्दल ग्रंथकर्ता त्यांचा अतिशय आभारी आहे.

ग्रंथप्रकाशनाचे कामीं आमचे मित्र रा॰ रा॰ हरिकृष्ण दामले यांनीं वेळोवेळीं कांहीं उपयुक्त सूचना केल्या त्यांबद्दल ग्रंथकर्ता त्यांचाही फार आभारी आहे.

**चिंतामण गंगाधर गोगटे.**

ग्रंथालय

# औरंगजेब बादशाहाचें चरित्र.

## उत्तरभाग[1].

## प्रकरण पहिलें.

### उपोद्घात.

औरंगजेबाचें जन्म व त्याची बालवयांतील हकीकत.–त्याचें शिक्षण.–त्याची दक्षिणच्या सुभेदारीवर प्रथमतः नेमणूक.–शहाजहान त्यास बल्क व बदकशान प्रांत हे घेण्याकरितां पाठवून देतो, व त्या स्वारीची हकीकत.–शहाजहान त्यास कंदाहार प्रांत घेण्याकरितां पाठवून देतो.–वर सांगितलेल्या मोहिमांपासून झालेला औरंगजेबाचा फायदा.–शहाजहान आपल्या पुत्रांस निरनिराळ्या सुभ्यांवर पाठवून देतो.–तो अजारी पडतो.–त्याच्या पुत्रांत जी लढाई झाली तिचा शेवट.

दिल्लीचा जगद्विख्यात बादशाहा अलमगीर (जगज्जेता) ऊर्फ औरंगजेब याचें जन्म ता० ४ नवंबर इ० स० १६१८[2]

---

१ या ग्रंथाचे पूर्वभागास "औरंगजेब बादशाहाचें चरित्र, पूर्वभाग" असें नांव दिलें आहे, तरी या बादशाहाचें वास्तविक चरित्र या उत्तरभागांतच आलेलें आहे. पूर्वभाग हें याच्या संबंधाचें एक निराळेंच प्रकरण आहे, असें म्हटल्यास हरकत नाहीं.

२ हा सन डा० हंटर यांच्या ग्रंथाच्या आधारानें दिला आहे. बरनीर साहेबांनीं औरंगजेब इ०स०१६१९ त जन्मला असें आपल्या ग्रंथांत दिलें आहे, व या ग्रंथाच्या पूर्वभागांत तोच सन दिलेला आहे.

रोजीं माळवा प्रांताच्या सीमेवर बडोदें व उज्जनी यांचे दरम्यान दूध या गांवीं झालें. त्या वेळीं अकबर बादशाहाचा पुत्र जहांगीर हा दिल्लीच्या तख्तातर असून त्याचा पुत्र व आमच्या चरित्रनायकाचा पिता शहाजहान हा दक्षिणच्या सुभेदारीवर होता. इ० स० १६२१ त शहाजहान यानें आपल्या पित्याविरुद्ध बंड केल्यामुळें, त्यास तेलंगण प्रांतांत पळून जावें लागलें. पुढें तो आपल्या पित्यास शरण गेला, तेव्हां जहांगीर यानें त्याला पुनः दक्षिणची सुभेदारी दिली. परंतु त्यास त्या वेळीं त्याचा ज्येष्ठ पुत्र दारा व तृतीय पुत्र औरंगजेब या दोघांस जहांगीर याजकडे ओलीदाखल पाठवावें लागलें. त्या वेळीं औरंगजेबाचें वय फक्त ६ वर्षांचें होतें. पुढें दोन वर्षेंपर्यंत तो नूरजहान राणीच्या ताब्यांत एखाद्या कैद्याप्रमाणें होता. त्याच्या बालवयांतील हकीकत फारशी उपलब्ध नाहीं. इ० स० १६२७ त शहाजहान दिल्लीच्या तख्तावर बसल्यामुळें औरंगजेबाची नूरजहान हिच्या कैदेंतून मुक्तता झाली. त्या वेळीं त्याचें वय सुमारें नऊ वर्षांचें होतें. पुढें तो सतरा वर्षांचा होईपर्यंत त्याचे संबंधानें कांहीं माहिती मिळत नाहीं. तो सतरा वर्षांचा झाल्यावर, म्हणजे इ० स० १६३६ त, शहाजहान बादशाहानें त्यास प्रथमतः दक्षिणच्या सुभेदारीवर नेमिलें. परंतु त्यास त्या वेळीं राज्यकारभाराचें मुळींच ज्ञान नसून तो फक्त नांवाचा सुभेदार होता.

औरंगजेबास बालपणीं अगदीं साधारण प्रतीचें शिक्षण मिळालें होतें. त्याला कुराण मुखोद्गत येत होतें, व आरबी व फारशी या भाषांचें फार चांगलें ज्ञान झालें होतें; तसेंच तो फारशी भाषेंत उत्कृष्ट ‘बैत’ म्हणजे कवनें रचीत असे. औरंगजेब मोठा झाल्यावर त्यास आपल्याला

लहानपणीं वरिष्ठ प्रतीचें शिक्षण मिळालें नाहीं म्हणून फार वाईट वाटत असे.

औरंगजेबास प्रथमतः दक्षिणच्या सुभेदारीवर नेमिलें, त्या वेळीं त्यास राज्यकारभार चालविण्याचें फारसें ज्ञान नव्हतें हें खरें; पण तो अतिशय हूड, चपळ, व बुद्धिमान् असल्यामुळें, व अल्प वयांत एवढा मोठा अधिकार त्यास प्राप्त झाल्यामुळें, त्याच्या मनांत हळू हळू महत्त्वाकांक्षेचें वारें शिरूं लागलें. आपण या जगांत कांहीं तरी महत्त्वाची कामगिरी बजाविण्याकरितां निर्माण झालों आहों, अशी त्याची लहानपणापासून समजूत झाली होती; व पुढें त्याचे अनावर मनांत कल्पनेचे अचाट तरंग उत्पन्न होऊन त्यानें जीं मोठमोठीं कारस्थानें केलीं, त्यांना तरी ही वर सांगितलेली समजूतच कारणीभूत झालेली होती. पुढें त्याचे मनांत काय आलें असेल तें असो; परंतु इ० स० १६४३ त, म्हणजे आपल्या वयाच्या सुमारें पंचविसाव्या वर्षी, तो प्रपंचाचा त्याग करून परमार्थांत शिरला, व पश्चिमघाटांत एका एकांतस्थळीं परमेश्वराची ध्यानधारणा करण्याकरितां जाऊन बसला. आपण कोणतेंही कृत्य केलें, तरी त्यास पारमार्थिक रूप येऊन त्यावर लोकांचा विश्वास बसावा, व आपणाविषयीं त्यांचे मनांत पूज्यबुद्धि उत्पन्न व्हावी, असा कावा साधण्याकरितां औरंगजेबानें बुद्धिपुरस्सर हें कृत्य केलें होतें, असें पुष्कळ इतिहासकर्त्यांचें मत आहे. शहाजहान यास ही गोष्ट कळली, तेव्हां त्याला औरंगजेबाचा अतिशय राग आला. त्यानें त्याचा तनखा बंद केला, त्याची पदवी काढून घेतली, त्याची चीजवस्त जप्त केली, व दक्षिणच्या सुभेदारीवरून त्यास दूर केलें. पुढें सुमारें एक वर्ष झाल्यावर त्यानें ती परमार्थवृत्ति टाकून

दिली, व तो पुनः प्रपंचांत शिरला. नंतर शहाजहान यानें त्यास गुजराथच्या सुभेदारीवर नेमिलें. यानंतर शहाजहान याचे कारकीर्दीत ज्या लढाया झाल्या, त्यांत औरंगजेब प्रमुख असून, त्यांत त्याचें शौर्य, धाडस, मनोनिग्रह, धूर्तता इत्यादि गुणांविषयीं त्याची फार प्रसिद्धि झाली. इ० स० १६४७ च्या फेब्रुवारी महिन्यांत शहाजहान बादशाहानें त्याच्या हाताखालीं पंधरा हजार पायदळ, दहा हजार स्वार, व शिवाय मोठा तोफखाना देऊन त्यास हिंदुकूश पर्वताच्या वायव्येस बल्क व बदकशान या प्रांतांत मोंगलांचा कायमचा अंमल बसविण्याकरितां पाठवून दिलें. हे प्रांत इ० स० १६४५ त मुराद व अलीमर्दान नांवाचा सरदार यांनीं उसबेग किंवा तार्तार[1] लोकांकडून घेतले होते. परंतु त्या वेळीं मोंगलांचा तेथें चांगलासा अंमल बसला नव्हता.

वरील प्रांत हिंदुस्थानापासून फार दूर व केवळ डोंगराळ असून मध्यंतरीं हिंदुकूश पर्वत असल्यामुळें व हिंवाळ्यांत त्या प्रदेशांत अतिशय बर्फ पडत असल्यामुळें तिकडे जातां येत नसे; त्याचप्रमाणें तिकडील बेबंद लोकांच्या निरनिराळ्या टोळ्या त्या मुलखास वारंवार अतिशय त्रास देत असत; या सर्व गोष्टी मनांत आणून लढाईचे भरीस न पडतां औरंगजेबानें मोठ्या शहाणपणानें उसबेगच्या राजाशीं तह केला, व अशा रीतीनें रक्तपात न करितां युक्तीनें आपला कार्यभाग उरकून घेऊन तो ऐन हिंवाळ्याच्या तोंडीं हिंदुस्थानांत परत येण्याकरितां निघाला. परंतु वाटेंत त्याचे फार हाल झाले; तिकडील डोंगरांतील लुटारू लोक त्याच्या सैन्यासभोंवार घिरट्या घालूं लागले; ते त्याच्या पिछाडीवर छापे घालून जो कोणी त्यांचे हातीं

१ तार्तरी देशास पूर्वी उसबेग असें म्हणत असत.

न- ६५९

लागे, त्यास कापून टाकूं लागले; त्यांनीं त्याच्या सैन्यापैकीं पुष्कळ शूर रजपूत लोकांस ठार मारिलें; त्याचें जें सामानसुमान त्यांस मिळे तें उंच उंच कड्यांवरून ते खालीं ढकलून देऊं लागले; हजारी नांवाचे डोंगरी लोक घाटांतील अरुंद वाटांत छपून बसून त्याला अतिशय त्रास देऊं लागले; व अशा भयंकर प्रसंगीं हिंदुकुश पर्वतांत सतत पांच दिवस बर्फ पडून वाटाही बंद पडल्या. फक्त बर्फ व थंडी यांच्या योगानें त्या वेळीं त्याचे पांच हजार लोक मरण पावले, व हत्ती, घोडे, उंट, बैल वगैरे जनावरें किती मेलीं, याची तर गणतीच नाहीं ! इतका नाश होऊन स्वारीखर्च म्हणून दोन कोट रुपयांचा चुराडा झाला तो निराळाच. शेवटीं मोठ्या कष्टानें तो काबूल येथें येऊन पोहोंचला.

इ० स० १६३७ त कंदाहार प्रांत मोंगलांचे अमलाखालीं आला होता. पुढें इ० स० १६४८ त इराणी लोकांनीं कंदाहार शहरास वेढा दिला. तेव्हां शहाजहान बादशाहानें राजा जयसिंग व सय्यद अल्ला अलामी या दोन सरदारांच्या हाताखालीं साठ हजार घोडेस्वार, दहा हजार पायदळ, व जंगी तोफखाना देऊन व त्या सर्वांवर औरंगजेबास मुख्य नेमून कंदाहारास पाठवून दिलें. परंतु तें सैन्य काबुलास येऊन पोहोंचण्यापूर्वींच इराणी लोकांनीं कंदाहार शहर काबीज केलें होतें. पुढें औरंगजेबानें कंदाहारास जाऊन वेढा दिला, व इ० स० १६४९ च्या मे महिन्यांत त्या शहरावर आपला तोफखाना सुरू केला. सुमारें चार महिनेपर्यंत ती लढाई मोठ्या जारीनें चालू होती; परंतु पुढें हिंवाळा येऊन ठेपल्यामुळें, व पूर्वीं एकदां तिकडील हिंवाळ्याचा चांगलाच अनुभव आल्यामुळें, तो

दिली, व तो पुनः प्रपंचांत शिरला. नंतर शहाजहान यानें त्यास गुजराथच्या सुभेदारीवर नेमिलें. यानंतर शहाजहान याचे कारकीर्दीत ज्या लढाया झाल्या, त्यांत औरंगजेब प्रमुख असून, त्यांत त्याचें शौर्य, धाडस, मनोनिग्रह, धूर्तता इत्यादि गुणांविषयीं त्याची फार प्रसिद्धि झाली. इ० स० १६४७ च्या फेब्रुवारी महिन्यांत शहाजहान बादशाहानें त्याच्या हाताखालीं पंधरा हजार पायदळ, दहा हजार स्वार, व शिवाय मोठा तोफखाना देऊन त्यास हिंदुकूश पर्वताच्या वायव्येस बल्क व बदकशान या प्रांतांत मोंगलांचा कायमचा अंमल बसविण्याकरितां पाठवून दिलें. हे प्रांत इ० स० १६४६ त मुराद व अल्लीमर्दान नांवाचा सरदार यांनीं उसबेग किंवा तार्तार[1] लोकांकडून घेतले होते. परंतु त्या वेळीं मोंगलांचा तेथें चांगलासा अंमल बसला नव्हता.

वरील प्रांत हिंदुस्थानापासून फार दूर व केवळ डोंगराळ असून मध्यंतरीं हिंदुकूश पर्वत असल्यामुळें व हिंवाळ्यांत त्या प्रदेशांत अतिशय बर्फ पडत असल्यामुळें तिकडे जातां येत नसे; त्याचप्रमाणें तिकडील बेबंद लोकांच्या निरनिराळ्या टोळ्या त्या मुलखास वारंवार अतिशय त्रास देत असत; या सर्व गोष्टी मनांत आणून लढाईचे भरीस न पडतां औरंगजेबानें मोठ्या शहाणपणानें उसबेगच्या राजाशीं तह केला, व अशा रीतीनें रक्तपात न करितां युक्तीनें आपला कार्यभाग उरकून घेऊन तो ऐन हिंवाळ्याच्या तोंडीं हिंदुस्थानांत परत येण्याकरितां निघाला. परंतु वाटेंत त्याचे फार हाल झाले; तिकडील डोंगरांतील लुटारू लोक त्याच्या सैन्यासभोंवार घिरट्या घालूं लागले; ते त्याच्या पिछाडीवर छापे घालून जो कोणी त्यांचे हातीं

---

१ तार्तरी देशास पूर्वी उसबेग असें म्हणत असत.

वी. ६५६



लागे, त्यास कापून टाकूं लागले; त्यांनीं त्याच्या सैन्यापैकीं पुष्कळ शूर रजपूत लोकांस ठार मारिलें; त्याचें जें सामानसुमान त्यांस मिळे तें उंच उंच कड्यांवरून ते खालीं ढकलून देऊं लागले; हजारी नांवाचे डोंगरी लोक घाटांतील अरुंद वाटांत छपून बसून त्याला अतिशय त्रास देऊं लागले; व अशा भयंकर प्रसंगीं हिंदुकूश पर्वतांत सतत पांच दिवस बर्फ पडून वाटाही बंद पडल्या. फक्त बर्फ व थंडी यांच्या योगानें त्या वेळीं त्याचे पांच हजार लोक मरण पावले, व हत्ती, घोडे, उंट, बैल वगैरे जनावरें किती मेलीं, याची तर गणतीच नाहीं! इतका नाश होऊन स्वारीखर्च म्हणून दोन कोट रुपयांचा चुराडा झाला तो निराळाच. शेवटीं मोठ्या कष्टानें तो काबूल येथें येऊन पोहोंचला.

इ० स० १६३७ त कंदाहार प्रांत मोंगलांचे अमलाखालीं आला होता. पुढें इ० स० १६४८ त इराणी लोकांनीं कंदाहार शहरास वेढा दिला. तेव्हां शहाजहान बादशाहानें राजा जयसिंग व सय्यद अल्ला अलामी या दोन सरदारांच्या हाताखालीं साठ हजार घोडेस्वार, दहा हजार पायदळ, व जंगी तोफखाना देऊन व त्या सर्वांवर औरंगजेबास मुख्य नेमून कंदाहारास पाठवून दिलें. परंतु तें सैन्य काबुलास येऊन पोहोंचण्यापूर्वीच इराणी लोकांनीं कंदाहार शहर काबीज केलें होतें. पुढें औरंगजेबानें कंदाहारास जाऊन वेढा दिला, व इ० स० १६४९ च्या मे महिन्यांत त्या शहरावर आपला तोफखाना सुरू केला. सुमारें चार महिनेपर्यंत ती लढाई मोठ्या जारीनें चालू होती; परंतु पुढें हिंवाळा येऊन ठेपल्यामुळें, व पूर्वीं एकदां तिकडील हिंवाळ्याचा चांगलाच अनुभव आल्यामुळें, तो

कंदाहाराचा वेढा उठवून काबुलास परत आला. इ० स० १६५२ त शहाजहान बादशाहानें कंदाहार घेण्याकरितां पुनः औरंगजेबास पाठवून दिलें; परंतु शत्रूंनीं कंदाहारास जाण्याचे सर्व रस्ते रोंखून धरल्यामुळें, औरंगजेबाचा त्या प्रांतांत शिरकावच झाला नाहीं; व तीन महिनेपर्यंत धडपड करून शेवटीं त्यास ती मोहीम सोडून हिंदुस्थानांत परत यावें लागलें.

वरील मोहिमांपासून शहाजहान बादशाहाचा कांहींच फायदा झाला नाहीं; इतकेंच नव्हे, तर त्याचें उलट अतिशय नुकसान झालें, हें सहजच ध्यानांत येईल. परंतु औरंगजेबाचा मात्र त्यांच्या योगानें अतिशय फायदा झाला. बादशाही सैन्य व सरदार त्याचे हाताखालीं असल्यामुळें त्याची व सैन्यांतील मोठमोठ्या अधिकाऱ्यांची चांगली वग पडली, व त्याचें धैर्य, शौर्य, साहस इत्यादि गुण पाहून शिपाई लोकांस तो फार आवडूं लागला. एकदां तो उसबेगच्या लोकांशीं लढत असतां, व लढाई अगदीं हातघाईवर आली असतां, संध्याकाळचा नमाज पढावयाची वेळ झाली. त्या वेळीं औरंगजेब मोठ्या धिमेपणानें आपल्या घोड्यावरून खालीं उतरला, व अगदीं शांतपणें नमाज पढला; आणि तें सर्व कृत्य यथासांग आटोपल्यावर घोड्यावर बसून तो पुनः युद्धाच्या गर्दींत शिरला. त्या वेळीं एकंदर सैन्यास त्याचें मोठें कौतुक वाटलें, व शहाजहान बादशाहाचे पुत्रांत गादीला योग्य असा एक औरंगजेब आहे, असें जो तो ह्मणूं लागला.

पुढें दारा, सुजा, औरंगजेब व मुराद यांचें एकमेकांशीं पटत नाहीं असें पाहून शहाजहान बादशाहानें ती भांडणाची कळ मिटविण्याकरितां त्या चौघांस निरनिराळे

सुभे सांगून बाहेर घालवून दिलें. त्या वेळीं (इ० स० १६५९) औरंगजेबास पुनः दक्षिणचा सुभेदार नेमिलें. पूर्वी इ० स० १६३६ त त्यास प्रथम दक्षिणची सुभेदारी दिली होती, त्या वेळेची त्याच्या मनाची स्थिति, व पुनः इ० स० १६५९ त त्याची नेमणूक झाली, त्या वेळेची स्थिति, यांच्यामध्यें महदंतर पडलें होतें. औरंगजेबास या वेळीं आपली खरी स्थिति कळूं लागली होती; तसेंच पुढील मोठ्या राजकारस्थानाचा पाया तो मनांत रचूं लागला होता; व आपला पक्ष जोरांत आणण्याकरितां त्याचे अव्याहत प्रयत्न सुरू झाले होते. याच वेळेच्या सुमारास गोवळकोंड्याचा राजा व त्याचा प्रधान मीर जुमला यांचेमध्यें बेबनाव होऊन मीर जुमला औरंगजेबास येऊन मिळाला. मीर जुमल्यासारखा शूर, कारस्थानी, हिंदु लोकांचा पूर्ण द्वेष्टा, शहाणा, व संपत्तिमान् असा पुरुष औरंगजेबास येऊन मिळाल्यामुळें त्याचें निमें काम झाल्यासारखें झालें. या संबंधाचा, व पुढें शहाजहान अजारी पडल्यामुळें पादशाहीपद प्राप्त करून घेण्याकरितां दारा, सुजा, औरंगजेब व मुराद यांचेमध्यें जी लढाई झाली तिचा सविस्तर वृत्तांत पूर्वभागांत दिलाच आहे.

---

१ मीर जुमला गोवळकोंड्याच्या राजाचा प्रधान असतां त्यानें करनाटकावर स्वारी करून हिंदूंच्या हजारों देवालयांचा विध्वंस करून टाकला होता; तसेंच त्यांच्यावर जुलूम करून व त्यांचीं देवस्थानें लुटून त्यानें अगणित द्रव्य मिळविलें होतें.

# प्रकरण दुसरें.

## इ० स० १६५८ पासून इ० स० १६६२ पर्यंत.

औरंगजेबाचे कारकीर्दीचा आरंभ कोठपासून धरावा.—परराष्ट्रांतून त्याच्याकडे आलेले वकील.—औरंगजेब अजारी पडतो.—मोअजीम व रोषनार बेगम आपापल्या वतीनें अमीरउमराव मंडळीस वश करण्याचा प्रयत्न करतात.—औरंगजेबाची भयंकर स्थिति, व त्याचें विलक्षण मानसिक धैर्य.—त्यास आराम पडतो, व त्याचा पुत्र अकबार याचें दाराच्या मुलीशीं लग्न करून देण्याचा त्याचा विचार.—प्रख्यात मयूरासनास ज्यास्त भाग जोडण्याची त्याची इच्छा.—मीर जुलमा बंगाल प्रांत काबीज करितो.—त्याची आसामावर स्वारी.—त्याचा मृत्यु.—त्याचे संबंधानें औरंगजेबाचा झालेला ग्रह.—शाहिस्तेखान याची बंगालच्या सुभेदारीवर नेमणूक.—महाराष्ट्रदेश, व मराठ्यांची पूर्वपीठिका.—शिवाजीचा उदय.—त्याचें बालपण.—पुणें प्रांताची स्थिति.—शिवाजी विजापुरकरांचे किल्ले घेतो.—तो मोंगलांचे मुलखावर प्रथमतः स्वारी करितो.—शहाजहान अजारी पडल्यामुळें औरंगजेब शिवाजीशीं तह करितो.—अफजुलखान व त्याचा मृत्यु.—शिवाजी विजापुरकरांचा मुलूख घेतो.—तो रेडी किल्ल्यास रायगड असें नांव देऊन ती आपली राजधानी करतो.—इतक्या अवधींत औरंगजेब आपल्या बंधूंचें निर्दलन करितो.

सामूगड[1] येथील रणभूमीवर दाराचें दुर्दैव त्याच्या मार्गांत आडवें पडल्यामुळें त्याचा पराभव होऊन, औरंगजेबास आकस्मिक जय प्राप्त झाल्यावर तीन दिवसांनीं तो आग्र्यास आला, व त्यानें तें शहर आपल्या ताब्यांत

---

१ या लढाईचा सविस्तर वृत्तांत पूर्वभागांत दिलेला आहे.

घेतलें. दरबारांतील बहुतेक अमीरउमराव व मानकरी लोक त्यास अगोदरच येऊन मिळाल्यामुळें तें शहर हातीं येण्यास त्यास मुळींच श्रम पडले नाहींत. त्या दिवसापासून तो आपणास ' बादशाहा ' असें समजूं लागला. परंतु त्याला मुराद याची वाट लावावयाची होती, म्हणून त्यानें आपल्या नांवाची त्या वेळीं द्वाही फिरविली नाहीं. नंतर दाराचा पाठलाग करण्याकरितां म्हणून त्यानें मुराद यास बरोबर घेतलें, व मार्गांत मथुरा येथें त्यास यथेच्छ दारू पाजून तो बेशुद्ध पडला असतां त्यास कैद केलें. नंतर दिल्लीस आल्यावर ता० २० आगष्ट इ० स० १६५८ रोजीं त्यानें आपल्या नांवाची द्वाही फिरविली. परंतु पुढें सुमारें एक वर्षभर त्यानें बादशाही शिक्क्यावर आपलें नांव घातलें नाहीं, किंवा बादशाही मुकुटही धारण केला नाहीं, त्यामुळें त्याच्या कारकीर्दीचा प्रारंभ केव्हांपासून धरावा, या संबंधानें बराच गोंधळ झालेला आहे. परंतु ज्या अर्थी त्यानें तारीख २० आगष्ट इ० स० १६५८ रोजीं आपण बादशाहा झालों अशी प्रसिद्धपणें द्वाही फिरविली होती, त्या अर्थी त्याच दिवसापासून त्याच्या कारकीर्दीस प्रारंभ झाला असें मानणें आमचें मतें सयुक्तिक दिसतें.

बादशाही पद प्राप्त झाल्यावर आपला अधिकार दृढ करण्याकरितां प्रथमतः त्यानें आपल्या कुलाचा संहार आरंभिला, व इ० स० १६६१ पर्यंत, ज्यांचा ज्यांचा म्हणून राज्यावर हक्क पोहोंचत होता त्या सर्वांस युक्तिप्रयुक्तीनें ठार मारून, व आपल्या पित्यास मोठ्या बंदोबस्तानें कैदेंत ठेवून तो गृहकलहांतून मोकळा झाला. हा सविस्तर इतिहास पूर्वभागांत आलाच आहे.

नंतर समरकंद व बल्क येथील खानांनीं औरंगजेबास

कंदाहाराचा वेढा उठवून काबुलास परत आला. इ० स० १६५२ त शहाजहान बाहशाहानें कंदाहार घेण्याकरितां पुनः औरंगजेबास पाठवून दिलें; परंतु शत्रूंनीं कंदाहारास जाण्याचे सर्व रस्ते रोंखून धरल्यामुळें, औरंगजेबाचा त्या प्रांतांत शिरकावच झाला नाहीं; व तीन महिनेपर्यंत धडपड करून शेवटीं त्यास ती मोहीम सोडून हिंदुस्थानांत परत यावें लागलें.

वरील मोहिमांपासून शहाजहान बादशाहाचा कांहींच फायदा झाला नाहीं; इतकेंच नव्हे, तर त्याचें उलट अतिशय नुकसान झालें, हें सहजच ध्यानांत येईल. परंतु औरंगजेबाचा मात्र त्यांच्या योगानें अतिशय फायदा झाला. बादशाही सैन्य व सरदार त्याचे हाताखालीं असल्यामुळें त्याची व सैन्यांतील मोठमोठ्या अधिकाऱ्यांची चांगली वग पडली, व त्याचें धैर्य, शौर्य, साहस इत्यादि गुण पाहून शिपाई लोकांस तो फार आवडूं लागला. एकदां तो उसबेगच्या लोकांशीं लढत असतां, व लढाई अगदीं हातघाईवर आली असतां, संध्याकाळचा नमाज पढावयाची वेळ झाली. त्या वेळीं औरंगजेब मोठ्या धिमेपणानें आपल्या घोड्यावरून खालीं उतरला, व अगदीं शांतपणें नमाज पढला; आणि तें सर्व कृत्य यथासांग आटोपल्यावर घोड्यावर बसून तो पुनः युद्धाच्या गर्दीत शिरला. त्या वेळीं एकंदर सैन्यास त्याचें मोठें कौतुक वाटलें, व शहाजहान बादशाहाचे पुत्रांत गादीला योग्य असा एक औरंगजेब आहे, असें जो तो ह्मणूं लागला.

पुढें दारा, सुजा, औरंगजेब व मुराद यांचें एकमेकांशीं पटत नाहीं असें पाहून शहाजहान बादशाहानें तीं भांडणाची कळ मिटविण्याकरितां त्या चौघांस निरनिराळे

सुभे सांगून बाहेर घालवून दिलें. त्या वेळीं (इ० स० १६५५) औरंगजेबास पुनः दक्षिणचा सुभेदार नेमिलें. पूर्वी इ० स० १६३६ त त्यास प्रथम दक्षिणची सुभेदारी दिली होती, त्या वेळेची त्याच्या मनाची स्थिति, व पुनः इ० स० १६५५ त त्याची नेमणूक झाली, त्या वेळेची स्थिति, यांच्यामध्यें महदंतर पडलें होतें. औरंगजेबास या वेळीं आपली खरी स्थिति कळूं लागली होती; तसेंच पुढील मोठ्या राजकारस्थानाचा पाया तो मनांत रचूं लागला होता; व आपला पक्ष जोरांत आणण्याकरितां त्याचे अव्याहत प्रयत्न सुरू झाले होते. याच वेळेच्या सुमारास गोवळकोंड्याचा राजा व त्याचा प्रधान मीर जुमला यांचेमध्यें बेबनाव होऊन मीर जुमला औरंगजेबास येऊन मिळाला. मीर जुमल्यासारखा शूर, कारस्थानी, हिंदु लोकांचा पूर्ण द्वेष्टा, शहाणा, व संपत्तिमान् असा पुरुष औरंगजेबास येऊन मिळाल्यामुळें त्याचें निमें काम झाल्यासारखें झालें. या संबंधाचा, व पुढें शहाजहान अजारी पडल्यामुळें पादशाहीपद प्राप्त करून घेण्याकरितां दारा, सुजा, औरंगजेब व मुराद यांचेमध्यें जी लढाई झाली तिचा सविस्तर वृत्तांत पूर्वभागांत दिलाच आहे.

---

१ मीर जुमला गोवळकोंड्याच्या राजाचा प्रधान असतां त्यानें करनाटकावर स्वारी करून हिंदूंच्या हजारों देवालयांचा विध्वंस करून टाकला होता; तसेंच त्यांच्यावर जुलूम करून व त्यांचीं देवस्थानें लुटून त्यानें अगणित द्रव्य मिळविलें होतें.

# प्रकरण दुसरें.

## इ० स० १६५८ पासून इ० स० १६६२ पर्यंत.

औरंगजेबाचे कारकीर्दीचा आरंभ कोठपासून धरावा.—परराष्ट्रांतून त्याच्याकडे आलेले वकील.—औरंगजेब अजारी पडतो.—मोअजीम व रोषनार बेगम आपापल्या वतीनें अमीरउमराव मंडळीस वश करण्याचा प्रयत्न करतात.—औरंगजेबाची भयंकर स्थिति, व त्याचें विलक्षण मानसिक धैर्य.—त्यास आराम पडतो, व त्याचा पुत्र अकबार याचें दाराच्या मुलीशीं लग्न करून देण्याचा त्याचा विचार.—प्रख्यात मयूरासनास ज्यास्त भाग जोडण्याची त्याची इच्छा.—मीर जुलमा बंगाल प्रांत काबीज करितो.—त्याची आसामावर स्वारी.—त्याचा मृत्यु.—त्याचे संबंधानें औरंगजेबाचा झालेला ग्रह.—शाहिस्तेखान याची बंगालच्या सुभेदारीवर नेमणूक.—महाराष्ट्रदेश, व मराठ्यांची पूर्वपीठिका.—शिवाजीचा उदय.—त्याचें बालपण.—पुणें प्रांताची स्थिति.—शिवाजी विजापुरकरांचे किल्ले घेतो.—तो मोंगलांचे मुलखावर प्रथमतः स्वारी करितो.—शहाजहान अजारी पडल्यामुळें औरंगजेब शिवाजीशीं तह करितो.—अफजुलखान व त्याचा मृत्यु.—शिवाजी विजापुरकरांचा मुलूख घेतो.—तो रेडी किल्ल्यास रायगड असें नांव देऊन ती आपली राजधानी करतो.—इतक्या अवधींत औरंगजेब आपल्या बंधूंचें निर्दलन करितो.

सामूगड येथील रणभूमीवर[1] दाराचें दुर्दैव त्याच्या मार्गांत आडवें पडल्यामुळें त्याचा पराभव होऊन, औरंगजेबास आकस्मिक जय प्राप्त झाल्यावर तीन दिवसांनीं तो आग्र्यास आला, व त्यानें तें शहर आपल्या ताब्यांत

---

१ या लढाईचा सविस्तर वृत्तांत पूर्वभागांत दिलेला आहे.

घेतलें. दरबारांतील बहुतेक अमीरउमराव व मानकरी लोक त्यास अगोदरच येऊन मिळाल्यामुळें तें शहर हातीं येण्यास त्यास मुळींच श्रम पडले नाहींत. त्या दिवसापासून तो आपणास ' बादशाहा ' असें समजूं लागला. परंतु त्याला मुराद याची वाट लावावयाची होती, म्हणून त्यानें आपल्या नांवाची त्या वेळीं द्वाही फिरविली नाहीं. नंतर दाराचा पाठलाग करण्याकरितां म्हणून त्यानें मुराद यास बरोबर घेतलें, व मार्गांत मथुरा येथें त्यास यथेच्छ दारू पाजून तो बेशुद्ध पडला असतां त्यास कैद केलें. नंतर दिल्लीस आल्यावर ता० २० आगष्ट इ० स० १६५८ रोजीं त्यानें आपल्या नांवाची द्वाही फिरविली. परंतु पुढें सुमारें एक वर्षभर त्यानें बादशाही शिक्क्यावर आपलें नांव घातलें नाहीं, किंवा बादशाही मुकुटही धारण केला नाहीं, त्यामुळें त्याच्या कारकीर्दीचा प्रारंभ केव्हांपासून धरावा, या संबंधानें बराच गोंधळ झालेला आहे. परंतु ज्या अर्थी त्यानें तारीख २० आगष्ट इ० स० १६५८ रोजीं आपण बादशाहा झालों अशी प्रसिद्धपणें द्वाही फिरविली होती, त्या अर्थी त्याच दिवसापासून त्याच्या कारकीर्दीस प्रारंभ झाला असें मानणें आमचें मतें सयुक्तिक दिसतें.

बादशाही पद प्राप्त झाल्यावर आपला अधिकार दृढ करण्याकरितां प्रथमतः त्यानें आपल्या कुलाचा संहार आरंभिला, व इ० स० १६६१ पर्यंत, ज्यांचा ज्यांचा म्हणून राज्यावर हक्क पोहोंचत होता त्या सर्वांस युक्तिप्रयुक्तीनें ठार मारून, व आपल्या पित्यास मोठ्या बंदोबस्तानें कैदेंत ठेवून तो गृहकलहांतून मोकळा झाला. हा सविस्तर इतिहास पूर्वभागांत आलाच आहे.

नंतर समरकंद व बल्क येथील खानांनीं औरंगजेबास

त्याच्या राज्यारोहणाच्या संबंधानें आपला आनंद प्रदर्शित करण्याकरितां आपले वकील त्याच्या दरबारीं पाठविले. औरंगजेब त्या गोष्टीचें इंगित पूर्णपणें ओळखून होता. पूर्वी शहाजहान बादशाहाचे कारकीर्दीत समरकंद व बल्क येथील खानांमध्यें लढाई उपस्थित झाली होती, तेव्हां समरकंदच्या खानानें शहाजहान याजपाशीं मदत मागित-ल्यावरून त्यानें औरंगजेबास त्याचे मदतीस पाठवून दिलें होतें. त्या वेळीं औरंगजेबानें बल्क शहरास वेढा दिला, व तें शहर त्याचे हातीं आलेंच होतें. इतक्यांत बल्कच्या खानानें समरकंदच्या खानाशीं आंतून तह केला, व ते दोघे एकचित्त होऊन उलट एकट्या औरंगजेबावर उल-टून पडले, व त्यांनीं त्यास तेथून पिटाळून लाविलें. त्या वेळीं त्यांना आपण हा मोठा पुरुषार्थ केला असें वाटलें. परंतु पुढें औरंगजेब बादशाहा झाला असें त्यांस समज-ल्यावर, आतां तो आपली पाळेंमुळें खातरीनें खणून काढील अशी त्यांस भीति उत्पन्न होऊन, त्यांनीं त्यास खुश करण्याकरितां व आपणांवरचा त्याचा राग शांत करण्याकरितां बरोबर मोठमोठ्या देणग्या देऊन वर सांगि-तल्याप्रमाणें आपले वकील त्याचे दरबारीं पाठवून दिले होते. औरंगजेब मोठा धोरणी व समयानुसार वर्तन ठेवणारा पुरुष असल्यामुळें, त्यानें त्या वेळीं त्या देणग्यांचा मोठ्या आनंदानें स्वीकार करून आपण फार खुश झालों असें बोलून दाखविलें, व त्या वकिलांस शिरपाव ( पोषाग ) देऊन त्यांची मोठ्या थाटानें रवानगी केली. याच वेळीं इराण, मक्का व दुसऱ्या पुष्कळ देशांतून औरंगजेबाकडे वकील आले होते, त्यांचाही त्यानें योग्य रीतीनें आद-रसत्कार केला.



याच वेळेच्या सुमारास औरंगज़ेब तापानें फार अजारी पडला. पुढें त्यास घेऱ्या येऊं लागल्या, व त्याच्या जिव्हेस पक्षघात होऊन त्याची वाचा बंद झाली. तो त्या दुख-ण्यांतून जगेल असें कोणासही वाटत नव्हतें, व तो मेला अशी सुद्धां बाहेर वदंता उठली होती. त्या वेळीं आग्रा येथें निरनिराळ्या कंड्या पिकल्या होत्या. कोणी म्हणत कीं, गुजराथचा सुभेदार यशवंतसिंग बरोबर मोठी फौज घेऊन शहाजहान यास बंधमुक्त करण्याकरितां आग्र्याकडे येत आहे; कोणी म्हणत कीं, काबुलचा सुभेदार माहाबत-खान यानें जरी औरंगजेबाचें स्वामित्व कबूल केलें आहे, तरी तोही मोठी फौज घेऊन आग्र्यावर चाल करून येत आहे; कोणी म्हणत कीं, आग्र्याचे किल्ल्याचा अधिकारी इतबारखान हा शहाजहान यास कारागृहांतून सोडविण्याच्या विचारांत आहे; अशा रीतीनें ज्याला जें बरें वाटेल तें तो बहकूं लागला होता.

त्या वेळीं औरंगजेबाचा दुसरा पुत्र सुलतान मोअजीम हा अमीरउमराव लोकांस लांचलुचपती देऊन आपले पक्षास वश करून घेऊं लागला. तो एके दिवशीं रात्रीं वेश पालटून राजा जयसिंग याजकडे गेला, व त्यानें आपल्या पक्षास मिळावें म्हणून त्यानें त्याची प्रार्थना केली, व अशा रीतीनें स्वपक्षाच्या समर्थनार्थ त्यानें मोठ्या

---

१ औरंजेबाच्या या अजाराचे संबंधानें निरनिराळे लेख सांपड-तात, त्यामुळें तो अमुकच वर्षी अजारी पडला असें निश्चयानें सांगतां येत नाहीं. औरंगजेब इ० स० १६६२ त अजारी पडला, असें काफीखान म्हणतो, व तेंच वर्ष पुष्कळ अंशीं खरें असावें.

२ औरंगजेबानें आपल्या थोरल्या मुलास अगोदरच ग्वाल्हेरचे किल्ल्यांत कैदेंत ठेविलें होतें हें पूर्वभागांत सांगितलेंच आहे.

जारीनें प्रयत्न सुरू केला होता. उलट पक्षीं औरंगजेबाची बहीण रोषनार बेगम हिच्या मनांतून त्याचा तिसरा पुत्र सुलतान अकबर यास गादीवर बसवावयाचें होतें, तेव्हां तिनेंही पुष्कळ अमीरउमराव लोक व तोफखान्याचा सरदार फिदायखान यांस आपल्या पक्षास सामील करून घेतलें होतें. अकबर या वेळीं फक्त आठ वर्षांचा होता.

त्या वेळीं दोन्ही पक्षांकडील मंडळींनें, शहाजहान यास पुनः दिल्लीच्या गादीवर स्थापन करण्याकरितां आम्ही एवढा प्रयत्न करीत आहों, असा आपापल्या वर्तानें बहाणा केला होता. असें करण्यांत त्यांचा मुख्य हेतु असा होता कीं, शहाजहान याजवर संपूर्ण प्रजेची फार प्रीति असल्यामुळें ते लोक आपल्या पक्षास खुशीनें अनुकूल होतील, व तेणेंकरून आपल्या पक्षास ज्यास्त जोर येईल; व कदाचित् इतबारखानानें शहाजहान याची कारागृहांतून मुक्तता केलीच, तर आपल्या बहाण्यास आपोआप दुप्पट जोर येऊन आपलें गुप्त कारस्थान बाहेर न फुटतां त्या योगानें बादशाहाचीही मर्जी आपणावर सुप्रसन्न होईल. परंतु अमीरउमराव मंडळींत फक्त यशवंतसिंग, माहाबतखान, दानिषमनखान वगैरे फार थोडे मुत्सद्दी शिवाय करून बाकीच्यांस औरंगजेबानें आपल्याकडे पूर्णपणें सामील करून घेतलें असल्यामुळें, शहाजहान यास पुनः तख्तावर येण्याची मुळींच आशा नव्हती.

औरंगजेब इतका शरपंजरीं पडला होता, तरी तो आपला राज्यकारभार स्वतः पहात असे. बादशाहास कदाचित् कोणी बंधमुक्त करील, या भीतीनें त्यानें त्याच्यावर सक्त पहारा ठेविला होता. तसेंच त्यास नीट बंदोबस्तानें ठेवावें, म्हणून तो इतबारखान यास वारंवार पत्रें पाठवीत असे. 'माझा या दुखण्यांत अंत झालाच तर शहाजहान यास कैदेंतून मुक्त करावें,' असें त्यानें सुलतान मोअजीम यास सांगून ठेविलें होतें. त्याच्या दुखण्याच्या पांचव्या दिवशीं त्याची प्रकृति फारच बेताल झाली होती. तथापि त्या दिवशीं त्यानें आपणास दरबारांत घेऊन जावें अशी आपल्या नोकरांस आज्ञा केली. तसें करण्यांत त्याचा असा उद्देश होता कीं, आपण अद्यापि जिवंत आहों अशी लोकांची खातरी होऊन त्यांनीं शहाजहान यास कारागृहांतून सोडविण्याचा प्रयत्न करूं नये. त्याचें दुखणें विकोपास गेलें होतें तरी सातव्या, नवव्या, व दहाव्या दिवशीं त्यानें आपल्या अमीरउमराव लोकांचे मुजरे घेतले. तेराव्या दिवशीं त्यास प्रबल मूर्च्छा आली, व तो मेला असें पुष्कळांस वाटलें. परंतु जरा सावध होतांच आपण अद्यापि जिवंत आहों असें लोकांस समजण्याकरितां त्यानें जयसिंग आदीकरून दरबारांतील मुख्य मुख्य उमराव लोकांस बोलावून आणिलें, स्वहस्तें इतबारखानास एक पत्र लिहिलें, व प्रथमतः अजारी पडला त्या वेळीं त्यानें आपलें शिक्कामोर्तब मोहोरबंद करून रोषनार बेगम हिच्या स्वाधीन केलें होतें, तें तसेंच मोहोरबंद आहे किंवा नाहीं, याची खातरी करून घेण्याकरितां तें पाठवून देण्याविषयीं त्यानें तिला निरोप पाठविला. केवढा हा मनोनिग्रह ! काय हें मानसिक धैर्य !! औरंगजेब म्हणजे एक अद्वितीय पुरुष होऊन गेला यांत काडीमात्र शंका नाहीं. असो. यानंतर त्याच्या प्रकृतीस हळूहळू आराम पडत चालला.

औरंगजेबास चांगलें बरें वाटूं लागल्यावर त्याच्या मनांत दाराची मुलगी आग्र्याचे किल्ल्यांत शहाजहान व बेगमसाहेब यांच्याजवळ होती, तिचें आपला तृतीय पुत्र

सुलतान अकबर याच्याशीं लग्न करून द्यावें, असा विचार आला. त्याचे मनांत आपलेमागें आपली गादी अकबर यास मिळावी असें होतें. सुलतान महमद व सुलतान मोअजीम हे एका रजपूत राजकन्येच्या पोटीं झालेले होते, व अकबर हा मस्कतच्या पुरातन राजघराण्यांपैकीं शहानवाझखान नांवाचा एक पुरुष त्या वेळीं दिल्लीच्या दरबारीं होता, त्याच्या कन्येच्या पोटीं झाला होता. त्यामुळें तो राज्यपदारूढ होण्यास अधिक योग्य आहे, व दाराच्या मुलीशीं त्याचें लग्न करून दिलें, म्हणजे आपल्या मनोदयास अधिक बळकटी येईल असें त्यास वाटत होतें. परंतु शहाजहान व बेगमसाहेब यांस त्यानें आपला हेतु कळविला, तेव्हां त्यांनीं त्या गोष्टीचा निषेध केला, व दाराच्या मुलीस त्याच्याकडे पाठवून देण्याचें नाकारलें. दाराच्या मुलीस ही गोष्ट समजली तेव्हां, " ज्यानें माझ्या पित्याच्या व आपल्या वडील बंधूच्या रक्तानें आपले हात विटाळले आहेत, त्याच्या मुलाशीं लग्न करण्याची माझी इच्छा नाहीं, व याउपर माझा बळजबरीनें त्याच्याशीं विवाह करण्याचा निश्चय ठरलाच, तर आत्महत्या करण्याचा माझा पक्का निश्चय झाला आहे, " म्हणून तिनें स्पष्टपणें बोलून दाखविलें. वर सांगितलेल्या अडचणींमुळें औरंगजेबास त्या वेळीं आपला बेत रहित करावा लागला.

याच वेळेच्या सुमारास दिल्लीच्या प्रख्यात मयूरासनास कांहीं ज्यास्त भाग जोडावा, असें औरंगजेबाचे मनांत आलें; तेव्हां त्यानें शहाजहान याजपाशीं कांहीं रत्नें मागितलीं. शहाजहान यास त्या गोष्टीची अतिशय चीड येऊन त्यानें औरंगजेबास असा परत निरोप पाठविला कीं, " तूं अशा भानगडींत न पडतां कपटानें मिळविलेलें माझें राज्य



शहाणपणानें, न्यायानें, व समदृष्टीनें चालवावें हें बरें. तूं माझ्या मयूरासनास हात लावूं नये, अशी माझी तुला आज्ञा आहे. यापुढें तूं मला अशा प्रकारचा निरोप पाठविशील, तर माझ्यापाशीं जें जवाहीर आहे, तें सर्व फोडून मी त्याचें पीठ करून टाकीन, व तुला त्यापैकीं एक तुकडाही देणार नाहीं. " औरंगजेबानें कपटानें आपलें राज्य हरण केलें, ही गोष्ट शहाजहान बादशहाचे मनास फार लागली होती; परंतु बिचारा करतो काय ? सांपळ्यांत सांपडलेल्या सिंहाप्रमाणें त्याची स्थिति झाली होती.

इ० स० १६६१ पर्यंत औरंजेबाचा सर्व काल आपल्या बंधूंचा संहार करण्यांत गेला, हें मागें सांगितलेंच आहे. दारा व मुराद यांची त्यानें स्वहस्तें वाट लाविली होती. फक्त सुजा काय तो त्याच्या हातीं लागला नाहीं. परंतु त्याच्यावर त्यानें मीर जुमला याची योजना केल्यामुळें, त्याला सुजाची मुळींच भीति उरली नव्हती. मीर जुमला यानें सुजास आराकानांत घालवून दिल्यावर हळू हळू सर्व बंगाल प्रांत काबीज केला, व औरंगजेबानें त्यास त्या प्रांताचा सुभेदार नेमिलें. पुढें त्यानें आपलीं मुलेंमाणसें बंगाल्यांत पाठवून देण्याविषयीं औरंगजेबास विनंतिपत्र लिहिलें. त्यांतील मजकूर असा होता कीं, " इकडील लढाईचा शेवट झाला आहे. वृद्धावस्था प्राप्त झाल्यामुळें माझ्या अंगात आतां पूर्वीप्रमाणें हिंमत व उत्साह हीं राहिलीं नाहींत. तेव्हां माझ्या आयुष्याचे जे कांहीं थोडेसे दिवस शिलक राहिले आहेत, ते आपल्या मुलांमाणसांमध्यें राहून स्वस्थपणें घालवावे असें मला वाटतें. याकरितां आपण माझी विनंति मान्य कराल, अशी आशा

१ बरनीर.

आहे. " औरंगजेब मीर जुमला यास फार दिवसांपासून ओळखून होता. त्याला असें वाटलें कीं, " आपण मीर जुमला याचा पुत्र महंमद अमीरखान यास बंगाल्यांत त्याच्याकडे पाठवून दिलें, तर त्याच्या मनांत कदाचित् भलतीच महत्त्वाकांक्षा उत्पन्न होईल. तो मोठा हुशार, धाडशी, शूर, व संपतिमान् असून त्याचे हाताखालीं फौजही फार मोठी आहे, व बंगाल्यासारखा सुपीक व संपत्तिमान प्रांत त्याचे ताब्यांत आहे; तेव्हां असा सधन प्रांत आपणच बळकावून बसावें, असे विचार त्याचे मनांत आले तर त्याला तसें करण्यास फारसे आयास पडणार नाहींत, आणि तसें झालें म्हणजे आपणास मात्र त्याचा बंदोबस्त करणें अतिशय जड जाईल. " तेव्हां त्या कावेबाज औरंगजेबानें अशी युक्ति केली कीं, त्यानें मीर जुमला याची बायको, मुलगी व नातवंडें यांस त्याच्याकडे पाठवून दिलें, व त्याच्याकडे बंगालची सुभेदारी कायम करून त्यास मीर–उल्–उमराव ( उमरावांचा राजा ) हा राज्यांतील पहिल्या प्रतीचा बहुमानाचा किताब दिला. परंतु महंमद अमीरखान यास त्याच्याकडे पाठवून दिलें नाहीं. मीर जुमला यास त्या गोष्टीचा राग येऊं नये म्हणून त्यानें महंमद अमीरखान यास मीर बक्षी अथवा स्वारांवरचा मुख्य सरदार नेमिलें, व अशा रीतीनें त्यास दरबारांत ठेवून घेतलें.

मीर जुमला यास या गोष्टीचें फार वाईट वाटलें. परंतु आपण आपल्या पुत्रास पाठवून देण्याविषयीं ज्यास्त आग्रह धरला, तर औरंगजेबास कदाचित् राग येईल, या भीतीनें त्यानें तो नाद टाकून दिला, व औरंगजेबानें त्याचा जो बहुमान केला होता, त्याबद्दल आभारदर्शक असें पत्र दरबारांत पाठवून दिलें. सुमारें एक वर्षभर मीर जुमला



संसारसुखाचा व अधिकाराचा उपभोग घेत स्वस्थपणें पडला होता. परंतु त्याला फार दिवस स्वस्थ बसूं दिलें, तर तो मोठा कारस्थानी असल्यामुळें कांहीं निराळाच खेळखंडोबा माजवील, अशी औरंगजेबास फार भीति होती; तेव्हां त्यानें त्यास आसाम प्रांतावर स्वारी करून तो काबीज करण्याची कामगिरी सांगितली.

मीर जुमला याचे मनांत फार दिवसांपासून तो बेत घोळतच होता. बादशाहाची आज्ञा होतांच तो मोठी फौज बरोबर घेऊन ढाका शहराहून निघाला, व त्यानें प्रथमतः आझो नांवाच्या किल्ल्यास वेढा देऊन तो पंधरा दिवसांत घेतला. नंतर अठ्ठावीस दिवसांनीं तो आसाम प्रांताचें नाकें कंदरा शहर येथें येऊन पोहोंचला. तेथें त्यानें आसामच्या राजाचा पूर्ण पराभव केला, तेव्हां तो राजा आपली राजधानी घेरगांव येथें पळून गेला. परंतु मीर जुमला यानें त्याचा मोठ्या नेटानें पाठलाग केल्यामुळें त्यास आपली राजधानी सोडून लासाच्या डोंगरांत पळून जावें लागलें. नंतर मीर जुमला यानें घेरगांव व दुसरीं मोठमोठीं शहरें घेऊन तीं लुटून फस्त केलीं.

इतक्यांत पर्जन्यकाळ लागल्यामुळें मीर जुमला यास पुढें जातां येईना. आसामांत पाऊस अतिशय पडतो व सर्व प्रदेश जलमय होऊन जातो. ती संधि साधून आसामचे राजानें मीर जुमला याचे आसपासचा सर्व मुलूख ओस पाडला. तेव्हां मीर जुमला याचे सैन्यांत धान्याचा तोटा पडला. त्याचेजवळ लुटीचा पुष्कळ पैसा होता; परंतु त्यास धान्य मिळेना, व त्यामुळें त्याचें सैन्य उपाशीं मरूं लागलें. त्याला पुढेंही जातां येईना, व मागेंही फिरतां येईना. पुढच्या अंगास उंच व बिकट पर्वत होते, व

पिछाडीचा सर्व प्रदेश जलमय होऊन गेला होता. तसेंच आसामच्या राजानें नद्यांवरील सर्व पूल मोडून टाकिले होते. शेवटीं उपासमरीमुळें त्याचें सैन्य इतकें हतवीर्य झालें कीं, त्याला ती मोहीम सोडून देणें भाग पडलें. दुसरा एखादा सरदार असता, तर आसामांतून बंगाल्यांत त्या मोहिमेपैकीं एकही मनुष्य परत आलें नसतें, व त्यानें मिळविलेली सर्व लूट तेथेंच राहून त्याच ठिकाणीं त्याचा अंत झाला असता. परंतु मीर जुमला म्हणजे कोणत्याही प्रसंगीं डगमगणारा पुरुष नव्हता. पावसाळा कमी होतांच तो आपलें सैन्य घेऊन परत फिरला. वाटेनें आसामच्या राजाचे लोक त्याच्या सैन्यावर चोरून लपून छापे घालूं लागले; परंतु त्यांस न जुमानतां तो आपली लूट घेऊन कुचबहार प्रांतांत परत आला. नंतर त्यानें आझो किल्ल्याची नीट दुरुस्ती केली, आणि तेथील शिबंदी वाढवून त्याचा पक्का बंदोबस्त केला. पुढच्या वर्षी आसामावर पुनः स्वारी करण्याचा त्याचा विचार होता. परंतु मार्गांत त्यास अमांशाचा आजार होऊन तो खिजरपूर येथें ता० ३१ मार्च इ० स० १६६३ रोजीं मरण पावला.

मीर जुमला हा मोठा शूर, कारस्थानी, महत्त्वाकांक्षी, शहाणा, संपत्तिमान्, किंबहुना जवळजवळ प्रति औरंगजेबच होता असें म्हटलें तरी चालेल. औरंगजेबास बादशाहीपद प्राप्त झालें, त्याचें श्रेय पुष्कळ अंशीं या पुरुषाकडेच जाणें योग्य आहे. औरंगजेबाचे पक्षास त्याचें पूर्ण पाठबळ होतें, व आमरणांत त्यानें त्याची एकनिष्ठपणें सेवा केली. औरंगजेब त्याला अतिशय मान देत असे. परंतु त्याच्याविषयीं औरंगजेबाचे मनांत निरंतर भीति असे, व त्यास रिकामें बसूं दिलें, तर कदाचित् तो आपणावरही उलटून पडेल असें त्यास वाटत असे. मीर जुमला इ० स० १६५६ त मोंगलांचे आश्रयाखालीं आला, व तेव्हांपासून त्याचें सर्व आयुष्य लढाया करण्यांतच खर्च झालें होतें. त्यानें ज्या ज्या मोहिमा केल्या, त्या सर्वांत त्यास यशच मिळत गेलें. फक्त आसामच्या मोहिमेंत मात्र त्याची फार दुर्दशा झाली. मीर जुमला याचे आपणावर किती उपकार आहेत, हें औरंगजेब ओळखून होता. परंतु त्याच्या मृत्यूमुळें त्याला मुळींच वाईट वाटलें नाहीं. इतकेंच नव्हे, तर आपला एक जबरदस्त प्रतिस्पर्धी मेल्यामुळें आज आपण त्याच्या भीतींतून अनायासें मोकळे झालों, असें वाटून त्याला मोठा आनंद झाला. मीर जुमला याचा पुत्र महंमद अमीरखान यास पितृवियोगाचें अतिशय दुःख होऊन तो शोक करीत बसला असतां औरंगजेब त्याला म्हणाला, “ तूं आपल्या परमपूज्य पित्याबद्दल शोक करितोस हें तुला भूषणच आहे, परंतु मला सुद्धां आज माझ्या स्नेह्यांपैकीं एक अतिशय बलाढ्य व भयंकर असा स्नेही मरण पावला म्हणून फार दुःख होत आहे. तुझा पिता मरण पावला तथापि तूं काळजी करूं नको. मी तुझा तुझ्या पित्याप्रमाणें सांभाळ करीन.” नंतर औरंगजेबानें त्याच्याकडे मीर बक्षीचा हुद्दा कायम केला, त्याचा दरमहा एक हजार रुपये ज्यास्त तनखा वाढविला, व त्याच्या पित्याची सर्व मालमत्ता त्याचे हवालीं केली. मीर जुमल्यासारखा पराक्रमी स्नेही वारल्यामुळें औरंगजेबास यत्किंचित्ही वाईट वाटलें नाहीं, म्हणजे त्याच्या पाषाणहृदयत्वाची कमाल झाली असें म्हटलें पाहिजे.



औरंगजेबाचा चुलता शाहिस्तेखान यास इ० स० १६५८ त औरंगजेबानें आग्रयाचा सुभेदार नेमिलें होतें.

पिछाडीचा सर्व प्रदेश जलमय होऊन गेला होता. तसेंच आसामच्या राजानें नद्यांवरील सर्व पूल मोडून टाकिले होते. शेवटीं उपासमरीमुळें त्याचें सैन्य इतकें हतवीर्य झालें कीं, त्याला ती मोहीम सोडून देणें भाग पडलें. दुसरा एखादा सरदार असता, तर आसामांतून बंगाल्यांत त्या मोहिमेपैकीं एकही मनुष्य परत आलें नसतें, व त्यानें मिळविलेली सर्व लूट तेथेंच राहून त्याच ठिकाणीं त्याचा अंत झाला असता. परंतु मीर जुमला म्हणजे कोणत्याही प्रसंगीं डगमगणारा पुरुष नव्हता. पावसाळा कमी होतांच तो आपलें सैन्य घेऊन परत फिरला. वाटेनें आसामच्या राजाचे लोक त्याच्या सैन्यावर चोरून लपून छापे घालूं लागले; परंतु त्यांस न जुमानतां तो आपली लूट घेऊन कुचबहार प्रांतांत परत आला. नंतर त्यानें आझो किल्ल्याची नीट दुरुस्ती केली, आणि तेथील शिबंदी वाढवून त्याचा पक्का बंदोबस्त केला. पुढच्या वर्षी आसामावर पुनः स्वारी करण्याचा त्याचा विचार होता. परंतु मार्गांत त्यास अमांशाचा आजार होऊन तो खिजरपूर येथें ता० ३१ मार्च इ० स० १६६३ रोजीं मरण पावला.

मीर जुमला हा मोठा शूर, कारस्थानी, महत्त्वाकांक्षी, शहाणा, संपत्तिमान्, किंबहुना जवळजवळ प्रति औरंगजेबच होता असें म्हटलें तरी चालेल. औरंगजेबास बादशाहीपद प्राप्त झालें, त्याचें श्रेय पुष्कळ अंशीं या पुरुषाकडेच जाणें योग्य आहे. औरंगजेबाचे पक्षास त्याचें पूर्ण पाठबळ होतें, व आमरणांत त्यानें त्याची एकनिष्ठपणें सेवा केली. औरंगजेब त्याला अतिशय मान देत असे. परंतु त्याच्याविषयीं औरंगजेबाचे मनांत निरंतर भीति असे, व त्यास रिकामें बसूं दिलें, तर कदाचित् तो

आपणावरही उलटून पडेल असें त्यास वाटत असे. **मीर जुमला** इ० स० १६५६ त मोंमलांचे आश्रयाखालीं आला, व तेव्हांपासून त्याचें सर्व आयुष्य लढाया करण्यांतच खर्च झालें होतें. त्यानें ज्या ज्या मोहिमा केल्या, त्या सर्वांत त्यास यशच मिळत गेलें. फक्त **आसामच्या** मोहिमेंत मात्र त्याची फार दुर्दशा झाली. **मीर जुमला** याचे आपणावर किती उपकार आहेत, हें **औरंगजेब** ओळखून होता. परंतु त्याच्या मृत्यूमुळें त्याला मुळींच वाईट वाटलें नाहीं. इतकेंच नव्हे, तर आपला एक जबरदस्त प्रतिस्पर्धी मेल्यामुळें आज आपण त्याच्या भीतींतून अनायासें मोकळे झालों, असें वाटून त्याला मोठा आनंद झाला. **मीर जुमला** याचा पुत्र **महंमद अमीरखान** यास पितृवियोगाचें अतिशय दुःख होऊन तो शोक करीत बसला असतां **औरंगजेब** त्याला म्हणाला, " तूं आपल्या परमपूज्य पित्याबद्दल शोक करितोस हें तुला भूषणच आहे, परंतु मला सुद्धां आज माझ्या स्नेह्यांपैकीं एक अतिशय बलाढ्य व भयंकर असा स्नेही मरण पावला म्हणून फार दुःख होत आहे. तुझा पिता मरण पावला तथापि तूं काळजी करूं नको. मी तुझा तुझ्या पित्याप्रमाणें सांभाळ करीन." नंतर **औरंगजेबानें** त्याच्याकडे **मीर बक्षीचा** हुद्दा कायम केला, त्याचा दरमहा एक हजार रुपये ज्यास्त तनखा वाढविला, व त्याच्या पित्याची सर्व मालमत्ता त्याचे हवालीं केली. **मीर जुमल्यासारखा** पराक्रमी स्नेही वारल्यामुळें **औरंगजेबास** यत्किंचित्‌ही वाईट वाटलें नाहीं, म्हणजे त्याच्या पाषाणहृदयत्वाची कमाल झाली असें म्हटलें पाहिजे.

**औरंगजेबाचा** चुलता **शाहिस्तेखान** यास इ० स० १६५८ त **औरंगजेबानें आग्रयाचा** सुभेदार नेमिलें होतें.

पुढें इ० स० १६५९ त त्यानें त्यास दक्षिणची सुभेदारी सांगितली. नंतर इ० स० १६६३ त मीर जुमला वारल्यावर त्यानें त्यास बंगालचा सुभेदार नेमिलें, व त्यास मीर–उल्–उमराव हा किताब दिला. औरंगजेब इ० स० १६५७ त आपला गादीवरचा हक्क स्थापित करण्याकरितां दक्षिणेंतून उत्तर–हिंदुस्थानांत आला, तेव्हांपासून तिकडे काय काय गोष्टी झाल्या त्यांचा इतिहास देणें राहिलें आहे, तो येणेंप्रमाणें.

औरंगजेबास बादशाहीपद प्राप्त झालें त्या वेळीं मराठ्यांच्या इतिहासरूपी नाटकाच्या प्रथमांकास प्रारंभ होऊन ते नुक्तेच रंगभूमीवर येऊं लागले होते. उत्तरेस विंध्याचल, दक्षिणेस करनाटक, किंवा गोव्यापासून बेदर शहरावरून वर्धानदीवर चांद म्हणून शहर आहे तेथपर्यंत सूत्र टाकिलें तर जी रेषा उत्पन्न होईल ती, पूर्वेस वर्धानदी, व पश्चिमेस आरबी समुद्र, एवढ्या प्रदेशास महाराष्ट्र अशी संज्ञा असून त्यांतील लोकांस मराठे असें म्हणतात. मराठे हे जात्या लहान, रांकट, धडधाकड, चपळ, मेहनती, धीट, निग्रही व बुद्धिवान् आहेत. उत्तरेकडील रजपूत लोकांप्रमाणें यांस वृथाभिमान किंवा डामडौल नाहीं, व त्यांच्याप्रमाणें हे व्यवहारशून्य किंवा आळशीही नाहींत. त्यांची दृष्टि परिणामावर असते व पाहिजे त्या युक्तीनें ते आपला कार्यभाग साधून घेतात.

यापूर्वी मराठे इतिहासांत विशेष प्रसिद्धीस आले नव्हते. परंतु मूळपासून त्यांच्यांत साधारण एकी होती, असें दिसून येतें. त्यांच्यांत जाधव, भोंसले, निंबाळकर वगैरे बरींच उच्च घराणीं असून तीं पिढीजाद वतनदार होतीं. त्यांच्यांत जे मुख्य

१ एलफिन्स्टन.

असत त्यांच्याजवळ थोडथोडी फौजही असे; यामुळें विजापूर, अहमदनगर, गोवळकोंडें वगैरे ठिकाणचे मुसलमान राजे प्रसंगविशेषीं त्यांस आपल्या मदतीस बोलावीत असत. मराठे या शब्दाचा मूळ उपयोग फेरिस्ता यानें इ० स० १४८५ त केलेला आहे. प्रथमतः तो शब्द व्यक्तिवाचक होता. परंतु पुढें मराठे म्हणजे महाराष्ट्र देशांतील लोक अशी त्याची व्याप्ति झाली. पूर्वीं विजापुरच्या राज्याचें महसूल संबंधीं दप्तर फारशी भाषेंत ठेवीत असत. परंतु इसवीसनाच्या सोळाव्या शतकांत तें मराठी भाषेंत लिहून ठेवण्याचा प्रघात पडला, त्यामुळें बरेच मराठे विजापुरकरांचे नोकरींत शिरले. प्रथमतः त्यांस हलक्या दर्ज्याच्या नोकऱ्या देत असत. परंतु त्यांच्या आंगचे नैसर्गिक गुण जसजसे बाहेर पडूं लागले, तसतशी त्यांची स्थिति सुधारत चालली; व हलक्या प्रतीचा कारकून व शिपाई या पायरीवरून चढत चढत स्वतःच्या कर्तबगारीनें त्यांनीं मुत्सद्दी व सरदार लोकांच्या पंक्तीस बसण्याची योग्यता प्राप्त करून घेतली. अहमदनगरचा सरदार मलिकंबर[१] याच्या वेळीं ते बरेच

---

१ मलिकंबर हा हबशी जातीचा एक सरदार होता. मोंगलांनीं निजामशाही घेतल्यामुळें तिचा पडता काळ आला असतांही त्यानें तिचा बरींच वर्षें बचाव केला. मोंगलांनीं अहमदनगर घेतल्यावर त्यानें खडकी नांवाचें शहर—याला पुढें औरंगजेबानें औरंगाबाद असें नांव दिलें—आपली राजधानी केली. त्यानें दक्षिणेंत नवी जमाबंदी सुरू केली. उत्तर-हिंदुस्थानांत ज्याप्रमाणें अकबराचा जमाबंदी खात्याचा मुख्य अधिकारी तोडरमल्ल याची प्रसिद्धि आहे, त्याचप्रमाणें मलिकंबर याची दक्षिण-हिंदुस्थानांत कीर्ति आहे. तो इ० स० १६१० चे सुमारास फार प्रसिद्धीस आला, व इ० स० १६२६ त मरण पावला. तो मोठा शूर, शहाणा व राजकारस्थानी होता. निजामशाहींत जमाबंदी खात्यांत प्रथमतः ब्राह्मण लोकांस यानेंच नोकऱ्या दिल्या.

प्रसिद्धीस आले, व तेव्हांपासून दक्षिणेच्या इतिहासांत त्यांचें नांव चमकूं लागलें. मलिकंबर याच्या कारकीर्दीत मालोजी भोंसले या नांवाचा एक सरदार कांहीं घोडेस्वारांनिशीं निजामशाहींत नोकरीस होता. ( इ० स० १५७७ ). त्यास शहाजी व सरिफजी असे दोन पुत्र होते. शहाजीचा जन्म इ० स० १५९४ त झाला. त्याला लखुजी जाधव शिंदखेडकर याची जिजाबाई नांवाची कन्या दिली होती. मालोजीनें मोठमोठे पराक्रम केल्यामुळें त्यास निजामशाहींतून पांच हजार स्वारांची सरदारी व पुणें प्रांतांची जहागीर मिळाली. तो इ० स० १६१९ त मरण पावला.

मालोजीच्यामागें शहाजी निजामशाहींत नोकरीस राहिला. तो मोठा शूर असल्यामुळें त्याचें तेथें बरेंच प्रस्थ माजलें होतें. त्यानें निजामशाहीच्या उन्नतीकरितां अश्रांत परिश्रम केले, परंतु त्यांचा कांहींएक उपयोग न होतां औरंगजेबाचा पिता शहाजहान यानें इ० स० १६३७ त तें राज्य बुडवून टाकिलें. नंतर शहाजी विजापुरच्या आदिलशाहींत नोकरीस राहिला. तेथेंही त्यानें आपलें नांव गाजवून स्वपराक्रमानें करनाटकांत मंगळूर, कोल्हार, बाळापूर, सेरा इत्यादि प्रांतांची जहागीर संपादन केली. जिजाबाईच्या पोटीं शहाजीस संभाजी व शिवाजी असे दोन पुत्र झाले. हाच शिवाजी हिंदुपदपादशाहीचा स्थापनकर्ता होय. याचें जन्म इ० स० १६२७ च्या मे महिन्यांत पुणें प्रांतांत शिवनेरी किल्यांत झालें. शिवाजी हा आपला जबरदस्त प्रतिस्पर्धी औरंगजेब याच्यापेक्षां नऊ वर्षांनीं लहान होता. शहाजीच्या पुण्याच्या जहागिरीचा कारभार दादाजी कोंड-

१ संभाजी करनाटकांत कनकागिरी किल्याचे वेढ्यांत मरण पावला.



देव नांवाचा एक हुशार मनुष्य पहात असे, व त्यासच त्यानें शिवाजीच्या शिक्षणाचें काम सांगितलें होतें. तो इ० स० १६३७ त शिवाजीस पुणें येथें घेऊन आला, व हुशार असे निरनिराळे शिक्षक ठेवून त्यानें त्यास सरदाराच्या मुलास योग्य असें सर्व प्रकारचें शिक्षण दिलें. शिवाजी मोठा हूड, चलाख व तीव्र बुद्धीचा असल्यामुळें थोडक्याच अवधींत तो दांडपट्टा, कुस्ती, बोथाटी, तिरंदाजी, घोड्यावर बसून अचूक निशाण मारणें, इत्यादि कलांत प्रवीण झाला. दादाजीनें त्यास लिहावयास व वाचावयासही शिकविलें होतें. शिवाजीस लहानपणापासून शिकारीचा फार नाद असे. पुणें प्रांत हा पहाडी व सपाट अशा प्रदेशांच्या सरहद्दीवर असल्यामुळें शहाजीस त्याच्या बंदोबस्ताकरितां आपले कांहीं घोडेस्वार तेथें ठेवावे लागत असत, व त्यांच्याबरोबर शिवाजी नेहमीं फिरत असे. त्यामुळें त्या प्रांतांतील लुटारू लोकांचा व त्याचा प्रथमतः स्नेह पडला, व त्याला साहसाची गोडी लागली. शिवाजीस आपल्या लोकांनीं केलेल्या पराक्रमांचे पोंवाडे ऐकण्याची फार आवड असे, व त्यामुळें त्याची साहसबुद्धि दृढतर होऊन त्याच्या मनांत निरनिराळे तरंग येऊं लागले. तसेंच शिकारीच्या नेहमींच्या फेरफटक्यानें व लुटारू लोकांच्या संगतीनें त्यास घाटांतील चोरवाटा माहीत झाल्या. दादाजीनें मलिकंबराच्या धाऱ्यांची पद्धत सुरू करून मावळ, जुन्नर, पुणें वगैरे

१ मलिकंबर यानें कांहीं वर्षांच्या उत्पन्नाची सरासरी काढून तिचा दोन पंचमांश रयतेनें सरकारास द्यावा असें ठरविलें होतें. इ० स० १६१४ त त्यानें सरासरी उत्पन्नाचा एक तृतीयांश सरकारदेणें ठरवून त्याबद्दल रोख पैसा द्यावा असें ठरविलें. त्यानें

( पुढें चालू )

प्रांत फार चांगल्या स्थितींत आणले, तसेंच रानटी हिंस्र पशु मारून मुलूख निरुपद्रवी केला, व मावळे लोकांस प्रथमतः लष्करी नोकरींत ठेविलें. पुण्याचे उत्तरेकडील डोंगरांत राहणारे भिल्ल व कोळी, व दक्षिणेकडील डोंगरांत राहणारे रामोशी यांचा व शिवाजीचा जरी चांगला स्नेह जमला होता, तरी मावळे लोक आडाणी परंतु मोठे शूर असून इमानी आहेत, अशी त्याची खातरी झाली होती. त्यामुळें त्यानें त्या लोकांस हाताशीं धरिलें, व त्यांस युद्धोपयोगी शिक्षण देऊन चांगलें हुशार केलें. त्याचे मनांत हळू हळू मराठी राज्याची स्थापना करण्याचे विचार घोळूं लागले. परंतु दादाजीचा त्यास मोठा धाक असल्यामुळें त्याला कोणतीच गोष्ट उघडपणें करतां किंवा बोलतां येईना. पुढें लौकरच दादाजी मरण पावला, तेव्हां शिवाजी फार दिवस मनांत दाबून ठेवलेल्या आपल्या जबरदस्त महत्त्वाकांक्षेच्या पूर्ततेस लागला.

या वेळीं पुणें प्रांत व त्याच्या आसपासचा सर्व प्रदेश विजापुरकरांचे ताब्यांत होता. त्या प्रांतांत बरेच पहाडी किल्ले होते, परंतु त्यांचा बंदोबस्त साधारणच होता. तेव्हां प्रथमतः या किल्ल्यांपैकीं कांहीं किल्ले बळकाविण्याचा विचार शिवाजीचे मनांत आला, व इ० स० १६४६ त त्यानें तोरणा किल्ला घेतला. या वेळीं त्याचें वय एकोणीस वर्षांचें होतें. नंतर हळू हळू कोंडाणें ऊर्फ सिंहगड, पुरंदर, कांगोरी, तुंग, तिकोना, लोहगड, राजमाची,

---

( मागील पृष्ठावरून पुढें चालू )

अकबराचा जमाबंदी खात्याचा कामगार तोडरमल्ल याच्याप्रमाणें च जमिनीचा धारा कायमचा न करितां पिकाच्या मानाप्रमाणें तो कमजास्त घेत असावें असें ठरविलें होतें.

भोरूप वगैरे किल्ले, व कल्याण, जावळी वगैरे प्रांत घेऊन, व लिंगाणा, विरवाडी वगैरे नवीन किल्ले बांधून त्यानें आपली सत्ता दृढ केली. विजापूरसरकार करनाटक घेण्यांत गुंतल्यामुळें त्याला शिवाजीकडे फारसें लक्ष्य देतां आलें नाहीं, व शिवाजीच्या कृत्यांचें प्रथमतः त्यास विशेष महत्त्वही वाटलें नाहीं. परंतु त्यामुळें शिवाजीला मात्र आपला चांगला फायदा करून घेतां आला. त्यानें सह्याद्रींतील बहुतेक किल्ले घेतले, व बराच मुलूख आपल्या अमलाखालीं आणून स्वराज्याचा पाया घातला. वर सांगितल्याप्रमाणें शिवाजी एकसारखी आपली सत्ता वाढवीत असतां शहाजहान बादशाहानें इ० स० १६५५ त औरंगजेबास पुनः दक्षिणच्या सुभेदारीवर पाठवून दिलें. औरंगजेब दक्षिणेंत आल्यावर प्रथमतः शिवाजी दिल्लीसरकारचा आश्रित या नात्यानें त्याच्याशीं व्यवहार ठेवूं लागला. तेव्हां शहाजहान बादशाहानें शिवाजीनें मिळविलेला मुलूख त्याच्याकडे कायम केला. ह्या वेळेपर्यंत शिवाजीनें मोंगलांचे मुलुखास उपद्रव दिला नव्हता. पुढें औरंगजेबानें गोवळकोंड्याच्या राजाशीं लढाई सुरू केली, त्या वेळीं मोंगलांची बहुतेक फौज तिकडे गेल्यामुळें, व औरंगजेब बरेच दिवस तिकडे गुंतून राहील असें शिवाजीस वाटल्यावरून, त्यानें प्रथमतः मोंगलांचे मुलुखावर स्वारी केली. त्यानें जुन्नर शहरावर छापा घालून तें लुटून फस्त केलें, व अहमदनगरावर आपला मोरचा फिरविला. परंतु तेथें त्यास फारसें यश आलें नाहीं. मोंगलांशीं उघडपणें वैर बांधण्याची अद्यापि आपल्या अंगीं शक्ति आली नाहीं, असें पाहून पुढें लौकरच औरंगजेब गोवळकोंड्याहून परत आल्यावर शिवाजीनें त्याचेपाशीं आपली चुकी

कबूल केली, व त्याची क्षमा मागितली. प्रथमतः औरंगजेब वळेना; परंतु इतक्यांत शहाजहान अजारी पडल्याची बातमी त्यास समजली, त्यामुळें शिवाजीनें उत्तर-हिंदुस्थानांत नेण्याकरितां आपलें एक पथक आपणाबरोबर द्यावें, असा त्याच्याशीं करार करून त्यानें तें प्रकरण मिटवून टाकिलें. त्याच वेळीं मोंगलाचे मुलखांत आपले कांहीं हक्क आहेत ते आपणास मिळावे, म्हणून शिवाजीनें औरंगजेबाशीं बोलणें लाविलें. परंतु औरंगजेब म्हणजे पहिल्या प्रतीचा कार्यसाधु व ठक. त्यानें त्या प्रकरणाचा त्या वेळीं निकाल न करितां तें तसेंच लांबणीवर टाकिलें. परंतु शिवाजीही कमी वस्ताद होता असें नाहीं. औरंगजेब आपल्या बोलण्याचा विचार करीत नाहीं असें त्यास समजतांच त्यानें त्यास देऊं केलेलें स्वारांचें पथक पाठविण्याचा विचार तहकूब केला, व केवळ पोकळ शब्दांनीं औरंगजेबास मदत करण्याची रेलचल करून आपण स्वस्थ बसला.

शिवाजीनें विजापुरकरांचे मुलुखांत मोठी धामधूम उडवून दिली होती, तरी तें सरकार धुंदींतच होतें. पुढें हळू हळू त्याचे डोळे उघडूं लागले; व इ० स० १६५९ त त्या बादशाहानें अफजूलखान नांवाच्या आपल्या सरदारास शिवाजीचें पारिपत्य करण्याकरितां पाठवून दिलें. अफजूलखान मोठा पराक्रमी होता, परंतु अतिशय गर्विष्ठ असे. त्यानें ‘ शिवाजीस पकडून आणून स्वामींपुढें उभा करितों,’ अशी आपल्या धन्याचे दरबारांत फुशारकी मारिली होती. अशा वेळीं अफजूलखानाशीं लढाई करून आपला निभाव लागणार नाहीं, असें शिवाजीस वाटल्यावरून त्यानें विजापुरकरांशीं तहाचें बोलणें सुरू केलें, व अफजूलखानास जावळीं प्रांतांत प्रतापगडाजवळ भेटीस



बोलाविलें. पुढें भेटीच्या प्रसंगीं आतां शिवाजी आपल्या हातांत एकटा सांपडला आहे, तर त्यास कैद करण्यास ही संधि बरी आहे, असें अफजखानास वाटून त्यानें शिवाजीस दोन्हीं हातांनीं जखडून धरिलें. शिवाजीही तयारीनेंच गेला होता. खानाचा दुष्ट हेतु दिसून येतांच अस्तनींत लपवून ठेवलेल्या वाघनखांची एक चपेट मारून त्यानें त्यास खालीं पाडिलें, व त्याचे शिर कापून तें त्यानें प्रतापगड किल्ल्यावर नेऊन पुरलें. शिवाजीच्या सैन्यानें अफजूखानाच्या फौजेवर हल्ला करून तिचा फडशा करून टाकिला, व अशा रीतीनें शिवाजी त्या संकटांतून मुक्त झाला. शिवाजीनें अफजूलखानाचा मुद्दाम खून केला असा कित्येक इंग्रज इतिहासकारांचा त्याच्यावर आरोप आहे. परंतु वास्तविक पाहतां शिवाजीनें आपण होऊन त्याचा वध केला नाहीं. शिवाजीचा स्वभाव फार दयाशील होता, व विनाकारण त्यानें कोणावर कधींच शस्त्र धरिलें नाहीं. कल्याण परगणा घेतला, त्या वेळीं तेथल्या मुसलमान सुभेदारास त्यानें नुसतें कैद केलें होतें; व त्याचा सन्मान करून त्यास विजापुरास परत पाठवून दिलें होतें. शिवाय “ मुसलमान लोकांचीं बायकामुलें त्याच्या हातांत पडलीं असतां त्या सर्वांस मोठ्या गौरवानें, व त्यांच्या मोठेपणास धक्का लागणार नाहीं अशा बंदोबस्तानें, तो परत पाठवून देत असे; ” “ शिवाजीनें नीच कर्म कधीं केलें नाहीं; ” असें एका मुसलमान इतिहासकारानें म्हटलें आहे; या एकंदर कारणांवरून तो मुद्दाम होऊन खुनासारखें भयंकर पापकर्म करण्यास प्रवृत्त झाला असेल, असें म्हणणें वाजवी दिसत नाहीं. प्राणावर येऊन बेतल्यावर शेळीही वाघावर

१ डा० हंटर.

चाल करते, मग शिवाजी म्हणजे शिवाजीच होता. अफजूलखानानें त्यास पकडण्याचा प्रयत्न केला असावा, व त्यामुळें शिवाजीनें त्यास ठार मारिलें असावें, हीच गोष्ट ज्यास्त संभवनीय आहे. बरें, राजनीतीच्या तत्त्वावर दृष्टि देऊन विचार करूं गेलें, तरीही शिवाजीकडे मुळींच दोष येत नाहीं. बेअरिंग साहेबांचेंही यासंबंधानें असेंच मत आहे.

अफजूलखानास ठार मारल्यावर शिवाजीनें घांटालगतचा विजापुरकरांचा सर्व मुलूख लुटला, त्यांचे सर्व डोंगरी किल्ले घेतले, व सर्व कोंकण प्रांतांत आपला अंमल बसविला. पुढें शिवाजी व विजापुरसरकार यांचेमध्यें तह होऊन शिवाजीस कल्याणपासून गोव्यापर्यंतचा सवाशें कोस लांबीचा कोंकणपट्टीचा प्रदेश, व घांटावर भीमेपासून वारणेपर्यंतचा पाउणशें कोसांचा मुलूख मिळाला. ( इ० स० १६६२ ).

याच वेळेच्या सुमारास शिवाजी कुलाबा प्रांतांत रेडा नामक किल्ल्यावर राहण्याकरितां गेला. त्यानें त्या किल्ल्यावर एक राजवाडा व दुसऱ्या थोर थोर हेवेल्या बांधून व त्याची उत्कृष्ट दुरुस्ती करून पक्का बंदोबस्त केला. त्यानें त्या किल्ल्याचें रायगड असें नांव ठेविलें, व त्याच ठिकाणीं राहून तो आपला राज्यकारभार पाहूं लागला. या वेळीं शिवाजीजवळ पन्नास हजार पायदळ व सात हजार स्वार इतकी फौज होती.

इतक्या अवधींत औरंगजेबानें आपल्या तिघां बंधूंचें निर्दलन करून व शहाजहान यास कैदेंत टाकून दिल्लीची गादी बळकाविली होती; व आपल्या भयंकर दुखण्यांतून तो नुकताच बरा झाला होता.

---

[library stamp, illegible]

# प्रकरण तिसरें.

इ० स० १६६२ पासून इ० स० १६७० पर्यंत.

औरंगजेब शाहिस्तेखानास शिवाजीचा बंदोबस्त करण्याकरितां पाठवून देतो.–शाहिस्तेखान चाकणचा किल्ला घेतो.–तो पुणें येथें शिवाजीच्या वाड्यांत उतरतो, व शिवाजी त्याच्यावर छापा घालतो.–औरंगजेब त्याची बंगालच्या सुभेदारीवर बदली करितो.–शिवाजी सुरत शहर लुटतो.–औरंगजेब हवापालट करण्याकरितां काश्मीर येथें जाण्यास निघतो, व त्याच्या स्वारीच्या थाटाचें वर्णन.–शिवाजी मोंगलांचीं गलबतें धरितो व मक्केचे यात्रेकरू लुटतो.–औरंगजेब, जयसिंग व दिलावरखान यांस शिवाजीचें पारिपत्य करण्याकरितां पाठवून देतो.–दिलावरखान पुरंदरास वेढा देतो, व मुरार बाजी त्या किल्ल्याचें मोठ्या शूरपणानें रक्षण करितो.–शिवाजी जयसिंगाशीं तहाचें बोलणें सुरू करितो.–तो औरंगजेबाचे भेटीस दिल्लीस जातो.–औरंगजेब त्याचा अपमान करितो.–औरंगजेब शिवाजीस कैदेंत ठेवितो व तो तेथून युक्तीनें आपली सुटका करितो.–शहाजहान बादशहाचा मृत्यु.–औरंगजेबाचें वैभव शिखरास जाऊन पोहोंचतें.–विजापुरच्या लढाईंत जयसिंगास अपयश येतें.–औरंगजेब त्यास दक्षिणेंतून परत बोलावितो, व त्याचा मृत्यु.–औरंगजेब मोअजीम व यशवंतसिंग यांस पुनः दक्षिणेंत पाठवून देतो.–शिवाजी विजापूर व गोवळकोंडें येथील राजांपासून चौथाई व सरदेशमुखी हे हक्क घेतो.–शिवाजी आपल्या राज्याची अंतस्थ स्थिति सुधारतो.

औरंगजेबानें शाहिस्तेखान यास इ० स० १६५९ त दक्षिणच्या सुभेदारीवर पाठवून दिलें होतें, हें पूर्वीं सांगितलेंच आहे. तो सुमारें दोन वर्षेपर्यंत आपल्या मुलुखाचा

कारभार पहात स्वस्थपणें औरंगाबाद येथें बसला होता. शिवाजीही विजापुरकरांशीं लढाई करण्याच्या कामांत गुंतल्यामुळें त्यास मोंगलाकडे लक्ष्य देण्यास फावलें नाहीं. पुढें इ० स० १६६२ त विजापुरकरांशीं तह झाल्यामुळें तो मोकळा झाला. पूर्वीं शिवाजीनें दक्षिणेंतील मोंगलांचे मुलखावरील कांहीं हक्कांची औरंगजेबापाशीं मागणी केली असून त्यानें तें प्रकरण तसेंच लांबणीवर टाकून त्याचा कांहींच निकाल केला नव्हता, ही गोष्ट शिवाजीचे मनांत डांचत होती; तेव्हां फुरसत मिळतांच त्यानें इ० स० १६६२ त मोंगलांचे मुलखांत धामधूम चालविली. त्याचा सरदार नेताजी पालकर यानें जुन्नरपर्यंतचे मोंगलांचे सर्व किल्ले घेऊन थेट औरंगाबादेपर्यंतचा मुलूख लुटून फस्त केला. औरंगजेबास तें वर्तमान कळतांच त्यानें शाहिस्ते-खान यास शिवाजीचें पारिपत्य करण्याचा हुकूम केला. तो औरंगाबादेहून निघाला तो अहमदनगरावरून पुण्यास आला, व लहानपणीं शिवाजी ज्या वाड्यांत राहत असे तेथेंच तो येऊन राहिला. नंतर तो बरोबर मोठी फौज घेऊन जुन्नरप्रांत घेण्याकरितां निघाला. वाटेनें चाकणाचा किल्ला त्यास लागला. त्या वेळीं शाहिस्तेखान यास असें वाटलें कीं, आपली जंगी फौज पाहून मराठे गर्भगळीत होऊन एकदम तो किल्ला सोडून पळून जातील. परंतु अनुभवाअंतीं आपला समज फार चुकीचा आहे, असें त्यास कळून आलें. मराठे आपणास दाद देत नाहींत असें पाहून त्यानें किल्ल्यास वेढा दिला. चाकणचा किल्लेदार फिरंगोजी नरसाळा यानें दोन महिनेपर्यंत मोंगलांस दाद दिली नाहीं. शाहिस्तेखान यानें ईशान्येकडील बुरुजा-खालीं सुरुंग लावून तो उडविला, व मोंगलांनीं मराठ्यांवर

मोठ्या निकरानें हल्ला केला. परंतु फिरंगोजीनें आपल्या शूर शिपायांसह त्या फुटक्या बुरुजावर जाऊन अनेक वेळां मोंगलांचे हल्ले मागें परतविले. आपलें सैन्यबळ फार थोडें यास्तव यापुढें मोंगलांच्या अवाढव्य फौजेसमोर आपणास टिकाव धरतां येणार नाहीं असें पाहून दुसरे दिवशीं त्यानें तो किल्ला शाहिस्तेखान याचे स्वाधीन केला. शाहिस्तेखान यानें त्याची फार तारीफ केली, व त्यानें आपल्या पदरीं रहावें म्हणून त्यास फार आग्रह केला. परंतु त्यानें त्या गोष्टीचा निषेध केला, व तो आपल्या लोकांसह शिवाजीकडे निघून गेला.

या एका साधारण किल्ल्याच्या अनुभवावरून मराठ्यांपासून त्यांचे डोंगरी किल्ले परत घेणें हें काम किती अवघड आहे ही गोष्ट शाहिस्तेखानाच्या चांगलीच प्रत्ययास आली. पुढें त्यानें ज्यास्त कुमक पाठविण्याविषयीं औरंगजेबास विनंति केली. तेव्हां त्यानें जोधपुरचा राजा यशवंतसिंग याच्या हाताखालीं कांहीं फौज देऊन त्यास शाहिस्तेखानाच्या मदतीस पाठवून दिलें. चाकणचा किल्ला हातीं आल्यावर शाहिस्तेखान परत पुण्यास आला, व त्या ठिकाणीं यशवंतसिंग त्यास येऊन मिळाला. शाहिस्तेखान आपल्या स्वतःच्या वाड्यांत उतरला आहे, हें वर्तमान शिवाजीस समजलें तेव्हां त्याला त्याचा मोठा राग आला; व त्याचें पारिपत्य करण्याकरितां तो रायगडाहून सिंहगडास येऊन दाखल झाला. शाहिस्तेखान यानें पुण्याची नाकेबंदी केली असतांही एके दिवशीं शिवाजी आपणाबरोबर निवडक पंचवीस मावळे लोक घेऊन कोणा मराठ्याचे लग्नाची वऱ्हाडी मंडळी पुण्यास जात होती, त्या मंडळींत शिरून तो पुण्यास आला, व रात्रीस शाहिस्तेखा-

नावर छापा घालून त्यानें त्याचा पुत्र अबुल फत्तेखान व दुसरे पुष्कळ लोक यांस कापून काढिलें. शाहिस्तेखान गर्भगळित होऊन खिडकीस दोर बांधून खालीं उतरूं लागला, इतक्यांत शिवाजीनें आपल्या भवानीचा फटकारा मारून त्याच्या हाताचीं तीन बोटें उडविलीं, तेव्हां खानसाहेब अल्ला अल्ला, तोबा तोबा, करीत खालीं उडी टाकून पळून गेले. शाहिस्तेखानाच्या लष्करांत ही बातमी पसरली, त्या वेळीं त्या लोकांचें धाबें दणाणून गेलें, व शिवाजीचा बंदोबस्त करण्याची गोष्ट बाजूसच राहून त्यांचा आपसांतच मोठा गोंधळ माजून गेला. शाहिस्तेखान पळाला तो आपल्या गोषांत जाऊन लपून बसला, व अशा रीतीनें त्यानें आपला प्राण वांचविला. शिवाजीनें त्याचा पुष्कळ शोध केला, परंतु तो त्याचे हातीं लागला नाहीं. शेवटीं आपले लोक बरोबर घेऊन टेंभे पाजळीत तो रातोरात सिंहगडास परत आला. सकाळचे प्रहरीं मोंगलांचे शेंदाड-शिपाई तरवारी चमकावीत, व नगारे वाजवीत सिंहगडाजवळ आले. परंतु शिवाजीनें त्यांच्यांवर तोफांचा भडिमार करून त्यांस पिटाळून लाविलें. या वेळीं कार्टोजी गुजर नांवाच्या शिवाजीच्या सरदारानें मोंगलांचा अशा जोरानें पाठलाग केला कीं, त्यानें वाटेंतच त्यांचे बहुतेक लोक ठार मारून टाकिले.

आपण येवढे मोठे लढवय्ये सरदार असून शिवाजीनें आपली अशी कच्ची केली असें पाहून शाहिस्तेखान अतिशय चिडून गेला. 'यशवंतसिंग मराठ्यांस फितूर असल्यामुळें आज आपला पाडाव झाला,' असें तो म्हणूं लागला. त्यामुळें त्या दोघां सरदारांत कलह उत्पन्न झाला. पुढें त्यानें औरंगजेबास त्या हकीकतीचें पत्र लिहिलें त्यां-

तही 'यशवंतसिंग मराठ्यांस अनुकूल आहे' असें लिहिलें होतें. परंतु त्याचें व यशवंतसिंगाचें वैमनस्य पडलें आहे, ही बातमी औरंगजेबास अगोदर समजली होती. त्यामुळें त्यानें खानाच्या लिहिण्यावर फारसा भरंवसा न ठेवितां, त्याची ताबडतोब मीर जुमला वारल्यामुळें रिकाम्या पडलेल्या बंगालच्या सुभेदारीवर नेमणूक केली, व आपला पुत्र मोअजीम यास सुभेदार नेमून दक्षिणेंत यशवंतासिंगाचे मदतीस पाठवून दिलें. मध्यंतरीं यशवंतसिंगानें सिंहगडास वेढा दिला, व तो घेण्याकरतां त्यानें आपली शिकस्त केली; परंतु त्या कामांत त्याला यश आलें नाहीं. नंतर चाकण, जुन्नर वगैरे प्रांतांत आपली बरीच फौज ठेवून तो औरंगाबादेस निघून गेला.

नंतर शिवाजीनें दंडाराजपुरी येथें बरीच फौज गोळा केली, व पोर्तुगीज लोकांचे ताब्यांतील वसई व चौल हे किल्ले घेण्याचा प्रथमतः आव घातला. परंतु त्याची वास्तविक दृष्टि सुरत शहरावर होती. सुरत शहर त्या वेळीं मोंगलांचे ताब्यांत असून तेथें इंग्लिश, पोर्तुगीज, फ्रेंच, डच, वगैरे सर्व लोकांच्या वसाहती होत्या. तसेंच तेथें फार मोठा व्यापार चालत असून तें भरभराटीच्या शिखरास जाऊन पोहोंचलें होतें. शिवाजीनें बरोबर चार हजार निवडक फौज घेऊन नाशिकास देवदर्शनार्थ जाण्याचा आव घातला, व तो एकाएकीं सुरत शहरावर येऊन पडला. तो तें शहर सात दिवसपर्यंत एकसारखें लुटीत होता, व त्याला तेथें अगणित लूट सांपडली. परंतु त्यानें त्या वेळीं युरोपियन लोकांच्या वखारींवर हल्ला केला नाहीं. हें वर्तमान इ० स० १६६४ च्या जानेवारी महिन्याच्या पांचव्या तारखेस घडलें.

नावर छापा घालून त्यानें त्याचा पुत्र अबुल फत्तेखान व दुसरे पुष्कळ लोक यांस कापून काढिलें. शाहिस्तेखान गर्भगळित होऊन खिडकीस दोर बांधून खालीं उतरूं लागला, इतक्यांत शिवाजीनें आपल्या भवानीचा फटकारा मारून त्याच्या हाताचीं तीन बोटें उडविलीं, तेव्हां खान-साहेब अल्ला अल्ला, तोबा तोबा, करीत खालीं उडी टाकून पळून गेले. शाहिस्तेखानाच्या लष्करांत ही बातमी पसरली, त्या वेळीं त्या लोकांचे धाबें दणाणून गेलें, व शिवाजीचा बंदोबस्त करण्याची गोष्ट बाजूसच राहून त्यांचा आपसां-तच मोठा गोंधळ माजून गेला. शाहिस्तेखान पळाला तो आपल्या गोषांत जाऊन लपून बसला, व अशा रीतीनें त्यानें आपला प्राण वांचविला. शिवाजीनें त्याचा पुष्कळ शोध केला, परंतु तो त्याचे हातीं लागला नाहीं. शेवटीं आपले लोक बरोबर घेऊन टेंभे पाजळीत तो रातोरात सिंहग-डास परत आला. सकाळचे प्रहरीं मोंगलांचे शेंदाड-शिपाई तरवारी चमकावीत, व नगारे वाजवीत सिंहगडा-जवळ आले. परंतु शिवाजीनें त्यांच्यांवर तोफांचा भडि-मार करून त्यांस पिटाळून लाविलें. या वेळीं कार्टोजी गुजर नांवाच्या शिवाजीच्या सरदारानें मोंगलांचा अशा जोरानें पाठलाग केला कीं, त्यानें वाटेंतच त्यांचे बहुतेक लोक ठार मारून टाकिले.

आपण येवढे मोठे लढवय्ये सरदार असून शिवाजीनें आपली अशी कच्ची केली असें पाहून शाहिस्तेखान अति-शय चिडून गेला. 'यशवंतसिंग मराठ्यांस फितूर अस-ल्यामुळें आज आपला पाडाव झाला,' असें तो म्हणूं लागला. त्यामुळें त्या दोघां सरदारांत कलह उत्पन्न झाला. पुढें त्यानें औरंगजेबास त्या हकीकतीचें पत्र लिहिलें त्यां-

तही ‘ यशवंतसिंग मराठ्यांस अनुकूल आहे ’ असें लिहिलें होतें. परंतु त्याचें व यशवंतसिंगाचें वैमनस्य पडलें आहे, ही बातमी औरंगजेबास अगोदर समजली होती. त्यामुळें त्यानें खानाच्या लिहिण्यावर फारसा भरंवसा न ठेवितां, त्याची ताबडतोब मीर जुमला वारल्यामुळें रिकाम्या पडलेल्या बंगालच्या सुभेदारीवर नेमणूक केली, व आपला पुत्र मोअजीम यास सुभेदार नेमून दक्षिणेंत यशवंतसिंगाचे मदतीस पाठवून दिलें. मध्यंतरीं यशवंतसिंगानें सिंहगडास वेढा दिला, व तो घेण्याकरतां त्यानें आपली शिकस्त केली; परंतु त्या कामांत त्याला यश आलें नाहीं. नंतर चाकण, जुन्नर वगैरे प्रांतांत आपली बरीच फौज ठेवून तो औरंगाबादेस निघून गेला.

नंतर शिवाजीनें दंडाराजपुरी येथें बरीच फौज गोळा केली, व पोर्तुगीज लोकांचे ताब्यांतील वसई व चौल हे किल्ले घेण्याचा प्रथमतः आव घातला. परंतु त्याची वास्तविक दृष्टि सुरत शहरावर होती. सुरत शहर त्या वेळीं मोंगलांचे ताब्यांत असून तेथें इंग्लिश, पोर्तुगीज, फ्रेंच, डच, वगैरे सर्व लोकांच्या वसाहती होत्या. तसेंच तेथें फार मोठा व्यापार चालत असून तें भरभराटीच्या शिखरास जाऊन पोहोंचलें होतें. शिवाजीनें बरोबर चार हजार निवडक फौज घेऊन नाशिकास देवदर्शनार्थ जाण्याचा आव घातला, व तो एकाएकीं सुरत शहरावर येऊन पडला. तो तें शहर सात दिवसपर्यंत एकसारखें लुटीत होता, व त्याला तेथें अगणित लूट सांपडली. परंतु त्यानें त्या वेळीं युरोपियन लोकांच्या वखारींवर हल्ला केला नाहीं. हें वर्तमान इ० स० १६६४ च्या जानेवारी महिन्याच्या पांचव्या तारखेस घडलें.

सुरत येथें मिळविलेली भारी लूट बरोबर घेऊन शिवाजी रायगडास परत आल्यावर कांहीं दिवसांनीं त्याचा बाप शहाजी हा करनाटकांत तुंगभद्रेचे काठीं बेदनुराजवळ बसवेपट्टण गांवीं शिकार करीत असतां घोड्यावरून पडून मृत्यु पावला. यानंतर कांहीं महिने आपल्या प्रांताचा बंदोबस्त करीत शिवाजी स्वस्थ बसला. शहाजी वारल्यानंतर शिवाजी आपणास 'राजा' असें म्हणवूं लागला, व त्यानें आपल्या नांवाचें नाणें पाडलें.

पुढें त्याच वर्षाच्या आगष्ट महिन्यांत त्यानें अहमदनगर शहर लुटून औरंगाबादच्या सभोंवतालच्या मुलुखांत मोठी धामधूम उडवून दिली. इतक्यांत पन्हाळ्याजवळ विजापुरकरांचें सैन्य होतें, त्यावरील सरदारानें शिवाजी दूरच्या पल्ल्यावर गेला आहे असें पाहून कोंकणपट्टी परत काबीज करण्याचा उद्योग चालविला. परंतु शिवाजीस तें वर्तमान कळतांच तो एकदम कोंकणांत परत आला, व त्यानें त्या सैन्याचा मोड करून त्यास पिटाळून लाविलें.

दक्षिणेंत मोंगलांचे मुलुखांत व इतर ठिकाणीं शिवाजी अशा रीतीनें बंडाळी करीत असतां, उत्तर–हिंदुस्थानांत सर्वत्र स्वस्थता असून दिल्ली येथें औरंगजेब हवापालट करण्याकरितां काश्मीर येथें जाण्याची मोठी जंगी तयारी करीत होता. औरंगजेबाच्या ऐश्वर्याची व त्याच्या स्वारीच्या बादशाही थाटाची थोडीशी तरी कल्पना मनांत येण्याकरितां त्या थाटाचें संक्षिप्त तरी वर्णन देणें जरूर आहे.

ता० ६ दिजंबर इ० स० १६६४ रोजीं दोन प्रहरीं तीन वाजतां औरंगजेब मोठ्या थाटानें दिल्ली शहर सोडून काश्मीर येथें जाण्याकरितां निघाला. तो आपल्या दुखण्यांतून

बरा झाला तेव्हांपासून त्याचे मनांत हा बेत घोळत होता. मोठमोठ्या शहाण्या मुत्सद्दी इतिहासकारांचें या प्रयाणाचे संबंधानें असें मत आहे कीं, शहाजहानासारख्या लोकप्रिय बादशाहाचें येवढें मोठें लचांड आपल्या मागें असतां फक्त प्रकृतीच्या दुरुस्तीकरितां औरंगजेबासारखा दीर्घ शंकेखोर पुरुष निर्वेधपणें इतक्या लांबीच्या पल्ल्यावर गेला नसावा. तर यांत त्याचा हेतु निराळाच असला पाहिजे. तो हा कीं, हिंदुस्थान, इराण, व उसबेग या तीन राष्ट्रांच्या सीमेवर असणारें सुप्रसिद्ध कंदाहार शहर घेण्याचा विचार त्याचे मनांत फार दिवसांपासून घोळत होता, व त्याच कामाकरितां तो बहुधा निघाला असावा; व त्यानें त्या वेळीं आपणाबरोबर जी जंगी फौज घेतली होती त्यावरून वरील अनुमानास बरीच बळकटी येते. असो.

औरंगजेब दिल्लीहून निघाला तो प्रथमतः तेथून ६ मैलांवर शाहालिमार नांवाची त्याची सदोदित उतरण्याची आवडती वाडी होती, तेथें जाऊन दाखल झाला. या ठिकाणीं सहा दिवस मुकाम केल्यावर लाहोर येथें जाण्याकरितां स्वारी निघाली. औरंगजेबाजवळ त्याच्या स्वतःच्या रक्षणार्थ म्हणून पसतीस हजार घोडेस्वार, दहा हजार पायदळ, मोठ्या तोफा सत्तर व लहान तोफा साठ, एवढा सरंजाम असे. याशिवाय लष्कर व तोफखाना निराळाच. वर सांगितलेला तोफखाना नेहमीं स्वारीचे अघाडीस असून बादशाहा मुकामास आला म्हणजे त्याची वर्दी सर्व लोकांस देण्याकरितां त्याला सरबत्ती देत असत.

दिल्ली व लाहोर यांचे दरम्यान सुमारें दीडशें कोसांचें अंतर असून त्या वेळीं तो आठ दिवसांचा रस्ता होता. परंतु औरंगजेबाची स्वारी अशा थाटानें आस्ते आस्ते

चालली होती कीं, त्याला तेथें जाण्यास दोन महिने लागले. तो ता० २९ फेब्रुवारी इ० स० १६६९ रोजीं लाहोर येथें येऊन पोहोंचला.

औरंगजेबाचे स्वारीबरोबर नेहमीं दोन पेषखाने (तंबू वगैरे स्वारीस लागणारें सर्व सामान) असत. त्यांपैकीं एक पेषखाना नेहमीं अघाडीस चालत असे, त्यामुळें स्वारीचा कूच सुरू झाला म्हणजे पुढील मुकामाची सर्व व्यवस्था अगोदर सिद्ध केलेली असे. एक पेषखाना वाहून नेण्यास साठ हत्ती, दोनशें उंट, शंभर खेंचरें व शंभर नोकर एवढा सरंजाम लागत असे.

सर्वांत मोठ्या तंबूस 'हमखास' असें म्हणत असत. त्यांत बादशाहा राहत असे, व तेथेंच आपला दरबार भरवीत असे. प्राति दिवशीं दोन वेळ दरबार भरावयाचा अशी चाल असे. याच्याच शेजारीं परंतु याच्याहून जरा लहान असा दुसरा तंबू असे. त्यास 'गुसलखाना' असें म्हणत असत. बादशाहा या तंबूंत स्नान करीत असे, व सर्व सरदार व अमीरउमराव मंडळीचे संध्याकाळीं मुजरे घ्यावयाचे ते येथेंच घेत असे. संध्याकाळीं हजारों अमीरउमराव लाखों मशाली पेटवून औरंगजेबाचे दर्श-नार्थ निघाले म्हणजे जी गर्दी उसळून जात असे, व जो विलक्षण व भव्य देखावा दिसत असे, त्याचें वर्णन करतां येणें अशक्य आहे.

'हमखास' व 'गुसलखाना' या तंबूंच्या मागच्या बाजूस 'कौलखाना' नांवाचा तिसरा तंबू असे. या ठिकाणीं फक्त बड्या बड्या उमराव लोकांस येण्याची परवानगी असून तेथें राज्यांतील विशेष महत्त्वाच्या कामांची चर्चा चालत असे. त्याच्यामागें उंची कनाथी लावलेले,

किनखाबाचे पडदे सोडलेले, रेशमी बुटीदार कापडानें मढविलेले, व झालरी सोडलेले असे बादशाहाचे खासगी तंबू असत. त्याच्या सर्व तंबूंत उंची विलायती सकलादी, व मखमाली पसरलेल्या असत, व ' हमखास, ' ' गुसलखाना ' व ' कौलखाना ' या तीन तंबूंत त्याचीं रत्नजडीत सिंहासनें मांडलेलीं असत. यालाच लागून त्याच्या जनानखान्याचे तंबू असत. या तंबूच्या सभोंवर उंच कनाथी असून त्यांच्या मध्यंतरीं जनानखान्यांतील नोकर लोकांचे तंबू असत. फक्त एकट्या ' हमखास ' तंबूची कनाथ सोळाशें हात लांबीची होती.

' हमखास ' व दुसरे पांच सहा तंबू सर्व लोकांस फार लांबूनही ओळखितां यावे म्हणून सर्वांत उंच केलेले होते. ' हमखास'च्या पुढच्या अंगास दोन्ही बाजूस दोन भव्य तंबू असून त्यांत कांहीं उंची घोडे विशेष जरूरीच्या कामाकरितां कोणास पाठविणें झालें तर जीन वगैरे घालून तयार ठेवलेले असत. त्यांना लागूनच परंतु बाहेरच्या बाजूस तोफखाना असे. 'हमखास'च्या पुढच्या अंगास पुष्कळ खुली जागा असे, व तिच्या पुढच्या बाजूस ' नगारखाना ' व ' चौकीखाना ' या नांवांचे दोन तंबू असत. तेथें बादशाहाचा नगारखाना व चौकीपहारा ठेवलेला असे.

बादशाहाच्या तंबूंकरतां जी जागा आंखलेली असे, तिची पुढची बाजू शिवाय करून बाकीच्या तीन बाजूंस बादशाहाच्या नोकर मंडळीचे तंबू असून, शिवाय त्याचीं शस्त्रास्त्रें, घोडयांचे उंची जीन व लगाम, बादशाहास आलेल्या भेटी, उंची कपडे, फळफळावळ, मेवामिठाई, पान-

---

१ औरंगजेबाचीं मयूरासनासह रत्नजडीत अशीं सात सिंहासनें होतीं—बरनीर.

सुपारी, गंगेचें[1] पाणी वगैरे जिनसा ठेवण्याचे निरनिराळे तंबू असत. फक्त पानसुपारीचे तंबू चार होते, व स्वयंपाक व त्यास लागणारीं भांडीं व साहित्य यांचे सोळा तंबू होते. याशिवाय त्याचा शिकारखाना बरोबर असल्यामुळें हत्ती, घोडे, कुत्रे, मांसाहारी पक्षी, हरणें, त्यांस धरण्याकरितां पाळलेले चित्ते, वनगाई, वाघ, सिंह, अस्वल, गेंडे, बंगाली रेडे, बैल वगैरेंचे शेंकडों निरनिराळे तंबू होते.

अमीरउमराव मंडळीचे तंबू बादशाहाच्या तंबूंच्या दोन्ही बाजूंस मैल दीड मैल लांब पसरलेले असत. कोणाचा तंबू 'हमखास'च्या कोणत्या बाजूस किती अंतरावर मारावयाचा त्याची व्यवस्था स्वारी निघण्यापूर्वीच होत असे. बादशाहाप्रमाणें अमीरउमराव लोकांचाही दुहेरी पेषखाना असे. बादशाहाच्या तंबूंमधून त्यास लागणाऱ्या जिनसांचे, व अमीरउमरावांच्या तंबूंमधून सर्व लोकांस लागणाऱ्या दाणावैरण, गहूं, तूप, लोणी, साखर वगैरे सर्व तऱ्हेच्या जिनसांचे बाजार भरलेले असत. छावणीचे निरनिराळे भाग ओळखितां यावे म्हणून त्या त्या भागांचीं नांवें घालून अतिशय उंच पताका लाविलेल्या असत. याशिवाय मनसबदार, दिवाणी कामदार, व्यापारी, खासगी चाकरनोकर व दुसरें बाजारबुणगें यांचे हजारों लहान लहान तंबू मधून मधून असत. चोरीचपाटीच्या बंदोबस्ताकरितां पांच पांचशें कदमांच्या अंतरावर चौक्या ठेवलेल्या असत, व स्वारांची घस्त फिरत असे. ते 'खबरदार' म्हणून मोठ्यानें ओरडत असत. बरनीर साहेब असें म्हणतात कीं, "इतका बंदोबस्त होता तरी चोऱ्या होतच असत."

[1] औरंगजेच बहुतकरून नेहमीं गंगेचें पाणी पीत असे.



'हमखास' तंबू रात्रीस सुद्धां ओळखितां यावा म्हणून त्याच्यापुढें ८० हात उंचीची काठी असे व तिच्यावर आकाशदिवा टांगलेला असे. स्वारीचा कूच सुरू झाला म्हणजे नगाऱ्यांचा दणदणाट, तोफांच्या गाड्यांचा घडघडाट, हत्तींच्या गळ्यांतील घंटांचा घणघणाट, घोड्यांचा टापांचा खडखडाट, यांच्यायोगानें आकाश दुमदुमून जात असे, व दशदिशा धुळीनें अंध होऊन जात. अघाडीस जंगी तोफखाना, त्याच्या मागून शेंकडों पायदळ पलटणें, त्याच्या मागून हजारों घोडेस्वार, त्यांच्यामागें बादशाहाचें खासगी सैन्य व खासा स्वारी, त्याच्यामागें हत्तींवर अंबाऱ्यांतून बसलेला त्याचा जनानखाना, त्याच्यामागें बादशाहाच्या अमीरउमराव लोकांचा जनानखाना, त्याच्यामागें हजारों पालख्या व म्याने यांतून बसलेले अमीरउमराव लोक, त्यांच्यामागें त्यांच्या नोकर लोकांचे थवे, त्यांच्यामागें बादशाहाचे खासगी व दिवाणी कामदार, त्यांच्यामागें व्यापारी लोकांचे तांडेचेतांडे, त्यांचेमागें असंख्य बाजारबुणगें, व त्याच्यामागें पुनः लष्करी लोक. या एकंदर थाटाचें वर्णन वाचलें म्हणजे पुष्कळांस ही कादंबरी आहे असें वाटेल. परंतु कादंबरी नव्हे. औरंगजेबाचें तसेंच वैभव होतें. बरनीर साहेब या स्वारीबरोबर होते, व त्यांनीं आपल्या डोळ्यांनीं हा सर्व थाट पाहिलेला होता. ते लिहितात कीं, "वाचक हो! कल्पनेची धांव जितकी पोहोंचेल तितकी पोहोंचवा, तरी सुद्धां औरंगजेबाच्या स्वारीच्या थाटाची खरी कल्पना तुम्हांस करतां येणार नाहीं." औरंगजेबाच्या ह्या स्वारीबरोबर अजमासें ४ लाख मनुष्य असून त्याच्या छावणीचा घेर सुमारें आठ मैल पडलेला असे. वर दिलेल्या वर्णनावरून औरं-

गजेबाच्या ऐश्वर्याची कल्पना आमचे वाचकांस बरीच झाली असेल. असो.

याच वेळेच्या सुमारास शिवाजीनें औरंगजेबाचीं पुष्कळ तारवें धरिलीं, तसेंच मुसलमान यात्रेकरू मक्केस जात होते त्यांचींही गलबतें धरून लुटलीं, व घांटावरही मोंगलांचे मुलुखास फार त्रास दिला. औरंगजेब या वेळीं काश्मीर येथें होता. त्याला हें वर्तमान समजलें तेव्हां शिवाजीचा अतिशय राग आला, व त्यानें त्याचें पारिपत्य करण्या-करितां यशवंतसिंग व मोअजीम यांस परत बोलावून दिला-वरखान व जयसिंग या दोन सरदारांस दक्षिणेंत पाठवून दिलें. त्यानें जातांना जयसिंग यास असें सांगितलें कीं, " तुम्हीं शिवाजी राजे यांस जिवंत धरून आणावें, म्हणजे तुमचें बहुतां प्रकारें ऊर्जित होईल. शास्तीखानासारखें न करणें. इमानइतबारें सेवा करून शास्तीचे नाकास चूर्ण लावणें. तुम्हीं हिंदु मर्दानें, नेकजाद; हरगीज ( कोणत्याही प्रकारें ) तफावत न करणें. इसवास्ते दक्षिणेचे मोहिमेस जावयास फर्माविलें आहे." त्या वेळीं जयसिंगानें बादशा-हास मुजरा केला, व तो म्हणाला " आम्ही हजरतीचे दुवागीर ( हितचिंतक ). हमारे बडे तागायत बादशाके कदमोकों तफावत केली नाहीं. आमचा करार जीव-जमीयतनिशीं पादशहाके दौलतकेवास्ते खर्च होना. और कुच जानते नही. शिवाकी क्या मुजाख? हम सब दख्खन काबीज पादशाहाके मेहेरसें करेंगे. ये हिंमत हज-रतकु रोषन ( श्रुत ) है. शिवाकु पकडलाते है. और इस बाबें हमारे अर्ज शिवा इमानसें दर बंदगीके हजर हुवा तो सब तकशीर माफ करून जादा दौलत देऊन बढती करावी. हमारेपर नेकनजर देऊन शिवाका भला केल्यानें

अच्छी बात. इस बावें हमारे शीरपर हात रखना. शिवाजीस हजर करितों." त्या वेळीं औरंगजेबानें त्यास "तुमचे वचनावेगळे नाहीं, तुम्हीं सांगाल त्याप्रमाणें चालवूं," असें ह्मणून कुराणाची शपथ दिली. नंतर त्या दोघांस मोठा नजरनजराणा देऊन त्यांची मोठ्या थाटानें दक्षिणेंत रवानगी केली.

अशा रीतीनें जयसिंग व दिलावरखान हे इ० स० १६६५ च्या फेब्रुवारी महिन्यांत नर्मदा उतरून खालीं आले, व त्यांनीं सिंहगड व पुरंदर यांचे दरम्यान आपल्या फौजेचा तळ दिला. पुढें जयसिंगानें सिंहगडास व दिलावरखानानें पुरंदरास वेढा दिला. शिवाजी या वेळीं कानडा प्रांतांत बारशिलोर नांवाचें विजापुरच्या ताब्यांतील एक मातबर बंदर लुटीत होता. तेथें अतिशय लूट मिळवून रायगड येथें परत आल्यावर त्याला वरील वर्तमान कळलें. शिवाजी नेहमीं आपली शक्ति ओळखून कोणतेंही कृत्य करीत असे. जयसिंग व दिलावरखान यांच्याबरोबर लढाईस उभें राहून आपला निभाव लागणार नाहीं, असें वाटून त्यानें जयसिंगाशीं सामाचें बोलणें सुरू केलें, व रघुनाथपंत पंडितराव व दादाजी रघुनाथ प्रभु यांस त्याच्याकडे पाठवून दिलें. अशा रीतीनें तहाचें बोलणें सुरू झाल्यामुळें सिंहगडच्या वेढ्याचें काम बंद पडलें. परंतु दिलावरखानानें पुरंदरच्या वेढ्याचें काम मोठ्या जोरानें चालविलें होतें. त्या वेळीं पुरंदर येथें मुरार बाजी नांवाचा शिवाजीचा सरदार असून त्याचे हाताखालीं दोन हजार मावळे होते. दिलावरखानानें तो किल्ला घेण्याविषयीं आपली शिकस्त केली, परंतु किल्ला त्याचे हातीं आला

१ काव्येतिहाससंग्रह.

नाहीं. एके प्रसंगीं मुरार बाजी हा बरोबर सातशें निवडक लोक घेऊन किल्ल्याबाहेर पडला. प्रथमतः त्यानें मोंगलांचे लोकांस आपले अंगावर पाडून घेतलें, व नंतर अशा जोरानें उलट खाल्ली कीं, त्यानें हां हां म्हणतां त्यांचे एक हजार लोक कापून काढले. मुरार बाजी स्वतः दिलावरखानास ठार मारण्याकरितां त्याच्या अंगावर चालून गेला, व त्याला त्यानें गांठलेंच होतें; परंतु इतक्यांत एक बाण त्याच्या मर्मस्थानीं येऊन लागला, त्यामुळें तो शूर सरदार खालीं पडून प्राणास मुकला. त्याबरोबर मावळे लोकांचें धैर्य सुटून ते परत किल्ल्यांत निघून गेले. ह्या हल्ल्यांत एकंदर तीनशें मावळे पडले. मुरार बाजी पडला तरी किल्ल्यांतील शिबंदीनें धीर सोडिला नाहीं, व त्यांनीं मोठ्या शूरपणानें त्याचें रक्षण केलें. दिलावरखानानें किल्ल्याच्या माचीच्या बुरुजाखालीं सुरुंग लावून तो उडविला, व मोंगलांनीं मोठ्या जोरानें हल्ला करून माची आपल्या ताब्यांत घेतली. नंतर किल्ला आपले हातीं लागला असें मोंगलांस वाटून ते बेसावधपणें बालेकिल्ल्यावर चढून जाऊं लागले. त्या वेळीं हेटकरी लोकांनीं त्यांच्यावर अशा रीतीनें गोळ्यांचा वर्षाव केला कीं, त्यांनीं त्या बहुतेक लोकांस ठार मारिलें. नंतर दिलावरखानानें पुरंदरच्या ईशान्य दिशेस वज्रगड नांवाचा किल्ला होता, त्यावर आपल्या तोफा चढवून तेथून बालेकिल्ल्यावर मारा चालविला. तथापि आंतील लोकांनीं त्यास दाद दिली नाहीं, व त्याच संधीस पावसाळा सुरू झाल्यामुळें मोंगलांचें कांहींच चालेनासें झालें.

शिवाजीनें जयसिंगापाशीं तहाचें बोलणें सुरू केलें होतें, म्हणून वर सांगितलेंच आहे. पुढें तो इ० स० १६६५ च्या जुलै महिन्यांत स्वतः जयसिंगास भेटण्याकरितां गेला. नंतर त्या दोघांमध्यें तह होऊन त्यांत असें ठरलें कीं, शिवाजीनें आपल्या बत्तीस किल्ल्यांपैकीं वीस किल्ले मोंगलांस द्यावे, व बारा जहागिरीदाखल आपणाकडे ठेवावे; आणि औरंगजेबानें शिवाजीचा पुत्र संभाजी यास पांच हजार स्वारांची सरदारी द्यावी, व विजापुरच्या प्रत्येक परगण्याच्या जमाबंदीवर चौथाई व सरदेशमुखी हे हक्क द्यावे. औरंगजेबानें पुढें शिवाजीस जें पत्र पाठविलें, त्यांत पहिलीं दोन कलमें कबूल केलीं होतीं, परंतु तिसऱ्या कलमाचा मुळींच उल्लेख केला नव्हता. वरील तह झाल्यामुळें दिलावरखानास पुरंदरचा वेढा उठवून परत यावें लागलें.



हा तह झाल्यानंतर औरंगजेबाचे आज्ञेवरून जयसिंग शिवाजीस आपल्या मदतीस घेऊन विजापुरचें राज्य घेण्याकरितां निघाला. त्या वेळीं शिवाजीनें आपणाबरोबर फक्त दोन हजार स्वार व एक हजार पायदळ इतकें सैन्य घेतलें होतें. त्या लढाईंत शिवाजी व त्याचा शूर सरदार नेताजी पालकर यांनीं फार मोठीं पराक्रमाचीं कृत्यें केलीं. पुढें तें वर्तमान औरंगजेबास समजलें तेव्हां त्यानें शिवाजीस एक पत्र पाठवून त्यांत त्याची फार स्तुति केली, व त्याला आपले भेटीस दिल्लीस बोलाविलें. त्या पत्रांत "तुमची मोठी बढती होऊन तुम्हांस लौकरच दक्षिणेंत परत जाण्याची परवानगी मिळेल," असेंही लिहिलें होतें. प्रथमतः शिवाजीस जावें असें वाटेना, परंतु जयसिंगानें त्या गोष्टीस भर दिल्यामुळें व त्याबद्दलची हमी घेतल्यामुळें, शेवटीं दिल्लीस जाण्याचा त्याचा निश्चय ठरला. नंतर रायगडास येऊन त्यानें मोरोपंत पिंगळे, आबाजी सोनदेव, अण्णाजी दत्तो, नेताजी

पालकर, प्रतापराव गुजर वगैरे सरदारांवर राज्याचा कारभार सोंपवून त्यांस " बंदोबस्तीनें रक्षणें, व गडकोट किल्ले जतन करणें. श्रीमन्ममहाराज मातुश्री आईसाहेबांचे आज्ञेंत वर्तणूक करणें. हमेशा आम्हांकडील दिल्लीची बातमी राखणें. बहुत सावधपणें असणें. आम्ही दिल्लीस गेलों म्हणजे अवसान न सोडणें. जें जें पराक्रमें राज्य साधेल तें वरचेवरी वृद्धिंगत करणें. आम्ही कांहीं अवसान टाकून डगमगीत नाहीं. आमचा सबळ पक्ष, हिंदु राजे साध्य, संपदाद्वारा अनुपदें जाहले आहेत, ते नेऊन बदलियानें पादशाहाची तमा धरणार नाहींत. आम्हीही रात्रंदिवस सावध आहों. आमची चिंता न करणें. वरचेवरी आईसाहेबांचें समाधान सर्व गोष्टींनें करीत जाणें," अशी आज्ञा केली, व संभाजीस बरोबर घेऊन तो इ० स० १६६६ त दिल्ली येथें जाण्याकरितां निघाला. संभाजी त्या वेळीं फक्त पांच वर्षांचा होता. औरंगजेबास ती बातमी कळतांच त्यानें शिवाजीची वाटेनें उत्तम बरदास्त ठेवण्याविषयीं ठिकठिकाणीं आपल्या माहालकरी व मोकासदार लोकांस ताकीदपत्रें पाठविलीं.

नंतर शिवाजी दिल्लीजवळ आला अशी वर्दी औरंगजेबास पोहोंचतांच त्यानें जयसिंगाचा पुत्र रामसिंग व दुसरा एक हलक्या प्रतीचा मानकरी यांस सामोरें पाठवून दिलें. 'प्रथम ग्रासे मक्षिकापातः' याप्रमाणें औरंगजेबानें आपणास कोणी बड्या दर्जाचा उमराव सामोरा पाठविला नाहीं, असें पाहून शिवाजीस फार वाईट वाटलें, व रागही आला. परंतु त्या वेळीं त्यानें तो अपमान तसाच सहन केला. औरंगजेबानें शिवाजीस उतरण्याकरितां म्हणून एक स्वतंत्र पेठ नेमून दिली होती, तेथें जाऊन



तो उतरला. तेव्हांपासून त्या पेठेस शिवपुरा असें नांव पडलें. नंतर नेमलेल्या दिवशीं तो बादशाहाचे भेटीस गेला, व त्याच्यापुढें नजरनजराणा ठेऊन त्यानें त्यास मुजरा केला. शिवाजीची खरी योग्यता औरंगजेबास कळली नव्हती, त्यामुळें त्याला तो तुच्छ लेखीत असे, व त्यामुळेंच त्यानें या भेटीचे प्रसंगीं त्याचा योग्य मानमरातब ठेविला नाहीं. मुजरा केल्यावर औरंगजेबानें शिवाजीस पहिल्या प्रतीच्या सरदारांत न बसवितां त्याला तिसऱ्या प्रतीच्या सरदारांत बसविलें. त्या मानी वीरास हा अपमान सहन न होऊन त्याचा इतका संताप झाला व रागानें माथें इतकें भिरभिरून गेलें कीं, तो एकदम तेथून उठला, व उमराव लोकांच्या मागें जातो आहे तोंच घेरी येऊन धाडकर खालीं पडला. त्या वेळीं "हें काय झालें?" असा औरंगजेबानें रामसिंगास प्रश्न केला. तेव्हां त्यानें मोठ्या शहाणपणानें " शिवाजी राजे जंगलके हैवान (मनुष्य) त्यासी गर्मी बहुत झाली, तेणेंकरून काहिले जहाले." असें सांगितलें. शिवाजी सावध झाल्यावर "तुमच्या पित्यानें आपलें वचन मोडलें," असें तो रामसिंगास म्हणाला; नंतर "सरकारांनीं आपली अब्रू तर पुर्वींच घेतली, त्या अर्थी आतां आपला प्राणही घ्यावा" असें बादशाहास बोलून त्यानें दिलेल्या पोषागाचा स्वीकार न करितां तो दरबार सोडून एकदम चालता झाला. हें एकंदर कृत्य पाहून औरंगजेबास मोठा संतोष वाटला. त्याचे मनांत कांहीं तरी निमित्तानें शिवाजीस कैद करावयाचें होतें. त्यानें लगेच दिल्लीचा कोतवाल पोलादखान यास पांच हजार लोकांनिशीं शिवाजी ज्या वाड्यांत राहत होता, त्याचे सभोंवार सक्त पाहरा ठेवण्याकरितां पाठवून

पालकर, प्रतापराव गुजर वगैरे सरदारांवर राज्याचा कार भार सोंपवून त्यांस " बंदोबस्तीनें रक्षणें, व गडकोट किल्ले जतन करणें. श्रीमन्ममहाराज मातुश्री आईसाहेबांचे आज्ञें वर्तणूक करणें. हमेशा आम्हांकडील दिल्लीची बातमी राखणें. बहुत सावधपणें असणें. आम्ही दिल्लीस गेले म्हणजे अवसान न सोडणें. जें जें पराक्रमें राज्य साधेल तें वरचेवरी वृद्धिंगत करणें. आम्ही कांहीं अवसान टाकून डगमगीत नाहीं. आमचा सबळ पक्ष, हिंदु राजे साध्य संपदाद्वारा अनुपदें जाहले आहेत, ते नेऊन बदलियानें पादशाहाची तमा धरणार नाहींत. आम्हीही रात्रंदिवस सावध आहों. आमची चिंता न करणें. वरचेवरी आईसाहे बांचें समाधान सर्व गोष्टीनें करीत जाणें," अशी आज्ञा केली, व संभाजीस बरोबर घेऊन तो इ० स० १६६६ त दिल्ली येथें जाण्याकरितां निघाला. संभाजी त्या वेळी फक्त पांच वर्षांचा होता. औरंगजेबास ती बातमी कळ तांच त्यानें शिवाजीची वाटेनें उत्तम बरदास्त ठेवण्याविषयीं ठिकठिकाणीं आपल्या माहालकरी व मोकासदार लोकांस ताकीदपत्रें पाठविलीं.

नंतर शिवाजी दिल्लीजवळ आला अशी वर्दी औरं गजेबास पोहोंचतांच त्यानें जयसिंगाचा पुत्र रामसिंग व दुसरा एक हलक्या प्रतीचा मानकरी यांस सामोरें पाठवून दिलें. 'प्रथम ग्रासे मक्षिकापातः' याप्रमाणें औरं- गजेबानें आपणास कोणी बड्या दर्जाचा उमराव सामोरा पाठविला नाहीं, असें पाहून शिवाजीस फार वाईट वाटलें, व रागही आला. परंतु त्या वेळीं त्यानें तो अपमान तसाच सहन केला. औरंगजेबानें शिवाजीस उतरण्याकरितां म्हणून एक स्वतंत्र पेठ नेमून दिली होती, तेथें जाऊन



तो उतरला. तेव्हांपासून त्या पेठेस शिवपुरा असें नांव पडलें. नंतर नेमलेल्या दिवशीं तो बादशाहाचे भेटीस गेला, व त्याच्यापुढें नजरनजराणा ठेऊन त्यानें त्यास मुजरा केला. शिवाजीची खरी योग्यता औरंगजेबास कळली नव्हती, त्यामुळें त्याला तो तुच्छ लेखीत असे, व त्यामुळेंच त्यानें या भेटीचे प्रसंगीं त्याचा योग्य मानमरा- तब ठेविला नाहीं. मुजरा केल्यावर औरंगजेबानें शिवा- जीस पहिल्या प्रतीच्या सरदारांत न बसवितां त्याला तिसऱ्या प्रतीच्या सरदारांत बसविलें. त्या मानी वीरास हा अपमान सहन न होऊन त्याचा इतका संताप झाला व रागानें माथें इतकें भिरभिरून गेलें कीं, तो एकदम तेथून उठला, व उमराव लोकांच्या मागें जातो आहे तोंच घेरी येऊन धाडकर खालीं पडला. त्या वेळीं "हें काय झालें?" असा औरंगजेबानें रामसिंगास प्रश्न केला. तेव्हां त्यानें मोठ्या शहाणपणानें " शिवाजी राजे जंगलके हैवान (मनुष्य) त्यासी गर्मी बहुत झाली, तेणेंकरून काहिले जहाले." असें सांगितलें. शिवाजी सावध झाल्यावर "तुमच्या पित्यानें आपलें वचन मोडलें," असें तो रामसिंगास म्हणाला; नंतर "सरकारांनीं आपली अब्रू तर पुर्वींच घेतली, त्या अर्थीं आतां आपला प्राणही घ्यावा" असें बादशाहास बोलून त्यानें दिलेल्या पोषाखाचा स्वीकार न करितां तो दरबार सोडून एकदम चालता झाला. हें एकं- दर कृत्य पाहून औरंगजेबास मोठा संतोष वाटला. त्याचे मनांत कांहीं तरी निमित्तानें शिवाजीस कैद करावयाचें होतें. त्यानें लगेच दिल्लीचा कोतवाल पोलादखान यास पांच हजार लोकांनिशीं शिवाजी ज्या वाड्यांत राहत होता, त्याचे सभोंवार सक्त पाहरा ठेवण्याकरितां पाठवून

पालकर, प्रतापराव गुजर वगैरे सरदारांवर राज्याचा कारभार सोंपवून त्यांस " बंदोबस्तीनें रक्षणें, व गडकोट किल्ले जतन करणें. श्रीमन्महाराज मातुश्री आईसाहेबांचे आज्ञेंत वर्तणूक करणें. हमेशा आम्हांकडील दिल्लीची बातमी राखणें. बहुत सावधपणें असणें. आम्ही दिल्लीस गेलों म्हणजे अवसान न सोडणें. जें जें पराक्रमें राज्य साधेल तें वरचेवरी वृद्धिंगत करणें. आम्ही कांहीं अवसान टाकून डगमगीत नाहीं. आमचा सबळ पक्ष, हिंदु राजे साध्य, संपदाद्वारा अनुपदें जाहले आहेत, ते नेऊन बदलियानें पादशाहाची तमा धरणार नाहींत. आम्हीही रात्रंदिवस सावध आहों. आमची चिंता न करणें. वरचेवरी आईसाहेबांचें समाधान सर्व गोष्टीनें करीत जाणें," अशी आज्ञा केली, व संभाजीस बरोबर घेऊन तो इ० स० १६६६ त दिल्ली येथें जाण्याकरितां निघाला. संभाजी त्या वेळीं फक्त पांच वर्षांचा होता. औरंगजेबास ती बातमी कळतांच त्यानें शिवाजीची वाटेनें उत्तम बरदास्त ठेवण्याविषयीं ठिकठिकाणीं आपल्या माहालकरी व मोकासदार लोकांस ताकीदपत्रें पाठविलीं.

नंतर शिवाजी दिल्लीजवळ आला अशी वर्दी औरंगजेबास पोहोंचतांच त्यानें जयसिंगाचा पुत्र रामसिंग व दुसरा एक हलक्या प्रतीचा मानकरी यांस सामोरें पाठवून दिलें. 'प्रथम ग्रासे मक्षिकापातः' याप्रमाणें औरंगजेबानें आपणास कोणी बड्या दर्जाचा उमराव सामोरा पाठविला नाहीं, असें पाहून शिवाजीस फार वाईट वाटलें, व रागही आला. परंतु त्या वेळीं त्यानें तो अपमान तसाच सहन केला. औरंगजेबानें शिवाजीस उतरण्याकरितां म्हणून एक स्वतंत्र पेठ नेमून दिली होती, तेथें जाऊन



तो उतरला. तेव्हांपासून त्या पेठेस शिवपुरा असें नांव पडलें. नंतर नेमलेल्या दिवशीं तो बादशाहाचे भेटीस गेला, व त्याच्यापुढें नजरनजराणा ठेऊन त्यानें त्यास मुजरा केला. शिवाजीची खरी योग्यता औरंगजेबास कळली नव्हती, त्यामुळें त्याला तो तुच्छ लेखीत असे, व त्यामुळेंच त्यानें या भेटीचे प्रसंगीं त्याचा योग्य मानमरातब ठेविला नाहीं. मुजरा केल्यावर औरंगजेबानें शिवाजीस पहिल्या प्रतीच्या सरदारांत न बसवितां त्याला तिसऱ्या प्रतीच्या सरदारांत बसविलें. त्या मानी वीरास हा अपमान सहन न होऊन त्याचा इतका संताप झाला व रागानें माथें इतकें भिरभिरून गेलें कीं, तो एकदम तेथून उठला, व उमराव लोकांच्या मागें जातो आहे तोंच घेरी येऊन धाडकर खालीं पडला. त्या वेळीं "हें काय झालें?" असा औरंगजेबानें रामसिंगास प्रश्न केला. तेव्हां त्यानें मोठ्या शहाणपणानें " शिवाजी राजे जंगलके हैवान (मनुष्य) त्यासी गर्मी बहुत झाली, तेणेंकरून काहिले जहाले." असें सांगितलें. शिवाजी सावध झाल्यावर "तुमच्या पित्यानें आपलें वचन मोडलें," असें तो रामसिंगास म्हणाला; नंतर "सरकारांनीं आपली अब्रू तर पुर्वींच घेतली, त्या अर्थीं आतां आपला प्राणही घ्यावा" असें बादशाहास बोलून त्यानें दिलेल्या पोषाखाचा स्वीकार न करितां तो दरबार सोडून एकदम चालता झाला. हें एकंदर कृत्य पाहून औरंगजेबास मोठा संतोष वाटला. त्याचे मनांत कांहीं तरी निमित्तानें शिवाजीस कैद करावयाचें होतें. त्यानें लगेच दिल्लीचा कोतवाल पोलादखान यास पांच हजार लोकांनिशीं शिवाजी ज्या वाड्यांत राहत होता, त्याचे सभोंवार सक्त पाहरा ठेवण्याकरितां पाठवून

दिलें. अशा रीतीनें कपटानें औरंगजेबानें आपणास फसविलें असें पाहून शिवाजीस फार वाईट वाटलें. "माझें येथें प्रयोजन नसल्यास मला दक्षिणेंत जाण्याची परवानगी द्यावी," अशी पत्रद्वारा शिवाजीनें औरंगजेबाची प्रार्थना केली. परंतु तो तिकडे मुळींच लक्ष्य देईना. तेव्हां शिवाजीस मोठी काळजी लागली, व आपली या लचांडांतून कशी सुटका करून घ्यावी, याविषयीं तो युक्ति योजूं लागला. प्रथमतः त्यानें आपल्या लोकांस दिल्लीची हवा मानवत नाहीं, असा बहाणा करून त्यांस दक्षिणेंत पाठविण्याची औरंगजेबाकडून परवानगी काढिली. शिवाजीचे सर्व लोक दक्षिणेंत गेले तर तो अधिकच आपल्या कबजांत येईल, असें औरंगजेबास वाटल्यावरून त्यानेंही त्यांस जाण्यास परवानगी दिली. पुढें शिवाजीनें अजारीपणाचें मिष केलें, व त्यास औषध देण्याकरितां जे हिंदु वैद्य येत असत, त्यांस वश करून घेऊन त्यांच्या मध्यस्थीनें, व रामसिंगाचे साहाय्यानें आपल्या बाहेरच्या इष्टमित्रांशीं पत्रव्यवहार सुरू केला. पुढें त्यानें अमीरउमराव, इष्टमित्र गोसावी, फकीर वगैरे मंडळीस देण्याकरितां मोठमोठ्या पेटाऱ्यांतून मेवामिठाई पाठविण्याचा परिपाठ घातला. हे पेटारे रोजच्या रोज जात असत, त्यामुळें तसे पेटारे निघाले, म्हणजे पहारेकरी लोक झाडा वगैरे घेत नसत. पुढें बाहेरील बंदोबस्त यथास्थित झाल्यावर एके दिवशीं संध्याकाळीं तो एका पेटाऱ्यांत बसला, व एकांत संभाजीस बसवून व आपल्या बिछान्यावर आपला विश्वासु नोकर हिरोजी फर्जंद यास निजवून आपल्या तुरुंगांतून बाहेर पडला. शिवाजी व संभाजी

१ काव्येतिहाससंग्रह.

निर्विघ्नपणें बाहेर पडल्यावर कांहीं वेळानें हिरोजीही काखेस आपला बटवा अडकवून कांहीं कामाचे निमित्तानें बाहेर पडला तो पडलाच. शिवाजीनें लगेच बैराग्याचा वेश घेतला, व संभाजीस बरोबर घेऊन तो मथुरेस आला, व तेथें मोरोपंत पिंगळे याचे तिघे मेहुणे कृष्णाजीपंत, काशीपंत व विसाजीपंत हे राहत असत त्यांच्या स्वाधीन संभाजीस[1] करून आपण त्याच वेशानें दिल्ली सोडल्यापासून नऊ महिन्यांनीं गोंडवणांतून हैदराबादेकडून रायगड येथें सुखरूप येऊन पोहोंचला.

शिवाजी पळून गेला हें वर्तमान औरंगजेबास कळतांच तो दांतओठ खाऊं लागला. त्यानें त्याला पकडून आणण्याकरितां चोहींकडे आपली फौज पाठवून दिली.

---

१ संभाजीस वर सांगितलेल्या त्रिवर्ग बंधूंच्या स्वाधीन करून शिवाजी निघून गेल्यावर पुढें ती बातमी औरंगजेबास समजली. तेव्हां त्यानें लगेच त्यांच्या घरावर सक्त पहारा ठेवावा, म्हणून हुकूम केला. त्या वेळीं काशीपंत यानें " हा माझा पुत्र आहे, राजपुत्र नाहीं." असें सांगितलें. तेव्हां औरंगजेबानें " तुम्हीं त्यास पुढें घेऊन भोजन केल्यास आमची खातरी होईल " असें सांगितलें. त्या वेळीं काशीपंतानें केळीच्या पानावर पोहे कालवून संभाजीस जवळ घेतलें व दोघांनीं ते खाल्ले. तेव्हां बादशाहाचा संशय फिटून त्यानें त्यांच्या घराभोंवतालचा पहारा उठविला. शिवाजी रायगडास येऊन पोहोंचल्यावर थोडक्याच दिवसांनीं काशीपंत संभाजीस मुलीचा वेष देऊन रायगडास घेऊन आला व त्यानें त्यास शिवाजीच्या स्वाधीन केलें. शिवाजीनें काशीपंताचा मोठा सन्मान करून त्यास मोठें बक्षिस दिलें. काशीपंताच्या स्वामीभक्तीचें हें उदाहरण ध्यानांत ठेवण्यासारखें आहे. ज्याच्या पदरीं अशीं एकनिष्ठ माणसें असतील त्याचा भरभराट कां होणार नाहीं ?—काव्येतिहाससंग्रह, क्यांचेल.

शिवाजी नऊ महिनेपर्यंत वेश पालटून प्रवास करीत होता, व वाटेनें त्याच्यावर पुष्कळ संकटें आलीं होतीं. परंतु निरनिराळे समयोचित बहाणे करून आपण कोण याचा त्यानें मोंगलांस गंधही लागूं दिला नाहीं, याबद्दल त्याची जितकी तारीफ करावी तितकी थोडीच आहे. शिवाजीची सुटका करण्याचे कामीं रामसिंगाची मदत आहे, असा औरंगजेबास संशय आल्यावरून त्यानें कांहीं दिवस त्यास दरबारांत येण्याचें बंद केलें होतें.

शिवाजी दिल्ली येथून पळून गेल्यावर लौकरच ह्मणजे इ० स० १६६६च्या दिजंबर महिन्यांत शहाजहान बादशाहा मरण पावला. औरंगजेबानें त्यास आग्र्याचे किल्ल्यांत अटकेंत ठेविलें होतें; परंतु त्यानें त्यास दुसऱ्या कोणत्याही रीतीनें वाईट तऱ्हेनें वागविलें नाहीं. त्याला सोडविण्याकरितां लोक बंड करितील कीं काय, अशी त्यास नेहमीं भीति असे, त्यामुळें शहाजहान याच्या मृत्यूची तो वाटच पहात होता, व तो मेला असें त्यास कळलें तेव्हां त्यास मोठा आनंद झाला. काय ही पितृभक्ति! अशा रीतीनें आपल्या पित्यास वागविणारे व त्याच्या मृत्यूनें आनंद मानणारे लोकांस नराधम म्हटलें तर विशेष दोष लागेल काय? बिचारा शहाजहान मात्र अशा क्रूर पुत्राच्या हातून लौकर सुटला, हा परमेश्वरानें त्याच्यावर मोठा अनुग्रहच केला असें म्हटलें पाहिजे.

या वेळीं औरंगजेबाचें वैभव शिखरास जाऊन पोहोंचलें होतें. त्याच्या अवाढव्य राज्यांत बहुतेक स्वस्थता होती. काश्मीरच्या सुभेदारानें धाकटा तिबेट देश जिंकून मोंगलांचे अमलाखालीं आणिला होता. शाहिस्तेखान यानें आराकानी लोकांस जिंकून बंगालच्या उपसागराच्या पूर्वेस

चितगांवपर्यंतचा सर्व मुलूख मोंगलांचे राज्यांत सामील केला होता; शिवाजी अज्ञातवासांत असल्यामुळें त्याची भीति उरली नव्हती; मक्का, अरबस्थानांतील दुसरीं राज्यें, हबसदेश, उसबेग, इराण इत्यादि देशांतील वकील औरंगजेबाच्या दरबारीं होतेच; व जयसिंगानें आपल्या पराक्रमानें दक्षिणेंत मोंगलांचा दरारा कायम राखिला होता. यापुढें मात्र त्याचे राज्यास उतरती कळा लागली.

या वेळीं जयसिंगानें विजापुरचें बहुतेक राज्य जिंकून खुद्द विजापुरास वेढा दिला होता. परंतु विजापुरच्या बादशाहानें आजूबाजूचा सर्व मुलूख ओस पाडला, व बाहेरून जी धान्यसामग्री येत असे, तिच्यावर छापे घालून तो ती पळवून नेऊं लागला. गोवळकोंडयाचा राजाही विजापुरकरांच्या मदतीस आला होता. त्यामुळें जयसिंगाचें कांहीं एक चालेनासें झालें. त्याच्या सैन्याची उपासमर होऊं लागली, तेव्हां विजापुरचा वेढा उठवून त्यास औरंगाबादेस परत यावें लागलें. तो परत येत असतां विजापुरच्या सैन्यानें वाटेंत त्याच्या सैन्यावर छापे घालून त्यानें अतोनात नुकसान केलें. ही मोहीम फसल्यामुळें औरंगजेबाचा त्याच्यावर फार रोष झाला, व त्यानें त्यास दक्षिणेंतून परत बोलाविलें. त्या शूर रजपुतास हा अपमान शल्याप्रमाणें टोंचूं लागला, व त्याला तें दुःख असह्य होऊन तो दिल्लीस परत येत असतां वाटेंतच बऱ्हाणपूर येथें ता० १० जुलै इ० स० १६६७ रोजीं मरण पावला. जयसिंग मोठा शूर व शहाणा होता. त्यानें औरंगजेबाची मरेपर्यंत एकनिष्ठपणें सेवा केली. फक्त शेवटची विजापुरची मोहीम शिवाय करून त्यानें ज्या ज्या मोहिमा केल्या, त्यांत त्यास यश मिळालें होतें. औरंगजेबाची सत्ता कायम

करण्यास मीर जुमला याचेप्रमाणेंच मुख्य मदत जयसिंगाची होती. असें असून एका मोहिमेंत अपयश आलें म्हणून औरंगजेबानें त्याचा अपमान करणें म्हणजे कृतघ्नपणावर कडी करणें होय. जयसिंगाचे संबंधानें औरंगजेबाचे कृतघ्नपणाची कर्नल टाड यांनीं अशी हकीकत दिली आहे कीं, "जयसिंग अतिशय तापट होता, व त्यामुळें त्यास ठार मराण्याचा औरंगजेबानें निश्चय केला. त्याच्याजवळ बावीस हजार रजपूत घोडेस्वारांची जय्यत फौज असून शिवाय त्याच्या हाताखालीं बावीस संस्थानिक होते. तो आपले दरबारांत बसला म्हणजे आपल्या दोन्हीं हातांत दोन काचेचे पेले धरीत असे, व एकास 'दिल्ली' व दुसऱ्यास 'सातारा' असें म्हणत असे. नंतर "ही पहा साताऱ्याची गत" असें म्हणून तो आपल्या हातांतील एक पेला धाडकर खालीं जमिनीवर आपटीत असे; व त्याच वेळीं दुसरा पेला पुढें करून "ह्या दिल्लीचें बरेंवाईट माझ्या हातांत आहे, व पाहिजे त्या वेळीं मी तिचीही साताऱ्याप्रमाणेंच वाट लावीन." असें जोरानें म्हणत असे. अशा प्रकारची गर्वोक्ति औरंगजेबाचे कानावर गेली, तेव्हां त्याला मोठा राग आला, व त्यानें जयसिंगाचे कुटुंबांत फितुर केला. त्यानें त्याचा कनिष्ठ पुत्र कीरतसिंग यास अंबरेची गादी देण्याचें वचन देऊन जयसिंगास ठार मारण्यास सांगितलें. त्या दुष्ट पुत्रानें पुढें जयसिंग याचे अफूंत विष कालवून त्याचा प्राण घेतला." वरील गोष्ट खरी असेल तर जयसिंगाची कृति निर्दोषी होती असें आमचें म्हणणें नाहीं; परंतु तेवढ्यानें, त्यास ठार मारण्याकरितां औरंगजेबानें ज्या नीच मार्गानें अवलंबन केलें,* त्याचा विचार केला तर, औरंगजेबा-

वरचा कृतघ्नपणाचा आरोप कमी होईल असें वाटत नाहीं. आतां केवळ जयसिंगाच्या संबंधानेंच विचार केला, तर पूर्वी दाराचा खरा पक्ष सोडून तो औरंगजेबास जाऊन मिळाला होता. तेव्हां त्या राजद्रोहाच्या पापाबद्दल त्याला हें यथायोग्य प्रायश्चित्त मिळालें असें म्हणावें लागतें.

जयसिंगास परत बोलाविल्यावर औरंगजेबानें यशवंतसिंग व मोअजीम यांस पुनः दक्षिणेंत पाठवून दिलें. पुढें त्यांचें व दिलावरखानाचें पटेना म्हणून त्यालाही औरंगजेबानें परत बोलाविलें. जयसिंग वारल्यामुळें शिवाजीची पंढरी पिकली. त्यानें भडाभड आपले सर्व किल्ले परत घेतले. पुढें मोअजीम व यशवंतसिंग दक्षिणेंत आल्यावर त्यानें यशवंतसिंगाच्या मार्फतीनें मोअजीम याच्याशीं तहाचें बोलणें सुरू केलें, व औरंगजेबानें त्या तहास आपलें अनुमोदन दिलें. त्यांत त्यानें शिवाजीचा जिंकून घेतलेला बहुतेक मुलूख त्यास परत दिला, त्यानें घेतलेला ‘ राजा ’ हा किताब मान्य केला, व वऱ्हाडांत त्यास आणखीं जहागीर दिली. हा तह करण्यांत त्या कपटी बादशाहाचा अंतस्थ हेतु असा होता कीं, अशा रीतीनें शिवाजीस लालूच उत्पन्न करून त्यास पुनः दिल्लीस न्यावें व तेथें त्याचा घात करावा. परंतु शिवाजी त्याचें कपट पूर्णपणें ओळखून होता.

वर सांगितलेल्या तहामुळें शिवाजी मोंगलांचे भीतींतून मोकळा होतांच त्यानें विजापूर व गोवळकोंडें या राज्यांवर आपली शिस्त धरिली. परंतु हीं दोन्हीं राज्यें आंतून दुर्बळ

---

१ दिलावरखानास या वेळीं औरंगजेबानें सेनापति नेमिलें होतें. परंतु मोअजीम व यशवंतसिंग यांस ती गोष्ट न आवडून त्यांनीं तो औरंगाबादेस येऊन पोहोंचला त्याच रात्रीस त्याचा पाठलाग करून त्यास नर्मदेच्या पार पिटाळून लविलें—डाफ.

झालीं होतीं, व मोंगल त्यांचे राशीस एकसारखे लागले होते; त्यामुळें त्या राजांनीं शिवाजीस चौथाई व सरदेशमुखी हे हक्क देण्याचा करार करून इ० स० १६६८ त त्याच्याशीं तह केला.

यानंतर दोन वर्षेंपर्यंत शिवाजी आपल्या राज्याची अंतस्थ स्थिति सुधारीत स्वस्थ बसला होता. त्यानें त्या वेळीं राज्यपद्धतीची जी शिस्त घालून दिली, त्याच शिस्तीनें त्याच्यामागून राज्यकारभार चालता, तर मराठ्यांचें राज्य जितकें लौकर लयास गेलें, तितकें लौकर गेलें नसतें, असें म्हणण्यास कांहीं हरकत नाहीं. शिवाजीनें आपल्या राज्यपद्धतींत जे फेरफार व सुधारणा केल्या, त्या व त्याचें लष्करी खातें व त्याचे नियम, यांचें वर्णन संक्षिप्त रूपानें खालीं दिलें, तर विशेष अप्रासंगिक होईल असें वाटत नाहीं.

शिवाजीच्या पायदळांत मावळे व हेटकरी असे दोन भेद होते. मावळे घाटमाथ्यावर राहत असून हेटकरी कोंकणपट्टींत समुद्र कांठीं राहत असत. त्यांचीं हत्यारें स्वतःचीं असत. फक्त दारूसामान सरकारांतून मिळत असे. हे लोक बहुधा मांडचोळणे घालून वरून कांचे भिडवीत. डोकीस लहानसें पागोटें व अंगांत असला तर अंगरखा, नाहींतर धोतर. त्यांच्याजवळ ढाल, तरवार व बंदुक इतकीं शस्त्रें असत. दहा लोकांत एकाजवळ धनुष्यबाण असे. हेटकरी मोठे कुशल बरकनदाज होते, व मावळे छातीशीं छाती भिडवून तरवार मारण्याचे कामीं मोठे पटाईत होते. शिवाजीनें मराठी राज्याचा पाया याच लंगोट्यांच्या जिवावर घातला. त्यानें आपल्या पायदळांत दहा लोकांत एक नाईक, पन्नासांत एक हवालदार,

शंभरांत एक जुमलेदार, हजारांत एक हजारी, पांच हजारांत एक पांचहजारी, व त्या सर्वांवर सरनोबत नांवाचा एक अधिकारी, याप्रमाणें अधिकारी नेमून दिले, व अशा रीतीनें पायदळाची व्यवस्था केली.

त्याचे स्वारांत बारगीर व शिलेदार असे दोन भेद होते. ज्यांच्याजवळ सरकारी घोडे असत त्यांस बारगीर म्हणत, व जे आपल्या स्वतःच्या घोड्यावर बसून सरकारची नोकरी करण्यास येत, त्यांना शिलेदार म्हणत. बारगीर लोकांचे टोळीस पागा असें म्हणत, व युद्धप्रसंगीं या पागांचा अधिकार शिलेदार लोकांवर चालावा, असा निर्बंध ठरविलेला होता. शिवाजीनें आपल्या स्वारांत पंचवीस स्वारांत एक हवालदार, सवाशें स्वारांत एक जुमलेदार, पांच जुमलेदारांवर एक सुभेदार, दहा सुभेदारांवर एक पांचहजारी असे अधिकारी नेमिले. याशिवाय प्रत्येक सुभेदाराचे हाताखालीं एक जमाखर्च लिहिणारा, व एक हिशेबाची चौकशी करणारा, असे दोन कारकून दिले; व ते ब्राह्मण किंवा परभू या जातींपैकीं असावे, असें ठरविलें. त्याचप्रमाणें पांचहजारी या अधिकाऱ्याच्या हाताखालीं एक ब्राह्मण मुजुमदार किंवा हिशेबाची चौकशी करणारा, व त्याचे हाताखालीं आमीन म्हणून परभू जातीचा एक कारकून असे असावे, असा ठराव केला.

शिवाजी आपल्या सैन्यांत भरती करूं लागला म्हणजे जुन्या मनुष्याची हमी घेतल्याशिवाय नवीन मनुष्य कधींही नोकरीस ठेवीत नसे; कोणास कांहीं लूट मिळाल्यास ती त्यानें सरकारांत आणून दिली पाहिजे; पुढें त्या लुटीचा कांहीं अंश त्या इसमास देऊन बाकीचा भाग सरकारी पोत्यास जमा करावा; शत्रूचा मुलूख लुटीत असतां गायी,

शेतकरी, व बायकामुलें यांस बिलकूल त्रास देऊं नये, व कोणी दिल्यास त्यास शिक्षा करावी; स्वारीबरोबर कोणी आपलीं बायकामुलें घेऊं नयेत, घेतल्यास त्याचें डोकें मारावें, अशी कडक शिक्षा ठरविली; एखाद्या सरदारानें मोठें शूरपणाचें कृत्य केल्यास त्यास चांगलें इनाम देऊन त्याची बढती करावी; अशा रीतीची त्यानें एकंदर व्यवस्था करून टाकली. जहागिरी करून दिल्या तर आपणास कदाचित् पुढें त्रास होईल, यामुळें तो कोणास त्या देत नसे. आपल्या सर्व किल्ल्यांवरील शिबंदीशिवाय त्यानें प्रत्येक किल्ल्यास कांहीं ब्राह्मण, रामोशी, महार, व मांग असे लोक नेमून दिले होते, व त्यांस किल्ल्यांचे आसपास वतनें करून दिलीं होतीं. ब्राह्मणास 'सबनीस' असा किताब देऊन त्यांनीं किल्ल्यांत राहून धान्याचा बंदोबस्त राखावा; आणि रामोशी, महार, व मांग, यांस 'गडकरी' असें नांव देऊन त्यांनीं किल्ल्याचे बाहेर राहून बाहेरची सर्व बातमी किल्लेदारास सांगावी असें ठरविलें.

प्रतिवर्षी दसऱ्यास सर्व फौजेनें राजदर्शनार्थ यावें, व नंतर स्वारीस बाहेर पडावें. जमाबंदीच्या संबंधानें त्यानें अकबराची धाऱ्याची पद्धतीच कायम ठेविली. दरवर्षी पिकाची पहाणी करून उत्पन्नाचे तीन भाग रयतेस द्यावे, व दोन भाग सरकारदेणें घ्यावें असें ठरविलें. नवीन काबीज केलेल्या मुलुखांत मक्ता देऊन वसूल उत्पन्न करण्याची चाल व लष्करी खर्चाकरितां रयतेवर बसविलेला कर या गोष्टी त्याच्या नजरेस आल्या तर त्या तो ताबडतोब बंद करून टाकीत असे, व देवस्थानांच्या संबंधानें सर्व खर्च कायम राखीत असे. तसेंच देशमुख, देशपांडे यांचे हक्क त्यांनीं

सरकारचे परवानगीशिवाय वसूल करूं नयेत, असा त्यानें नियम बांधून टाकिला होता.

फक्त द्रव्यविभागणीचा जेव्हां प्रश्न येईल तेव्हां त्याचा निकाल पंचमार्फत करावा, व बाकी सर्व गोष्टींचा न्याय हिंदुधर्मशास्त्रास अनुसरून करावा असें ठरविलें होतें.

आपला राज्यकारभार सुरळीत रीतीनें चालावा म्हणून शिवाजीनें आपले अष्टप्रधान नेमून त्यांच्याकडे निरनिराळीं कामें लावून दिलीं. पहिला अथवा मुख्य प्रधान पेशवा यानें सर्व राज्याचें काम पहावें, दुसरा मजूमदार यानें सर्व जमाबंदीचा कारभार पहावा, तिसरा सुरणीस यानें दप्तराची व्यवस्था ठेवून सर्व सनदांच्या नकला सरकारी दप्तरीं लिहून ठेवाव्या, चौथा वाकनीस यानें सर्व खासगी कारभार पहावा, पांचवा सरनोबत यानें फौजेचा कारभार पहावा, सहावा डबीर यानें परराज्यसंबंधीं सर्व काम पहावें, सातवा न्यायाधीश यानें न्याय करण्याचें सर्व काम करावें, व आठवा न्यायशास्त्री यानें शास्त्रार्थ सांगावा.

या वेळीं शिवाजीनें जे अष्टप्रधान नेमिले त्यांचीं नांवें:—

| | |
|---|---|
| पेशवा अ० मुख्यप्रधान .... | मोरोपंत पिंगळे |
| मजीमदार .... .... .... | आबाजी सोनदेव. |
| सुरणीस .... .... .... | अण्णाजी दत्तो. |
| वाकनीस .... .... .... | दत्ताजी पंत. |
| सरनोबत .... .... .... | प्रतापराव गुजर ( स्वारांचा). |
| .... | येसाजी कंक (पायदळाचा). |
| डबीर .... .... .... | सोमनाथपंत. |
| न्यायाधीश .... .... .... | दोन—निराजी रावजी व गोमाजी नाईक. |
| न्यायशास्त्री .... .... | रघुनाथ शास्त्री. |

शेवटचे दोन प्रधान शिवायकरून बाकीचे प्रधान बहुधा स्वारीवर गुंतलेले असत; त्यामुळें आपलीं दरबारांतील कामें चालविण्याकरितां ते आपल्या तर्फेचा एकेक कारकून दरबारीं ठेवीत असत, व त्यांच्यामार्फत आपली कामें चालवीत. त्या कारकुनांस अनुक्रमें फडणीस, सबनीस, कारखाननीस, चिटणीस, जामदार व पोतनीस अशीं नांवें होतीं.

अशा रीतीनें व्यवस्था करून एकंदरीनें जेणेंकरून प्रजेस सुख होईल असे उपाय शिवाजी योजीत असे. वर सांगितलेले सर्व फेरफार शिवाजीनें आपल्या अकलेनें केले होते, त्यावरून तो फक्त शूर होता इतकेंच नाहीं, तर मोठा बुद्धिमान असून राज्यकारभार चालविण्यांतही अतिशय कुशल होता असें सिद्ध होतें.

# प्रकरण चवथें.

इ० स० १६७० पासून इ० स० १६८१ पर्यंत.

शिवाजी मोंगलांचे मुलुखास उपद्रव देतो.–त्यानें सिंहगड घेतला त्याची हकीकत–जंजिऱ्याचा शिद्दी औरंगजेबास मिळतो.–तो शिवाजीचे आरमाराचा पराभव करितो.–शिवाजी सुरत शहर पुनः लुटतो.–औरंगजेब माहाबतखान यास शिवाजीवर पाठवून देतो, व प्रतापराव गुजर त्याचा पराभव करितो.–औरंगजेब खानजहान यास दक्षिणेच्या सुभेदारीवर पाठवून देतो.–अफगाण लोकांबरोबर चाललेल्या लढाईचें वर्णन.–औरंगजेबानें केलेला हिंदुधर्माचा छळ, व त्याच्या अविचाराच्या गोष्टी.–सतनामी लोकांचें बंड, व त्याचा मोड.–औरंगजेबाचे विशेष दुराग्रहाचे ठराव.–तो हिंदुलोकांवर झिजिया नांवाचा कर बस-

वितो. त्याचा परिणाम.–उदेपुरचा राणा राजसिंग झिजियाकराचे संबंधानें औरंगजेबास पत्र पाठवितो.–औरंगजेबाचा यशवंतसिंगाचे कुटुंबावरील राग.–पृथुसिंग व त्याचा मृत्यु.–यशवंतसिंगाचा मृत्यु.–औरंगजेब यशवंतसिंगाचे पुत्र आपले ताब्यांत मागतो, व त्यामुळें रजपूत लोक लढाईस उभे राहतात.–रजपूत लोकांबरोबर चाललेली लढाई.–अकबर रजपूत लोकांस फितूर होतो, व औरंगजेबाविरुद्ध बंड करितो.–त्याला त्यांत अपयश आल्यामुळें तो संभाजीकडे निघून जातो.–औरंगजेब रजपूत लोकांशीं तह करितो.–खानजहान शिवाजीवर स्वारी करितो.–मोंगल व शिद्दी कोंकणांतील शिवाजीचे मुलुखास त्रास देतात.–विजापुरचा बादशाहा मरण पावतो, व त्याच्या राज्यांत गोंधळ होतो.–प्रतापराव गुजर विजापुरकरांचे फौजेस पिटाळून लावतो.–शिवाजीचा त्याच्यावर राग व त्याचा मृत्यु.–शिवाजी आपणास राज्याभिषेक करून घेतो.–दिलावरखान शिवाजीचे मुलुखास त्रास देतो, व शिवाजीची व मोंगलांची लढाई जुंपते.–दिलावरखान विजापुरास वेढा देतो.–संभाजी दिलावरखानास जाऊन मिळतो.–शिवाजी विजापुरकरांस मदत करितो.–शिवाजीचा मृत्यु.–संभाजीस राज्याभिषेक होतो.

इ० स० १६७० त औरंगजेब व शिवाजी यांचेमध्यें पुनः लढाई जुंपली. यशवंतसिंग शिवाजीस सामील असून मोअजीम यशवंतसिंगाचे तंत्रानें चालतो, असें वर्तमान औरंगजेबास कळतांच त्यानें त्या शाहाजाद्यास एक खरमरीत पत्र लिहिलें, व संधि साधून शिवाजीस पुनः कैद करावें असा त्यास हुकूम केला; तसेंच यशवंतसिंगास गुजराथचा सुभा सांगून तुम्हीं एकदम आपल्या सुभ्यावर निघून जावें, म्हणून हुकूम पाठविला. शिवाजीस तें वर्तमान कळल्यामुळें तो खबरदारीनें राहूं लागला, व त्यानें पुनः मोंगलांचे मुलुखांत धामधूम सुरू केली.

प्रथमतः शिवाजीनें सिंहगड घेतला. या वेळीं मराठ्यांचें शौर्य फारच दिसून आलें. सिंहगडाच्या संबंधाची हकीकत मोठी मनोरंजक आहे. या किल्ल्यावर मोंगलांचा उदयभान नांवाचा रजपूत अधिकारी असून त्याचे हाताखालीं सुमारें एक हजार रजपूत लोक होते. शिवाजीनें सिंहगड घेण्याचें काम आपला शूर सरदार तान्हाजी मालुसरे यास सांगितलें होतें. तान्हाजीनें एक हजार मावळे हाताखालीं घेऊन त्यांचे दोन भाग केले, व एका भागावर आपण व दुसऱ्यावर आपला पुतण्या सूर्याजी यास नेमून तो रात्रीचे प्रहरीं सिंहगडाजवळ आला, व तटाला घोरपड बांधून प्रथमतः आपण वर चढला, व मागून त्याचे सुमारें तीनशें लोक वर चढून गेले. परंतु इतक्यांत रजपूत लोकांस त्यांची चाहूल लागली, व ते सज्ज होऊन एकदम तान्हाजीवर चाल करून आले. तान्हाजीजवळ फक्त तीनशें लोक होते, तेवढेच घेऊन तो रजपुतांवर तुटून पडला, व त्याच्या शूर मावळ्यांनीं रजपुतांस मागें हटविलें. तान्हाजी व उदयभान छातीस छाती भिडवून लढूं लागले. दोघेही वीर मोठे शूर असल्यामुळें त्यांनीं त्या दिवशीं आपल्या कसबाची कमाल केली. परंतु अशा आणीबाणीच्या प्रसंगीं तान्हाजीची ढाल तुटून खालीं पडली, त्यामुळें हातास शेला गुंडाळूनच तो पट्याचा हात खेळूं लागला. एकमेकांनीं एकामेकांस भयंकर वार केले, व ते दोघेही ठार झाले. तान्हाजी पडल्यामुळें मावळे लोकांचा धीर सुटून ते शिडीकडे पळूं लागले; इतक्या अवधींत सूर्याजी वर येऊन त्यानें कांहीं लोक वर घेतले, व शिडीच्या दोऱ्या कापून टाकिल्या. आपल्या शूर चुलत्याच्या मृत्यूमुळें झालेल्या अनावर शोकास आवर घालून त्या पळत असलेल्या माव-



ळ्यांस तो मोठ्या वीरश्रीनें ओरडून म्हणाला "वीर हो ! शत्रूस पाठ दाखवून समरांगणांतून पळून जाणें हेंच का तुमचें शौर्य ? शिवाजी महाराजांनीं तुम्हांस लहानाचे थोर करून या योग्यतेस चढविलें, त्याची हीच काय फेड ? तुमचा बाप तान्हाजी या ठिकाणीं मरून पडला आहे, त्याचें प्रेत महारांमांगांनीं अमंगल जागेंत टाकून द्यावें, व त्या ठिकाणीं कोल्ह्यांकुत्र्यांनीं तें फाडून टाकावें, या गोष्टीनें तुम्हांला मोठें भूषण मिळेल नाहीं बरें ? अशा प्रकारचीं आपलीं अपयशी तोंडें महाराजांस दाखवावयास तुम्हांस लाज वाटत नाहीं काय ? पळालां तरी जाणार कोठें ? मी शिडीच्या दोऱ्या अगोदरच कापून टाकल्या आहेत. तर असे पळूं नका. मागें फिरा, आणि आपल्या शूर तान्हाजीच्या मृत्यूबद्दल शत्रूचा पुरा सूड घ्या." हे वीरश्रीचें शब्द ऐकून मावळे लोकांस दुप्पट अवसान चढलें, व हरहर महादेव अशी गर्जना करून त्यांनीं रजपूतांवर अशा जोरानें हल्ला केला कीं, त्याबरोबर ते लोक मागें हटले. त्या वेळीं मावळ्यांनीं भयंकर लांडगेतोड सुरू केली. त्यांनीं बहुतेक रजपूत लोक कापून काढले, व जे कांहीं थोडे पळून गेले ते तटावरून पडून प्राणास मुकले. तान्हाजी व उदयभान या उभयतांचींही थडगीं अद्यापि सिंहगडावर आहेत. तान्हाजीच्या मृत्यूमुळें शिवाजीस फार वाईट वाटलें. "गड हातीं आला परंतु माझा सिंह गेला" असें त्या वेळीं शिवाजी म्हणाला, यावरून तान्हाजीच्या शौर्याची सहज कल्पना करितां येईल.

यानंतर शिवाजीनें पुरंदर, माहुली, करनाळा, लोहगड वगैरे किल्ले मोंगलांपासून घेऊन सर्व कल्याण परगणा

आपले अमलाखालीं आणिला. त्यानें जंजिऱ्यावर स्वारी केली, त्या वेळीं तेथील सरदार फत्तेखान हा जंजिरा शिवाजीस देण्यास कबूल झाला. परंतु शिद्दी संबळ, शिद्दी कासीम व शिद्दी खैरियात या सरदारांनीं फत्तेखान शिवाजीस फितुर आहे, अशा संशयावरून त्यास कैद केलें. शिद्दी कासीम व खैरियात यांनीं संबळ यास जंजिऱ्याचा सुभेदार नेमिलें. नंतर संबळ यानें विजापुरच्या बादशाहाजवळ मदत मागितली. परंतु तो मदत करण्यास असमर्थ असल्यामुळें " तुम्हीं मला मदत कराल तर मी आपल्या आरमारासह आपल्या नोकरींत शिरतों " असें औरंगजेबाशीं बोलणें लाविलें. औरंगजेबास तें इष्टच होतें. त्यानें तावडतोब संबळ याच्या मदतीस आपलें सैन्य पाठवून दिलें, त्यास याकूतखान असा किताब दिला, व सुरतेच्या उत्पन्नांतून त्यास सालीना तीन लाख रुपयांची नेमणूक करून दिली.

औरंगजेबानें आपलें आरमार शिद्दीचे मदतीस पाठविल्यावर त्यानें शिवाजीच्या आरमारावर दंडाराजपुरी येथें हल्ला केला, व त्याचा पराभव करून त्याचे शंभर खलाशी धरून त्यांच्या पायांत मोठमोठे दगड बांधून त्यांना समुद्रांत बुडवून ठार मारिलें. नंतर शिवाजीनें दुसरें आरमार तयार करून शिद्दीवर स्वारी केली, व त्याचा पुष्कळ ठिकाणीं पराभव केला. इ० स० १६७१ त औरंगजेबानें शिद्दी संबळ यास मोंगलांचे आरमारावरचा मुख्य सरदार नेमिलें, व शिद्दी कासीम यास जंजिऱ्याचा सुभेदार केलें. पुढें त्यानें आपलें आरमार वाढवून, फाल्गुनी पौर्णिमेच्या दिवशीं सर्व हिंदुलोक बेसावध असतां एकाएकीं दंडाराजपुरीवर हल्ला करून तो किल्ला घेतला. त्या वेळीं

किल्ल्यांतील एका दारूनें भरलेल्या खोलीस आग लागून येवढा आवाज झाला कीं, त्याच्यायोगानें रायगड येथें शिवाजी झोपेंतून एकदम जागा झाला, व "आज दंडाराजपुरीस कांहीं तरी घोटाळा झाला," असें तो म्हणाला. नंतर काशीम यानें शिवाजीचे दुसरे कांहीं किल्ले घेतले, लहान मुलें व सुस्वरूप बायका यांस गुलाम करून मुसलमान केलें, म्हाताऱ्या व कुरूप बायकांस सोडून दिलें, व एकंदर पुरुषांची कत्तल केली, आणि आपल्या या शूरत्वाच्या कृत्याची सविस्तर हकीकत मोंगलांचा दक्षिणेचा सुभेदार मोअजीम यास लिहून कळविली. ( इ० स० १६७१ ). शिवाजी या वेळीं मोंगलांबरोबर लढाई करण्यांत गुंतल्यामुळें त्याला शिद्दीकडे लक्ष्य पोहोंचवितां आलें नाहीं.

इ० स० १६७१ चा पावसाळा संपल्यावर शिवाजीनें पंधरा हजार फौज बरोबर घेऊन पुनः सुरत शहरावर हल्ला केला, व तें शहर पुनः लुटलें. नंतर आपली लूट बरोबर घेऊन तो साल्हेर किल्ल्याचे वाटेनें बऱ्हाणपुराकडे चालला. मोंगलांचा सरदार खानजहान हा बरोबर पांच हजार लोक घेऊन शिवाजीचा पाठलाग करूं लागला, व मोंगलांची दुसरी मोठी फौज नाशिकाचे वाटेवर पिंपरी घाटांत शिवाजीची वाट पहात बसली. परंतु शिवाजी हा त्या दोन्ही फौजांचा पराभव करून दक्षिणेंत परत आला.

---

१ साल्हेर किल्ला नाशिक जिल्ह्यांत सटाणें तालुक्यांत आहे. इ० स० १८१८ त मॅक्डोवेल साहेब हा किल्ला घेण्याकरितां गेले, त्या वेळीं त्यांच्याबरोबर एक इंजिनियर होता, त्यानें त्यांस असें सांगितलें कीं, हा किल्ला मुळचाच इतका बळकट आहे कीं,

( पुढें चालू. )

शिवाजीनें अशी बंडाळी चालविली असून मोअजीम यानें त्याच्या पारिपत्याचा कांहींच इलाज केला नाहीं, याचीं निरनिराळीं कारणें लिहिलीं आहेत. कोणी म्हणतात कीं, शिवाजीचें पारिपत्य करण्यापुरती फौज त्या वेळीं मोअजीम याजपाशीं नव्हती, व औरंगजेब त्यास ज्यास्त कुमक पाठविना; कांहींचें असें मत आहे कीं, मोअजीम यशवंतसिंगाचे तंत्रानें चालत असल्यामुळें तो शिवाजीचे वाटेस गेला नाहीं; कांहींचें असें म्हणणें आहे कीं, औरंजेबाचेमागें दिल्लीची गादी प्राप्त करून घेण्याचे कामीं आपणास शिवाजीनें मदत करावी, एवढ्याकरितां त्यानें त्याचें पारिपत्य केलें नाहीं. वरील कारणांपैकी कोणतेंही कारण खरें असो, परंतु मोअजीम यानें आपलें काम बरोबर रीतीनें न बजाविल्यामुळें बादशाहाची त्याच्यावर फार इतराजी झाली. त्यानें इ० स० १६७२ त माहावतखान नांवाच्या सरदाराच्या हाताखालीं चाळीस हजार फौज देऊन त्यास स्वतंत्र रीतीनें शिवाजीचें पारिपत्य करण्याकरितां पाठवून दिलें. तो दक्षिणेंत आल्यावर त्यानें आपल्या सैन्याचे दोन विभाग केले. एकावर दिलावरखानास नेमून त्यास चाकणचा किल्ला घेण्याकरितां पाठवून दिलें, व दुसरा भाग स्वतः घेऊन त्यानें साल्हेरच्या किल्ल्यास वेढा दिला. शिवाजीनें मोरोपंत पिंगळे व प्रतापराव गुजर यांच्या हाताखालीं वीस हजार लोक देऊन त्यांस

---

( मागील पृष्टावरून पुढें चालू. )

किल्ल्यांत जिवाची पर्वा न धरणारे असे दोनशें लोक असतील तर ते केवढ्याही मोठ्या सैन्यास कधींच दाद देणार नाहींत. आंतील शिबंदी भिऊन जाण्यासारखी दैवयोगानें एखादी आकस्मिक गोष्ट घडून आली तरच किल्ला हातीं येईल—क्यांबेल.

मोंगलांवर पाठवून दिलें. माहाबतखानानें लगेच आपलें सैन्य त्यांच्यावर पाठविलें. दोन्ही फौजांची साल्हेरपासून थोडक्याच अंतरावर गांठ पडली. प्रतापरावानें मोंगलांस प्रथमतः आपल्या अंगावर पाडून घेतलें, व आपल्या सैन्याची पळापळ झाली असें दाखवून मोंगलांचे सैन्याची फळी फुटतांच तो आपल्या फौजेसह एकदम उलटला, व त्यानें त्या सैन्याचा फडशा पाडला. या लढाईत मोंगलांचे बावीस सरदार व वीस हजार लोक मेले. या लढाईमुळें मराठे फारच प्रख्यातीस आले. पुढें प्रतापरावानें माहाबतखानावर हल्ला केला, तेव्हां त्याला साल्हेर किल्ल्याचा वेढा उठवून औरंगाबादेस पळून जावें लागलें. माहाबतखानाची ती स्थिति पाहून दिलावरखानानेंही औरंगाबादेचा रस्ता सुधारला.

या लढाईनंतर औरंगजेबानें मोअजीम व माहाबतखान यांस परत बोलाविलें, व गुजराथचा सुभेदार खानजहान यास दक्षिणेच्या सुभेदारीवर पाठवून दिलें. ( इ० स० १६७२ ). परंतु शिवाजीच्या मनांत विजापुरकरांबरोबर पुनः लढाई करावयाची असल्यामुळें त्यानें औरंगजेबाशीं तह केला, व औरंगजेबाचें लक्ष्य या वेळीं अफगाण लोकांकडे लागल्यामुळें तो त्या तहास कबूल झाला. ( इ० स० १६७३ ).

यापूर्वी कांहीं दिवस औरंगजेबाची अफगाण लोकांबरोबर लढाई सुरू झाली होती. परंतु या वेळीं तिला विशेष भयंकर रूप आलें होतें. ते लोक कधीं कोणाचें वर्चस्व कबूल करीत नसत. अकबर, जहांगीर, शहाजहान या बादशाहांनीं त्यांस मोठमोठ्या नेमणुका करून दिल्या होत्या, व त्यांस कसेंबसें आपल्या अमलाखालीं आणून

ठेविलें होतें. ते वारंवार बादशाही मुलुखांत लुटालूट करीत, परंतु ते बादशाहा त्या गोष्टींकडे कानाडोळा करीत. परंतु औरंगजेब मोठा मानी असल्यामुळें त्यास आपल्या सत्तेचा उपमर्द काडीभर सहन होत नसे. त्यामुळें अफगाण लोक व औरंगजेब यांच्यामध्यें मूळ इ० स० १६६७ त बेबनाव उत्पन्न झाला. औरंगजेबानें प्रथमतः काबुलचा सुभेदार महंमद अमीरखान यास त्यांच्यावर पाठवून दिलें. त्यानें त्या लोकांस जिंकून अगदीं जेरीस आणिलें, त्यामुळें कांहीं दिवस तो बखेडा मिटला होता. परंतु इ० स० १६७० त त्या लोकांनीं पुनः उचल खाल्ली, व अमीरखानाचा पराभव करून त्याच्या फौजेचा धुव्वा उडवून दिला. अफगाण लोकांनीं अमीरखानाचीं बायकामुलेंसुद्धां धरून नेलीं, व त्याला तीं परत आणण्याकरितां त्या लोकांस पैसे भरावे लागले. नंतर अफगाण लोकांनीं आपणांपैकींच एक राजा नेमून त्याच्या नांवाचें नाणें पाडलें, व ते स्वतंत्र रीतीनें वागूं लागले.

पुढें इ० स० १६७३ च्या जानेवारी महिन्यांत औरंगजेब स्वतः त्यांचें पारिपत्य करण्याकरितां निघाला, व हसन अबदाल नामक शहरीं त्यानें आपल्या सैन्याची छावणी दिली. नंतर त्यानें शाहाजादा मोअजीम याच्याबरोबर मोठें सैन्य देऊन त्यास अफगाण लोकांवर पाठवून दिलें. आपण स्वतः पुढें गेलों, व आपला पराभव झाला, तर कदाचित् निराळाच कांहींतरी घोटाळा होईल, या भीतीनें तो स्वतः अफगाण लोकांवर गेला नसावा, असें दिसतें. ही लढाई दोन वर्षेंपर्यंत चालली होती. पुढें हिंदुस्थानांत ज्यास्त बखेडे माजल्यामुळें व अफगाण लोकांवर पूर्ण रीतीनें अंमल बसविण्याची फारशी आशा नसल्यामुळें

काबुलचा सुभेदार यशवंतसिंग यास त्या लोकांचा बंदोबस्त करण्याची आज्ञा देऊन, व सरासरी बंदोबस्त करून तो दिल्लीस परत आला.

औरंगजेब बादशाहा झाल्यावर त्यानें मुसलमानी धर्मास प्रोत्साहन देण्याकरितां व हिंदुधर्माचा छल करण्याकरितां ज्या ज्या अयोग्य, अनीतीच्या व अन्यायाच्या गोष्टी केल्या त्यांचा इतिहास अगोदर देणें अगत्याचें आहे.

राज्यपदारूढ झाल्याबरोबर त्यानें, पूर्वीं सौर वर्ष सुरू होतें, तें अग्निपूजकांनीं शोधून काढलें आहे, सबब तें अशास्त्र आहे, असा त्याच्यावर आक्षेप ठेवून तें बंद केलें, व मुसलमानी चांद्रमानाच्या वर्षाची सुरवात करावी, असा एक सक्तीचा हुकूम फर्माविला. हें वर्ष सुरू करण्यापासून पुष्कळ तोटे आहत, व त्यामुळें अतिशय अडचणी येतात, असें अनेक शाहण्या लोकांनीं त्यास सांगितलें, परंतु त्यानें आपला दुराग्रह सोडिला नाहीं. त्याच वेळीं त्यानें सर्व दारूचे पिठे, जुवेबाज लोकांचे अड्डे, व मूर्तिपूजेच्या डामडौलाचें ढोंग बंद करण्याकरितां एक मुल्ला नेमिला, व अंमलबजावणीकरितां त्याच्या हाताखालीं घोडेस्वारांची एक टोळी दिली. त्यानें मुसलमानी धर्मशास्त्रांत जे कर स्पष्ट रीतीनें सांगितले नव्हते, असे सुमारें ८० कर बंद केले, व त्यांत ज्याचा उल्लेख स्पष्ट रीतीनें केलेला होता, असे कित्येक नवीन कर बसविले. हिंदु लोकांच्या मोठ-

---

१ यशवंतसिंगाविषयीं औरंगजेबाचे मनांत निरंतर भीति असे. त्यास हिंदुस्थानांत राहूं दिलें तर तो मराठ्यांस सामील होऊन कांहींतरी घोटाळा करील असें त्यास वाटून त्यानें त्याची इ० स० १७७२ च्या सुमारास गुजराथच्या सुभ्यावरून एकदम काबुलच्या सुभेदारीवर बदली केली होती.

मोठ्या यात्रांत विक्रीच्या मालावर पूर्वींपासून कर बसविलेला होता, परंतु त्याचा संबंध मूर्तिपूजेशीं किंवा हिंदुधर्माशीं पोहोंचत असल्यामुळें तो पैसा अशुद्ध आहे, असें समजून त्यानें तो बंद केला. हा कर बहुधा सराफ लोक, व मोठमोठे व्यापारी यांस द्यावा लागत असे, व त्यामुळें सरकारास उत्पन्नही बरेंच होत असे. परंतु औरंगजेबानें अडाणी समजुतीनें तो बंद केला, व जकात, रहदारीवरील कर इत्यादि जे कर मुसलमानी कायद्यानें पसंत केले होते, ते सरसकट सर्व लोकांवर बसविले.

वरील फेरफारांमुळें रयतेस काडीभर फायदा न होतां ती उलट हवालदील झाली, व त्यामुळें सरकाराचेंही अतिशय नुकसान झालें. पुढें कांहीं वर्षांनीं सणांच्या दिवशीं हिंदुलोकांनीं आपल्या यात्रा भरूं नये, असा त्यानें हुकूम केला. त्याचप्रमाणें त्यानें नाच, गाणें वगैरे सर्व ख्यालीखुशालीचे प्रकार बंद केले, व पूर्वींपासून बादशाहाचे आश्रयास जे गवय्ये, बजवय्ये होते, त्यांस काढून टाकून त्यांचे तनखे बंद केले; अकबर, जहांगीर, शहाजहान यांस आपल्या कवींचा मोठा अभिमान असे, व त्यांनीं त्यांस आपल्या पदरीं ठेवून मोठमोठ्या नेमणुका करून दिल्या होत्या. परंतु औरंगजेबानें आपल्या पदरीं जो कवी होता, त्यास काढून टाकून त्याची जागा व पगार हीं बंद केलीं. कोणींही कविता करूं नये, व ती म्हणूं नये, अशी औरंगजेबाची सक्त ताकीद होती, असें स्पष्ट रीतीनें लिहिलेलें आहे. परंतु मोठ्या आश्चर्याची गोष्ट ही कीं, त्याच्या स्वदस्तूरच्या पत्रांतून कवितांचे पुष्कळ वेंचे आढळतात, व त्यांपैकीं कांहीं कविता त्यानें स्वतः रचलेल्या आहेत. इ० स० १६६७।६८ च्या सुमारास त्यानें आपल्या कार-

कीर्दीचा इतिहास लिहिण्याची सक्त मनाई केली. पूर्वी बादशाहाच्या पदरीं अखबरनवीस असून ते प्रत्येक वर्षाची सविस्तर हकीकत लिहून ठेवीत असत. परंतु औरंगजेबानें ते अखबरनवीस काढून टाकिले, व माझ्या कारकीर्दीचा इतिहास कोणींही लिहूं नये, असा सक्तीचा हुकूम फर्माविला. आपलीं दुष्ट व जुलमी कृत्यें पुढें लोकांचे नजरेस येऊं नयेत, व त्यांनीं त्यांवर चर्चा करून आपली निंदा करूं नये, एवढ्याकरितां औरंगजेबानें ही अश्रुतपूर्व व्यवस्था केली असावी. अकबर बादशापासून तों औरंगजेबाचे कारकीर्दीस १० वर्षें होत तोंपर्यंत सर्व संगतवार माहिती मिळते. परंतु पुढील इतिहास कामकाजसंबंधीं कागदपत्र, व कित्येक लोकांनीं खासगी रीतीनें लिहिलेला कांहीं गोष्टींचा वृत्तांत, यांवरूनच तयार करावा लागतो. वरील गोष्टीवरून त्यानें हिंदुलोकांचा फार भयंकर रीतीनें छल केला असावा, असें दिसतें. पुढेंपुढें हिंदु व मुसलमान यांच्या संबंधानें त्याचें पक्षपाताचें वर्तन अधिक अधिकच नजरेस येऊं लागलें.

जयसिंग व यशवंतसिंग या दोन बलिष्ठ रजपूत राजांची औरंगजेबास विशेष भीति वाटत असे, व ते जिवंत होते तोंपर्यंत त्यानें हिंदूंचा छल करण्याची आपली उच्छृंखल इच्छा तशीच दाबून ठेविली होती. इ० स० १६६८ त जयसिंग वारला, तेथपर्यंत धर्मसंबंधी बाबींत त्यानें विशेष हात घातला नव्हता. जयसिंग वारल्यामुळें तो निमे भीतींतून मोकळा झाला, व त्यानें हिंदूंच्या छलाचें, व त्या बरोबरच अर्थात् आपल्या अवाढव्य राज्याचा आधारस्तंभ स्वहस्तें पाडून टाकण्याचें, काम सुरू केलें.

इ० स० १६६९ च्या एप्रिल महिन्यांत त्यास असें

समजलें कीं, काशी येथील ब्राह्मण लोक आपलें दुष्टशास्त्र आपल्या लोकांस शिकवून शिवाय मुसलमान लोकांसही शिकवितात. हिंदूंवरील आपला राग व्यक्त करण्यास त्याला कांहींतरी निमित्त पाहिजेच होतें. त्यानें लगेच हिंदूंच्या पाठशाला, मठ, देवालयें वगैरे जमीनदोस्त करून त्यांचे जागीं मशिदी बांधाव्या, व मूर्तिपूजेचें ढोंग एकदम बंद करावें, असा सक्तीचा हुकूम सोडिला. औरंगजेबाच्या प्रजेपैकीं तीन चतुर्थांश लोक हिंदु होते, तेव्हां वरील हुकूम पूर्णपणें अमलांत आणणें किती अवघड होतें, हें सांगावयास नको. हंटर साहेब असें म्हणतात कीं, " प्रबल व सत्ताधीश इंग्रज सरकारासही आज अशा प्रकारची प्रचीति घेण्याचें धाडस होणार नाहीं. " असो. सर्वत्र ठिकाणीं नाहीं तरी कांहीं ठिकाणीं त्या हुकुमाची बजावणी झाली. त्यानें काशी येथील विष्णूचें देवालय, मथुरा येथील मोठा मठ, व दुसऱ्या कांहीं ठिकाणचीं देवालयें पाडून त्या ठिकाणीं मशिदी बांधल्या, व तेथील मूर्ति आग्र्यास आणून त्या मुसलमानांच्या पायांखालीं तुडविल्या जाव्या म्हणून मशिदींच्या पायऱ्यांखालीं पुरून टाकल्या.[1] पुढें औरंगजेबानें मुसलमान लोकांवरील निमे जकात बंद केली, व हिंदु लोकांवर ती तशीच कायम ठेविली. वरील एकंदर कृत्यांमुळें हिंदु व मुसलमान यांस एकाच धाऱ्यानें वागवून त्यांच्यांतील दुही मोडून टाकण्याचा अकबरानें मोठ्या शहाणपणानें जो कित्ता घालून दिला होता, व त्याच्यामागून जहांगीर व शहाजहान यांनीं जो मोठ्या

१ फक्त राजपुतान्यांत औरंगजेबानें तीनशें देवालयें धुळीस मिळवून त्या ठिकाणीं मशिदी बांधल्या, असें कीनसाहेब आपल्या इतिहासांत लिहितात.



काळजीनें गिरविला होता, तो औरंगजेबानें फाडून टाकिला, व आपल्या राज्याच्या नाशाचें बीज आपल्या हातानेंच पेरून ठेविलें.

अशा जुलमी कृत्यांमुळें औरंगजेब अफगाण लोकांवरच्या स्वारीवरून परत येतो आहे तोंच दिल्लीजवळ एक चमत्कारिक बंड झालें. सतनामी नांवाचे हिंदु गोसावी नार्नोळ नामक शहरीं व त्याच्या आसपास रहात असत. ते बहुधा व्यापार व शेतकी करून आपला उदरनिर्वाह करीत, व त्यांचा स्वभाव विशेष गडबड्या नव्हता. ते लोक हत्यारबंद असून स्वसंरक्षणाकरितां कधीं कधीं आपल्या शस्त्रांचा उपयोग करीत. औरंगजेबाच्या जुलुमास ते अगोदरच त्रासले होते, व त्यांस थोडेंसें कारण मिळतांच त्यांनीं बंडाचा झेंडा उभारला. एकदां असें झालें कीं, त्यांच्यापैकीं एकाचा व एका कोतवाली शिपायाचा तंटा झाला, व त्यांत त्यानें त्या शिपायास मारिलें. त्यामुळें कोतवाली लोक व सतनामी लोक यांच्यामध्यें मोठा बखेडा माजला, व त्यांनीं बरेच कोतवाली लोकांस ठार मारिलें. नार्नोळच्या फौजदारानें जरा सौम्य उपाय योजून त्यांस ताळ्यावर आणिलें असतें, तर तें बंड तेव्हांच मोडलें असतें. परंतु फौजदार पडले मुसलमानभाई, त्यांत अधिकाराचा जोर, शिवाय त्यांच्या हाताखालील लोकांचा उपमर्द झालेला. मग काय विचारतां? त्यानें लगेच गांवगन्ना ठेवलेले आपले शिपाई, व दुसरे लष्करी लोक यांस गोळा केलें, व सतनामी लोकांची पुरी खोड जिरविण्याचा निश्चय केला. पुढें त्या उभय पक्षांत लढाई होऊन सतनामी लोकांनीं फौजदाराचा पराभव केला, व इ० स० १६७६ त नार्नोळ शहर हस्तगत केलें. पुढें औरंग-

जेबानें त्यांच्यावर एक लहानशी फौज पाठविली, परंतु तिलाही त्यांनीं धुडकावून लावून नार्नोळच्या आसपासचा वीस पंचवीस कोसांपर्यंतचा मुलूख आपल्या अमलाखालीं आणिला. पुढें ते लोक मोठे जादूगार असून त्यांचीं शस्त्रें भारलेलीं आहेत, त्यामुळें त्यांच्यावर शस्त्र लागू पडत नाहीं, अशी कंडी पिकल्यामुळें त्यांच्याबरोबर युद्ध करण्यास बादशाहाची फौज पाय घेईना. सतनामी या गोष्टीमुळें इतके चढून गेले कीं, ते दिल्लीवर चाल करून येऊं लागले. त्या वेळीं औरंगजेबानें आपल्या सैन्याचा गैरसमज दूर करण्याकरितां अशी युक्ति केली कीं, सतनामी लोकांच्या जादूवर तोडगा म्हणून त्यानें कुराणांतील कांहीं वेंचे लहान लहान चिठ्ठयांवर लिहून काढले, व ते आपल्या फौजेच्या हत्यारांस चिकटविले. नंतर औरंगजेबाची व त्या लोकांची मोठी भयंकर लढाई होऊन त्यांचा पराभव झाला, व औरंगजेबानें त्या सर्वांची कत्तल करून टाकिली. या बंडामुळें अजमीर व आग्रा या प्रांतांत इतका गोंधळ माजून गेला होता कीं, तिकडील बंदोबस्त करण्याकरितां स्वतः औरंगजेबास त्या प्रांतांत जाणें भाग पडलें, व त्यानें मोठे कडक उपाय योजून थोडक्याच वेळांत सर्व बखेडा मोडून टाकिला.

यापुढें त्यानें केलेले ठराव पूर्वीपेक्षांही विशेष दुराग्रहाचे होते. ज्या लोकांनीं सरकारावर आपल्या हक्कांची मागणी केली असेल, त्यांचे इनसाफ मुसलमानी कायद्याप्रमाणें करावे, असें त्यानें ठरविलें. हा ठराव विशेष गैरशिस्त होता असें म्हणतां येत नाहीं; परंतु याच्यापुढें त्यानें जो ठराव केला, त्यांत मात्र त्यानें आपल्या दुराग्रहाची कमाल करून सोडिली होती. त्यानें आपल्या सुभेदारांस असा हुकूम फर्माविला कीं, या पुढें हिंदु लोकांस



नोकरीवर ठेवूं नये, व दरबारांतील, व बाहेरील प्रांतांतील अधिकाराच्या सर्व जागा मुसलमान लोकांसच द्याव्या. वरील ठराव कागदावर वठला खरा, परंतु तो अमलांत आणणें किती अशक्य होतें, हें त्याचें त्यासच पुढें कळून आलें. वरील ठरावामुळें हिंदु लोकांचीं मनें अधिकच कलुषित झालीं, व ते औरंगजेबाचा अतिशय तिरस्कार करूं लागले.

ह्या सर्व जुलमी कृत्यांचे मालिकेवर मेरु म्हणून त्यानें इ० स० १६७८ चे सुमारास झिजीया[१] नांवाचा कर सर्व हिंदु लोकांवर बसविला. प्रथमतः मुसलमान लोक हिंदुस्थानावर स्वाऱ्या करूं लागले, तेव्हां जे लोक धर्मांतर करण्यास कबूल नसत, त्यांच्यावर ते हा कर बसवीत असत. परंतु अकबर बादशाहानें तो जुलमी कर बंद केला होता, व जहांगीर व शहाजहान यांनींही तो तसाच बंद ठेविला होता. परंतु औरंगजेबाचे मनांत सर्व हिंदुस्थान देश यवनमय करण्याचा निश्चय असल्यामुळें त्यानें तो पुनः सुरू केला. या करामुळें तर हिंदूंचीं मनें फारच बिथरून गेलीं. दिल्ली व आसपासचा मुलूख यांतून लाखोंशें हिंदु या कराचे संबंधानें दाद मागण्याकरितां राजवाड्यासभोंवतीं जमले, व त्यांच्या गर्दीनें दिल्लींतील सर्व रस्ते भरून गेले. परंतु औरंगजेबानें त्या गरीब लोकांच्या गाऱ्हाण्यांकडे लक्ष्य दिलें नाहीं, इतकेंच नव्हे, तर शुक्रवारीं औरंगजेब नमाज पढण्याकरितां तो मशिदींत जाऊं लागला, त्या वेळीं हजारों हिंदु तो जुलमी कर माफ करावा म्हणून विनंती करण्या-

१ मानूसी नामक इताली देशांतील फिरस्ता असें वर्णन करितो कीं, गरिबापासून तों श्रीमंतापर्यंत साडेतीन रुपयांपासून साडेतेरा रुपयांपर्यंत हा कर बसवला होता.

करितां त्याच्या रस्त्यावर जमले, व त्यांनीं राजमार्ग अडवून धरिला. तथापि औरंगजबास त्या अनाथ प्रजेची काडीभर दया न येतां सक्तीनें रस्ता मोकळा करावा, म्हणून त्यानें आपल्या लष्करास आज्ञा केली; व आपले व आपल्या परिवाराचे हत्ती त्या गरीब लोकांचे अंगावर घालून त्या निर्दय बादशाहानें हजारों लोक हत्तींच्या पायांखालीं व घोड्यांच्या टापांखालीं तुडवून ठार मारिले.

वर सांगितलेल्या भयंकर कृत्याचा परिणाम लौकरच दृष्टीस पडूं लागला. औरंगजेबाच्या कारकीर्दीच्या प्रारंभीं अकबरानें घालून दिलेल्या धाऱ्याप्रमाणें हिंदु लोक मुसलमानांप्रमाणेंच एक दिलानें त्याची नोकरी बजावीत होते, व प्रसंगविशेषीं आपल्या धर्मातील लोकांविरुद्ध सुद्धां ते कामगिऱ्या बजावीत होते. परंतु औरंगजेबाची अविचाराची व जुलमी राज्यपद्धति जसजशी त्यांच्या अनुभवास येऊं लागली, तसतशी त्यांची स्वामीभक्ति शिथिलता पावूं लागली, त्यांच्यांत असंतोष उत्पन्न झाला, मोंगलबादशाहीचे आधारस्तंभ जे रजपूत लोक ते बेदिल होऊन गेले, मराठे लोकांनीं उचल खाल्ली, व पुष्कळ शूर हिंदु सरदार स्वधर्मसंरक्षणाकरितां मनापासून शिवाजीस मदत करूं लागले.

औरंगजेबानें हा झिजिया कर बसविल्यामुळें एकंदर हिंदु लोकांस केवळ ‘ त्राहि भगवन् ’ करून सोडिलें होतें. त्याची ही चुकी त्याचे नजरेसमोर आणावी, म्हणून उदेपुरचा राणा राजसिंग यानें त्याला एक पत्र लिहिलें. त्या पत्राची भाषा, त्यांतील मजकूर, उपलक्षणांनीं व अन्योक्तीनें लावून लिहिण्याची शैली, सन्मान्य परंतु कडक लेखनपद्धति इत्यादि गुण त्या पत्राच्या रचनेवरून फार



चांगल्या रीतीनें व्यक्त होत आहेत. कोणत्याही सुधारलेल्या राष्ट्रांत हें पत्र कोणीं वाचलें, तर त्याला तें वाचून मानच डोलविली पाहिजे. एखाद्या शाहण्या बादशाहानें तें पत्र वाचून आपला चुकीचा वर्तनक्रम तेव्हांच सुधारला असता. परंतु दुराग्रही औरंगजेबास त्याचें कांहींच महत्त्व वाटलें नाहीं. तें पत्र येणेंप्रमाणें:—

“ सर्व प्रकारच्या स्तुतीला तो सर्व शक्तिमान परमेश्वर पात्र आहे. त्याप्रमाणें स्तुति करून आपणांस असें कळवितों कीं, “ आपलें औदार्य व समदृष्टि चंद्रसूर्याप्रमाणें सर्व जगाला महशूर आहे. मी आपला हितचिंतक असून जरी मी आपल्या दरबारांत येण्याचें वर्ज केलें आहे. तरी आपली आज्ञाधारकता आणि राजनिष्ठा यांस मी पराङ्मुख नसून त्याप्रमाणें वर्तन ठेवण्याची माझी उत्कट इच्छा आहे. माझी मनापासून अशी इच्छा आहे कीं, माझी एकनिष्ठ सेवा किंवा मदत हिंदुस्थानांतील सर्व राजे, सरदार, संस्थानिक, नबाब, अमीर, उमराव वगैरे सर्वांच्या ऊर्जितदशेस उपयोगीं पडावी. त्याचप्रमाणें इराण, तुराण, रूमशाम वगैरे सातही मुलुखांतल्या, व निरनिराळ्या ठिकाणच्या रहिवाशांचे व जलस्थलमार्गानें सफरी व प्रवास करणारे लोकांचे मी उपयोगीं पडून त्या सर्वांचें माझ्या हातानें अभेदबुद्धीनें कल्याण व्हावें, अशी माझी इच्छा आहे, ही गोष्ट सर्वांस माहीत असून आपणांसही ठाऊक आहे. माझ्या पूर्वजांनीं आपल्या दरबारची जी सेवा करून आपल्या पूर्वजांचा स्नेह संपादन केला होता, व आपल्या वाडवडिलांनीं जें त्यांच्याशीं निरभिमानानें व दोस्तीनें वर्तन ठेविलें होतें, त्याविषयींचें आपणास स्मरण देऊन मी ज्या कांहीं थोड्याशा गोष्टी खावंदांच्या नजरेस

आणतों, व ज्यांवर व्यक्तिविषयक व सार्वजानिक असें दोन्ही प्रकारचें हिताहित अवलंबून आहे, त्यांचा योग्य रीतीनें विचार होईल अशी आशा आहे."

"मला असें कळलें आहे कीं, मी आपला हितचिंतक असतां माझा पराजय करून मला पादाक्रांत करावें, म्हणून आपले एकसारखे प्रयत्न चालू असून त्याकरितां आपण फार पैसा खर्च करीत आहांत, आणि त्याकरितां आपणास पैशाची जी ओढाताण बसली आहे, ती भरून काढण्याकरितां मजपासून कांहीं तरी खंडणी किंवा करभार वसूल करण्याची आपली खटपट सुरू आहे."

"खावंदांनीं ही गोष्ट लक्ष्यांत आणिली पाहिजे कीं, आपले परम पूज्य थोर पूर्वज महमद जलालुद्दीन अकबर बादशाहा यांनीं ५२ वर्षेंपर्यंत मोठ्या नीतीनें व समदृष्टीनें आपला राज्यकारभार चालवून सर्व जातींच्या व सर्व वर्णांच्या लोकांस फार उत्कृष्ट रीतीनें वागाविलें, व आपल्या प्रजेची प्रीति संपादन केली. मग ते लोक ख्रिस्ती असोत, यहुदी असोत, मुसलमान असोत, ब्राह्मण असोत किंवा दुसरे कोणी असोत, व त्यामुळें आपणास 'जगद्गुरु' असेंही म्हणवून घेतलें."

"त्यांचेनंतर महमद नूर उद्दीन जहांगीर बादशाहा यांनीं एकसारखें २२ वर्षेंपर्यंत आपल्या कृपेचें छत्र आपल्या प्रजेवर धरलें होतें....त्यांचे चिरंजीव, व आपले वडील शहाजहान बादशाहा यांनींही ३२ वर्षेंपर्यंत आपल्या प्रजेचें न्यायानें पुत्रवत् पालन करून आपलें नांव अजरामर करून घेतलें."

"अशा रीतीनें आपल्या पूर्वजांनीं राज्यकारभार चालविल्यामुळें, व ते मोठे थोर व उदार असून त्यांचे विचार

पोक्त असल्यामुळें, प्रत्येक कामांत त्यांस यश मिळत गेलें, त्यांचा मोठा भरभराट झाला, व त्यांनीं पुष्कळ मुलूख काबीज करून आपले राज्यास जोडिला. खावंदांचे कारकीर्दींत त्यापैकीं बराच मुलूख हातचा गेला आहे, व ज्या अर्थी आपल्या कारकीर्दींत लुटालूट व त्यामुळें चाललेली देशाची नासाडी या गोष्टी अनियंत्रित रीतीनें जिकडे-तिकडे सुरू आहेत, त्या अर्थी आणखीं पुष्कळ मुलूख आपल्या हातून जाईल यांत मुळींच शंका नाहीं. आपल्या वर्तनक्रमाची दिशा झुकल्यामुळें आपल्या प्रजेची पायमल्ली होत आहे; आपल्या राज्यांतील प्रत्येक प्रांत भिकेस लागला आहे; मुलूख ओसाड पडत चालला आहे; व संकटें वृद्धिंगत होत आहेत. प्रत्यक्ष बादशाहाच्या कुटुंबावर दरिद्राचा अंमल बसल्यावर मग प्रजेचे हाल पुसावयासच नकोत. आपल्या फौजेंतील लोक पगाराकरितां कुरकुर करीत आहेत, व्यापारी लोक पैसा येत नाहीं म्हणून हात चोळीत आहेत, मुसलमान लोकांत असमाधान उत्पन्न झालें आहे, व हिंदु लोक अन्नास मोताद होऊन रात्रंदिवस आपलीं मस्तकें बडवून घेत आहेत."

"अशा रीतीनें अन्नान्नदशा प्राप्त झालेल्या प्रजेवर अवघड व जुलमी कर बसवून ते सक्तीनें वसूल करण्याचा जो बादशाहा प्रयत्न करील त्याचें राज्य कायम राहील असें आपणास वाटतें काय? हिंदुस्थानच्या पूर्व टोंकापासून तों पश्चिम टोंकापर्यंत असा गवगवा होऊन राहिला आहे कीं, हिंदुस्थानचा बादशाहा गरीब ब्राह्मण, सन्यासी, जोगी, बैरागी, व दुसरे हिंदु यांच्यापासून सक्तीनें एक कर वसूल करणार आहे, व आपल्या थोर कुलाचा अभिमान धाब्यावर बसवून गरीब निरुपद्रवी हिंदु साधुसंतांवर

आपला बादशाही अंमल गाजविण्याची त्यास मोठी हौस आली आहे. परंतु आपल्या पवित्र धर्मशास्त्राचें आपण जर लक्ष्यपूर्वक अध्ययन कराल, तर त्यांतच आपल्या असें नजरेस येईल कीं, सर्व ज्ञातींचा व सर्व वर्णांचा परमेश्वर एकच आहे. तो हिंदूंचा निराळा व मुसलमानांचा निराळा असें नाहीं. त्याच्याजवळ हिंदु व मुसलमान दोघेही सारखेंच आहेत. निरनिराळे धर्म त्याच्याच इच्छेनें उत्पन्न झाले आहेत, व आपणा सर्वांचा आयुर्दाय त्याच्याच इच्छेवर अवलंबून आहे. आपण आपल्या मशिदीमध्यें ज्याच्या प्राप्तीकरितां मोठ्यानें ओरडून नमाज पढतां, तो तोच, व मूर्तिपूजकांच्या गृहांत घंटा वगैरे वाजवून ज्याची पूजार्चा करितात तो तोच. कोणत्याही धर्माची अथवा प्रचारांची अवहेलना व छळ करणें म्हणजे ज्याच्या इच्छामात्रेंकरून सर्व जगाचें संयमन व नियमन चाललें आहे, त्या परात्पर परमेश्वराचें अस्थित्व न मानण्यासारखें आहे.... एका कवीनें "तुम्ही परमेश्वराच्या कृतीविषयीं चिकित्सा करूं नका," असें म्हटलें आहे तें अगदीं बरोबर आहे."

"सारांश, आपण हिंदूंपासून जो कर घेणार तो अन्यायाचा आहे. राजनीतीच्या तत्त्वावरही त्याचा विचार केला, तरी त्यापासून फार तोटे आहेत. त्याच्यायोगानें देश भिकेस लागेल. **हिंदुस्थानचा** राज्यकारभार ज्या कायद्यांच्या अनुरोधानें आजपर्यंत चालत आला, त्यांची या कराच्या योगानें पायमल्ली होत आहे. आपल्या धर्माच्या कट्ट्या अभिमानामुळें जर आपणास हें कृत्य करावयाचें होतें, तर आपणास प्रथमतः हा कर हिंदु लोकांमध्यें प्रमुख जो **राम-सिंग** ( **जयसिंगाचा पुत्र** ) याचे कारकीर्दीत बसविला पाहिजे होता. एखादा शूर व उदार पुरुषानें आपल्या

शस्त्रांचा उपयोग गरीब मुंग्यांमाशांवर करावा, यांत मोठा पुरुषार्थ आहे असें नाहीं. न्यायानें व थोरपणानें राज्य कसें चालवावें, ही गोष्ट आपणास शिकविण्याची आपल्या मंत्र्यानें कशी हयगय केली याचें फार आश्चर्य वाटतें."

वरील पत्रांतील प्रत्येक गोष्ट विचार करण्यासारखी आहे, परंतु माथेफिरू औरंगजेबास त्याचा काय उपयोग?

हा झिजिया कर सुरू केल्यावर थोडकेच महिन्यांनीं दुसरी एक गोष्ट घडून आली, त्यामुळें ही धर्मसंबंधीं वैमनस्याची आग फारच भडकली.

औरंगजेबाचे मनांत कोणीकडून तरी यशवंतसिंगाची वाट लावावयाची होती. परंतु त्याच्याशीं उघड रीतीनें वैर बांधून आपला डाव साधेल असें त्यास वाटेना; तेव्हां त्यानें त्याच्याशीं स्नेह करून नंतर त्याचा गळा कापला. त्यानें यशवंतसिंगास ठार मारण्याचा एकदां प्रयत्न केला होता, परंतु त्या कामांत त्यास यश आलें नाहीं. पुढें त्यास हिंदुस्थानचें बाहेर कोठें तरी घालवून दिलें, म्हणजे त्याचा आपणास संपर्क लागणार नाहीं, व त्यासही आपल्या राज्यांत बखेडे उपस्थित करतां येणार नाहींत, असा विचार करून इ० स० १६७१ त त्यानें त्यास दक्षिणेंतून परत बोलाविलें, व इ०स० १६७२त त्यास काबूलच्या सुभेदारीवर पाठवून दिलें. यशवंतसिंग काबुलास गेला त्या वेळीं त्यानें आपला ज्येष्ठ पुत्र पृथुसिंग यास आपल्या राज्याचा कारभार पाहण्याकरितां जोधपूर येथें ठेविलें होतें, व बाकीचें सर्व कुटुंब त्यानें बरोबर नेलें होतें.

पृथुसिंग आपल्या पित्याप्रमाणेंच मोठा शूर व धाडशी

---

१ कर्नल टाडकृत राजस्थानचा इतिहास.

होता. औरंगजेबाचे मनांत यशवंतसिंगाचे कुलाविषयीं अतिशय मत्सर उत्पन्न झाला होता, व त्याचा वंश नाहींसा करून टाकावा, अशी त्याची इच्छा होती. यशवंतसिंगाच्यामागें पृथुसिंग आपल्या राज्याचा कारभार पहात असतां, एकदां औरंगजेबानें त्यास दरबारांत बोलावून आणिलें. त्या वेळीं औरंगजेबानें त्याचा मोठा आदरसत्कार केला. नंतर त्यानें त्यास जवळ बोलाविलें, व त्यानें जोडलेले दोन्ही हात आपल्या एका हातानें धरून तो त्यास म्हणाला "कसें काय राठोड ? मीं असें ऐकितों कीं, तुमचे बाहु तुमच्या पित्याप्रमाणेंच स्फुरण पावतात. आतां आपण काय करणार?" त्यावर त्या शूर राजपुत्रानें बादशाहास असें समर्पक उत्तर दिलें कीं, "परमेश्वर खावंदांस चिरायु करो. ज्या अर्थीं आपणासारख्या थोर प्रजापालक बादशाहानें आपल्या प्रजेपैकीं एका गरीब मनुष्यास आपल्या हस्तानें धरिलें आहे, त्या अर्थीं त्याचे संपूर्ण मनोरथ पूर्ण झाले असेंच समजलें पाहिजे; खावंदांनीं माझे दोन्ही हात आपल्या हातांत धरिले आहेत, त्या अर्थीं मी सर्व पृथ्वी जिंकून टाकीन असें मला वाटतें." परंतु शूरास योग्य अशा या उत्तराचा औरंगजेबास मोठा विषाद वाटला, व यशवंतसिंगाप्रमाणेंच याच्यापासूनही आपणास पुढें त्रास होईल अशी भीति त्याचे मनांत उत्पन्न झाली. त्या वेळीं औरंगजेबानें त्याचा गौरव केला, व त्यास अंगांत घालण्याकरितां एक उत्कृष्ट झगा व दुसरा पोषाग देऊन त्यास जाण्यास निरोप दिला. तो झगा घालून तो बिचारा राजपुत्र दरबारांतून घरीं परत येतो आहे, तोंच त्याच्या अंगाची होळी झाली, व थोडक्याच वेळांत तो

शूर राजपुत्र तडफडून मरण पावला, व अशा रीतीनें औरंगजेबानें यशवंतसिंगावरचा आपला सूड उगविला.[1]

आपल्या पराक्रमी पुत्राच्या मृत्यूमुळें यशवंतसिंगाची कंबरच खचून गेली. नंतर त्याच्यावर एकामागून एक संकटें येऊं लागलीं. पृथुसिंग वारल्यावर कांहीं वर्षांनीं काबुलच्या रोगकारक हवेनें त्याचे आणखी दोन पुत्र मरण पावले. अशा प्रकारच्या पुत्रवियोगांमुळें यशवंतसिंगाच्या दुःखास पारावारच नाहींसा झाला, व शेवटीं तोही इ० स० १६७८ त काबूल, येथें मरण पावला.[2]

यशवंतसिंग मोठा शूर पुरुष होता. तो औरंगजेबाचा फार तिरस्कार करीत असे, व त्याच्या नाशाकरितां त्याचे नेहमीं प्रयत्न सुरू असत. जयासिंगाच्या मध्यस्थीनें दाराचा विश्वासघात करून तो औरंगजेबास मिळाला ही गोष्ट त्याचे हातून फारच निंद्य झाली असें म्हणावें लागतें. त्याच्या एकंदर कारकीर्दींत धरसोडपणा फार दिसून येतो, व त्याचें प्रायश्चित्तही त्याला चांगलेंच मिळालें.

यशवंतसिंग वारल्यानंतर त्याचे शूर राठोड त्याची स्त्री व दोन पुत्र यांस घेऊन काबुलाहून निघाले. त्यांना वाटेंत सिंधु नदावर अटक येथें औरंगजेबाच्या लोकांनीं अडकाव केला. परंतु त्या ठिकाणीं त्या राठोडांनीं त्या लोकांचा पराभव करून ते अलीकडे आले. औरंगजेबाचे मनांत यशवंतसिंगाचे पुत्रांस आपल्या ताब्यांत घेऊन पुढें

---

१ टाडकृत राजस्थानचा इतिहास.

२ एलफिन्स्टन. राजस्थानच्या इतिहासांत तो इ०स० १६८१ त मरण पावला असें लिहिलें आहे. औरंगजेबानें इतिहास लिहिण्याची चाल बंद केल्यामुळें अमुक गोष्ट अमुकच वर्षीं झाली असें खातरीनें सांगतां येत नाहीं.

त्यांस मुसलमान करावें असें होतें; नंतर ते लोक दिल्लीजवळ आले, तेव्हां त्यांस पुढें येण्याची मनाई करून औरंगजेबानें त्यांच्या सभोंवार आपल्या स्वारांचा सक्त पहारा ठेविला.

ह्या आणीबाणीचे प्रसंगीं रजपूत लोकांनीं आपलें नेहमींचें शौर्य जरा बाजूस ठेवून मराठी काव्याचा उपयोग केला. यशवंतसिंगाच्या पदरीं दुर्गादास नांवाचा एक शूर सरदार होता, त्यानें युक्तीनें आपल्या बायकामुलांस स्वदेशीं पाठविण्याची परवानगी मिळविली, आणि यशवंतसिंगाची स्त्री व दोन पुत्र यांचे वेश पालटून व त्यांचे जागीं त्यांच्याच वयाचीं तीन मनुष्यें ठेवून त्यांस जोधपुरास लावून दिलें. औरंगजेब मोठा धूर्त होता; त्याला त्या गोष्टीचा पुढें लौकरच वहीम आला; तेव्हां त्यानें यशवंतसिंगाची स्त्री व दोन पुत्र यांस बालेकिल्ल्यांत पाठवून द्यावें म्हणून हुकूम केला. परंतु रजपूत लोक त्यांस बादशाहाचे स्वाधीन करीनात, व ते त्यांचें संरक्षण करण्याकरितां सशस्त्र होऊन उभे राहिले. पुढें त्या बिथरलेल्या रजपूत लोकांवर औरंगजेबानें आपली फौज पाठविली, त्या वेळीं ते मोठ्या निकरानें लढले व बहुतेकांनीं आपले देह धारातीर्थी अर्पण केले. औरंगजेबाची फौज फार मोठी असल्यामुळें त्यानें

१ एलफिन्स्टन. राजस्थानच्या इतिहासांत असें लिहिलें आहे कीं, यशवंतसिंग वारला त्यावेळीं त्याची स्त्री गरोदर असून पुढें तिला काबूल येथेंच पुत्र झाला. नंतर रजपूत लोक तिला घेऊन दिल्लीस आले. पुढें औरंगजेबाच्या ह्या मुलास आपले ताब्यांत द्यावें म्हणून म्हणूं लागला. तेव्हां दुर्गादासानें राजपुत्र अजितसिंग यास एका टोपल्यांत घालून वर फळफळावळ घालून त्यास उदेपुरच्या राण्याकडे पाठवून दिलें. रजपूत लोकांनीं आपल्या सर्व बायका मोठी चिता पेटवून जाळून टाकिल्या व आपल्या जात्याभिमानाक-

( पुढें चालू. )

रजपूत लोकांचा पराभव केला. परंतु खरी राणी व राजपुत्र औरंगज़ेबाचे हातीं न पडतां ती वेषधारी राणी व राजपुत्र त्याचे हातीं लागले. दुर्गादास कांहीं थोडे लोक बरोबर घेऊन अगोदरच निघून गेला होता, व तो जोधपुरास सुखरूप येऊन पोहोंचला. राणी आपल्या पुत्रासह अगोदरच तेथें येऊन पोहोंचली होती. ती उदेपूरच्या राजघराण्यापैकीं असल्यामुळें तिनें आपला ज्येष्ठ पुत्र अजितसिंग यास उदेपुरचा राणा राजसिंग याचे आश्रयास पाठवून दिलें, त्या राण्यानें त्यास आश्रय देऊन त्याच्या संरक्षणाकरितां दुर्गादास यास नेमिलें. हा अजितसिंग पुढें मोठा झाल्यावर त्यानें पुष्कळ दिवस मारवाडचें राज्य केलें, व औरंगजेब मरेपर्यंत त्यास अतिशय त्रास देऊन त्याच्या कुलावर औरंगजेबानें जी आग पाखडली होती, तिचें बरेंच परिमार्जन केलें.

रजपूत लोकांनीं औरंगजेबास अशा रीतीनें फसविल्यामुळें त्याला त्यांची अतिशय चीड आली. जीं दोन मुलें त्याच्या हातांत पडलीं होतीं, तीं यशवंतसिंगाचीं नाहींत असें त्यास ठाऊक होतें, तरी ती गोष्ट बाहेर न फोडतां तीं त्याचींच खरीं मुलें आहेत असें धरून, त्यानें त्यांचें पालनपोषण केलें, व तीं मोठीं झाल्यावर हेच जोधपुरच्या गादीचे खरे वारस असें धरून पुढें अजितसिंगाशीं लढाई सुरू केली. असो.

झिजिया कर बसविल्यामुळें अगोदरच रजपूत लोकांचीं

---

( मागील पृष्ठावरून पुढें चालू. )
रितां ते सर्व औरंगजेबाच्या फौजेशीं मोठ्या निकरानें लढले व मरून गेले. फक्त दुर्गादास मात्र आपली सुटका करून राजपुत्राचे रक्षणार्थ निघून गेला.

माथीं फिरून गेलीं होतीं. त्यांतून यशवंतसिंगासारख्या थोर राजघराण्याचा झालेला उपमर्द पाहून ते फारच बिथरले. फक्त अंबेर संस्थान शिवाय करून बाकीचे सर्व रजपूत लोक एकत्र मिळाले. राजसिंगानें तर मोठ्या निश्चयानें अजितसिंगास आश्रय देऊन आपल्या ज्ञातीचा अभिमान राखण्याकरितां मोठा दीर्घ उद्योग चालविला. त्या वेळीं पश्चिमेकडील सर्व रजपूत संस्थानांचा कट झालेला होता. त्यांचें पारिपत्य करण्याकरितां इ० स० १६७९ त औरंगजेब अजमिरास आला. त्यानें एकदम राजसिंगाबरोबर लढाई सुरू केली, व सर्व मारवाडप्रांत उद्वस्त करण्याकरितां आपल्या पुष्कळ टोळ्या पाठवून दिल्या. पुढें राजसिंग औरंगजेबास शरण आला, तेव्हां औरंगजेबानें झिजिया कराबद्दल त्याचा कांहीं मुलूख घेतला, व जोधपुरकरांस मदत करूं नये असा त्याच्याशीं ठराव केला. नंतर इ० स० १६७९ च्या जुलै महिन्यांत तो दिल्लीस परत आला.

परंतु तो दिल्लीस आला नाहीं तोंच राजसिंगानें पुनः मोंगलांबरोबर लढाई सुरू केली. तेव्हां औरंगजेबास पुनः अजमिरास जाणें भाग पडलें. या वेळीं रजपूत लोकांचीं पाळेंमुळें खणून काढण्याचा औरंगजेबानें निश्चय केला होता. त्यानें या स्वारीची मोठी जंगी तयारी केली होती. त्यानें बंगाल्यांतून अकबर, काबुलांतून अजीमशाहा व दक्षिणेंतून मोअजीम या आपल्या पुत्रांस आपल्या मदतीस बोलाविलें. त्यानें अकबराचे हाताखालीं मोठी फौज देऊन त्याला उदेपुरावर पाठवून दिलें. व गुजराथच्या सुभेदारास तिकडून उदेपुरच्या राज्यावर स्वारी करण्याचा हुकूम केला. उदेपुरचा राणा राजसिंग

बरेच दिवस मोठ्या वीरश्रीनें लढला, व त्यानें औरंगजेबास दाद दिली नाहीं. तो वृत्तांत येणेंप्रमाणेः—

पूर्वी राजसिंगानें झिजिया कराचे संबंधानें औरंगजेबास पाठविलेलें पत्र, त्यानें यशवंतशिंगाचा अज्ञान पुत्र अजितसिंग यास दिलेला आश्रय, व ज्या रजपूत कन्येशीं विवाह करण्याचा औरंगजेबाचा पूर्वी निश्चय ठरला होता, तिची त्याच्याशीं लग्न करण्याची इच्छा नसल्यामुळें तिनें राणा राजसिंग यास, आपणास त्या संकटांतून मुक्त करावें, अशी विनंती केल्यावरून त्यानें तिला काढून नेऊन आपली बायको केलें होतें ही गोष्ट, या तीन कारणांमुळें औरंगजेबास राजसिंगाचा फार राग आलेला होता. तो मोठ्या जंगी फौजेनिशीं मेवाडप्रांत घेण्याकरितां निघाला. त्यानें वाटेनें पुष्कळ गांवें, व शहरें लुटलीं, तेव्हां पुष्कळ रजपूत लोक घरेंदारें सोडून जिवाच्या भीतीनें डोंगरांत व रानांत जाऊन लपून बसले. त्यानें चितोड, मंडळगड, मंदोसर, जीरण वगैरे किल्ले हस्तगत करून तेथें आपली फौज ठेविली. औरंगजेबानें असा कहर करून दिला होता तरी न डगमगतां, राजसिंगानें आपली सर्व फौज गोळा केली, व आपले राज्यांतील व अरवली डोंगरांतील भिल्ल व कोळी यांस आपल्या मदतीस बोलाविलें. त्या वेळीं सर्व रजपूत लोक मोंगलांचे जुलुमास त्रासून जाऊन केवळ जात्यभिमानाकरितां मोठ्या आवेशानें व एकदिलानें एकत्र जमले होते.

राण्यानें आपल्या फौजेचे तीन भाग करून त्यांस निरनिराळ्या वाटांनीं औरंगजेबावर पाठवून दिले. त्यानें आपला ज्येष्ठ पुत्र जयसिंग याचे हाताखालीं एक भाग देऊन त्यास अरवली डोंगराचे माथ्यावर पाठवून दिलें, दुसरा भाग

आपला द्वितीय पुत्र भीमसिंग याचे हाताखालीं देऊन त्याला पश्चिमेचे बाजूस गुजराथकडचा रस्ता रोखून धरण्यास सांगितलें; व तिसरा भाग स्वतः घेऊन तो नाईनघाटांत सुरक्षित स्थळीं जाऊन औरंगजेबाची वाट पहात बसला. आपल्या डाव्या बाजूचे बारींतून औरंगजेबाचें सैन्य जाऊं लागलें म्हणजे त्याच्यावर छापा घालून त्याचा फडशा पाडावा असा राण्याचा हेतु होता. परंतु औरंगजेब दुबारीपर्यंत आल्यावर पुढें न जातां तेथेंच थांबला, व त्यानें आपला पुत्र अकबर याचे हाताखालीं पन्नास हजार लोक देऊन त्यास मेवाडची राजधानी उदेपूर शहर घेण्याकरितां पाठवून दिलें. औरंगजेबास त्या वेळीं पुढें जाण्याची बुद्धि झाली नाहीं, हें त्याचें मोठें भाग्यच समजलें पाहिजे. नाहींतर त्या वेळीं त्याचा घातच झाला असता.

शाहाजादा अकबर आपल्या फौजेनिशीं उदेपुरांत शिरला, त्या वेळीं त्यास तेथें कोणीच अडथळा केला नाहीं. तें शहर अनायासें हातीं आल्यामुळें अकबरास मोठा आनंद झाला, व त्याचे फौजेंतील लोक कोणी नमाज पढत आहेत, कोणी जेवणखाणाची तयारी करीत आहेत, कोणी बाता करीत बसले आहेत, कोणी हुक्का ओढीत आहेत, अशा रीतीनें बेसावध पडले होते. इतक्यांत राण्याचा ज्येष्ठ पुत्र जयसिंग यानें बाहेर जाण्याच्या सर्व वाटा बंद करून एकदम त्या लोकांवर हल्ला केला. त्या वेळीं मोंगलांची फार त्रेधा उडून गेली. अकबर गोगुंड्याच्या रस्त्यानें आपल्या फौजेसह पळून गेला, परंतु त्या वाटेनें आगींतून निघून फुपाट्यांत पडावें त्याप्रमाणें त्याची स्थिति झाली. कारण तो रस्ता बिकट असून एका खिडींतून जात होता. मोंगलांचे लोक त्या खिडींतून निघाले त्या वेळीं दोन्ही

डगरींवरून भिल्ल लोक त्यांच्यावर मोठमोठे दगड ढकलून देऊं लागले, व त्यामुळें अकबर याचे फार लोक मरण पावले. या संकटामुळें तो कांहीं दिवस त्या दरींतच एक सुरक्षित जागा पाहून तेथें मुकाम करून राहिला. पुढें आपणास मदत येण्याची कांहींच आशा दिसत नाहीं असें पाहून, दाणावैरणीचा व धान्यसामग्रीचा तोटा पडल्यामुळें अकबर राण्यास शरण आला. तेव्हां ' पुढें लढाई चालविणार नाहीं, ' असें त्याच्यापासून अभिवचन घेऊन राण्यानें त्यास डोंगरी वाटाडे देऊन झिलवाडच्या खिंडींतून पोहोंचवून दिलें[1].

औरंगजेबाच्या फौजेची दुसरी तुकडी दिलावरखान याच्या हाताखालीं असून तो मारवाडांत देसूरी नांवाच्या एका बारींतून जात असतां रूपनगरचा राजा विक्रम सोळांकी, व गोदवडपैकीं गनोरा संस्थानचा मुख्य गोपीनाथ राठोड यांनीं त्याच्यावर हल्ला करून त्याचा बहुतेक

१ रजपुतांचा एकंदर इतिहास पाहूं गेलें तर पुष्कळ प्रसंगीं फाजील दयाभूतपणामुळें त्याचें अतिशय नुकसान झालें आहे, अशा प्रकारचे दुःखोद्गार कर्नेल टाड यांनीं आपल्या ग्रंथांत काढले आहेत. शरणागताला मरण देऊं नये, हें ब्रीद त्यांनीं शेवटपर्यंत पाळलें खरें; परंतु त्याचा खरा फायदा त्यांच्या शत्रूंनीं घेतला. प्रथमतः त्यांच्या नाशास प्रवृत्त होऊन पुढें कांहीं चालत नाहींसें झालें म्हणजे त्यांस शरण जावें; त्या भोळ्या रजपुतांनीं त्यांस त्यांच्या अपराधाची क्षमा करावी, व त्यांस संकटांतून मुक्त करावें; व शत्रूचे पाय जरा जमिनीस लागले म्हणजे पुनः त्यांनीं रजपुतांवर उलटून पडावें. अशा रीतीनें रजपुतांनीं आपलें राज्य व वैभव शत्रूंस दिलें, व या संबंधानें टाड साहेब त्यांस फार दूषण देतात. ते म्हणतात कीं, " रजपुतांची भूतदया व न्यायदृष्टि ह्या केवळ अंध होत्या. "

फडशा पाडून टाकिला. राजसिंगानें औरंगजेब व अजीमशाहा यांच्याशीं सामना देऊन त्यांचीही अकबर व दिलावरखान यांच्याप्रमाणेंच वाट लाविली. या वेळीं चोहींकडून औरंगजेबाचा पराभव होऊन रजपुतांनीं त्याच्या फौजेस अगदीं भंडावून सोडिलें होतें. राण्याचा दुसरा पुत्र भीमासिंग ह्यास गुजराथेंत पाठविलें होतें, म्हणून सांगितलें आहे. त्यानेंही ईडरप्रांत हस्तगत करून तेथला मुसलमान सुभेदार हसन यास हसकून दिलें. नंतर तो बडणेरावरून पट्टणास आला, व तेथें पुष्कळ लूट मिळवून तो तसाच सिद्धपूर, मोरासो वगैरे शहरें काबीज करीत सुरतेकडे निघाला. परंतु त्याच्या स्वारीमुळें त्या प्रांतांतील लोक इतके त्रासून गेले कीं, त्यांपैकीं कांहीं राणा राजसिंग याचेपाशीं दाद मागावयास गेले, तेव्हां त्यानें भीमासिंगास परत बोलाविलें.

अशा रीतीनें आपला पराभव झाला असें पाहून औरंगजेब फार चिडून गेला. त्यानें "शिवाजीशीं तूर्त लढाई बंद ठेवून एकदम आमचे मदतीस यावें" म्हणून मोअजीम यास पत्र पाठविलें. पुढें मोअजीम आपल्या फौजेसह उज्जनी येथें आल्यावर त्यास परभारें औरंगजेबानें रजपुतांवर पाठवून दिलें, अजीमशाहास जोधपुरावर पाठवून दिलें, व अकबर यास मेवाडप्रांत घेण्याकारितां रवाना केलें. रजपूत लोकांची धान्यसामग्री व दाणावैरण लुटून टाकावी; त्यांचीं शहरें ओस पाडावीं; त्यांचा मुलूख जाळून पोळून उद्ध्वस्त करावा; गांवचे गांव कत्तल करून टाकावे; फळझाडें व दुसरें बागायत तोडून टाकावें, बायकामुलांचा छल करून त्यांस गुलाम करावें; व अशा रीतीनें त्यांस

गांजून त्यांचा फडशा करून टाकावा; असे दुष्ट हुकूम या वेळीं औरंगजेबानें आपल्या सैन्यास दिले होते.

या वेळीं औरंगजेबाशीं सामना देण्याकरितां एकंदर पंचवीस हजार रजपूत लोक जमले होते, व त्यांत राठोड लोकांचा विशेष भरणा होता. त्यांनींही औरंगजेबाची बरीच खोड जिरविली. मोंगलांचे धान्यसामग्री आणणारे लोकांवर छापे घालून ते ती पळवून नेत असत, त्यांच्या लहान लहान टोळ्यांवर हल्ले करून त्या कापून काढीत, कधीं सामन्यास उभे राहून युद्ध करीत, व कधीं रात्रीस छापे घालून त्यांची दुर्दशा उडवीत. या सर्वांवर दुर्गादास मुख्य असून तो केवळ आपल्या शूरपणावरच अवलंबून बसला नव्हता. औरंगजेबाचे पुत्रांमध्यें त्यानें फितुरीही चालविली होती. त्यानें प्रथमतः मोअजीम यास फोडण्याचा प्रयत्न केला. प्रथमतः तो त्या गोष्टीस कबूल झाला, परंतु मागाहून त्यानें ती गोष्ट नाकारली. नंतर त्यानें अकबर यास फितुर करण्याचा प्रयत्न चालविला, व त्या कामांत त्यास यश आलें. अकबर मोठा शूर असून महत्त्वाकांक्षी होता. या वेळीं त्याचें वय २३ वर्षांचें होतें. औरंगजेबाची अकबरावर अतिशय प्रीति असून तो आपले मागें त्यासच राज्यपद देईल असें सर्वांस वाटत होतें. अकबर दुर्गादास यास जाऊन मिळाला, ही बातमी प्रथमतः मोअजीम यानें औरंगजेबास कळविली. परंतु मोअजीम याच्यावर त्याचा विशेष भरंवसा नसल्यामुळें तो ती गोष्ट केवळ बंधुद्वेषानें सांगतो आहे असें त्यास वाटलें, व तो स्वस्थ बसला.

इकडे दुर्गादासाचें फौजेजवळ अकबरानें आपले डेरे दिले. अकबर आपणास बादशाहा असें म्हणवूं लागला, त्यानें ताहोवरखान नामक सरदारास आपली वजिरी दिली,

व मजाहिदखान नांवाच्या सरदारास आपला सेनापति नेमिलें; आणि बरोबर सत्तर हजार लोक घेऊन तो औरंगजेबाशीं सामना देण्याकरितां निघाला.

औरंगजेबास ती बातमी समजली तेव्हां तो अजमीर येथें होता, व त्याच्याजवळ पुरे एक हजारही लोक नव्हते. तथापि तो मुळींच डगमगला नाहीं. त्यानें मोअजीम यास सर्व फौजेसह ताबडतोब आपल्या मदतीस बोलाविलें, व मजाहिदखानाचा भाऊ त्याच्याबरोबर होता, त्यास मजाहिदखानास फितूर करण्याकरितां त्याच्याकडे पाठवून दिलें. औरंगजेबास त्या वेळीं अकबर, आपण शहाजहान याची जी स्थिति केली, त्याप्रमाणें आपली स्थिति करितो कीं काय, अशी भीति पडली होती. परंतु अकबरानें जरी आपला उत्तम बंदोबस्त केला होता, तथापि त्याचे सरदार त्यास अनुकूल नव्हते. त्यामुळें त्याला त्या कामांत यश आलें नाहीं. मजाहिदखान संधि सांपडतांच आपले सैन्यासह औरंगजेबास जाऊन मिळाला, व त्याचे मागून बहुतेक लोक बादशाहाकडे गेले. तोहोवरखान सुद्धां अघाडीच्या लोकांसह बादशाहावर हल्ला करण्याचें मिष दाखवून औरंगजेबाकडे गेला. परंतु बादशाहाचा घात करण्याकरितां कपटानें तो आपल्याकडे आला आहे, असा संशय आल्यावरून बादशाहाचे लोक त्याचेजवळ त्याचीं हत्यारें मागूं लागले. पण तो आपलीं हत्यारें देईना; त्यामुळें त्याचा त्यांस ज्यास्तच संशय येऊं लागला. पुढें तो बादशाहाचे डेऱ्याकडे जाऊं लागला तेव्हां बादशाहाचे शिपायांनीं त्यास तेथल्या तेथेंच ठार मारिलें.

अकबराचे सर्व सरदार आपल्या फौजेसह औरंगजे-

वास जाऊन मिळाले असें पाहून रजपूत लोक घाबरून गेले, व ते स्वसंरक्षणाचे उपाय योजूं लागले. आपल्या लोकांनीं अशा रीतीनें आपला विश्वासघात केला असें पाहून, तो राजपुत्र रजपूत लोकांचा आश्रय सोडून दक्षिणेंत येण्याकरितां निघाला. त्या वेळीं त्याच्याबरोबर त्याचा असा एकही शिपाई नव्हता. परंतु शूर व इमानी दुर्गादास हा बरोबर एक हजार निकडक रजपूत लोक घेऊन त्यास पोहोंचविण्याकरितां निघाला, व मेवाड व डोंगरपूर यांच्या दऱ्याखोऱ्यांतून नर्मदेवर येऊन तेथून खालीं त्यासह कोंकणांत उतरला. अकबर इ० स० १६८१ च्या जून महिन्यांत संभाजीचे आश्रयास जाऊन राहिला. नंतर दुर्गादास आपल्या लोकांसह परत गेला. या वेळीं शिवाजीच्या मृत्यूमुळें मराठ्यांत थोडासा घोटाळा झाला होता. तो वृत्तांत पुढें येईलच.

वर सांगितलेल्या संकटांतून[1] पार पडतांच औरंगजेबानें जोधपूर व उदेपूर या संस्थानांशीं पुनः लढाई सुरू केली. मोंगल लोक जसजशीं तीं राज्यें उद्वस्त करूं लागले, तसतसे रजपूत लोक त्यांचा सूड उगविण्याकरितां माळव्यांत लुटालूट करून मुलूख ओस पाडीत चालले. ते

१ अकबराचे संबंधानें टाड व व्हुइलर साहेब असें लिहितात कीं, औरंगजेबावर अजमीर येथें स्वारी करण्याकरितां अकबर निघाला तेव्हां मोअजीम व अजीमशाहा त्याच्या मदतीस येऊन पोहोंचले नव्हते. अशा भयंकर प्रसंगीं औरंगजेबानें अशी युक्ति केली कीं, त्यानें अकबराच्या नांवानें एक पत्र लिहिलें व त्यांत " रजपूत लोक आमचेबरोबर लढाईंत गुंतले म्हणजे तुम्हीं त्यांचेवर उलटून पडावें, " असा खोटाच मजकूर लिहून आपल्या एका मनु-

( पुढें चालू. )

लोक मोठे प्रामाणिक, विश्वासु, दयाशील, व एकवचनी होते. परंतु औरंगजेबाचे जुलमामुळें ते इतके गांजून गेले होते, व त्यांचा इतका संताप होऊन गेला होता कीं, तेही या वेळीं मोंगलांच्या चांगलेच हात धुवून पाठीस लागले. राणा राजसिंग याचा दयाळसाह नांवाचा एक शूर सरदार होता, त्यानें राण्याची एक तुकडी हाताखालीं घेतली, व तो माळव्यांत नर्मदा व बिटवा येथपर्यंतचा मुलूख काबीज करीत गेला. त्यानें सारंगपूर, देवास, सरोंज, मांडू, उज्जनी, आणि चंदेरी हीं शहरें लुटलीं, व तेथचे मोंगलांचे लोक कापून काढले. हीं सर्व शहरें दाट मुसलमान वस्तीचीं होतीं. परंतु दयाळसाह यानें तीं सर्व उद्वस्त करून टाकिलीं. दयाळसाह याचे संबंधानें भाटांनीं असें वर्णन केलें आहे कीं, " त्याच्या विलक्षण शौर्याला एकंदर म्लेंच्छ इतके भीत असत कीं, ते आपलीं बायकापोरें टाकून देऊन स्वतःचा जीव बचाविण्याकरितां पळून जात किंवा लपून बसत. नंतर शूर रजपूत लोक त्यांची नेण्यासारखी असे ती सर्व मालमत्ता घेऊन जात, व बाकीचीस आग

---

( मागील पृष्ठावरून पुढें चालू. )

ष्याकडून तें पत्र दुर्गादास याचे तंबूमध्यें पडेल असें केलें. रजपूतांच्या हातांत तें पत्र पडतांच ते अकबर यास सोडून गेले. त्याचा मुख्य सरदार टायबरखान यानें औरंगजेबाचा खून करण्याचा प्रयत्न केला. परंतु त्या कामांत तोच मारला गेला. अकबराची सर्व फौज त्यास सोडून बादशाहास जाऊन मिळाली, व मोअजीम व अजीमशाहा आपल्या फौजांसह अजमीर येथें आले. रजपूत लोकांचे हातून आपला निभाव लागत नाहीं असें पाहून अकबर संभाजीकडे येण्याकरितां निघाला, व दुर्गादासानें त्यास त्याचेकडे पोहोंचतें केलें.

घालून तिची राखरांगोळी करून टाकीत. " या वेळीं त्यांनीं मोंगलांवर आपला चांगलाच सूड उगविला. गांवांतील काजी धरून पकडून आणावे, त्यांची दाढीमिशी काढावी, त्यांचीं कुराणाचीं पुस्तकें विहिरींत टाकून द्यावीं, त्यांच्या मशिदी जमीनदोस्त कराव्या व जाळून टाकाव्या, असा त्यांनीं एकसारखा क्रम चालविला होता. त्यानें बहुतेक माळवा प्रांत अनविध करून टाकला, व तो 'दयाळ' असतांही केवळ मुसलमानांच्या जुलमी कृत्यांमुळें त्यांचा ' काळ ' बनला होता, त्यानें चितोड येथें अजीमशाहावर हल्ला करून त्याचा पूर्ण पराभव केला, तेव्हां अजीमशाहा जिवाच्या भीतीनें रणथंबोर येथें जाऊन लपून बसला. परंतु या एकंदर अंदाधुंदीच्या व झोटिंगबादशाहीच्या प्रसंगीं मेवाड प्रांताचें फारच नुकसान झालें. कारण तो प्रांत अतिशय सुपीक असल्यामुळें मोंगलांनीं त्याची मुद्दाम नासाडी केली होती.

परंतु या लढाईपासून आपला यत्किंचित्‌ही फायदा न होतां तिच्यामुळें दुसऱ्या महत्त्वाच्या कामांत व्यत्यय येत आहे असें पाहून ती बंद करावी असें औरंगजेबास वाटूं लागलें. पुढें त्यानें उदेपुरच्या राण्यास विशेष फायदेशीर असा त्याच्याशीं तह केला. त्यांतील कलमें येणेंप्रमाणें:—

( १ ) बादशाहानें चितोड व त्याच्या आसपासचा मुलूख परत द्यावा; ( २ ) हिंदु देवालयांच्या आजपर्यंत पुष्कळ मशिदी केल्या; परंतु झाल्या गोष्टी परत येत नाहींत, याकरितां ती दुष्ट चाल इतःपर एकदम बंद करावी; ( ३ ) पूर्वींपासून ज्या रीतीनें राणा बादशाहास मदत करीत होता, त्याच रीतीनें त्यानें त्यास पुढेंही मदत करावी,

त्याशिवाय कोणतीही फाजील मागणी बादशाहानें कर नये; ( ४ ) यशवंतसिंगाचे पुत्र वयांत आल्यावर त्यां राज्य त्यांस परत द्यावें. ( इ० स० १६८१ ).

अशा रीतीनें रजपुतांबरोबर चाललेल्या लढाईंत औ गजेब गुंतला असतां इकडे दक्षिण—हिंदुस्थानांत फा मोठ्या उलाढाली होऊन गेल्या. इ० स० १६७२ खानजहान यास दक्षिणच्या सुभेदारीवर पाठविलें, त्या वेळीं औरंजेबाचें बहुतेक सैन्य अफगाण लोकांशीं लढाई कर ण्यांत गुंतलें होतें. या अडचणीमुळें खानजहान या शिवाजीच्या वाटेस जातां येईना. तो फक्त आपल्या मु खाचा बंदोबस्त करीत राहिला, व त्यानें घाटांतील हम रस्ते शिवाजीस वर येतां येऊं नये ह्मणून बंद केले. पर शिवाजी नवीन वाटा पाहून देशावर आला, व अहमद नगर व औरंगाबाद यांचे सभोंवतालचा मुलूख लुटूं ला गला. खानजहान यानें शिवाजीवर आपली फौज पा विली, परंतु त्यानें तिला मुळींच दाद दिली नाहीं. पु पावसाळा आल्यामुळें खानजहान भीमेचे कांठीं पेढगां येथें छावणी देऊन राहिला, व तेथें एक किल्ला बांधू त्यानें त्याचें नांव बहादरगड असें ठेविलें. मोंगल स्व बसले असें पाहून शिवाजीनें गोवळकोंड्यावर स्वारी क रून पुष्कळ लूट मिळविली, व तो पुनः मोंगलांस त्रा देऊं लागला. ( इ० स० १६७२ ).

याच वेळेच्या सुमारास बुंदेलखंडचा राजा छत्रसा हा शिवाजीस भेटण्याकरितां दक्षिणेंत आला होता. छ त्रसाल मोठा शूर होता, व पूर्वीपासून यवनांचे अंकि होऊन रहावयाचें नाहीं, असा त्याचा बाणा होता. ज्या आपल्या विचित्र बुद्धिप्रभावानें हिंदु लोकांत जूट उत्प



करून स्वराज्याचा पाया घातला, व औरंगजेबासारख्या सार्वभौम बादशाहाची त्रेधा उडवून दिली, त्या नरश्रेष्ठ शिवाजीच्या नांवाचा डंका त्या वेळीं सर्व हिंदुस्थानभर दुमदुमून राहिला होता. तेव्हां अशा पराक्रमी वीराचें दर्शन घ्यावें असा निश्चय करून छत्रसाल, दक्षिणेंत येण्याचा रस्ता बिकट असतांही, मनाचा हिय्या करून व अनेक संकटें सोसून दक्षिणेंत आला. त्याची व शिवाजीची भीमानदीचे कांठीं एका डोंगराचे पायथ्याशीं मोठ्या प्रेमानें भेटाभेट झाली. त्या वेळीं उभयतांचें हृद्गत परस्परांस कळून त्यांचे विवक्षित बेत ठरले. छत्रसाल याची स्वातंत्र्यप्रीति, स्वधर्माभिमान, शौर्य, धैर्य, साहस इत्यादि गुण पाहून शिवाजीस मोठा आनंद झाला. त्यानें छत्रसाल यास त्या वेळीं खालीं दिल्याप्रमाणें वीरास भूषणास्पद असा उपदेश केला. “ हे पराक्रमी राजा! तूं आपल्या शत्रूचा संहार करून विजयी हो; बादशाही देश पुनः काबीज करून त्यावर राज्य कर; बादशाही सैन्याची वाताहत करून सोड; त्या कपटी लोकांचा विश्वास न धरतां तुर्क लोकाचा स्वाहाकार कर; ज्या ज्या वेळीं ते तुजवर हल्ला करण्याचा बेत करितील त्या त्या वेळीं मी तुला साह्य करून त्यांचे बेत सिद्धीस जाऊं देणार नाहीं; ज्या वेळीं त्यांनीं आमच्याशीं वैर आरंभिलें, त्या वेळीं श्रीभवानी माझ्या साह्यास आली; तिच्या कृपाप्रसादानें मला मुसलमानांच्या सामर्थ्याची मुळींच पर्वा वाटत नाहीं; मजवर त्या कपटी लोकांचे मी मी म्हणणारे सरदार चालून आले, आणि त्यांनीं माझा कंठच्छेद करण्याचा प्रयत्न केला; परंतु त्या सर्वांवर मी आपल्या तरवारीचें पाणी चालवून त्यांना मोक्ष दाखविला; ह्याकरितां तूं

त्याशिवाय कोणतीही फाजील मागणी बादशाहानें करूं नये; ( ४ ) यशवंतसिंगाचे पुत्र वयांत आल्यावर त्यांचें राज्य त्यांस परत द्यावें. ( इ० स० १६८१ ).

अशा रीतीनें रजपुतांबरोबर चाललेल्या लढाईंत औरंगजेब गुंतला असतां इकडे दक्षिण—हिंदुस्थानांत फार मोठ्या उलाढाली होऊन गेल्या. इ० स० १६७२ त खानजहान यास दक्षिणच्या सुभेदारीवर पाठविलें, त्या वेळीं औरंजेबाचें बहुतेक सैन्य अफगाण लोकांशीं लढाई करण्यांत गुंतलें होतें. या अडचणीमुळें खानजहान यास शिवाजीच्या वाटेस जातां येईना. तो फक्त आपल्या मुलुखाचा बंदोबस्त करीत राहिला, व त्यानें घाटांतील हमरस्ते शिवाजीस वर येतां येऊं नये ह्मणून बंद केले. परंतु शिवाजी नवीन वाटा पाडून देशावर आला, व अहमदनगर व औरंगाबाद यांचे सभोंवतालचा मुलूख लुटूं लागला. खानजहान यानें शिवाजीवर आपली फौज पाठविली, परंतु त्यानें तिला मुळींच दाद दिली नाहीं. पुढें पावसाळा आल्यामुळें खानजहान भीमेचे कांठीं पेढगांव येथें छावणी देऊन राहिला, व तेथें एक किल्ला बांधून त्यानें त्याचें नांव बहादरगड असें ठेविलें. मोंगल स्वस्थ बसले असें पाहून शिवाजीनें गोवळकोंड्यावर स्वारी करून पुष्कळ लूट मिळविली, व तो पुनः मोंगलांस त्रास देऊं लागला. ( इ० स० १६७२ ).

याच वेळेच्या सुमारास बुंदेलखंडचा राजा छत्रसाल हा शिवाजीस भेटण्याकरितां दक्षिणेंत आला होता. छत्रसाल मोठा शूर होता, व पूर्वीपासून यवनांचे अंकित होऊन रहावयाचें नाहीं, असा त्याचा बाणा होता. ज्यानें आपल्या विचित्र बुद्धिप्रभावानें हिंदु लोकांत जूट उत्पन्न

करून स्वराज्याचा पाया घातला, व औरंगजेबासारख्या सार्वभौम बादशाहाची त्रेधा उडवून दिली, त्या नरश्रेष्ठ शिवाजीच्या नांवाचा डंका त्या वेळीं सर्व हिंदुस्थानभर दुमदुमून राहिला होता. तेव्हां अशा पराक्रमी वीराचें दर्शन घ्यावें असा निश्चय करून छत्रसाल, दक्षिणेंत येण्याचा रस्ता बिकट असतांही, मनाचा हिय्या करून व अनेक संकटें सोसून दक्षिणेंत आला. त्याची व शिवाजीची भीमानदीचे कांठीं एका डोंगराचे पायथ्याशीं मोठ्या प्रेमानें भेटाभेट झाली. त्या वेळीं उभयतांचें हृद्गत परस्परांस कळून त्यांचे विवक्षित बेत ठरले. छत्रसाल याची स्वातंत्र्यप्रीति, स्वधर्माभिमान, शौर्य, धैर्य, साहस इत्यादि गुण पाहून शिवाजीस मोठा आनंद झाला. त्यानें छत्रसाल यास त्या वेळीं खालीं दिल्याप्रमाणें वीरास भूषणास्पद असा उपदेश केला. " हे पराक्रमी राजा! तूं आपल्या शत्रूचा संहार करून विजयी हो; बादशाही देश पुनः काबीज करून त्यावर राज्य कर; बादशाही सैन्याची वाताहत करून सोड; त्या कपटी लोकांचा विश्वास न धरतां तुर्क लोकाचा स्वाहाकार कर; ज्या ज्या वेळीं ते तुजवर हल्ला करण्याचा बेत करितील त्या त्या वेळीं मी तुला साह्य करून त्यांचे बेत सिद्धीस जाऊं देणार नाहीं; ज्या वेळीं त्यांनीं आमच्याशीं वैर आरंभिलें, त्या वेळीं श्रीभवानी माझ्या साह्यास आली; तिच्या कृपाप्रसादानें मला मुसलमानांच्या सामर्थ्याची मुळींच पर्वा वाटत नाहीं; मजवर त्या कपटी लोकांचे मी मी म्हणणारे सरदार चालून आले, आणि त्यांनीं माझा कंठच्छेद करण्याचा प्रयत्न केला; परंतु त्या सर्वांवर मी आपल्या तरवारीचें पाणी चालवून त्यांना मोक्ष दाखविला; ह्याकरितां तूं

तिळमात्र काळजी न करितां आपल्या देशामध्यें परत जा; सैन्याची भरती कर; मुसलमानांस हाकून दे; सदोदित नंगी समशेर हातांत असूं दे; म्हणजे युद्धप्रसंगीं परमेश्वर-कृपेनें तुझें रक्षण होईल. गोब्राह्मणांचा प्रतिपाल करणें, वेदांचें रक्षण करणें, आणि समरांगणावर शौर्य दाखविणें, हेंच क्षत्रियांचें मुख्य व्रत होय; जर ह्यांत तुला मृत्यु प्राप्त झाला तर तूं सूर्यमंडळ भेदून स्वर्गद्वार जिंकशील, व तेथील अपार सुखाचा उपभोग घेशील; आणि रणामध्यें विजयी झालास तर तुला तुझें स्वराज्य आणि अमरकीर्ति प्राप्त होईल; ह्या प्रांतामध्यें तूं मला साह्य केलें, व शत्रूवर आपण उभयतांनीं हल्ला केला, तरी सर्व यशाचा धनी मी होईन; याकरतां तूं आपल्या देशामध्यें जा; व तेथें युद्ध कर; म्हणजे तुझ्या कीर्तीचा वांटा घेण्यास पुष्कळ लोक सिद्ध होतील; तेथें तुला यशश्री माळ घालील, आणि तुझें शौर्य व तुझी कीर्ति यावच्चंद्रदिवाकरौ चमकत राहील. या उपदेशामुळें छत्रसाल यास दुप्पट अवसान चढून तो बुंदेल खंडांत परत गेल्यावर तिकडे त्यानें बादशाही मुलखांत धुमाकूळ उडवून औरंगजेबास फार त्रास देऊं लागला.

शिवाजी गोवळकोंडें लटण्याचे कामांत गुंतला असतां मोंगलांचें व शिद्दीचें आरमार एकत्र होऊन त्यांनीं शिवाजीच्या कोंकणांतील मुलुखास फार त्रास दिला. इ० स० १६७३ त शिवाजी व जंजिऱ्याचा शिद्दी या दोघांनीं आपापल्या वतीनें मुंबईचा डेपुटी गव्हरनर अनंगीर याजपाशीं एकमेकांविरुद्ध मदत मागितली. परंतु त्यानें कोणासच मदत केली नाहीं. मोंगल व शिद्दी यांच्या आरमारानें मराठ्यांचीं बरींच गलबतें धरिलीं, व पेण व नागोठणें या खाडयांत शिरून त्यांनीं शिवाजीचा पुष्कळ मुलूख लुटून फस्त केला, व पुष्कळ लोक गुलाम करून नेले. इतक्यांत मोरोपंत पिंगळे हा रायगडाहून मोठें सैन्य घेऊन आला, व त्यानें शिद्दी व मोंगल यांचा पराभव करून हजारों लोक ठार मारिले.

१ शिवाजीच्या या भेटीची हकीकत विशेष कोठें उपलब्ध नाहीं. परंतु ती शिवाजी व छत्रसाल यांची कारकीर्द प्रत्यक्ष पाहिलेल्या भूखन कवीनें वर्णन केली आहे, तेव्हां तिच्या सत्यतेबद्दल शंका घेण्याचें कारण नाहीं. वरील मजकूर कॅप्टन पॉगसन यांनीं ‘ छत्रप्रकाश ’ ग्रंथावरून इंग्रजीमध्यें लिहिलेला आहे. पारसनीसकृत मराठ्यांचे पराक्रम—बुंदेलखंड प्रकरण.



इ० स० १६७२ च्या डिजंबर महिन्याच्या पंधराव्या तारखेस विजापुरचा बादशाहा अली अदिलशाहा हा अर्धांग वायूनें अजारी पडला, व पुढें त्यास लौकरच देवाज्ञा झाली. त्याला सुलतान शिकंदर नांवाचा एक पुत्र होता, परंतु तो अज्ञान होता, त्यामुळें राज्याचा कारभार कोणी चालवावा अशा संबंधानें तेथील दरबारच्या मंत्र्यांमध्यें तंटा उपस्थित झाला; व त्या गडबडींत शिवाजीनें विजापुरकरांचा बराच मुलूख जिंकून घेतला. इ०स० १६७३च्या मार्च महिन्यांत शिवाजीनें विशाळगड येथें मोठें सैन्य गोळा केलें. त्यानें प्रथमतः विशाळगडचा किल्ला घेतला, व अण्णाजी दत्तो यास हुबळी शहर लुटण्याकरितां पाठवून दिलें. त्यानें तें शहर लुटून अतिशय संपत्ति आणिली, व विजापुरकरांचीं कोंकणांतील सर्व ठाणीं घेतलीं. हुबळी शहराची दुर्दशा पाहून बेदनूरचा राजा शिवाजीस शरण आला, व दरसाल खंडणी देण्यास कबूल झाला. नंतर शिवाजीनें परळी, सातारा, चंदनवदन,

पांडवगड, नांदगिरी, ताटोरा, कऱ्हाड, कोल्हापूर वगैरे किल्ले घेतले. विजापुरच्या वजिरानें एक जंगी फौज शिवाजीचें पारिपत्य करण्याकरितां पाठवून दिली. तें सैन्य पन्हाळ्याजवळ येऊन उतरलें, तेव्हां शिवाजीनें प्रतापराव गुजर यास त्याच्यावर पाठवून दिलें. प्रतापरावानें त्या सैन्यास इतकें भंडावून सोडिलें कीं, त्यानें लगेंच आपला गाशा गुंडाळला, व तें आल्या वाटेनें परत विजापुरास निघून गेलें.

प्रतापरावानें सुध्या रीतीनें विजापुरच्या फौजेस परत जाऊं दिलें, असें पाहून शिवाजीला त्याचा फार राग आला, व विजापुरचें सैन्य लुटशील तरच मला तोंड दाखव, नाहीं तर दाखवूं नको, म्हणून त्यानें त्यास निरोप पाठविला. पुढें इ० स० १६७४ त पुनः विजापुरचें सैन्य पन्हाळ्यास आलें, त्या वेळीं प्रतापरावानें बेहोष रीतीनें त्याच्यावर हल्ला केला. त्या लढाईत प्रतापराव गोळी लागून ठार झाला, आणि विजापुरच्या सैन्यानें मराठ्यांचा अशा जोरानें पाठलाग केला कीं, त्यांस ' दे माय धरणी ठाय ' असें होऊन ते पळून गेले. अशा नामोहरमीच्या प्रसंगीं हंसाजी मोहिते नांवाचा एक मराठा सरदार पांच हजार फौज बरोबर घेऊन अकस्मात् विजापुरचे सैन्यावर येऊन पडला, व त्यानें त्या लोकांचा पराभव करून त्यांस महाराष्ट्रांतून हाकून लाविलें. या प्रसंगीं दोन मराठे शिपाई फार वीरश्रीनें लढले. त्यांपैकीं एकाचें नांव संताजी घोरपडे व दुसऱ्याचें नांव धनाजी जाधव. ही जोडी पुढें फारच नांवलौकिकास चढली, त्याचा इतिहास पुढें येईलच.

प्रतापरावाच्या मृत्यूमुळें शिवाजीस फारच वाईट वाटलें व आपल्या रागामुळें त्यानें असा अतित्यागीपणा केला

असें त्यास वाटूं लागलें. परंतु त्याचा उपयोग काय ? होणारी गोष्ट होऊन गेली. **शिवाजीनें** **प्रतापरावाच्या** कुटुंबास फार चांगल्या रीतीनें वागविलें, व त्याच्या कन्येचा आपला कनिष्ठ पुत्र **राजाराम** याच्याशीं विवाह करून दिला. त्यानें **हंसाजीस** **हंबीरराव** असें नांव दिलें, व त्यास आपला सरनोबत नेमिलें.

त्याच वर्षी **शिवाजीनें** **दंडाराजपुरीपासून** तों **गोव्या-जवळ** **वारदेस** म्हणून बंदर आहे, तेथपर्यंतचा सर्व समुद्रकांठचा प्रदेश आपल्या ताब्यांत आणिला, व तो **रायगडास** परत आला. पुढें त्याच वर्षाच्या जूनच्या सहाव्या तारखेस त्यानें आपणास राज्याभिषेक करून घेतला. त्या वेळीं त्यानें आपली सोन्यानें तुला केली, व अतिशय दानधर्म केला. त्याच वेळीं त्यानें आपल्या अष्टप्रधानांच्या किताबांपैकीं कांहीं किताब फारशी होते ते मराठी केले. ते किताब येणेंप्रमाणें:—

| फारशी. | मराठी. |
|---|---|
| पेशवा | मुख्यप्रधान. |
| मजीमदार | पंतअमात्य. |
| सुरणीस | पंतसचिव. |
| वाकनीस | मंत्री. |
| सरनोबत | सेनापति. |
| डबीर | सुमंत. |
| न्यायाधीश | न्यायाधीश. |
| न्यायशास्त्री | पंडितराव. |

पूर्वी इ० स० १६७२ त **शिवाजीनें** **मोंगलांशीं** तह केला होता, त्यामुळें कांहीं दिवस त्यांच्यांतील तंटे बंद

पांडवगड, नांदगिरी, ताटोरा, कऱ्हाड, कोल्हापूर वगैरे किल्ले घेतले. विजापुरच्या वजिरानें एक जंगी फौज शिवाजीचें पारिपत्य करण्याकरितां पाठवून दिली. तें सैन्य पन्हाळ्याजवळ येऊन उतरलें, तेव्हां शिवाजीनें प्रतापराव गुजर यास त्याच्यावर पाठवून दिलें. प्रतापरावानें त्या सैन्यास इतकें भंडावून सोडिलें कीं, त्यानें लगेंच आपला गाशा गुंडाळला, व तें आल्या वाटेनें परत विजापुरास निघून गेलें.

प्रतापरावानें सुध्या रीतीनें विजापुरच्या फौजेस परत जाऊं दिलें, असें पाहून शिवाजीला त्याचा फार राग आला, व विजापुरचें सैन्य लुटशील तरच मला तोंड दाखव, नाहीं तर दाखवूं नको, म्हणून त्यानें त्यास निरोप पाठविला. पुढें इ० स० १६७४ त पुनः विजापुरचें सैन्य पन्हाळ्यास आलें, त्या वेळीं प्रतापरावानें बेहोष रीतीनें त्याच्यावर हल्ला केला. त्या लढाईंत प्रतापराव गोळी लागून ठार झाला, आणि विजापुरच्या सैन्यानें मराठ्यांचा अशा जोरानें पाठलाग केला कीं, त्यांस ‘ दे माय धरणी ठाय ’ असें होऊन ते पळून गेले. अशा नामोहरमीच्या प्रसंगीं हंसाजी मोहिते नांवाचा एक मराठा सरदार पांच हजार फौज बरोबर घेऊन अकस्मात् विजापुरचे सैन्यावर येऊन पडला, व त्यानें त्या लोकांचा पराभव करून त्यांस महाराष्ट्रांतून हाकून लाविलें. या प्रसंगीं दोन मराठे शिपाई फार वीरश्रीनें लढले. त्यांपैकीं एकाचें नांव संताजी घोरपडे व दुसऱ्याचें नांव धनाजी जाधव. ही जोडी पुढें फारच नांवलौकिकास चढली, त्याचा इतिहास पुढें येईलच.

प्रतापरावाच्या मृत्यूमुळें शिवाजीस फारच वाईट वाटलें व आपल्या रागामुळें त्यानें असा अतित्यागीपणा केला

असें त्यास वाटूं लागलें. परंतु त्याचा उपयोग काय? होणारी गोष्ट होऊन गेली. शिवाजीनें प्रतापरावाच्या कुटुंबास फार चांगल्या रीतीनें वागविलें, व त्याच्या कन्येचा आपला कनिष्ठ पुत्र राजाराम याच्याशीं विवाह करून दिला. त्यानें हंसाजीस हंबीरराव असें नांव दिलें, व त्यास आपला सरनोबत नेमिलें.

त्याच वर्षीं शिवाजीनें दंडाराजपुरीपासून तों गोव्या-जवळ बारदेस म्हणून बंदर आहे, तेथपर्यंतचा सर्व समुद्रकांठचा प्रदेश आपल्या ताब्यांत आणिला, व तो रायगडास परत आला. पुढें त्याच वर्षाच्या जूनच्या सहाव्या तारखेस त्यानें आपणास राज्याभिषेक करून घे-तला. त्या वेळीं त्यानें आपली सोन्यानें तुला केली, व अतिशय दानधर्म केला. त्याच वेळीं त्यानें आपल्या अष्टप्रधानांच्या किताबांपैकीं कांहीं किताब फारशी होते ते मराठी केले. ते किताब येणेंप्रमाणें:—

| फारशी. | मराठी. |
| --- | --- |
| पेशवा .... .... .... | मुख्यप्रधान. |
| मजीमदार .... .... .... | पंतअमात्य. |
| सुरणीस .... .... .... | पंतसचिव. |
| वाकनीस .... .... .... | मंत्री. |
| सरनोबत .... .... .... | सेनापति. |
| डबीर .... .... .... | सुमंत. |
| न्यायाधीश .... .... .... | न्यायाधीश. |
| न्यायशास्त्री .... .... .... | पंडितराव. |

पूर्वीं इ० स० १६७२ त शिवाजीनें मोंगलांशीं तह केला होता, त्यामुळें कांहीं दिवस त्यांच्यांतील तंटे बंद

पडले होते. पुढें इ० स० १६७५ त मोंगलांचा सरदार दिलावरखान शिवाजीचे मुलुखास उपद्रव देऊं लागला, त्यामुळें पुनः लढाई सुरू झाली. शिवाजीनें मोरोपंत पिंगळे यास पाठवून औंढा व पट्टा[1] हे दोन किल्ले घेतले. हंबीररावानें आपल्या फौजेच्या निरनिराळ्या टोळ्या केल्या, व त्यांनीं खानदेश व वऱ्हाड प्रांतांत शिरून बऱ्हाणपूर व माहूरपर्यंतचा सर्व मुलूख लुटून फस्त केला; तसेंच त्यानें भडोच परगाणाही लुटला. लुटालूट करीत नर्मदेच्या पलीकडे गेलेला पहिला मराठा सरदार हाच होय. इकडे शिवाजीनें फोंडा किल्ला घेतला, आणि मोंगलांचीं कोंकणांतील कित्येक शहरें व घाटावर सोंद प्रांत लुटून तो रायगडास परत आला.

मध्यंतरीं निंबाळकर, घाटगे वगैरे विजापुरच्या सरदारांनीं शिवाजी कोंकणांत गुंतला आहे असें पाहून पन्हाळा, ताटोरा वगैरे किल्ले पुनः घेतले. परंतु इ० स० १६७६ त शिवाजीनें फिरून तो प्रांत काबीज केला; व आपल्या राज्यास विशेष बळकटी आणण्याकरितां वर्धनगड, भूषणगड, सदाशिवगड, व मछिंद्रगड असे चार नवीन किल्ले बांधिले. नंतर शिवाजी अजारी पडल्यामुळें कांहीं दिवस सातान्यास स्वस्थ बसला. पुढें त्यानें इ० स० १६७७ त आपला भाऊ व्यंकोजी याच्यावर स्वारी केली, व आपल्या पित्याच्या जहागिरीचा निमे भाग घेतला.

या वेळीं दिलावरखान हा दक्षिणच्या सुभेदारीवर होता. तो जातीचा पठाण असून त्याच्या हाताखालच्या फौजेंतही पठाण लोकांचाच विशेष भरणा होता. तो दक्षिणेंत आल्यावर त्यानें बरीच धामधूम केली. विजापुरचा

१ हे किल्ले नाशिक जिल्ह्यांत आहेत.

बादशाहा अज्ञान असल्यामुळें अबदुल करीम नांवाचा सरदार त्याचा कारभार पहात असे. प्रथमतः दिलावरखानानें त्याच्याशीं लढाई सुरू केली; परंतु तोही पठाणच असल्यामुळें ते एक होऊन त्यांचा तह झाला, व त्यांनीं गोंवळकोंड्याच्या राज्यावर स्वारी करण्याचा बेत केला. इतक्यांत अबदुल करीम मरण पावला, तेव्हां दिलावरखानानें मसाऊदखान नांवाच्या हबशास त्याचा अधिकार दिला. त्यामुळें त्या राज्यांत मोंगलांचें बरेंच बोट शिरकलें. परंतु औरंगजेबाची तेवढ्यानें तृप्तता झाली नाहीं. विजापुरकरांवर ज्यास्त मागण्या करण्याकरितां त्यानें मोअजीम यास सरसुभेदार नेमून पुनः दक्षिणेंत पाठवून दिलें. मोंगलांच्या जबरदस्त मागण्या विजापूरकर कबूल करीनात, तेव्हां त्या कबूल करण्यास त्यांना भाग पाडण्याकरितां दिलावरखानानें इ० स० १६७९ त विजापुरास वेढा दिला. त्या वेळीं मसाऊदखानानें शिवाजीपाशीं मदत मागितली. वेढा दिलेल्या लोकांवर हल्ला केला, तर त्यापासन विशेष फायदा होणार नाहीं, असें शिवाजीस वाटल्यावरून त्यानें मोंगलांस जेरीस आणण्याची निराळीच युक्ति काढिली. बहुतेक सैन्य विजापुरास गुंतून राहिल्यामुळें मोंगलांच्या मुलखांतील बंदोबस्त कमी झाला असें पाहून तो त्यांचे मुलखांत शिरला, व सर्व मुलूख उद्वस्त करून त्यानें त्यांचे बरेच किल्ले घेतले. तथापि त्यास दाद न देतां दिलावरखानानें विजापुरच्या वेढ्याचें काम मोठ्या नेटानें चालविलें होतें. मसाऊदखानानें पुनः शिवाजीस विनंती केली, तेव्हां आपली फौज घेऊन तो विजापुरास जाण्याकरितां निघाला. इतक्यांत संभाजी दिलावरखानाच्या थापांस भुलून जाऊन त्यास

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

जाऊन मिळाला. हें दुःखदायक वर्तमान शिवाजीस समजलें, तेव्हां त्यास कांहीं सुचेनासें झालें. संभाजी शिवाजीप्रमाणें शूर होता; परंतु तो फार दुर्व्यसनी होता. शिवाजीनें त्याला कांहीं कारणावरून पन्हाळ्यावर कैदेंत ठेविलें होतें. पुढें तेथून तो युक्तीनें पळून जाऊन दिलावरखानास मिळाला. संभाजी आपणास अनुकूल झाला आहे, तर त्यालाच शिवाजीबरोबर लढावयास लाविलें म्हणजे त्यापासून आपला फार फायदा होईल, असें दिलावरखानानें औरंगजेबास कळविलें. परंतु औरंगजेबाचा स्वभाव संशयी असल्यामुळें त्याला ती मसलत पसंत पडली नाहीं. त्यानें "संभाजीस एकदम कैद करून आमचेकडे पाठवून द्यावें," म्हणून दिलावरखानास हुकूम पाठविला. परंतु खानानें त्यास अभयवचन दिलें होतें, त्यामुळें त्यास कैद न करितां त्यानें त्यास परत जाण्यास सांगितलें. नंतर संभाजी परत आला, तेव्हां शिवाजीस मोठा आनंद होऊन तो विजापुरकरांस मदत करण्याकरितां गेला. त्यानें बाहेरून दिलावरखानास असें भंडावून सोडिलें कीं, त्यामुळें त्याला विजापुरचा वेढा उठवून औरंगाबादेस परत यावें लागलें.

ह्या मदतीबद्दल विजापुरच्या कारभाऱ्यानें शिवाजीस कृष्णा व तुंगभद्रा या नद्यांचे मधील सर्व मुलूख व करनाटकांतील शहाजीच्या जहागिरीवरील सर्व हक्क दिले. त्या वेळीं त्याचा भाऊ व्यंकोजी यास फार वाईट वाटून तो सर्वसंगपरित्याग करून विदेही होऊं लागला; तेव्हां शिवाजीनें त्याची समजूत करून करनाटकांतील सर्व जहागीर त्यास देऊन टाकिली. पुढें शिवाजी रायगडास परत आला. परंतु तेथें त्यास थोडक्याच दिवसांत गुढगी नांवाचा रोग झाला, व अतिशय ताप येऊं लागला. शेवटीं तें दुखणें विकोपास

जाऊन इ० स० १६८० च्या एप्रिल महिन्याच्या पांचव्या तारखेस त्या प्रतापी पुरुषाचा अवतार संपला.

शिवाजी म्हणजे एक असामान्य पुरुष होता. त्यानें गरीब, इमानी व शूर अशा मावळ्यांस हाताशीं धरून त्यांच्या साहाय्यानें स्वराज्याचा पाया घातला, व आपल्या शौर्यानें, शहाणपणानें व अश्रांत परिश्रमानें त्याच पायावर पुढें चांगली टोलेजंग इमारत उभी केली. त्याच्या बाहेरील मुलुखांत लढाया सुरू असत तरी स्वतःच्या राज्याच्या बंदोबस्तांत तो अंतर पडूं देत नसे. त्यानें दिवाणी, फौजदारी व लष्करसंबंधी कायद्यांत फेरफार करून प्रजेस सुख होईल असे नवे कायदे केले. तो एक कुशल सरदार व शहाणा राज्यकर्ता होऊन गेला. शिवाजीप्रमाणें शूर व मुत्सद्दी असा मराठ्यांमध्यें पुढें एकही वीर निर्माण झाला नाहीं असें म्हटलें तरी चालेल. औरंगजेबाचे छलामुळें जीर्ण दशेस आलेल्या हिंदुधर्माची खरी योग्यता मराठ्यांचे मनांत जागृत करून देऊन त्यांचे हातून अचाट पराक्रम करविणें, व औरंगजेबानें आपल्या महंमदी धर्माविषयीं दुराग्रह धरून हिंदूंचीं कित्येक देवालयें जमीनदोस्त करणें, त्यांच्या मूर्ति फोडून टाकणें, त्यांच्या कित्येक देवालयांच्या मशीदी बनविणें, त्यांस मुसलमान करण्याकरितां त्यांच्यावर जुलमी कर बसविणें, ह्या व अशा प्रकारच्या दुसऱ्या ज्या भयंकर चुक्या केल्या, त्यांचा योग्य फायदा घेऊन त्यांपासूनच आपला कार्यभाग साधून घेणें, हिंदुधर्मास प्रोत्साहन देणें, साधकबाधक प्रमाणें पाहून कोणत्याही कार्यास प्रवृत्त होणें, योग्य प्रसंग पाहून आपल्या शक्तीचा उपयोग करणें, व हीं एकंदर धोरणें राखून स्वराज्याचा भक्कम पाया घालणें, इत्यादि गोष्टी करण्यास शिवाजीसारखा असामान्य पुरुष पाहिजे

होता, व तो होता म्हणूनच वरील सर्व गोष्टी झाल्या. 'त्याचीं कांहीं कृत्यें सदोष होतीं, राज्यप्रकरणांत सरळमार्गापेक्षां कुटिल मार्गाचें तो अवलंबन करीत असे, प्रसंगीं कपटानें व क्रौर्यानें तो आपला कार्यभाग शेवटास नेई,' इत्यादि दोषांचें आरोपण कांहीं इंग्रज ग्रंथकार त्याचे ठिकाणीं करितात. परंतु ज्यांचे अंगीं कमज्यास्त प्रमाणानें वरील दोष वास करीत नाहींत, असे राजकार्यधुरंधर पुरुष कितीसे मिळतील बरें ? अगदीं शांततेच्या काळांत सुधारणेच्या शिखरास जाऊन पोहोंचलेल्या मोठमोठ्या राष्ट्रांतील राजकार्यधुरंधर पुरुषही कधीं कधीं वरील सदोष मार्गांचें अवलंबन करितात. मग शिवाजीला तर फारच मोठा कार्य भाग करून घ्यावयाचा होता. त्यानें ज्या कालामध्यें स्वराज्याची स्थापना केली, त्या वेळीं सर्व हिंदुस्थानदेश यवनमय होऊन गेला होता, असें ह्मटलें तरी चालेल. तेव्हां त्या गोष्टीकडे थोडेसें लक्ष्य पुरविलें ह्मणजे वरील आक्षेपांच्या संबंधानें शिवाजीस विशेष दोष लावितां येईल असें वाटत नाहीं; इतकेंच नव्हे तर त्याला त्या प्रसंगीं तशाच प्रकारच्या गोष्टी करणें निरुपायास्तव जरूर होतें, असें म्हणावें लागेल. तो हिंदुधर्माचा कट्टा अभिमानी होता व त्यानें पुष्कळ हिंदु लोकांस वर्षासनें व नेमणुका करून दिल्या. औरंगजेबाच्या करड्या व जुलमी अमलाखालीं हिंदुधर्माची राखरांगोळी होण्याचा बेत आला होता, परंतु शिवाजीनें रामदास स्वामींच्या साहाय्यानें त्यास औरंगजेबाच्या तडाक्यांतून वांचवून त्याचा जीर्णोद्धार केला, याबद्दल हिंदु लोकांस त्याचें कधींच उतराई होतां येणार नाहीं.

शिवाजीनें संभाजीस त्याच्या दुर्वर्तनाबद्दल पन्हाळा किल्ल्यावर कैदेंत ठेविलें होतें. शिवाजी वारल्यावर त्याचा

कनिष्ठ पुत्र राजाराम हा लहान होता, म्हणून त्याची आई सोयराबाई ही प्रधानमंडळीस वश करून घेऊन त्याच्या नांवानें राज्यकारभार चालवूं लागली. तिनें संभाजीचा बंदोबस्त करण्याकरितां जनार्दनपंत सुमंत यास पन्हाळ्यास पाठवून दिलें. संभाजीनें पन्हाळ्यावरील शिबंदी अनुकूल करून घेऊन तो किल्ला आपले ताब्यांत घेतला. त्यानें जनार्दन पंताचा पराभव केला, व पुढें हंबीरराव मोहिते सेनापति त्यास येऊन मिळाला. नंतर तो रायगडास आला. तेव्हां तेथील शिबंदीही त्यास अनुकूल झाली. नंतर इ० स० १६८० च्या आगष्ट महिन्यांत त्यानें आपणास राज्याभिषेक करून घेतला.

रायगडास येऊन पोहोंचेपर्यंत संभाजीचें वर्तन फार चांगलें होतें. परंतु रायगडास त्याचे पाय लागतांच त्याच्या वृत्तींत फेर पडला. त्यानें अण्णाजी दत्तो सचिव यास कैद केलें, सोयराबाईची अमर्यादा करून तिला भिंतींत चिनून ठार मारिलें, तिच्या पक्षास अनुकूल असलेल्या मंडळीपैकीं कित्येकांचीं डोकीं मारिलीं, कित्येकांस हत्तींच्या पायीं दिलें, कित्येकांचा कडेलोट केला, व अशा रीतीनें शिवाजीच्या शूर व इमानी माणसांची विटंबना व संहार करून आपल्या नांवास अक्षयी कलंक लावून घेतला.

---

## प्रकरण पाचवें

इ० स० १६८१ पासून इ० स० १६९१ पर्यंत.

राजाराम यास गादीवर बसविण्याचा शिवाजीच्या सरदारांचा प्रयत्न.–कलुशा.–शिवाजीची कैद ढिली पडते.–औरंगजेब दक्षिणेंत

येतो.-मोअजीम कोंकणप्रांत काबीज करितो.-औरंगजेब स्व
मोहीम चालविण्याकरितां बाहेर पडतो.-मराठे कोंकणपट्टी प
जिंकून घेतात.-अजीमशाहा विजापुरावर चाल करून जातो.-
औरंगजेब विजापूर व गोवळकोंडें हीं राज्यें बुडवितो.-तो मो
जीम यास कैदेंत ठेवितो.-वरील दोन राज्यें बुडविण्यांत औरं
जेबानें केलेली चुकी.-संभाजीचा बेहोषपणा व अकबर त्या
सोडून मक्केस जातो.-हंबीरराव मोंगलांचा सरदार शिरजीखा
याचा पराभव करितो.-औरंगजेब संभाजीचा मुलूख घेण्याकरि
बाहेर पडतो.-त्याचा व मुंबईच्या इंग्रज लोकांचा बेबनाव.-
तकरीबखान संगमेश्वर येथें संभाजीस कैद करितो.-औरंग
संभाजीस ठार मारतो.-राजाराम मराठी राज्याचा कार
पाहूं लागतो.-तकरीबखान रायगडचा किल्ला घेतो, व सं
जीची स्त्री येसूबाई व पुत्र शिवाजी यांस औरंगजेबाकडे
करून नेतो.-राजाराम जिंजी तंजावर येथें निघून जातो.

मागें सांगितल्याप्रमाणें इ० स० १६८१ च्या जून महिन्या
त औरंगजेबाचा पुत्र अकबर संभाजीकडे आला, व संभाजी
त्यास दुतसे गांवीं मोठ्या डामडौलानें ठेविलें. पुढें अण्णाजी
दत्तो व दुसरी कांहीं मंडळी यांनीं संभाजीस मारून त्या
जागीं राजारामाची स्थापना करावी असें कारस्थान अ
बरापाशीं सुरू केलें. परंतु त्यानें तें इत्थंभूत वर्तमान सं
जीस कळविलें. तेव्हां संभाजीस मोठा राग येऊन त्या
अण्णाजी दत्तो, शिरके कुलांतील कांहीं मंडळी, बाळा
आवजी चिटणीस वगैरे प्रमुख मंडळीस हत्तीच्या पा
दिलें. त्या वेळीं बरेच मराठे सरदार संभाजीस सोडू
मोंगलांचे आश्रयास गेले.

यानंतर संभाजी कलुशा नांवाचा एक नीच कनोज

१ सोयराबाई शिरके कुलांतील असल्यामुळें ती मंडळी अ
तच राजारामाचे पक्षास अनुकूल होती.



ब्राह्मण होता, त्याच्या तंत्रानें वागूं लागला. पुढें संभाजीनें कलुशाच्या चिथावणीवरून मोरोपंत पिंगळे यास कैद केलें व त्यास आपली पेशवाई दिली.

शाहाजादा अकबर संभाजीस मिळाला, त्या वेळीं दिल्लीची बादशाही मिळवून देण्याचे कामीं संभाजी आपणास चांगली मदत करील असें त्यास वाटलें होतें. परंतु संभाजीच्या हातून तसें कांहींएक झालें नाहीं. इ० स० १६८२ त संभाजीनें पुनः जंजिऱ्यावर स्वारी केली, व जमीन व समुद्र या दोन्ही बाजूंनीं त्यावर हल्ला केला. परंतु दोन्हींकडे त्याचा पराभव झाला.

संभाजीचे कारकीर्दींत शिवाजीचे वेळची कैद ढिली पडली. कलुशास राज्यकारभाराचें मुळींच ज्ञान नसल्यामुळें, व शिवाजीचे वेळचे जुने अनुभवशीर मंत्री नाहींसे झाल्यामुळें, राज्यकारभारांत फार अव्यवस्था होऊन गेली. मद्यपान व दुसऱ्या व्यसनांत संभाजी आपणा स्वतःस विसरून गेला, व कलुशाचे ओंजळीनें पाणी पिऊं लागला. राज्यांत बेबंदशाही माजत चालली, शिवाजीचे लष्करी खात्याचे नियम शिथिल होत चालले, मोंगलांप्रमाणें मराठेही आपलीं बायकापोरें बरोबर घेऊन लढाईवर जाऊं लागले, जमिनीचा वसूल थकला, फौजेस वेतन मिळेनासें झालें, लष्करी लोक नोकऱ्या सोडून जाऊं लागले त्यामुळें फौज कमी झाली, संभाजीच्या उधळेपणामुळें शिवाजीचा अतिशय मोठा खजिना रिता पडला, पैशाची तूट आल्यामुळें कलुषानें जमिनीचा धारा वाढविला, लोकांस तो देण्याचें सामर्थ्य नसल्यामुळें ते घरेंदारें, जमीनजुमला, सोडून देशत्याग करूं लागले, व गांवचे गांव ओसाड पडत चालले. वैरे, या सर्व गोष्टींची दाद लावण्याकरितां कोणी सरदार संभा-

जीकडे जावयास लागला, तर कलुशा त्याची व संभाजीची गांठच पडूं देत नसे; अशा प्रकारें कोणाचा कांहींच उपाय चालेनासा झाला. मराठी राज्याच्या या नातवानीच्या प्रसंगीं औरंगजेब बादशाहा बरोबर जंगी फौज घेऊन दक्षिण-हिंदुस्थान पादाक्रांत करण्याकरितां ब्ऱ्हाणपूर येथें येऊन दाखल झाला.

इ० स० १६८१ त औरंगजेबाचा पुत्र अकबर संभाजीस येऊन मिळाल्यामुळें औरंगजेबास मोठी काळजी उत्पन्न झाली होती. रजपूत लोकांबरोबर चाल-लेल्या लढाईपेक्षां ह्या गोष्टीकडे त्याचें विशेष लक्ष्य लागलें होतें. रजपूत लोकांसारख्या शूर व तरवारबहाद्दर लोकांस एकदम आपल्या कह्यांत आणणें फार मुष्किलीचें होतें. त्यामुळें औरंगजेबाचे मनांत तें प्रकरण मिटवावयाचें फार होतें. परंतु आपण होऊन तहाचें बोलणें सुरू करणें म्हणजे त्यांत आपल्या दर्जास कमीपणा येईल असें त्यास वाटलें. पुढें बिकानेरचा राजा औरंगजेबाच्या फौजेंत होता, त्याच्या मध्यस्थीनें उदेपुरच्या राण्यानें तहाचें बोलणें सुरू केलें, व त्या दोघांमध्यें तह झाला, हा भाग मागें आलाच आहे.

पुढें कांहीं दिवसांनीं मोंगल व रजपूत यांच्यामध्यें पुनः लढाई सुरू झाली, व सुमारें एक वर्षभर ती तशीच सुरू होती. परंतु औरंगजेबाचें सारें लक्ष्य अकबराकडे लाग-ल्यामुळें त्यानें दिलावरखान व दुसरे कांहीं सरदार यांस रजपूत लोकांबरोबर लढाई चालविण्यास सांगून आपण जंगी फौजेनिशीं दक्षिणेंत उतरला.

औरंगजेब ब्ऱ्हाणपुरास येऊन पोहोंचल्यावर कांहीं महिनेपर्यंत तो तेथेंच मुलुखाचा बंदोबस्त करीत, व दक्षिण-

हिंदुस्थान जिंकण्याची तयारी करीत स्वस्थ बसला. त्यानें प्रथमतः सुलतान मोअजीम यास संभाजीचा कोंकणपट्टींतील मुलूख घेण्याकरितां पाठवून दिलें, अजीमशाहा याची खानदेशांत रवानगी केली, व आपण स्वतः ब्ऱ्हाणपूर सोडून औरंगाबादेस येऊन दाखल झाला.

सुलतान मोअजीम आंबेदरा घाटानें कोंकणांत उतरला, व कल्याणपासून तों थेट गोव्यापर्यंतचा सर्व मुलूख त्यानें जाळून व लुटून उद्वस्त करून टाकिला. अजीमशाहानें प्रथमतः साल्हेरचा किल्ला घेतला, इतक्यांत औरंगजेबानें त्यास परत बोलाविलें, व शाहाबुद्दीन नांवाच्या सरदारास त्या मोहिमेवर पाठवून दिलें. शाहाबुद्दीन मोठ्या हौलानें मराठ्यांचा मुलूख घेण्याकरितां निघाला, परंतु रामशेजे[१] किल्ल्याजवळ मराठ्यांनीं त्याच्या फौजेचा पुरा मोड करून त्यास परत पिटाळून लाविलें.

कोंकणप्रांत म्हणजे अतिशय खडकाळ व तेथील रस्ते अतिशय अवघड असल्यामुळें मोअजीम गोव्यापर्यंत जातो आहे तों त्याचे बहुतेक उंट व बैल मरून गेले. तो सर्व प्रांताची धूळधाण करीत चालला होता त्यामुळें पुढें त्यास धान्यादि सामग्री मिळेनाशी झाली, त्याचें सैन्य उपाशीं मरूं लागलें, संभाजीनें घाटांतील सर्व वाटा रोखून धरल्यात्यामुळें घाटावरून धान्य येण्याची बंदी झाली, सुरतेहून कांहीं गलबतें धान्य भरून येत होतीं, तींही संभाजीनें धरलीं, व या एकंदर गोष्टींमुळें मोअजीम याची फौज अन्नावांचून मरूं लागली. पुढें औरंगजेबानें शाहाबुद्दीन यास मोअजीम याचे मदतीस पाठवून दिलें, तेव्हां

१ हा किल्ला नाशिक जिल्ह्यांत दिंडोरी तालुक्यांत दिंडोरीचे दक्षिणेस सहा मैलांवर आहे.

तो घाट चढून वर आला, व इ० स० १६८४ त कृष्णेचे कांठीं वाळवें येथें आपली छावणी देऊन राहिला. परंतु त्या ठिकाणीं पटकीचा अज़ार उत्पन्न होऊन त्याचे फार लोक मेले.

पर्जन्यकाळ संपल्यावर औरंगजेब जातीनें मोहिमेचें काम चालविण्याकरितां औरंगाबाद सोडून बाहेर पडला. अजीमशाहास खानदेशांतून परत बोलाविल्यानंतर त्यानें त्याचे हाताखालीं मोठी फौज देऊन त्यास विजापूर घेण्याकरितां पाठवून दिलें. या वेळेचा औरंगजेबाच्या स्वारीचा थाट पूर्वी काश्मीरच्या स्वारीचे वेळीं ज्या थाटाचें वर्णन केलें आहे, त्याच प्रकारचा होता. त्यानें मोअजीम यास विजापुरचे राज्याचे नैर्ऋत्य दिशेस जो संभाजीचा मुलूख होता, तो घेण्याची आज्ञा केली, व खानजहान यास औरंगाबादेच्या संरक्षणाकरितां मागें ठेवून स्वतः अहमदनगरास आला. मोअजीम यानें गोकाक, धारवाड, हुबळी वगैरे शहरें घेतलीं, परंतु तिकडील रोगकारक हवेनें त्याचे अतिशय लोक मेले. त्यामुळें ती मोहीम सोडून तो इ० स० १६८५ त अहमदनगर येथें निघून आला.

मोंगलांची बरीच फौज विजापुरकरांकडे गुंतल्यामुळें पूर्वी मोअजीम यानें कोंकणपट्टीची जी धूळधाण करून टाकिली होती, त्याचा बराच वचपा काढण्यास मराठ्यांस संधि सांपडली. सुलतान अकबर अद्यापि संभाजीजवळ होता, व संभाजी त्यास बादशाहाप्रमाणें मान देत असे; परंतु तो स्वतः व्यसनाधीन झाल्यामुळें त्याच्या हातून कांहींएक झालें नाहीं. तथापि त्याचे सरदार स्वस्थ बसले नव्हते. सेनापति हंबीरराव मोहिते यानें बरीच फौज गोळा केली, व तिच्या निरनिराळ्या टोळ्या करून तो



औरंगजेबाच्या पिछाडीच्या बाजूनें जलद कूच करून ब्ऱ्हाणपुरावर येऊन पडला, व तें शहर त्यानें लुटून जाळून टाकिलें. त्यानें तिकडील सर्व प्रदेश लुटून फस्त केला, व तो जलदीनें कोंकणांत परत आला. औरंगजेबानें खानजहान यास त्याचेवर पाठवून दिलें, परंतु तो येण्याचे पूर्वीच हंबीरराव कोंकणांत परत आला होता. औरंगजेबास दक्षिण-हिंदुस्थान काबीज करण्याची इतकी घाई झाली होती कीं, त्यानें आपल्या पाठीमागें आपल्या स्वतःच्या मुलुखाच्या बंदोबस्तास पुरे इतकी सुद्धां फौज ठेविली नव्हती. औरंगजेबासारख्या दूरदर्शी बादशाहाकडून अशी चूक होणें म्हणजे मोठें आश्चर्य होय.

अजीमशाहा सोलापूर घेऊन विजापुरावर चालला होता. परंतु वाटेंत विजापुरच्या सैन्यानें त्याच्यावर हल्ला करून त्याची पीछेहट केली. तेव्हां औरंगजेब स्वतः सोलापुरास गेला, व अजीमशाहाचे मदतीस ज्यास्त फौज देऊन त्यानें त्यास पुनः विजापुरावर पाठवून दिलें. (इ० स० १६८६ ). परंतु तिकडे दुष्काळ पडल्यामुळें व होतें नव्हतें तें सर्व धान्य विजापूरकरांनीं अगोदरच नाहींसें केल्यामुळें अजीमशाहाचें सैन्य उपाशीं मरूं लागलें. औरंगजेबास ती बातमी समजली, तेव्हां त्यानें आपल्या गाजीउद्दीन[१] नांवाच्या सरदाराबरोबर बरेंच सैन्य व वीस हजार धान्यानें भरलेले बैल देऊन त्यास अजीमशाहाचे मदतीस पाठवून दिलें. विजापुरच्या फौजेनें वाटेंत त्याच्यावर हल्ला केला. परंतु त्या उभय पक्षांच्या भयंकर लढा-

१ ह्यालाच पुढें निजामउल्मुल्क असें नांव मिळालें. तो मोठा शूर व कावेबाज होता. मोंगलांच्या पडत्या काळांत तो फार प्रसिद्धीस आला. हैदराबादच्या निजामाचा हा मूळपुरुष होय.

ईंत विजापुरच्या सैन्याचा पराभव होऊन गाजीउद्दीन अजीमशाहास येऊन मिळाला. वरील युद्धांत अजीमशाहाची पत्नी जानी बेगम[१] ही असून ती आपल्या हत्तीवर बसून लढाईच्या गर्दीत घुसून आपल्या फौजेस उत्तेजन देत होती असें म्हणतात.

गाजीउद्दीन अजीमशाहास येऊन मिळाल्यानंतर पुढें लौकरच औरंगजेबही आपल्या फौजेसह विजापुरास आला. नंतर वेढ्याचें काम मोठ्या नेटानें सुरू झालें. त्यानें जागजागीं मोरचे बांधून तटाला खिंडारें पाडिलीं, तथापि त्यानें शहरावर हल्ला म्हणून केला नाहीं. त्याचे मनांत असें होतें कीं, आंतील लोकांची धान्यसामग्रीच्या तोट्यामुळें उपासमर होऊं लागली, म्हणजे अनायासें तें शहर आपल्या हातीं येईल; त्यामुळें वेढा कायम ठेवून तो स्वस्थ बसला. शेवटीं तोच प्रसंग आला. आंतील शिबंदीची धान्यसामग्री संपल्यामुळें ती पटापट मरूं लागलीं, तेव्हां राजपुत्र शिकंदर यानें ता० १९ आक्टोबर इ० स० १६८६ रोजीं तें शहर औरंगजेबाचे स्वाधीन केलें. तें शहर हातीं येतांच औरंगजेबाचे लोक दीन दीन करीत शहरांत शिरले. त्या वेळीं औरंगजेबाच्या फौजेनें शहरांत मोठा कहर करून दिला, व मोठमोठे वाडे जमीनदोस्त करून टाकिले. औरंगजेब स्वतः शहरांत मोठ्या थाटानें गेला व तेथील राजाच्या दरबारांत जाऊन बसला. त्या वेळीं

१ हिंदुस्थानची पूर्वीची स्थिति पाहूं गेलें तर त्या काळच्या स्त्रियांचे अंगीं हल्लींच्या स्त्रियांप्रमाणें नेभळेपणा व पोषागीपणा नसून बरेंच शूरत्व होतें असें दिसून येतें. अहल्याबाई होळकरीण, व झांशीची शूर राणी लक्ष्मीबाई हीं दोन स्त्रीरत्नें या गोष्टीची फार चांगली साक्ष देत आहेत.

त्यानें शिकंदर यास हांतात रुप्याच्या बेड्या घालून पुढें आणविलें, व त्यास कैद करून दौलताबादच्या किल्ल्या-वर पाठवून दिलें. या वेळीं त्याचें वय १९ वर्षांचें होतें. नंतर औरंगजेबानें तेथच्या कांहीं सरदारांस आपल्या पदरीं नोकऱ्या दिल्या, व तें राज्य बुडवून मोंगलांचे राज्यांत सामील केलें. त्या वेळीं बहुतेक लोक विजापूर सोडून निघून गेले, व तें शहर ओसाड पडलें.

---

१ या शहराच्या तटाच्या भिंती फार उंच असून तोडीच्या दग-डांच्या आहेत, व अजूनपर्यंत त्या सर्व शाबूत आहेत. तटावरील घुमट व मोठमोठ्या सरकारी इमारतींचीं शिखरें आपल्या गत वैभवावर रोदन करीत आहेत कीं काय असें वाटलें. सकृद्दर्शनीं बाहेरून हें शहर मोठें नांदतें असावें असा भास होतो. परंतु आंत जाऊन पाहिलें म्हणजे जिकडे तिकडे सामसूम असून पुष्कळ भाग ओसाड पडलेला आहे असें दिसून येतें. शहराच्या सभोंवारचा तट दुहेरी असून त्याचा घेर नऊ मैलांचा आहे, व त्याच्या बाहेरून खंदक आहे. बालेकिल्यांत मोठमोठ्या भव्य इमारती मोडकळीस आलेल्या आहेत. आंत एक सुंदर व फार मोठी मशीद आहे, व तेथें इब्राहीम आदिलशाहा बादशाहाची कबर आहे. ह्या कबरीचें काम फारच उत्कृष्ट आहे. विजापुरास विशेष पाहण्यासारखी अशी कायती एवढीच जागा आहे. मशिदीचा घुमट जिकडून पहावा तिकडून एकसारखाच दिसतो. ही इमारत अतिशय मोठी असून फार साधी आहे. तिला नक्षीचें काम मुळींच नाहीं. तिच्या आसमंतात् भागचा प्रदेश ओसाड पडलेला आहे, व मध्यें ही भव्य इमारत उभी आहे, त्यामुळें विजा-पुरची पूर्वीची राजलक्ष्मी आपल्या नष्ट वैभवाचा शोक करीत बसली आहे कीं काय असें वाटतें, व तो एकंदर प्रकार पाहिला म्हणजे विजापुरच्या पूर्वीच्या वैभवाची कल्पना मनांत येऊन घटकाभर चित्तवृत्ति उद्विग्न होऊन जाते.

शिकंदर हा चौदा वर्षें औरंगजेबाचे कैदेंत होता. नंतर इ० स० १७०० या वर्षी औरंगजेबानें एका खरबुजांत विष घालून तें शिकंदर याजकडे पाठविलें, व तुझी काय इच्छा आहे म्हणून त्यास विचारिलें. तेव्हां औरंगजेबाचा दुष्ट हेतु त्यास समजला, व त्यानें " माझें शव विजापूर येथें पालेबाजारांत माझा गुरु शहानदी मुल्ला याची कबर आहे, त्याचे पायांपाशीं गाडावें, " असें सांगून तें खरबूज खाऊन टाकिलें. पुढें थोड्याच वेळांत तो हतभाग्य राजपुत्र मरण पावला, व त्यास औरंगजेबानें त्याच्या इच्छेप्रमाणें पालेबाजारांत त्याच्या गुरूच्या कबरीजवळ पुरलें. हल्लीं ही कबर एखाद्या अगदीं साध्या कबरीप्रमाणें दिसत आहे.

विजापुरचें राज्य खालसा केल्यावर औरंगजेबानें गोवळकोंड्यावर आपला मोरचा फिरविला. गोवळकोंड्याचें राज्य विजापुरच्या राज्यापेक्षां ज्यास्त दुर्बळ होतें. इ० स० १६९६ पासून औरंगजेब शनीमहाराजांची साडेसाती त्याच्यामागें लागलीच होती. त्यानें त्याच वेळीं तें राज्य बुडविलें असतें. परंतु कांहीं अपरिहार्य अडचणींमुळें त्याला त्या वेळीं तसें करतां आलें नाहीं. याचा उल्लेख पूर्वभागांत केलेलाच आहे. परंतु त्या वेळीं गोवळकोंड्याचा राजा अबुल हसन यास जो धक्का

---

१ शिकंदर हा औरंगजेबाचे कैदेंत फक्त तीन वर्षें होता; व पुढें त्यास विषप्रयोग करून औरंगजेबानें ठार मारिलें, असें डफसाहेबांचे इतिहासांत लिहिलेलें आहे. परंतु हें त्याचें म्हणणें चुकीचें आहे असें दोन तीन फारशी ग्रंथांवरून जी माहिती मिळालेली आहे तीवरून दिसून येतें.—गाईकवाडकृत विजापूरवर्णन.



बसला, त्यामुळें त्याला पुढें आपली स्थिति सुधारतां आली नाहीं. राज्यकारभारांतून त्याचें लक्ष्य अगदीं उडून गेलें होतें, व तो केवळ नामधारी राजा झाला होता. इ० स० १६६७ पासून तर त्याची स्थिति फारच बिघडली; व तो आपल्या जनानखान्याच्या बाहेरही पडेनासा झाला. त्याची राजधानी हैदराबाद येथें तर निवळ बेबंदशाही व बलबलपुरी माजून गेली होती. राजभीति नाहींशी झाल्यामुळें ' ज्याचे हातीं ससा तो पारधी ' असें होऊन अमीरउमराव वगैरे सत्ताधारी लोक गरीब रयतेवर जुलूम करूं लागले. त्यामुळें त्या लोकांस औरंगजेबासारख्या परकीय शत्रूचें स्वामित्व बरें, परंतु स्वतःच्या राज्याची ही दुःखपर्यवसायी व जुलमी स्वतंत्रता नको, असें होऊन गेलें. इ० स० १६९६ पासून गोवळकोंड्याच्या राजाच्या दरबारीं औरंगजेबाचा वकील होताच. तो तर अबुल हसन याचा अधिकार गुंडाळून ठेवून स्वतः वाटेल तसे हुकूम सोडीत असे, जाण्यायेण्याचे परवाने देत असे, व लोकांस धाकदपटशा देऊन हवें तसें वागवीत असे. सारांश, तेथें तो एखाद्या स्वतंत्र राजाप्रमाणें आपला अंमल चालवीत असे. या सर्व गोष्टींचा विचार केला तर गोवळकोंड्याचें राज्य मोंगलांच्या अमलाखालीं आल्यासारखेंच होतें. परंतु नामधारी कां असेना, परंतु तेथें स्वतंत्र राजा राज्य करीत आहे, ही गोष्ट औरंगजेबास बरी वाटेना. ' तसेंच त्या राजानें आपलीं राज्यसूत्रें दोन हिंदु सरदारांच्या स्वाधीन केलीं आहेत, व ते मुसलमान लोकांस फार त्रास देतात, ' अशी बातमी औरंगजेबाचे कानांवर गेली, तेव्हां तर त्याला फारच चीड आली. त्यानें इ० स० तें राज्य समूळ बुडविण्याचा निश्चय करून

१६८४ त मोअजीम याच्याबरोबर खानजहान बाहादर कोकलताश या नांवाचा सरदार मदतीस देऊन त्याला गोवळकोंड्याचें राज्य घेण्याकरितां पाठवून दिलें. मोअजीम यानें, गोवळकोंडयाची राजधानी हैदराबाद शहर यावर हल्ला करून लगेच गोवळकोंड्याच्या किल्ला घ्यावा, अशी औरंगजेबाची इच्छा होती. परंतु मोअजीम याचे मनांत होतां होईल तोंपर्यंत लढाईचा प्रसंग टाळून युक्तीनें आपला कार्यभाग उरकून घ्यावयाचें होतें. त्याच्या लोकांच्या व गोवळकोंड्याच्या राजाच्या सैन्याच्या चार पांच लहान लहान झटापटी झाल्या, परंतु त्यांत म्हणण्यायारखी गोष्ट घडून आली नाहीं. अशा रीतीनें विशेष हालचाल न करितां सुमारें पांच महिनेपर्यंत तो स्वस्थ वसला होता. परंतु औरंगजेबास त्या गोष्टीचा अतिशय राग येऊन त्यानें मोअजीम यास एक खरमरीत पत्र लिहिलें, व त्यामुळें तो राजपुत्र चिडून जाऊन लढाईस उभा राहिला. त्यानें एके प्रसंगीं गोवळकोंड्याच्या सैन्याचा पराभव करून त्यास पिटाळून लाविलें, व तो आपल्या सैन्यासह हैदराबादेजवळ येऊन दाखल झाला.

त्या वेळीं शहरांत जो गोंधळ माजून गेला तो सांगतां येत नाहीं. पुष्कळ मुसलमान सरदार मोंगलांस जाऊन मिळाल्यामुळें हिंदु लोक, मुसलमान लोकांनीं राज्य बुडविलें, म्हणून त्यांच्या नांवानें खडे फोडूं लागले. त्या प्रसंगीं हैदराबाद शहरावर जो भयंकर प्रसंग गुदरला, त्याचें वर्णनही करणें अशक्य आहे. सर्व शहरभर मारामारी व लुटालूट सुरू झाली, व हजारों लोक आपली मालमत्ता टाकून देऊन केवळ आपले व आपल्या बायकामुलांचे प्राण वांचविण्याकरितां गोंवळकोंड्याचे किल्ल्याकडे धांव घेऊं लागले.

यासंबंधानें काफीखान यानें असें वर्णन केलें आहे कीं, " सूर्योदय होण्यापूर्वी बादशाही सैन्यानें शहरावर हल्ला केला. अबुल हसन व त्याचे सरदार यांचा लाखों रुपायांचा खजिना, उंची कापड, गालीचे, घोडे, हत्ती, यांनीं शहराचा प्रत्येक भाग, रस्ता व बाजार भरून गेलेला होता, व त्याच्या आशेनें पुढें शहरांत भयंकर मारामारी व लुटालूट सुरू झाली. त्या वेळीं हैदराबादच्या किती बायकांस व किती मुलांस मोंगलांनीं कैद करून नेलें, व उच्चनीच कुलांतील किती स्त्रियांची बेअब्रू केली, याचें शब्दांनीं वर्णन करतां येत नाहीं. उंची उंची गालीचे नेण्यास जड होते म्हणून मोंगलांनीं आपल्या तरवारी व जंबिये यांनीं ते फाडून त्यांचे लहान लहान तुकडे केले, व ते ते घेऊन गेले. मोअजीम यानें ती लुटालूट बंद करण्याचा पुष्कळ प्रयत्न केला, परंतु त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं.

पुढें गोंवळकोंड्याच्या राजानें लढाईचा खर्च देण्याचें व वर सांगितलेल्या दोन हिंदु सरदारांस घालवून देण्याचें कबूल केल्यावरून मोअजीम यानें त्याच्याशीं इ० स० १६८५ त तह केला. मोअजीम याचें हें करणें औरंगजेबास आवडलें नाहीं. परंतु त्यानें बाह्यात्कारीं त्या राजपुत्राचा मोठा गौरव करून त्यास एकदम परत बोलाविलें.

औरंगजेब त्या वेळीं विजापुरास वेढा देऊन बसला होता. नंतर मागें सांगितल्याप्रमाणें इ० स० १६८६ त तें राज्य खालसा केल्यावर त्यानें आपली दृष्टि गोंवळकोंड्यावर फिरविली. वास्तविक रीतीनें इ० स० १६८५ त त्या राजाशीं तह झाल्यामुळें गोंवळकोंड्यावर हल्ला करण्यास औरंगजेबास सबळ असें एकही कारण नव्हतें.

परंतु, इसापनीतींतील ‘ लांडगा व करडूं ’ या गोष्टीप्रमाणें, त्याला गोंवळकोंड्याचें राज्य बुडवावयाचेंच होतें; तेव्हां त्याला कारण तरी पाहिजे कशाला? तो एका पवित्र स्थानास भेटण्याचें मिष करून प्रथमतः आपल्या फौजेसह कलबुर्ग्यास आला, व तेथून त्यानें हैदराबाद येथें मोंगलांचा जो वकील होता, त्याला अबुल हसन याजकडे राहिलेली खंडणी वसूल करावी म्हणून हुकूम पाठविला. त्या वेळीं त्या राजानें आपलें सर्व जवाहीर खंडणीदाखल त्या वकिलाकडे पाठवून दिलें. खंडणीचा पैसा हातीं पडतांच औरंगजेब आपल्या फौजेसह एकदम गोंवळकोंडयावर चाल करून येऊं लागला. आपण खंडणीचा पैसा भरला असतांही औरंगजेब आपणावर चाल करून येत आहे, ही बातमी ऐकून अबुल हसन यास पराकाष्ठेचा राग आला. त्यानें औरंगजेबाच्या वकिलास कैद केलें, व त्याजपाशीं तो आपलें जवाहीर परत मागूं लागला. परंतु त्याचा परिणाम पुढें काय होईल ही गोष्ट त्या वकिलानें अबुल हसन यास नीट समजावून सांगितल्यामुळें पुढें त्यानें त्यास सोडून दिलें. औरंगजेबानें पुढें चाल करून येऊं नये, म्हणून त्या राजानें औरंगजेबास पुष्कळ वेळां विनयपूर्वक विनंती केली; परंतु त्या दुराग्रही बादशाहानें तिकडे मुळींच लक्ष्य दिलें नाहीं, व तो तसाच पुढें चाल करून येऊं लागला. त्यानें लोकांत असें जाहीर केलें कीं, “ ह्या दुष्ट मनुष्याचीं ( अबुल हसन याचीं ) नीच कृत्यें लेखणींतून सुद्धां बाहेर काढतां येणार नाहींत. तेव्हां बहुतांत थोडें, व शंभरांत एक या रीतीनें त्याचें एकच कृत्य सांगितलें, म्हणजे त्याच्या बाकीच्या कृत्यांची बरीच कल्पना करतां येईल. त्यानें आपल्या राज्याचीं सूत्रें नीच व जुलमी अशा हिंदु लोकांच्या

हातांत दिलीं आहेत, त्यानें अल्लाच्या भक्तांवर मोठा जुलूम चालविला आहे, व रात्रंदिवस पूर्ण सुराभक्त होऊन तो अतिशय विषयांध झाला आहे. हिंदु व मुसलमान, अन्याय व न्याय, पाप व पुण्य यांच्यामध्यें त्याला फरकच दिसत नाहीं. त्यानें हिंदु लोकांच्या वतीनें लढाई चालविली आहे, आणि ' मुसलमानांचे जे शत्रु असतील त्यांस साह्य करूं नका ' अशी परमेश्वराची आज्ञा असतां त्यानें तिचें उल्लंघन करून परमेश्वर व मनुष्य या दोघांच्याही दृष्टीनें त्यानें आपल्या पवित्र कुराणाची निंदा केली आहे. त्याचे कान उघडण्याकरितां चांगल्या शहाण्या लोकांबरोबर मीं पुष्कळ पत्रें पाठवून दिलीं, परंतु तो तिकडे लक्ष्यच देत नाहीं. थोडयाच दिवसांपूर्वी त्यानें दुष्ट संभाजीकडे एक लाख पॅगोडा[1] नांवाचीं नाणीं पाठवून दिलीं. त्याचा उद्दामपणा, गैरशिस्तपणा, व दुष्टपणा यांच्याबद्दल त्यास मुळींच लाज वाटत नाहीं, व त्यामुळें त्याला इहलोकीं व परलोकीं क्षमेची मुळींच आशा उरली नाहीं. ''

औरंगजेब आपली विनंती मान्य करीत नाहीं असें पाहून गोंवळकोंडयाचा राजा समरांगणांत दोन हात करून एखाद्या वीराप्रमाणें मरण्यास तयार झाला. त्यानें आपला आळस टाकून दिला, व आपल्या सैन्यास लढाईस सिद्ध होण्यास हुकूम दिला. इ० स० १६८७ च्या जानेवारी महिन्यांत औरंगजेब गोंवळकोंडयाच्या किल्ल्याजवळ तोफेच्या गोळ्याच्या टप्प्यांत येऊन पोहोंचला, व त्याचा सेनापति गाजीउद्दीन फिरोजजंग हा दर दिवस एक एक

---

१ पागोडा या नाण्याची एक ठरीव किंमत नसून ती निरनिराळ्या प्रांतांत निरनिराळी ह्मणजे साडेतीन रुपयांपासून एक रुपयापर्यंत असे.

पाऊल पुढें पुढें चेपीत चालला. अबुल हसन याचे सुमारें चाळीस पन्नास हजार स्वार किल्ल्याचे बाहेर होते, ते औरंगजेबाच्या फौजेस बराच त्रास देऊं लागले. किल्ल्यांतील शिबंदीही आंतून तोफा व बाण सोडून त्याच्या फौजेस हैराण करूं लागली. ते लोक मोठ्या शूरपणानें आपला बचाव करीत होते. किल्ल्यांत दारूगोळ्याचा व धान्यसामग्रीचा चांगला पुरवठा होता, व आंतील शिबंदीनें रात्रंदिवस औरंगजेबाच्या सैन्यावर प्रत्येक बुरूज, तट व दरवाजा यांजवरून तोफांचा एकसारखा भडिमार चालविल्यामुळें प्रत्येक दिवशीं औरंगजेबाचें नुकसान होत होतें. किल्ल्याचा खंदक भरून काढावा म्हणून औरंगजेबानें माती भरून पुष्कळ पोतीं खंदकांत लोटून दिलीं. त्या पोत्यांपैकीं पहिलें पोतें औरंगजेबानें आपल्या हातानें शिवलें होतें. त्यानें मातीचे धक्के बांधून त्यांवर आपल्या मोठमोठ्या तोफा चढविल्या, व एके दिवशीं त्या तोफांचे माऱ्यांत त्याचे कांहीं लोक किल्ल्याचे तटास शिड्या लावून वर चढले. इतक्यांत त्या तटावरील एक कुत्रा मोठ्यानें भुंकूं लागला. त्याबरोबर आंतील शिबंदी सावध होऊन एकदम त्या ठिकाणीं आली, व त्या लोकांनीं जे मोंगलांचे लोक वर चढून आले होते, त्यांस कापून काढिलें, व तटास लाविलेल्या शिड्या पाडून टाकल्या. त्यांनीं त्या दिवशीं त्या कुत्र्याचे शहाणपणाबद्दल त्याचे गळ्यांत सोन्याचा पट्टा घातला.

अशा रीतीनें औरंगजेबाच्या फौजेची कच्ची होत होती, अशा समयीं त्या प्रांतांत दुष्काळ आपलें भयंकर रूप प्रगट करूं लागला होता, व त्यामुळें तिचे फारच हाल झाले. गोवळकोंडयाच्या राजाचे मित्र, व संभाजीचे मराठे

लोक यांनीं तो प्रांत अगदीं उजाड करून टाकला होता, व त्यामुळें औरंगजेबाच्या फौजेंत तांदूळ, इतर धान्य व गवतकाडी यांचा मोठा तोटा पडला. तशांत ते उन्हाळ्याचे दिवस, व त्याच संधीस पटकीनेंही आपलें बिऱ्हाड तेथें आणून ठेविलें. मग काय विचारतां ? औरंगजेबाच्या फौजेचे हाल कुत्राही खाईनासा झाला. शेंकडों शिपाई क्षुधा व इतर संकटें यांनीं गांजून जाऊन औरंगजेबास सोडून शत्रूस जाऊन मिळाले. बरें, पुढें पाऊस पडला तो तीन दिवसपर्यंत अशा जोरानें पडला कीं, त्याच्यायोगानें औरंगजेबानें आपल्या फौजेच्या रक्षणाकरितां जे मोरचे उभारले होते ते पडून गेले. ती संधि साधून वेढा घातलेले लोक किल्ल्यांतून एकदम बाहेर पडले. त्यांनीं मोंगलांवर हल्ला करून शेंकडों जणांस ठार मारिलें, व ते शेंकडों लोकांस कैद करून घेऊन गेले. अशा नामोहरमीच्या प्रसंगीं औरंगजेब तह करण्यास कबूल होईल असें वाटलें होतें. गोवळकोंडयाच्या राजानें कैदी करून नेलेल्या मोंगल लोकांस आपला खजिना व धान्यानें भरलेलीं कोठारें दाखविलीं. त्यानें औरंगजेबापाशीं, वेढा उठविल्यास लढाईचा सर्व खर्च देण्याचें व त्याच्या फौजेस धान्यसामग्री पुरविण्याचें, बोलणें लाविलें. परंतु तो हट्टी व दुराग्रही वृद्ध बादशाहा त्या तहास कबूल झाला नाहीं. त्यानें उत्तरादाखल असा जबाब दिला कीं, " अबुल हसन आपले हात बांधून माझ्या पुढें आला पाहिजे, नाहीं तर मी त्याला बद्ध करून आपणापुढें घेऊन येईन; आणि नंतर त्याच्यावर दया करावयाची किंवा नाहीं याचा विचार करीन, " व त्याच वेळीं त्यानें खंदक भरून काढण्याकरितां वऱ्हाडांतून पन्नास हजार पोतीं मागविलीं.

नंतर त्यानें किल्ल्याचे तटाखालीं मोठमोठे सुरुंग खोदण्याचें काम चालविलें, व जून महिन्यांत तें पुरें केलें. परंतु किल्ल्यांतील शिबंदीस त्या गोष्टीचा सुगावा लागून त्यांनीं त्याच बेतानें आंतून जमीन खोदून काढली, आणि एका सुरुंगांतील दारू काढून टाकिली, व बाकीच्यांत पाणी ओतून ठेविलें. प्रथमतः ज्या ठिकाणीं सुरुंग उडून तट कोसळून पडेल असें मोंगलांस वाटलें होतें, त्या ठिकाणीं आंतील शिबंदीनें सुरुंग उडण्याचे अगोदर यावें, व नंतर सुरुंगांस आग घालावी व त्यांचा फडशा पाडावा, अशा उद्देशानें मोंगलांनीं त्या भागावर हल्ला करण्याचा आव घातला, व आंतील शिबंदी तटावर जमली असें पाहून त्यांनीं सुरुंगांस आग घातली. परंतु आंतील लोक वर सांगितल्याप्रमाणें अगोदरच सावध असल्यामुळें मोंगलांची ती युक्ति फसली. तट उडाल्याबरोबर किल्ल्यांत शिरण्याकरितां मोंगलांची फौज तयारीनें उभी होती. इतक्यांत एक सुरुंग भलत्याच ठिकाणीं फुटून त्या फौजेच्या जवळच जो तटाचा भाग होता तो कोसळला. तेव्हां त्याच्या योगानें आंतील लोकांचें काडीभरही नुकसान न होतां मोंगलांचे मात्र शेंकडों लोक दगड व माती यांच्याखालीं दडपून मेले.

मोंगलांचा अशा रीतीनें गोंधळ झालेला पाहून किल्ल्यांतील लोक बाहेर आले, व खंदकांत जे मोंगलांचे लोक त्यांचे हातीं लागले त्यांची त्यांनीं कत्तल केली. त्या वेळीं औरंगजेबाच्या सैन्यांत दुःखाच्या आरोळ्या ऐकूं येऊं लागल्या. जसजसें मोंगलांचें धैर्य खचूं लागलें तसतसा किल्ल्यांतून तोफांचा भडिमार ज्यास्त जोरानें होऊं लागला. अशा रीतीनें आपली फजिती झाली असें पाहून औरंगजेब अतिशय चिडून गेला, व बरोबर फौज घेऊन हल्ला

करण्याकरितां स्वतः पुढें सरसावला. **काफीखान** या हल्ल्याचें असें वर्णन करितो कीं, " या वेळीं हल्ला करणारे लोकांनीं आपल्या शौर्याची कमाल करून सोडली. परंतु त्या आणीबाणीच्या प्रसंगीं इतक्या जोरानें वारा सुटला व पाऊस पडूं लागला कीं, **मोंगलांस** पुढें चाल करतां येईना, व पावसामुळें चिंब भिजून जाऊन त्यांस परत फिरणें भाग पडलें. या वेळीं पुनः किल्ल्यांतील शिबंदीनें त्यांच्यावर हल्ला केला, त्यांचे मोरचे आपल्या ताब्यांत घेतले, मोठमोठ्या तोफांचे कान्यांतून खिळे ठोकिले, व नेण्यासारख्या वस्तु होत्या त्या सर्व ते घेऊन गेले. त्यांनीं खंदकांत टाकलेले लांकडांचे ओंडे व हजारों मातीचीं पोतीं बाहेर काढिलीं, व त्याच सामानानें सुरुंग उडविल्यामुळें तटाला जीं लहान लहान खिंडारें पडलीं होतीं, तीं बुजवून टाकिलीं."

अशा रीतीनें आपल्या शौर्याचा व सैन्याचा कांहीं उपयोग होत नाहीं असें पाहून **अबुल हसन** याच्या लोकांत फितुरी करून आपला कार्यभाग साधण्याचा **औरंगजेबानें** प्रयत्न चालविला, व त्या कामांत त्यास यश आलें. ज्या ठिकाणीं सुरुंग व हल्ले यांचा काडीभरही उपयोग झाला नाहीं, त्या ठिकाणीं पैसा व पुढील लाभाचीं मोठमोठीं वचनें उपयोगीं पडलीं. **अबुल हसन** याचे बहुतेक सरदार अगोदरच **औरंगजेबास** फितूर झाले होते. फक्त **अबदुर रज्जक** व **अबदुल्लाखान** येवढे दोन सरदार स्वामीभक्तीस पराङ्मुख न होतां आपल्या राजाचा पक्ष धरून होते. **औरंगजेबानें** त्या दोघांस मोठमोठीं वचनें देऊन फितूर करण्याचा प्रयत्न चालविला. **अबदर रज्जक** याच्याविषयीं **काफीखान** असें म्हणतो कीं, " या अनुपकारी

इमानी मनुष्यानें "–(राजद्रोह करून औरंगजेबास वश झाला नाहीं म्हणून अनपकारी कीं काय कोण जाणें.)– "आपल्या बऱ्याची व जीविताची पर्वा न धरतां, आपल्या बुरुजावरील लोकांस औरंगजेबानें पाठविलेलें पत्र दाखविलें, व त्यांच्यासमोर त्यानें त्याचे तुकडे तुकडे करून टाकिले; आणि ज्या गुप्त हेरानें तें पत्र त्याच्याकडे आणिलें होतें, त्याच्याजवळ औरंगजेबास असें उत्तर सांगून पाठविलें कीं, "करबाळा येथें पुण्यशील हुसेनाकरितां त्याचे अनुयायी ज्याप्रमाणें जिवावर उदार होऊन लढले, त्याप्रमाणें मी मरून पडेपर्यंत तुमच्याशीं लढाई करीन." परंतु अबदल्लाखान औरंगजेबास फितूर झाला. किल्ल्याचा मागचा किंवा चोर दरवाजा त्याचे ताब्यांत होता, व त्यांतून त्यानें मोंगलांस आंत येऊं दिलें. त्या वेळीं मोंगलांच्या झुंडींच्या झुंडी किल्ल्यांत शिरल्या, व ते लोक आनंदानें मोठ्यानें आरोळ्या मारूं लागले. अबदल्लाखान यानें आपला अशा रीतीनें घात केला असें पाहून अबदर रज्जक बाहेर पडला, व एका उपलाण्या घोड्यावर एकदम उडी मारून ज्या दरवाज्यांतून शत्रूचे लोक आंत घुसत होते तेथें गेला. त्या वेळीं त्याच्या जिवाचे असे बारा असामी त्याच्यावरोबर होते. "आज अबुल हसन याच्याकरितां हा प्राण खर्ची घालतों," असें मोठ्यानें ओरडून त्यानें शत्रु सैन्यांत उडी घातली. वार लागल्यामुळें त्याचें सर्वांग रक्तबंबाळ होऊन गेलें होतें, व आपल्या घोड्यावर तो अगदीं रेलला होता. तथापि तो मोठ्या नेटानें वाट काढीत त्या दरवाज्याच्या बाहेर पडला. दुसरे दिवशीं एका ताडाचे वृक्षाखालीं मूर्च्छित पडलेला असा तो लोकांचे दृष्टीस पडला. त्याला एकंदर वीस वार लागले होते.



अबुल हसन यानें मोंगल लोक किल्ल्यांत शिरले असें पाहिलें तेव्हां 'आज आपली मुदत संपली' असें त्यास वाटलें. प्रथमतः तो आपल्या जनानखान्यांत गेला, व त्यानें आपल्या बायकांचें सांत्वन केलें; आणि केलेल्या अपराधांची क्षमा मागून व त्यांस शेवटचा रामराम ठोकून तो बाहेर पडला, व आपल्या दरबारांत जाऊन त्या ठिकाणीं शांत मनानें आपल्या आगंतुक पाहुण्यांची वाट पहात बसला. जेव्हां औरंगजेबाचे सरदार तेथें आले, तेव्हां आपल्या अधिकारास साजेल अशा रीतीनें त्यानें त्यांस मुजरा केला, व त्यांच्याजवळ उत्कृष्ट फारशी भाषेंत बरेंच संभाषण केलें. नंतर घोड्यावर बसून तो अजीमशाहा याजकडे गेला, व तो त्यास औरंगजेबाकडे घेऊन गेला. नंतर औरंगजेबानें त्यास कैदी करून दौलताबादच्या किल्ल्यावर पाठवून दिलें. विजापुरच्या राजास त्यानें अगोदरच तेथें आणून ठेविलें होतें. अशा रीतीनें दक्षिणेंतील आदिलशाही व कुतुबशाही या दोन राजघराण्याचें नांव त्यापुढें इतिहासांतून नष्ट झालें. (इ० स० १६८७).

गोवळकोंड्याच्या वेढ्यांतील खरा नायक अबदर रज्जक हा होय. औरंगजेब त्याचे संबंधानें असें ह्मणाला कीं, "अबदर रज्जक याचेप्रमाणें स्वराजनिष्ठ असा आणखी एक वीर अबुल हसन याचे पदरीं असता तर किल्ला हातीं येण्यास बराच अवधि लागला असता." त्यानें अबदर रज्जक याच्या सुश्रुषेकरितां एक युरोपियन व एक हिंदु असे दोन हकीम पाठवून दिले. पुढें सोळाव्या दिवशीं त्यानें आपले डोळे उघडले तेव्हां औरंगजेबास मोठा आनंद झाला. औरंगजेबानें त्याच्या मुलांस मोठमोठ्या देणग्या देऊन त्यांना मोठ्या योग्यतेस चढविलें. परंतु

अबदर रज्जक शेवटपर्यंत त्यास वश झाला नाहीं. तो अजारी पडून अंथरुणास खिळला असतांही असें ह्मणाला कीं, "ज्यानें अबुल हसन याचें निमक ( मीठ ) खाल्लें आहे, तो औरंगजेबाची नोकरी कधींही करणार नाहीं." शाबास त्या वीराची! औरंगजेबाच्या एवढ्या मोठ्या अवाढव्य फौजेंत अशा प्रकारचीं नररत्नें कितीशीं मिळालीं असतीं बरें!! परंतु काळ विपरीत आला ह्मणजे अबदर रज्जक याच्यासारख्या निमकहलाल शूर वीरांची निस्सीम राजभक्ति व्यर्थ जाऊन अबदल्लाखानासारखे निमकहराम, राजद्रोही कुलांगार पैदा होतात, आणि 'कुऱ्हाडीचा दांडा गोतास काळ' या म्हणीप्रमाणें आपल्या देशाच्या, आपल्या राजाच्या व आपल्या लोकांच्या नाशास कारणीभूत होतात. आतां ही स्वार्थपर व घरबुडवी मंडळी अशा निंद्य कृतीनें आपलें व आपल्या पश्चात् आपल्या पुत्रपौत्रांचें जन्माचें कल्याण करून ठेवितात ही गोष्ट खरी आहे. परंतु जेथें जेथें म्हणून अशा मंडळीस समाजांत जाण्याचा प्रसंग येतो, तेथें तेथें लोक त्यांचा तिरस्कार करितात. प्रत्येक देशाच्या, व त्यांत विशेषतः हिंदुस्थानच्या इतिहासांत वर सांगितलेल्या प्रकारचीं उदाहरणें बरींच आढळून येतात, ही मोठी दुःखाची गोष्ट आहे.

औरंगजेब विजापूर व गोवळकोंडें हीं शहरें घेण्याचे कामांत गुंतला असतां त्यानें गाजीउद्दीन, कासमखान वगैरे आपले सरदार त्या राजांच्या मुलुखांत पाठवून दिले, व त्यांनीं आंदोणी किल्ला, सगरचा किल्ला, कृष्णेच्या दक्षिणेकडील सर्व प्रांत, गोवळकोंड्याच्या पूर्वेकडचा प्रांत, राजमहेंद्री, मच्छलीपट्टण, गंजम वगैरे शहरें घेतलीं, व अशा रीतीनें दोन्ही राज्यांचा बहुतेक सर्व मुलूख काबीज केला.

तसेंच कडपा, कांजेवरम वगैरे ठिकाणचे सरदार लोकही त्यास भडाभड येऊन मिळाले.

औरंगजेब सर्वकाळ संशयानें भरलेला असे. त्यानें गोवळकोंड्यास वेढा घातला त्या वेळीं त्याचा पुत्र मोअजीम हा त्याचेबरोबर होता. पुढें गोवळकोंड्याच्या राजानें, मोअजीम यानें आपणाविषयीं औरंगजेबापाशीं कांहीं रदबदली करावी म्हणून त्यास पत्र पाठविलें, व त्यासंबंधानें त्या दोघांत कांहीं पत्रव्यवहार झाला. तो प्रकार औरंगजेबास समजला, तेव्हां पूर्वीपासून त्याला मोअजीम याचा जो संशय आला होता तो दृढतर झाला. त्या वेळीं, आपणास कैद करून दिल्लीची गादी बळकाविण्याचा मोअजीम याचा विचार आहे, असा बादशाहाचा समज होऊन त्यानें त्यास कैद केलें. तो सात वर्षेंपर्यंत कैदेंत होता. वर सांगितलेल्या प्रकारची भीति औरंगजेबाचे मनांत उत्पन्न व्हावी अशा प्रकारचें कोणतेंही कृत्य मोअजीम याचे हातून झालें नव्हतें. सर्व लोक त्याच्या अल्प संतोषाबद्दल व सावधगिरीबद्दल त्याचे गुण गात असत. बरनीर साहेब तर त्याच्याविषयीं कोलबर्ट साहेबास लिहिलेल्या पत्रांत असें म्हणतात कीं, " त्याच्यापेक्षां अधिक नम्र, व राज्यप्राप्तीविषयीं अधिक निरीच्छ असा एखादा गुलामही सांपडणार नाहीं. " परंतु औरंगजेबाचें अंतःकरण नेहमीं संशयानें भरलेलें असल्यामुळें त्याचे मनांत सुविचार कोठून येणार !

विजापूर व गोवळकोंडें हातीं आल्यामुळें आपण कृतकृत्य झालों असें औरंगजेबास वाटूं लागलें. तीं राज्यें बुडविण्यास त्याला कोणतेंही सबळ कारण नव्हतें; इतकेंच नव्हे, तर त्यानें तसें करण्यांत मोठा अविचार केला, व

त्याचीं फळें पुढें त्यास लौकरच भोगावीं लागलीं. तीं राज्यें एकतर मुसलमानी असून स्वतंत्र होतीं, त्यामुळें मराठे लोकांवर त्यांचा बराच दाब होता, व त्यामुळें त्यांनाही विशेष पुंडाई करितां येत नव्हती; व दुसरी गोष्ट बरेच मराठे लोक त्या दोन राज्यांत नोकऱ्या करीत होते, त्यामुळें त्यांनाही ते वचकून होते. औरंगजेबानें तीं राज्यें खालसा केल्यावर त्यांतील पठाण वगैरे मुसलमान लोक आपल्या पदरीं ठेविले, परंतु तो हिंदूंचा पूर्ण द्वेष्टा असल्यामुळें त्यानें मराठे लोकांस हाकून दिलें. त्यामुळें त्यांना संभाजीच्या पदरीं नोकरी धरणें किंवा लहान लहान टोळ्या करून स्वतंत्रपणें मुलूख लुटणें याशिवाय दुसरा मार्गच उरला नव्हता. सारांश वरील दोन राज्यें मोडल्याकारणानें आपला भरभराट होत चालला आहे, असें त्या वेळीं कदाचित् औरंगजेबास वाटलें असेल. परंतु वस्तुतः त्याच्या राज्यास जी उतरती कळा लागली होती तिच्यावर वरील अविचाराच्या कृत्यामुळें शिक्कामोर्तबच झालें, असें म्हटलें तरी चालल.

औरंगजेब वरील राज्यें घेण्याचे कामांत गुंतला असतां संभाजीस आपली स्थिति बरीच सुधारतां आली असती. परंतु एका अंगास कलुशासारखा दुष्ट राहू व दुसऱ्या बाजूस मद्यपानादि दुर्गुण हे आणखीं अनिष्ट ग्रह यांनीं त्याला ग्रासून टाकिलें असल्यामुळें त्याचे शौर्यादि नैसर्गिक गुण लोपून गेले होते; इतकेंच नाहीं, तर त्यामुळें शिवाजीचा कीर्तिसूर्यही निस्तेज झाला होता.

इ० स० १६८८ पर्यंत शाहाजादा अकबर संभाजीचे आश्रयास होता. परंतु दिवसेंदिवस संभाजीची स्थिति अधिकच बिघडत चालली आहे, व आपणास साह्य

करण्याची त्याचे अंगीं तादृश् शक्ति राहिली नाहीं, असें वाटून तो संभाजीस सोडून निघाला, व गलबतांत बसून मक्केस गेला. तेथून पुढें तो इराणांत गेला, व इराणच्या शाहानें त्यास खुरासान येथें ठेविलें. तेथें तो इ० स० १७०६ त मरण पावला.

औरंगजेबानें प्रथमतः शिरजीखान नांवाच्या सरदारास संभाजीवर पाठवून दिलें. त्याची व हंबीरराव याची वाइजवळ गांठ पडून मोठी निकराची लढाई झाली. या लढाईंत हंबीररावानें शिरजीखानाचा पूर्ण पराभव केला, परंतु तो स्वतः प्राणास मुकला. मराठी राज्याचा तो शेवटचा आधारस्तंभ गळून पडतांच सर्व इमारत खालीं बसली. मराठ्यांमध्यें दुसरे शूर सरदार नव्हते असें नाहीं, परंतु संभाजीच्या मूर्खपणाच्या वर्तनामुळें ते स्वस्थ बसले होते.

औरंगजेब सुमारें एक वर्षभर विजापूर येथें छावणी देऊन होता. नंतर इ० स० १६८९ त संभाजीस जिंकण्याकरितां तो बाहेर पडला, व थोडक्याच वेळांत कांहीं थोडे किल्ले शिवाय करून बाकीचा सर्व मुलूख त्यानें जिंकून घेतला. परंतु वाटेनें रोगराई उत्पन्न झाल्यामुळें तो कांहीं दिवस अकूज येथें छावणी देऊन राहिला.

याच वेळेच्या सुमारास त्याचा व मुंबईच्या इंग्लिश लोकांचा बेबनाव झाला. त्यानें इंग्लिशांच्या सर्व वखारी जप्त केल्या, व जंजिऱ्याचा शिद्दी याकूतखान यास मुंबईतून इंग्लिश लोकांस घालवून द्यावें अशी आज्ञा केली. याकूतखानानें मुंबईवर स्वारी करून माजगांव, शींवचा किल्ला, व माहीम हीं तीन ठिकाणें घेतलीं, व मुंबईच्या किल्ल्यास वेढा दिला. परंतु नऊ महिनेपर्यंत तो किल्ला

त्याचे हातीं आला नाहीं. पुढें इंग्लिशांचा व औरंगजेबाचा तह होऊन तें प्रकरण मिटलें.

औरंगजेब अकूज येथें असतां त्यानें आपल्या असदखान नांवाच्या सरदारास कोंकणप्रांत घेण्याकरितां पाठवून दिलें, व त्याचा पुत्र तकरीबखान यास कोल्हापुराकडील संभाजीचा मुलूख काबीज करण्याची आज्ञा केली. संभाजीच्या राज्यास मोंगलांनीं अशा रीतीनें चोहोंकडून घेरा घातला होता तरी त्याला त्याचें कांहींच वाटलें नाहीं, व तो कोंकणांत संगमेश्वर येथें कलुशासह स्वस्थपणें चैन करीत पडला होता. ती बातमी तकरीबखान यास समजली, तेव्हां कांहीं स्वार बरोबर घेऊन तो गुप्त रीतीनें संगमेश्वर येथें आला. पुढें तें वर्तमान संभाजीच्या नोकरांनीं संभाजीस सांगितलें, तेव्हां तो दारूनें इतका गुंग होऊन गेला होता कीं, तो त्या नोकरांवरच अतिशय रागावला, व त्यांस म्हणाला " मुसलमान येथें कसे येतील? पुनः अशी गोष्ट माझ्याशीं बोलाल तर तुमचीं नाकेंच चिरून टाकीन. " इतक्यांत तकरीबखान तेथें आला, व त्यानें संभाजीवर छापा घालून त्याचे बहुतेक लोक ठार मारिले. कलुशाचे लोक तकरीबखानाशीं लढूं लागले, परंतु कलुशास एक बाण लागून तो खालीं पडला, त्यामुळें त्याचे लोक पळून गेले. संभाजी सावध होऊन वेश पालटून पळून जात असतां त्याच्या अंगावरील उंची दागदागिने पाहून मोंगलांस हाच संभाजी असा संशय येऊन त्यानीं त्यास कैद केलें, व त्याच्याबरोबर कलुशा व आणखी २४ असामी यांसही कैद केलें. नंतर तकरीबखान त्या सर्वांस घेऊन कोल्हापुरास आला. औरंगजेबाची छावणी त्या वेळीं तुळापूर येथें होती. तकरीबखानानें संभा-

जी व कलुशा यांच्या मुसक्या बांधून त्यांस उंटावर घातलें व मोठ्या थाटानें वाजतगाजत तो त्यांस तुळापुरास घेऊन आला. त्या वेळीं संभाजीस ठार मारूं नये अशी औरंगजेबाच्या उमरावांनीं त्याची विनंती केली. औरंगजेब त्या गोष्टीस कबूल झाला. परंतु " तूं मुसलमान होशील तर तुला जीवदान देतों " असें औरंगजेबानें त्यास सांगितलें. संभाजी कसा झाला तरी शूर शिवाजी महाराजांचा बच्चा होता. वरील शब्द ऐकून त्याच्या अंगाची नखशिखांत आग होऊन गेली. त्याला आपल्या कृत्याचा पस्तावा झाला, परंतु उपयोग काय ? मुसलमान होऊन औरंगजेबाच्या कैदेंत राहून एखाद्या हीनाप्रमाणें कालक्रमणा करावी, त्यापेक्षां मरण बरें, असें त्यास वाटूं लागलें. बादशाहाच्या तोंडचे वरील शब्द कानीं पडतांच त्यानें त्यास असा रोकडा जबाब दिला कीं, " जहा पन्हा, तकसीर माफ. आपनी बेटी पादशाहजादी इनायत होय तो मै कबूल. " तसेंच त्या वेळीं त्यानें कुराणाची व पैगंबराचीही अतिशय निंदा केली. त्यामुळें औरंगजेब रागानें इतका बेफाम होऊन गेला कीं, त्यानें संभाजीस हालहाल करून ठार मारावें असा तत्काल हुकूम सोडिला. नंतर तुळापूर येथें भरबाजारांत प्रथमतः तापवून लाल केलेल्या खिळयांनीं त्याचे डोळे फोडले, ज्या जिव्हेनें त्यानें पैगंबराची निंदा केली होती ती कापून टाकिली, व शेवटीं त्याचा शिरच्छेद केला. कलुशाचाही त्यानें त्याच वेळीं शिरच्छेद केला. ( इ० स० १६८९ ). संभाजी शूर होता, परंतु तो दुर्व्यसनी झाल्यामुळें व कलुशासारख्या हलकट मनुष्याचे नादीं लागल्यामुळें मराठी राज्याचें अतिशय नुकसान झालें. तो आणखी

कांहीं वर्षे वांचता तर त्याचे हातून एखादें चांगलेंसें कृत्य न होतां दुसरीं निंदास्पद अशीं बरींच कृत्यें घडलीं असतीं.

औरंगजेबानें संभाजीस ठार मारिलें त्या वेळीं त्याची स्त्री येसूबाई, त्याचा पुत्र शिवाजी, व त्याचा कनिष्ठ बंधु राजाराम हीं सर्व माणसें रायगडास होतीं. शिवाजीनें महत्प्रयासानें स्थापिलेलें मराठी राज्य आतां खात्रीनें लयास जाणार, असें बहुतेकांस वाटूं लागलें. परंतु शिवाजीचे कांहीं जुने सरदार अद्याप शिल्लक होते, ते संभाजी वारल्यावर रायगड येथें आले, व येसूबाईच्या सल्ल्यानें त्यांनीं असें ठरविलें कीं, लहान शिवाजी यास गादीवर बसवावें व त्याचा सर्व कारभार राजाराम यानें पहावा. वरील मंडळींत प्रल्हाद निराजी, जनार्दनपंत हणमंते, रामचंद्रपंत बहुतकर, महादजी नाईक पानसंबळ, संताजी घोरपडे, धनाजी जाधव वगैरे मंडळी प्रमुख होती.

या सर्व मंडळींत प्रल्हाद निराजी फार हुशार असल्यामुळें सर्व कारभार तोच पाहूं लागला. त्यानें प्रथमतः जे किल्ले मोंगलांचे हातीं पडले नव्हते त्यांवर ज्यास्त शिबंदी ठेवून त्यांचा नीट बंदोबस्त केला, व शिवाजीनें घालून दिलेल्या नियमांप्रमाणें सर्व व्यवस्था सुरू केली. तसेंच मोंगलांस राजारामाचा पत्ता लागूं नये म्हणून त्यानें एकाच ठिकाणीं न राहतां रायगड व विशाळगड यांचे दरम्यान् आलटून पालटून रहावें असें ठरविलें. नंतर राजारामानें आपलीं बायकामाणसें विशाळगड येथें नेऊन ठेविलीं, व संभाजीची पत्नी येसूबाई आपल्या पुत्रासह रायगड येथें राहिली.

पुढें ती बातमी तकरीबखान यास समजली तेव्हां त्यानें इ० स० १६९० त रायगडास वेढा दिला, व जंजिऱ्याचा

हबशी येऊन त्यानें बाहेरून किल्ल्यास मोरचे लाविले. किल्ला घेण्याविषयीं मोंगलांनीं आपली शिकस्त केली, परंतु दहा महिने तो त्यांचे हातीं लागला नाहीं. पुढें धान्याचा तोटा पडल्यामुळें किल्ल्यांतील लोक उपाशीं मरूं लागले; व राजारामाकडूनही मदत येत नाहींशी झाला; त्यामुळें पुढें काय करावें तें येसूबाईस सुचेना. पुढें तकरीबखानानें येसूबाईस असा निरोप पाठविला कीं, "आपण सुध्या मार्गानें किल्ला खालीं करून दिला, तर त्यांत आपलें फार कल्याण आहे. आपले पुत्राचे जिवास कोणतेही रीतीनें धक्का लागणार नाहीं, व बेगम साहेब ( औरंगजेब बादशाहाची कन्या ) यांचेही माझ्याप्रमाणेंच मत आहे." येसूबाईनें त्या गोष्टीचा नीट विचार करून व प्रसंगास पाठ देऊन तो किल्ला तकरीखानाचे स्वाधीन केला. ग्रांटडफ, एल्फिन्स्टन वगैरे ग्रंथकार असें लिहितात कीं, सूर्याजी पिसाळ नांवाचा एक शिवाजीच्या वेळचा जुना मराठा मोंगलांस वश झाला, व त्यानें एका चोरवाटेनें मोंगलांस किल्ल्यांत नेलें, व त्यांनीं किल्ला घेऊन येसूबाई व शिवाजी यांस कैद केलें, व पुढें ते त्यांस घेऊन औरंगजेबाकडे निघून गेले. परंतु वरील गोष्टीस मराठी बखरींत कोठेंच आधार मिळत नाहीं. असो.

औरंगजेबानें शिवाजीस पाहिलें त्या वेळीं तो फार खुश झाला. त्या वेळीं "इतर सर्व मराठे चोर, हा काय तो साव" असें तो थट्टेनें म्हणाला. त्या 'साव' शब्दावरून पुढें शिवाजीचें 'शाहू' असें नांव पडलें. बेगमेचेंही शाहूवर पुत्रवत् प्रेम जडलें, व त्यामुळें औरंगजेबही शाहूस विशेष ममतेनें वागवूं लागला. त्याच्या तैना-

तीस औरंगजेबानें दासदासी, हत्तीघोडे वगैरे निराळा सरंजाम देऊन त्याच्या खर्चाकरितां वेगळी नेमणूक तोडून दिली. याप्रमाणें त्यानें मरेपर्यंत संभाजीच्या कुटुंबास फार चांगल्या रीतीनें वागविलें. असें म्हणतात कीं, औरंगजेबाचे मनांत शाहूस मुसलमान करावयाचें होतें, परंतु बेगम साहेब मध्यें आड येत असे, त्यामुळें त्याला ती गोष्ट करतां आली नाहीं.

तकरीबखान—यासच यानंतर झुलपिकारखान असें नांव पडलें—यानें रायगड घेऊन येसूबाई व शिवाजी यांस कैद करून नेलें, हें वर्तमान राजाराम व इतर मराठे सरदार यांस कळतांच त्यांच्या तोंडचें पाणी पळालें. शिवाजीच्या वंशापैकीं काय तो राजाराम शिलक राहिला होता. तेव्हां तो तरी औरंगजेबाचे हातीं सांपडूं नये, म्हणून सर्व सरदारांनीं त्यास करनाटकांत जिंजीतंजावर एथें पळून जाण्याची मसलत दिली. नंतर राजाराम कापड्याचा वेश घेऊन फक्त एकवीस मनुष्यांसह मोंगलांचे मुलखांतून वाट काढीत जिंजी एथें जाण्याकरितां निघाला. औरंगजेबास ती बातमी समजली तेव्हां त्यानें करनाटकचा फौजदार व त्याचे दुसरे सरदार यांस "राजाराम तुमच्या मुलखीं गेला आहे तर त्यास कैद करावें," ह्मणून हुकूम केला. राजाराम मंगळूर येथें उतरला, त्या वेळीं त्याचे नोकर त्याचे पाय धुऊं लागले, त्यावरून हा कोणी तरी बडा मराठा सरदार आहे, असा तेथील लोकांस संशय आला, व त्यांनीं ती बातमी तेथच्या मोंगलाच्या अधिकाऱ्यास कळविली. खंडो बल्लाळ चिटणीस या वेळीं राजारामाबरोबर होता, त्यास ती कुणकुण कळतांच त्यानें राजारामाबरोबर संताजी घोरपडे व धनाजी जाधव

या दोघांस देऊन एकदम तेथून पुढें रवाना केलें, व आपण बाकीच्या मंडळीसह तेथें स्वयंपाक करीत बसला. त्यानें जवळच्या सर्व लोकांस मोंगलांचा सरदार विचारावयास आलाच तर "आह्मांस कांहीं माहीत नाहीं" ह्मणून सांगावें, असें सांगितलें होतें. पुढें मोंगलांचा सरदार येऊन त्यानें त्या सर्वांस कैद करून व त्यांस अतिशय मार देऊन राजाराम कोठें आहे ह्मणून विचारलें. परंतु "आम्हांस कांहीं ठाऊक नाहीं" असा त्या सर्वांनीं जबाब दिला. पुढें खंडो बल्लाळ शिवायकरून बाकीच्या सर्वांस त्यानें सोडून दिलें. त्यास त्या सरदारानें राखेचे तोबरेही दिले, परंतु तो कबूल झाला नाहीं. पुढें दोन वर्षांनीं खंडो बल्लाळ याची मुक्तता झाली. अशा प्रकारचे स्वामीभक्तिनिष्ठ पुरुष फारच थोडे आढळतील. राजाराम जिंजीस सुखरूप पोहोंचल्यावर मागून हळूहळू त्याचे सर्व सरदार त्यास येऊन मिळाले.

# प्रकरण सहावें

### इ० स० १६९२ पासून इ० स० १७०७ पर्यंत.

औरंगजेब झुलपिकारखान यास जिंजी घेण्याची आज्ञा करितो.—त्याचा पुत्र कामबक्ष वाकिनखेडें नांवाचा किल्ला घेण्यास जातो.—राजाराम आपल्या मुलुखाचा बंदोबस्त करितो, व आपणास राजा असा किताब घेतो.—धनाजी जाधव व संताजी घोरपडे हे दक्षिणेंत येतात.—रामचंद्रपंत बहुतकर यानें राजारामाचे मागें दक्षिणेंतील मराठी राज्याचा केलेला बंदोबस्त.—मोंगलांची व मराठ्यांची लढाई करण्याची शिस्त.—संताजी व धनाजी

**औरंगजेबाचा** खजिना लुटतात.–**औरंगजेब कामबक्ष** यास **जिंजी** घेण्याकरितां पाठवून देतो.–झुलपिकारखानास या गोष्टीमुळें वाईट वाटून तो **राजारामाशीं** गुप्त तह करितो.–**औरंगजेबाचा** पोर्तुगीज लोकांवरील राग.–**संताजी** व **धनाजी** **करनाटकांत** परत येतात, व **मोंगलांची** दुर्दशा करितात.–**संताजी कासमखान** नांवाच्या **मोंगलांच्या** सरदाराचा पराभव करितो.—**झुलपिकारखान जिंजी** घेतो.—**राजाराम जिंजी** येथून **दक्षिणेंत** परत येतो.–तो **शाहूस औरंगजेबाचे** कैदेंतून सोडविण्याचा प्रयत्न करतो.–**औरंगजेब** स्वतः **मराठयांचे** किल्ले घेण्याकरितां बाहेर पडतो.–**औरंगजेब वसंतगड** घेऊन **साताराच्या** किल्ल्यास वेढा देतो.–**साताराच्या** वेढयाचें वर्णन.–**राजाराम** मरण पावतो.–**औरंगजेब मराठयांचे** किल्ले घेतल्यावर **जुन्नर** येथें छावणी देऊन राहतो.–**औरंगजेब वाकिनखेड्याचा** किल्ला घेतो.–**मराठे** आपले किल्ले परत घेतात.–**सातार्‍याची** हकीकत.–**रजपूत** लोकांबरोबर चाललेल्या लढाईचा इतिहास.–**औरंगजेबाचा** पडता काळ.–त्याचें शेवटचें प्रयाण.–**मराठे** त्याची दुर्दशा करितात.–अंतकाळची त्याच्या मनाची स्थिति.–त्यानें आपल्या पुत्रांस पाठविलेलीं पत्रें.–-त्याचा मृत्यू.–त्याचें स्वरूपवर्णन.

**औरंगजेबानें मराठ्यांचा** बहुतेक मुलूख घेतलाच होता. पुढें त्यास **राजाराम जिंजी** येथें आहे असें कळल्यावर तो किल्ला घेऊन **मराठ्यांच्या** राज्यवृक्षाच्या बुडाशीं शेवटचा घाव घालावा, व तो जमीनदोस्त करून टाकावा, अशा इच्छेनें त्यानें तें काम आपल्या शूर **झुलपिकारखान** सरदारास सांगितलें. तो आपल्या फौजेसह **जिंजी** येथें गेला, परंतु **जिंजी** घेण्यास पुरेशी फौज आपणाजवळ नाहीं, असें पाहून त्यानें ज्यास्त फौज पाठवून देण्याविषयीं **औरंगजेबास** लिहिलें, व मध्यंतरीं तो **तंजावर, त्रिचनापल्ली** येथील राजांपासून खंडण्या वसूल करीत स्वस्थ बसला.

औरंगजेबानें आपला कनिष्ठपुत्र कामबक्ष यास विजापुराजवळ वाकिनखेडें नांवाचा एक मजबूत किल्ला कांहीं लुटारू लोकांच्या ताब्यांत होता, तो घेण्याकरितां पाठविलें होतें. त्यानें तो किल्ला घेण्याविषयीं आपली शिकस्त केली. परंतु त्या लोकांनीं त्याचें कांहीं एक चालूं दिलें नाहीं, व त्या कामांत त्याची फौजही पुष्कळ मेली.

राजाराम जिंजीस गेला त्या वेळीं त्यानें निळोपंत पिंगळे व रामचंद्रपंत बहुतकर यांस अनुक्रमें पेशवा व हुकमतपन्हा असे किताब देऊन त्यांस रांगणा, विशाळगड वगैरे जे थोडेसे किल्ले मराठ्यांचे ताब्यांत राहिले होते, त्यांचा बंदोबस्त सांगितला होता, व कोंकणांत शिधोजी गुजर व कान्होजी आंग्रे यांस आरमाराचा बंदोबस्त सांगितला होता. जिंजीस गेल्यावर, शाहू औरंगजेबाचे कैदेंत होता, त्यामुळें राजारामानें आपणास राजा असा किताब घेतला, व आपले अष्टप्रधान नेमिले. त्या वेळीं त्यानें संताजी घोरपडे यास आपला सेनापति नेमिलें. नंतर त्यानें संताजी व धनाजी यांच्या हाताखालीं फौज देऊन त्यांस मोंगलांचा मुलूख लुटण्याकरितां दक्षिणेंत पाठवून दिलें.

ते दोघे दक्षिणेंत येण्यापूर्वींच विजापूर व गोवळकोंडें हीं राज्यें बुडाल्यामुळें पदच्युत झालेले बरेच मराठे सरदार मोंगलांचा मुलूख लुटूं लागले होते. ते दोघे दक्षिणेंत येतांच वर सांगितलेले सरदार व मोंगलांच्या जुलुमास त्रासलेले दुसरे हजारों लोक त्यांस येऊन मिळाले.

रामचंद्रपंतानें आपल्या ताब्यांतील मुलुखाचा बंदोबस्त फार चांगल्या रीतीनें ठेविला होता. त्यानें आपल्या हिमायतीवर ज्यास्त फौज नोकरीस ठेविली, आपल्या सरदारांस

उत्तेजन यावें म्हणून त्यांस चौथाई वसूल करण्याचा अधिकार देऊन टाकला, व त्या उत्पन्नांतून फौजेचा खर्च भागवून शिल्लक उरली तर ती सरकारांत द्यावी असें ठरविलें. खासगी रीतीनें मिळविलेली लूट तो ज्याची त्यास बहाल करी. तसेंच त्यानें घांसदाणा ( घोड्यांच्या चंदीबद्दलचा पैसा ) म्हणून एक नवीन हक्क वसूल करण्याचा आपल्या सरदारांस अधिकार दिला. त्यामुळें कालचक्राच्या तडाक्यांत सांपडून मागसलेले पुष्कळ मराठे सरदार निरनिराळ्या टोळ्या जमवून रामचंद्रपंतास येऊन मिळाले, व द्रव्याच्या लालसेनें जिवाची पर्वा न धरितां मोंगलांचा मुलूख लुटून आपापलीं पोटीं भरूं लागले. इतक्यांत धनाजी व संताजी हे दक्षिणेंत येऊन थडकल्यामुळें चाऱ्ही बाजूंनीं मराठे मोंगलांचा मुलूख जाळीत व लुटीत चालले, व सर्व दक्षिणभर मोठा कल्होळ होऊन गेला. रामचंद्रपंतानें आपले लष्करांत पुष्कळ धनगर लोक नोकरीस ठेविले होते. त्यांपैकीं बरेच लोक पुढें उदयास आले. इ० स० १६९२ त शंकराजी नारायण यानें मोंगलांपासून राजगड घेतला. ती त्याची मर्दुमकी पाहून रामचंद्रपंतानें त्यास वांई परगण्याची मामलत दिली. हा भोरच्या पंतसचिवांचा मूळपुरुष होता. परशुराम त्रिंबक यानें मोंगल बेसावध आहेत असें पाहून पन्हाळा त्यांच्यापासून परत घेतला. संताजीनें मिरजचा किल्ला सर केला, त्या वेळीं रामचंद्रपंतानें त्यास मिरजेची देशमुखी दिली. नंतर धनाजी व संताजी हे गोदातीरीं मोंगलांचे मुलुखास उपद्रव देण्याकरितां निघून गेले. औरंगजेबास मुख्य धान्याचा पुरवठा त्या प्रदेशांतून होत असे, त्यामुळें त्यानें आपली फौज धनाजी व संताजी यांचें पारिपत्य करण्याकरितां पाठवून दिली. नंतर मोंगलांचे

सामन्यास उभे राहून त्यांनीं तीन वेळ **मोंगलांचा** पराभव केला, व प्रत्येक लढाईंत त्यांनीं त्यांच्या मोठमोठ्या सरदारांस कैद केलें. तेव्हांपासून **औरंगजेबाला मराठे** डोंगरांतले 'उंदीर' नसून 'शेर' (वाघ) आहेत असें वाटूं लागलें.

त्या वेळीं **मोंगलांची** लढाई करण्याची शिस्त व **मराठ्यांची** लढाई करण्याची शिस्त या दोहोंत ज्यास्त फायदेशीर कोणती याची चांगली पारख झाली. **अकबराचे** कारकीर्दींत जिकडे तिकडे स्वस्थता होती, व राज्यपद्धति सौम्य असून रीतीभाति सौजन्याच्या होत्या, त्यामुळें व हिंदुमुसलमान यांस त्यानें एकाच धाऱ्यानें वागविल्यामुळें उत्तरेकडील मुसलमान लोकांचा मुळचा कडक व क्रूर स्वभाव नरम पडत चालला होता. **जहांगीर** याच्या कारकीर्दींत सर्वत्र स्वस्थता असल्यामुळें मुसलमानी लष्कराची कैद बरीच ढिली पडली होती. **शहाजहान** याचे कारकीर्दींत ती अधिकच ढिली पडली, व **औरंगजेबाचे** कारकीर्दींत तर ती फारच ढिली पडली. **मोंगलांच्या** अंगचें मूळचें चापल्य, धैर्य, साहस, इत्यादि गुण जाऊन आळस, अनुत्साह व हतवीर्यता हे गुण त्यांनीं चांगलेच संपादन केले होते. त्यांच्यांत ऐषआरामही फार वाढला होता. **मोंगलांचे** सरदार स्वारीमध्यें बाहेर पडले, म्हणजे जसे काय एखाद्या लग्नाच्या मिरवणुकीकरितां बाहेर पडले कीं काय, असा भास होत असे. अंगांत एक उत्कृष्ट कपडा, त्यावर तारेचें किंवा पत्र्याचें चिलखत, बसावयास चपळ नसेना कां परंतु उमदा सुंदर घोडा, त्यावर उत्तम परंतु अवजड जीन असून त्यावर मखमलीचा गाशा, त्याच्या चाऱ्ही कोंपऱ्यांस उंची रेशमी कापडाचे झोल, खोगिराच्या दोन्ही बाजूंस वनगाईंच्या केसांचीं मोरचेलें, घोड्यांच्या गळ्यांत व

उत्तेजन यावें म्हणून त्यांस चौथाई वसूल करण्याचा अधिकार देऊन टाकला, व त्या उत्पन्नांतून फौजेचा खर्च भागवून शिल्लक उरली तर ती सरकारांत द्यावी असें ठरविलें. खासगी रीतीनें मिळविलेली लूट तो ज्याची त्यास बहाल करी. तसेंच त्यानें घांसदाणा ( घोड्यांच्या चंदीबद्दलचा पैसा ) म्हणून एक नवीन हक्क वसूल करण्याचा आपल्या सरदारांस अधिकार दिला. त्यामुळें कालचक्राच्या तडाक्यांत सांपडून मागसलेले पुष्कळ मराठे सरदार निरनिराळ्या टोळ्या जमवून रामचंद्रपंतास येऊन मिळाले, व द्रव्याच्या लालसेनें जिवाची पर्वा न धरितां मोंगलांचा मुलूख लुटून आपापलीं पोटें भरूं लागले. इतक्यांत धनाजी व संताजी हे दक्षिणेंत येऊन थडकल्यामुळें चाऱ्ही बाजूंनीं मराठे मोंगलांचा मुलूख जाळीत व लुटीत चालले, व सर्व दक्षिणभर मोठा कल्होळ होऊन गेला. रामचंद्रपंतानें आपले लष्करांत पुष्कळ धनगर लोक नोकरीस ठेविले होते. त्यांपैकीं बरेच लोक पुढें उदयास आले. इ० स० १६९२ त शंकराजी नारायण यानें मोंगलांपासून राजगड घेतला. ती त्याची मर्दुमकी पाहून रामचंद्रपंतानें त्यास वांई परगण्याची मामलत दिली. हा भोरच्या पंतसचिवांचा मूळपुरुष होता. परशुराम त्रिंबक यानें मोंगल बेसावध आहेत असें पाहून पन्हाळा त्यांच्यापासून परत घेतला. संताजीनें मिरजचा किल्ला सर केला, त्या वेळीं रामचंद्रपंतानें त्यास मिरजेची देशमुखी दिली. नंतर धनाजी व संताजी हे गोदातीरीं मोंगलांचे मुलुखास उपद्रव देण्याकरितां निघून गेले. औरंगजेबास मुख्य धान्याचा पुरवठा त्या प्रदेशांतून होत असे, त्यामुळें त्यानें आपली फौज धनाजी व संताजी यांचें पारिपत्य करण्याकरितां पाठवून दिली. नंतर मोंगलांचे

सामन्यास उभे राहून त्यांनीं तीन वेळ मोंगलांचा पराभव केला, व प्रत्येक लढाईंत त्यांनीं त्यांच्या मोठमोठ्या सरदारांस कैद केलें. तेव्हांपासून औरंगजेबाला मराठे डोंगरांतले 'उंदीर' नसून 'शेर' (वाघ) आहेत असें वाटूं लागलें.

त्या वेळीं मोंगलांची लढाई करण्याची शिस्त व मराठ्यांची लढाई करण्याची शिस्त या दोहोंत ज्यास्त फायदेशीर कोणती याची चांगली पारख झाली. अकबराचे कारकीर्दींत जिकडे तिकडे स्वस्थता होती, व राज्यपद्धति सौम्य असून रीतीभाति सौजन्याच्या होत्या, त्यामुळें व हिंदुमुसलमान यांस त्यानें एकाच धाऱ्यानें वागविल्यामुळें उत्तरेकडील मुसलमान लोकांचा मुळचा कडक व क्रूर स्वभाव नरम पडत चालला होता. जहांगीर याच्या कारकीर्दींत सर्वत्र स्वस्थता असल्यामुळें मुसलमानीं लष्कराची कैद बरीच ढिली पडली होती. शहाजहान याचे कारकीर्दींत ती अधिकच ढिली पडली, व औरंगजेबाचे कारकीर्दींत तर ती फारच ढिली पडली. मोंगलांच्या अंगचें मूळचें चापल्य, धैर्य, साहस, इत्यादि गुण जाऊन आळस, अनुत्साह व हतवीर्यता हे गुण त्यांनीं चांगलेच संपादन केले होते. त्यांच्यांत ऐषआरामही फार वाढला होता. मोंगलांचे सरदार स्वारीमध्यें बाहेर पडले, म्हणजे जसे काय एखाद्या लग्नाच्या मिरवणुकीकरितां बाहेर पडले कीं काय, असा भास होत असे. अंगांत एक उत्कृष्ट कपडा, त्यावर तारेचें किंवा पत्र्याचें चिलखत, बसावयास चपळ नसेना कां परंतु उमदा सुंदर घोडा, त्यावर उत्तम परंतु अवजड जीन असून त्यावर मखमलीचा गाशा, त्याच्या चाऱ्ही कोंपऱ्यांस उंची रेशमी कापडाचे झोल, खोगिराच्या दोन्ही बाजूंस वनगाईच्या केसांचीं मोरचेलें, घोड्यांच्या गळ्यांत व

जिनांवर सोन्याच्या किंवा रुप्याच्या नक्षीदार सांखळ्या, घंटा व दुसरे शृंगार. अशा रीतीनें आपापल्या सामर्थ्याप्रमाणें प्रत्येक सरदार आपणास सजवीत असे. अशा प्रकारची चैनी व विलासी मंडळी लढाईंत हाल सोसून कितीसा टिकाव धरील हें उघडच दिसतें !

वर सांगितल्याप्रमाणें लढाईची कैद कमी होऊन ऐषआराम ज्यास्त वाढला होता. औरंगजेब आपण सर्व गोष्टींत दक्ष असा बाणा मिरवीत असे. परंतु त्याच्याच कसुरीमुळें त्याच्या लष्करांत पुष्कळ खोटसाळ वहिवाटी शिरल्या होत्या. त्याचे कांहीं सरदार जितकी फौज त्यांनीं आपल्या पदरीं नोकरीस ठेवावी असा ठराव होता, तिच्या निमे फौज ठेवीत असत, व अशा प्रकारें नेमणुकीपैकीं निमे पैसा घशाखालीं टाकीत; दुसरे कांहीं सरदार ठरावीक संख्येची भरती करून दाखविण्याकरितां आपल्या हाताखालील फौजेंत आपल्या चाकरांचीं व गुलामांचीं नांवें दडपून देत. अशा रीतीनें सर्व सरदार लोक बिघडून जाऊन त्यांचा लष्करी बाणा नाहींसा झाला होता. सरदार लोक स्वत: दुर्गुणी व गैरकायदा वर्तन करणारे असल्यामुळें त्यास इतरांचे अपराध बाहेर काढतां येत नसत. बरें, इकडे बादशाहाचा थाट पाहूं गेलें तर ऐन आणीबाणीच्या प्रसंगींसुद्धां तो अति शांततेच्या प्रसंगीं जसा असावयाचा तसाच असे. अगदीं हलक्या प्रतीचा शिपाईही आपणाबरोबर शरीरसुखाचीं व ऐषआरामाचीं साधनें ठेवीत असे. बादशाहाचा मुक्काम हालला म्हणजे हत्तीघोडे, उंटबैल, गाडेछकडे यांचे तांडेचे तांडे लागत असत. त्यांतच सर्व प्रतींच्या बायका, व्यापारी, उदमी, चाकरनोकर व इतर बाजारबुणगे यांची गर्दी असे. ज्या प्रदेशांतून ही टोळ-

धाड जाई, त्या सर्व प्रदेशाचें निःसंतान करून टाकीत असे. शिवाय लष्करी लोक गरीब रयतेवर जुलूम करीत तो निराळाच. वर सांगितलेल्या थाटानें स्वारी निघाली म्हणजे एखादे वेळीं शत्रु येऊन ते पिछाडीवर हल्ला करीत तेव्हां अघाडीचे लोक मदतीस येत तोंपर्यंत ते लुटालूट करून पळूनही जात असत.

मराठ्यांचा प्रकार मोंगलांच्यापेक्षां अगदीं निराळा होता. त्यांचा बांधा लहान असून ते चपल होते. मेहनतीच्या कामांची व जाड्याभरड्या अन्नाची त्यांस संवय होती. बाजरीचा रोट व त्याबरोबर मिळाल्यास कांदामिरची असली म्हणजे त्यांना पुरे असे. शिपायांचा पोषाग म्हटला म्हणजे एक तंग मांडचोळणा व कमरेस भिडविलेला काचा. बाकीचें शरीर उघडें, किंवा असलाच तर अंगांत एखादा रूदार अंगरखा, कमरेस तरवार, खांद्यावर बंदुक व हातांत तेरा किंवा चौदा फूट लांबीचा भाला. ते लोक भाला मारण्याचे कामांत फार कुशल असत. त्यांचे घोडे चपळ, मजबूत व कंटक असत. किंचित् मांड दाबिली म्हणजे ते तिराप्रमाणें पळत जात. ते पाहिजे तेथें थांबत व भरधांव चालले असतां एकदम फिरवितां येत. त्यांचें खोगीर कापडाचें असून त्यावर लहानशा गादीची घडी करून गाशा टाकलेला असे. मराठे तळ देऊन राहिले म्हणजे त्यांच्या सरदारास फक्त तंबू असे. बाकीचें लष्कर उघड्या जमिनीवर उतरत असे. ते लुटालूट करण्याकरितां बाहेर पडले म्हणजे उघड्याच जमिनीवर निजत असत, आणि जवळ आपला भाला पुरून त्यास आपला घोडा बांधीत, व त्याचा लगाम आपल्या दंडांत अडकवून ठेवीत. शत्रूची जरा चाहूल सांपडली कीं, एका क्षणांत ते स्वार होत व बलाबल पाहून

आपल्या शक्तीचा उपयोग करीत. शत्रूचे लोक फार असले तर ते पळून जात व चोरवाटांनीं पहाडांत जाऊन लपून बसत. कदाचित् मोंगलांचे लोक फळी सोडून त्यांचा पाटलाग करीत मागें गेलेच व त्यांची पक्की फाटाफूट झाली असें मराठ्यांस वाटलें, म्हणजे ते चोहोंकडून त्यांच्यावर छापे घालून त्यांस मारून टाकीत. मोंगलांचें लष्कर कूच करूं लागलें म्हणजे ते बहुधा पिछाडीस असत, व जे लोक मागें रहात त्यास कापून काढीत. शत्रूची धान्यसामग्री घेऊन एखादी टोळी निघाली तर तिचा विध्वंस कसा करावा हें त्यांस चांगलें साधलें होतें. खेड्यापाड्यांतील लोक त्यांस अनुकूल असत त्यामुळें मोंगलांच्या हालचालीची इत्थंभूत बातमी त्यांस लागत असे. परंतु मोंगलांस मात्र मराठ्यांचा कांहींएक मागमूस कळत नसे. त्यामुळें एखादे वेळीं मराठ्यांस लहानशी मोंगलांची टोळी आढळली म्हणजे त्यांचे घोडेस्वार तिच्या सभोंवार घिरट्या घालूं लागत, तेव्हां निरुपाय होऊन ती टोळी स्वसंरक्षणाकरितां तळ देऊन बसे. नंतर मराठे तिचें दाणापाणी गवतकाडी वगैरे बंद करीत, व त्यामुळें शेवटीं त्या लोकांस मराठ्यांस शरण येणें भाग पडे. पुढें मराठे त्यांचें सामानसुमान, घोडे, पैसा वगैरे सर्व छिनावून घेत, शिपाई लोकांस उघडे बिनहत्यारी सोडून देत व अधिक पैसा मिळविण्याचे हेतूनें त्यांच्या सरदारांस अडकवून ठेवीत.

वरील दोन्ही प्रकार लक्ष्यांत आणिले म्हणजे त्या वेळच्या मोंगल व मराठे यांच्या रीतीभाती, व त्यांच्यामध्यें चाललेल्या लढाईत अधिक फायदेशीर पद्धत कोणाची होती, हें चांगलें ध्यानांत येण्यासारखें आहे.

औरंगजेब आपला खजिना व सैन्याची भरती उत्तर-

हिंदुस्थानांतून आणीत असे. याकरितां संताजी व धनाजी यांनीं उत्तर व दक्षिण यांचे दरम्यान आपलें नाकें बसविलें. त्यांनीं अनेक वेळां बादशाहाचा खजिना लुटला, व त्याच्या पुष्कळ टोळ्यांचा खराबा करून टाकिला, त्यामुळें जे मराठे मोंगलांस पूर्वी अगदीं तुच्छ वाटत असत तेच त्यांना काळाप्रमाणें वाटूं लागले. धनाजीची तर त्यांना इतकी जरब बसली कीं, एखादे वेळीं त्यांनीं आपले घोडे पाणी पाजावयास नेले, व ते पाणी पीत नाहींसे झाले तर त्यांनीं त्याला म्हणावें, " बेटा! पानी क्यं नही पीते, उसमे धनाजी नजर आता है कैसा क्या! " अशा रीतीनें मराठ्यांचा मोंगलांस दरारा बसला होता.

अशा प्रकारची नाउमेदीची वेळ येऊन ठेपली तरी औरंगजेब डगमगला नाहीं. आपलें गेलेलें महत्त्व पुनः मिळविण्याकरितां त्यानें फिरून मोठ्या नेटानें प्रयत्न चालविला. पूर्वी वाकिनखेडें येथें कामबक्ष याची फजिती होऊन तो परत आला होता. पुढें औरंगजेबानें त्याच्या हाताखालीं मोठी फौज देऊन त्याला जिंजी घेण्याकरितां पाठवून दिलें, व झुलपिकारखानाचा पिता असदखान वजीर यास त्या स्वारीवर मुख्य नेमिलें. पूर्वी जिंजी सर करण्याचें काम झुलपिकारखान यास सांगितलें होतें. परंतु औरंगजेबानें तें काम आपणाकडून काढून कामबक्ष यास सांगितलें असें पाहून त्या शूर व मानी सरदारास ती गोष्ट विषम वाटली, व त्याला औरंगजेबाचा मोठा राग आला. नंतर तो त्या वेढ्याचे संबंधानें उदासवृत्तीनें वागूं लागला. राजारामाचे अष्टप्रधानांस ती बातमी कळतांच त्यांनीं आंतून झुलपिकारखानाशीं संधान बांधलें. झुलपिकारखानाचे मनांत कामबक्ष याचा पूर्णपणें नक्षा जिरवावयाचा होता, तेव्हां

त्यानें राजारामाशीं गुप्त तह केला. त्यांत असें ठरलें कीं, " झुलपिकारखानानें युक्तीनें कामबक्ष याचे सर्व बेत हाणून पाडावे व प्रसंगीं तसें नच झालें तर त्याची आगाऊ बातमी राजारामास द्यावी. " हा तह इ० स० १६८४ त ठरला.

औरंगजेबाची छावणी या वेळीं भीमेचे कांठीं ब्रह्मपुरी येथें होती. नंतर तेथून तो गलगला येथें गेला. परंतु रामचंद्रपंत व संताजी हे सोलापुरापर्यंतचा सर्व मुलूख ओस पाडीत चालले होते, त्यामुळें तो पुनः ब्रह्मपुरीस परत आला, व तेथेंच मोठमोठ्या इमारती उठवून कांहीं वर्षें राहिला.

इ० स० १६९५ व इ० स० १६९६ या सालीं महाराष्ट्रांत विशेष सांगण्यासारखी अशी कांहीं एक गोष्ट झाली नाहीं. कामबक्ष जिंजीस वेढा घालून बसला होता, परंतु झुलपिकारखानाचें आंतून राजारामास साह्य असल्यामुळें त्याला तो किल्ला घेतां आला नाहीं. कोंकणांत मात्र थोडीशी चळवळ झाली होती. औरंगजेबास कांहीं कारणावरून पोर्तुगीज लोकांचा राग येऊन त्यानें त्यांच्यावर कांहीं फौज पाठवून दिली. त्या फौजेनें त्यांची बहुतेक बंदरें घेऊन त्यांस तेथून हांकून दिलें, तेव्हां ते दमण व वसई या किल्ल्यांचे आश्रयास जाऊन राहिले. पुढें पोर्तुगीज लोक शरण आल्यामुळें औरंगजेबानें त्यांच्याशीं तह केला.

इ० स० १६९७ त संताजी बरोबर वीस हजार लोक घेऊन औरंगजेबाचें मुख्य लष्कर पूर्वेकडे टाकून साताऱ्यावरून करनाटकांत शिरला. जिंजीजवळ आल्यावर त्यानें धनाजीचे हाताखालीं सहा सात हजार लोक देऊन

त्यास वेढा घातलेल्या मोंगलांचे फौजेवर छापा घालण्याकरितां पुढें पाठवून दिलें. धनाजीनें प्रथमतः जिंजीजवळ एक मोंगलांचें ठाणें होतें तें मारिलें. धनाजी आल्याचें वर्तमान राजारामास कळतांच त्यानें आपली फौज बाहेर पाठवून दिली. जिंजी शहर फार मोठें असल्यामुळें ठिकठिकाणीं मोंगलांनीं आपलीं ठाणीं बसविलीं होतीं. ते सर्व लोक एकत्र जमते तर धनाजीचें कांहीं एक चाललें नसतें. परंतु धनाजी इतक्या गुप्त रीतीनें व सपाटयानें आला होता कीं, त्यानें मोंगलांस आपले लोक एकत्र मिळविण्यास फुरसूदच सांपडूं दिली नाहीं, व त्यामुळें त्यांचा फार नाश झाला. संताजी मागून हळूहळू येत होता. वाटेंत त्याची व अलीमर्द नांवाच्या औरंगजेबाच्या सरदाराची गांठ पडली. तो आपल्या फौजेसह एकदम संताजीवर चाल करून आला. परंतु संताजीनें त्याच्या सैन्याचा फडशा करून टाकला व त्यास कैद केलें, आणि त्याच्यापासून पुष्कळ पैसा घेऊन त्यास सोडून दिलें. संताजी जिंजीस आल्यावर त्यानें व धनाजीनें मिळून मोंगलांचीं बहुतेक ठाणीं उठविलीं, त्यांचे दाणावैरण आणणारे लोक मारून टाकिले, बाहेरील धान्यसामग्री बंद केली, व औरंगजेब मरण पावला अशी खोटीच कंडी पिकविली. आधींच मोंगलांची फौज हतवीर्य झाली होती, त्यांत औरंगजेब मृत्यु पावला असा पुकारा होतांच त्यांचें धाबें दणाणून गेलें. अशा संधीस, " तूं आम्हांकडे येशील तर आम्ही तुला दिल्लीची गादी मिळवून देऊं, " असें मराठयांनीं कामबक्ष याच्याशीं बोलणें सुरू केलें. असदखान व झुलपिकारखान यांस ती बातमी कळल्यामुळें ते कामबक्ष याच्या हालचालीवर नजर ठेवूं लागले. पुढें एके दिवशीं

रात्रीस कामबक्ष यानें आपल्या फौजेस तयार होण्याविषयीं हुकूम केला. तेव्हां " हा आतां मराठ्यांस जाऊन मिळणार " असा असदखान व झुलपिकारखान यांस संशय आल्यावरून त्यांनीं त्यास कैद केलें. त्या वेळीं मोंगलांचे फौजेंत इतका गोंधळ झाला कीं, स्वसंरक्षणाकरितां त्यांनीं आपल्या तोफा उडवून देऊन जिंजीच्या सभोंवतालचे मोरचे उठविले, व तेथून कांहीं अंतरावर तळ देऊन खंदक खणून बसले. नंतर मराठ्यांनीं उलट त्यांस वेढा दिला व कोंडून धरिलें. शेवटीं नाइलाज होऊन ते तह करण्यास कबूल झाले. त्या वेळीं असा ठराव झाला कीं, " औरंगजेबाची तह करण्यास कबुली मिळेपर्यंत मोंगल लोकांनीं तेथून दहा कोशांवर वांदिवाश येथें जाऊन रहावें. " परंतु औरंगजेब तह करण्यास कबूल झाला नाहीं. त्यानें लगेच दुसरी मोठी फौज जिंजीस पाठवून दिली, असदखान व कामबक्ष यांस परत बोलाविलें, व जिंजी सर करण्याचें काम एकट्या झुलपिकारखानास सांगितलें. नंतर औरंगजेब विजापूर येथें येऊन राहिला.

जिंजी येथें मोंगलांची त्रेधा उडवून दिल्यावर संताजी घोरपडे करनाटकांत औरंगजेबानें विजापुरच्या राज्याचा जो भाग घेतला होता तो लुटण्याकरितां गेला. औरंगजेबानें विजापुराहून आपलें सैन्य संताजीवर पाठवून दिलें, व कासमखान नांवाचा फौजदार करनाटकांत होता, त्यास त्या सैन्यास मदत करावी म्हणून हुकूम केला. नंतर त्या दोन्ही फौजा संताजीवर हल्ला करण्याकरितां निघाल्या परंतु ते लोक बेसावध असतां संताजीनें त्यांच्यावर छापा घालून पुष्कळ लोकांस ठार मारिलें. संताजीचे लोक दिवसास त्यांच्यावर छापे घालीत व रात्रीस बाण सोडून

त्यांस भाजून टाकीत. अशा रीतीनें तीन दिवस **संताजीनें** त्यांस ' दे माय धरणी ठाय ' करावयास लाविलें. शेवटीं ते दादोरी नांवाच्या किल्ल्याच्या आश्रयास जाऊन राहिले. परंतु तेथेंही संताजीनें त्यांस धान्यसामग्रीचा तोटा पाडल्यामुळें ते उपाशीं मरूं लागले. औरंगजेबानें त्यांच्या मदतीकरितां ज्यास्त फौज पाठविली, परंतु संताजीनें तिचा मधल्यामध्येंच पराभव करून त्या लोकांस पिटाळून लाविलें. शेवटीं दांतीं तृण धरून मोंगल मराठ्यांस शरण गेले. कासमखान मोठा मानी सरदार होता. त्यास वरील अपमान सहन न होऊन त्यानें विष खाऊन प्राण दिला. पुढें त्या सैन्यांतील दुसरे मुख्य मुख्य सरदार औरंगजेबाकडे गेले, तेव्हां तो त्यांच्यावर अतिशय रागावला, व त्यानें त्यांचे अधिकार कमी करून त्यांस अगदीं हलक्या प्रतीचीं कामें सांगून दरबारांतून घालवून दिलें.

झुलपिकारखानानें इ० स० १६९७ त जिंजीच्या वेढ्याचें काम सुरू केलें. परंतु आंतून त्याचें व राजारामाचें सूत असल्यामुळें त्यानें तें काम आळसत आळसत चालविलें होतें. औरंगजेबासारख्या पाताळयंत्री व दक्ष बादशाहापुढें अशा प्रकारचें ढोंग फार दिवस टिकावयाचें नाहीं, ही गोष्ट खान ओळखून होता. शिवाय औरंगजेबास आपला संशय आला आहे, अशी कुणकुण त्याचे कानावर आली होती. तेव्हां आपण आतां जिंजी सर केली नाहीं तर दरबारीं आपलें महत्त्व राहणार नाहीं, असें त्यास वाटून त्यानें राजारामास पळून जाण्याविषयीं सुचविलें. नंतर राजाराम कांहीं मंडळीसह गुप्त रीतीनें जिंजीहून निघाला, व थोडकेच दिवसांत विशाळगडास परत आला. राजारामाचीं बायकामुलें जिंजीस अडकून पडलीं होतीं.

त्यांस तेथें शिरके नांवाचे सरदार होते त्यांच्या स्वाधीन करावें, असें राजारामानें झुलपिकारखानास सांगितलें होतें. त्याप्रमाणें त्यानें राजारामाचीं बायकामुलें युक्तीनें त्यांच्याकडे पोहोंचतीं केलीं, व वेढ्याचें काम मोठ्या नेटानें चालविलें. पुढें त्यानें इ० स० १६९८ च्या जानेवारी महिन्यांत जिंजी घेतली, आंतील सर्व मराठे लोकांस कैद केलें, व बादशाहास आपला संशय येऊं नये म्हणून पुष्कळ लोकांची कत्तल केली. त्यांत प्रल्हाद निराजीचा पुत्र नारो प्रल्हाद हा मारला गेला.

राजाराम इ० स० १६९७ च्या दिजंबर महिन्यांत विशाळगडास येऊन पोहोंचला. नंतर तो सातान्यास आला, व रामचंद्रपंत बहुतकर याचे सांगण्यावरून इ० स० १६९८ त त्यानें तें शहर आपली राजधानी केलें. नंतर मोठी फौज गोळा करून तो गोदावरीच्या उत्तरेस स्वारी करण्याकरितां निघून गेला. तेथें त्यास गंगथडी, वऱ्हाड वगैरे प्रांतांत जे मराठे स्वतंत्रपणें लुटालूट करीत होते, ते येऊन मिळाले. त्यांत हैबतराव निंबाळकर, परसोजी भोंसले, नेमाजी शिंदे वगैरे सरदार प्रमुख होते. बादशाहाची छावणी त्या वेळीं औरंगाबाद येथें होती. तेव्हां एकवार त्याचे छावणीवर छापा घालून शाहूस सोडविण्याचा प्रयत्न करावा, असें राजारामाचे मनांत आलें. तेव्हां पन्नास हजार फौज बरोबर घेऊन तो पुण्यास आला. नंतर सिंहगडास जाऊन राहोरीवामोरीवरून पुणतांब्याजवळ गोदावरी नदी उतरून औरंगाबादेजवळ खंडोबाचें सातारें येथें त्यानें आपला तळ दिला. दुसऱ्या दिवशीं रात्रीस त्यानें औरंगजेबाच्या छावणीवर छापा घातला. मोंगलांचें सैन्य बेसावध असल्यामुळें त्याची दाणादाण

झाली. राजारामानें बादशाहाचा खजिना लुटला. परंतु छाप्याचा मूळ हेतु सिद्धीस गेला नाहीं. त्या दिवशीं बेगमेनें बादशाहास मेजवानी दिल्यामुळें तो शाहस बरोबर घेऊन तिच्याकडे गेला होता; व त्यामुळें राजारामाची मसलत फसली. नंतर राजाराम तेथून परत फिरला, व गंगथडींत शिरून त्यानें तेथें चौथाई व सरदेशमुखी हे हक्क वसूल केले, वाटेंत पुष्कळ मोंगलांच्या टोळ्यांचा पराभव केला, व नांदेड, खानदेश, वऱ्हाड वगैरे प्रांत लुटून फस्त केले. परत येतांना त्यानें खंडेराव दाभाडे यास बागलाण प्रांतांत, नेमाजी शिंदे यास खानदेशांत, परसोजी भोंसले यास वऱ्हाडांत, व हैबतराव निंबाळकर यास गंगथडींत ठेविलें. औरंगजेबानें झुलपिकारखानास राजारामावर पाठवून दिलें, व त्यानें मोठ्या जोरानें राजारामाचा पाठलाग चालविला. तथापि वाटेंत आंबेड, पैठण, बीड वगैरे शहरें लुटून व जालना प्रांत जाळून टाकून तो पुण्यास येऊन पोहोंचला.

राजारामानें उत्तरेकडे स्वारी केली, त्या वेळीं धनाजी जाधव करनाटकांत मोंगलांचा मुलूख ओस पाडीत चालला होता. तेव्हां औरंगजेबानें झुलपिकारखानास त्याच्यावर पाठविलें होतें. त्यानें बरेच ठिकाणीं धनाजीचा पराभव करून त्यास करनाटकांतून पिटाळून लाविलें. नंतर त्यानें त्यास परत बोलावून राजारामावर पाठवून दिलें. पुढें त्यानें आपल्या सैन्याचे दोन भाग केले. एका भागाचें आधिपत्य आपणाकडे घेऊन तो मराठ्यांचे सर्व किल्ले काबीज करण्याकरितां निघाला, व दुसऱ्या भागाचा नामधारी अधिकार आपल्या नातवास व खरा अधिकार झुलपिकारखान यास देऊन त्यांस मराठ्यांचे जे सरदार

निरनिराळे ठिकाणीं मोंगलांचे मुलुखास उपद्रव करीत होते, त्यांचा बंदोबस्त करण्याकरितां पाठवून दिलें. इ० स० १६९९ त झुलपिकारखानानें राजारामास पिटाळून लाविलें, व पुढील सालीं दुसऱ्या पुष्कळ मराठे सरदारांचा पराभव केला. त्यामुळें औरंगजेबास आपली आतां सरशी होत चालली आहे असें वाटलें. परंतु वस्तुतः त्याची स्थिति दिवसेंदिवस अधिक अधिक वाईट होत चालली होती. कारण मराठे लोकांची स्थिति म्हणजे पाण्यावर आघात केला असतां ज्याप्रमाणें तें प्रतिबंध करीत नाहीं, व त्या आघाताची त्याच्या पृष्ठभागावर कांहींएक खूण न राहतां थोडक्याच वेळांत तें सर्व एक होतें, त्याप्रमाणें होती. त्यांचा पराजय झाला म्हणजे तेवढ्या वेळेपुरते ते नाहींसे होत व चोहोंकडे पळून जात; परंतु त्याच दिवशीं किंवा दुसऱ्या दिवशीं ते पुनः एकत्र जमत. मोंगलांचें मात्र सर्व प्रकारें नुकसान होत असे. मराठ्यांनीं त्यांचा पराभव केलाच तर त्यांस पळून जाण्यास मार्ग नसल्यामुळें समरांगणांतच मरावें लागे, व अशा रीतीनें त्यांचे लोक फार मेल्यामुळें त्यांचें मनुष्यबळ कमी होत असे. औरंगजेबास फौजेंत भरती करावयाची असल्यास त्याला उत्तर—हिंदुस्थानांतून लोक आणावे लागत असत. परंतु मराठे त्या लोकांचा मधल्यामध्येंच पराभव करून त्यांची व मुख्य सैन्याची गांठच पडूं देत नसत; यामुळें सैन्यांत भरती होत नसे. अवाढव्य स्वारीच्या अफाट खर्चामुळें, व मराठे वरचेवर मोंगलांचा खजिना लुटून नेत असल्यामुळें औरंगजेबास पैशाची तंगी बसत चालली होती, व त्यामुळें त्याला सैन्यांत ज्यास्त भरती करतां येत नसे. त्या



योगानें त्याची शक्ति दिवसेंदिवस क्षीण होत चालली, व त्याच्या अडचणी वाढत चालल्या.

मागें सांगितल्याप्रमाणें औरंगजेब आपली फौज बरोबर घेऊन प्रथमतः वसंतगडास आला, व तीन दिवसांत त्यानें तो किल्ला सर केला. नंतर त्यानें साताराच्या किल्ल्यास वेढा दिला. या वेढ्याची हकीकत थोडीशी मनोरंजक असल्यामुळें ती येथें देणें जरूर आहे.

औरंगजेबानें साताऱ्याच्या किल्ल्याची चोहोंकडून नाकेबंदी केली होती. उत्तरेचे बाजूस हल्लीं जेथें करंजें गांव आहे, तेथें स्वतः औरंगजेब उतरला, पश्चिमेचे बाजूस शहापूर येथें अजीमशाहा उतरला, आणि दक्षिणेचे बाजूस शिरजीखान व पूर्वेचे बाजूस तरबियतखान या सरदारांनीं आपले तळ दिले. अशा रीतीनें चाऱ्ही दिशा व्यापून शिवाय मध्यंतरीं ठिकठिकाणीं त्यानें लहान लहान सरदारांचीं नाकीं बसविलीं, व मुंगीचाही आंत रिघाव होणार नाहीं असा बंदोबस्त केला. साताऱ्याच्या किल्ल्याची उंची नेमस्तच आहे. परंतु त्याच्या वरच्या भागास सभोंवार तीस हातपर्यंत एकसारखा तुटलेला कडा आहे. त्याचा ईशान्य कोपरा जरा उंच व लांब गेलेला असून त्याचा आकार एखाद्या बुरुजासारखा असून त्याच्या सभोंवतालचा तुटलेला कडाही बराच उंच आहे. या कोपऱ्यावर एक बुरूज असून तें ठिकाण वर चढण्यास फारच अवघड आहे. तरबियतखानानें तो कोपरा सुरूंग पाडून उडवून टाकून तेथें किल्ल्यावर हल्ला करण्याकरितां वाट पाडण्याचा निश्चय केला. साताऱ्याचा किल्लेदार प्रयागजी प्रभू यानें साडेचार महिने मोंगलांस दाद दिली नाहीं. मोंगल लोक हल्ला करण्याकरितां एकत्र जमले म्हणजे प्रयागजी वरून

मोठमोठे दगड खालीं ढकलून देत असे, व ते कांहीं अंशीं तोफांचें काम बजावीत असत, आणि प्रसंगीं तोफांपेक्षांही ज्यास्त नुकसान करीत. अशा रीतीनें प्रयागजी किल्ल्याचें संरक्षण करीत असतां किल्ल्यांतील धान्यसामग्री संपली, व बाहेरील दाणावैरण बंद झाली, त्यामुळें आंतील शिबंदीची उपासमर होऊं लागली. परंतु परशुराम त्रिंबक परळी किल्ल्यावर होता, त्यानें अजीमशाहास वश करून घेऊन किल्ल्यांत बरीच धान्यसामग्री पोहोंचती केली, त्यामुळें प्रयागजी पुनः मोठ्या नेटानें लढूं लागला.

तरबियतखान यानें निश्चय केल्याप्रमाणें साडेचार महिन्यांत वर सांगितलेल्या ईशान्येकडील बुरुजाखालीं दोन मोठे सुरुंग तयार केले. बुरूज उडाल्याबरोबर आंत हल्ला करण्याकरितां त्या सरदारानें आपली फौज गुप्त रीतीनें बाजूस तयार करून ठेविली होती. तो चमत्कार पाहण्याकरितां औरंगजेब तखतराव्यावर बसून मोठ्या थाटानें बाहेर पडला, व त्या स्वारीचा अपूर्व थाट पहाण्याकरितां प्रयागजी, बुरुजाखालीं मोठमोठे सुरुंग तयार केले आहेत ही गोष्ट त्यास माहीत नसल्यामुळें, आपल्या लोकांसह त्याच बुरुजावर आला होता. तरबियतखानानें पहिल्या सुरुंगास बत्ती दिली, त्याबरोबर वरचा बुरूज उडून त्याचा तट आंतल्या अंगास पडला. त्या वेळीं तटावरील मंडळी पऱ्यांप्रमाणें आकाशांत उडाली, व शेंकडों लोक प्राणास मुकले. प्रयागजीही वर उडाला, परंतु सुदैवानें आंतले बाजूस देवीचे देवालयाजवळ पडला, व त्याचे सभोंवार दगड व माती यांचा लहानसा डोंगर पडून मध्यें तो तेवढा मात्र सुरक्षित राहिला. दुसरा सुरुंग उडाल्याबरोबर किल्ल्यावर एकदम हल्ला करण्याकरितां तरबियतखानाची फौज कांहींशी

जवळ आली, इतक्यांत दुसरा सुरुंग उडाला. परंतु ह्या वेळीं असा चमत्कार झाला कीं, तो सुरुंग आंतले अंगास न फुटतां बाहेरच्या अंगास फुटला, व त्यामुळें लाखों दगड तोफांप्रमाणें उडून हल्ला करणारे लोकांवर पडले, व सुमारें दोन तीन हजार लोकांस जागचे जागीं मूठमाती मिळाली. अशा रीतीनें तरबियतखानाची प्रतिज्ञा भंग होऊन औरंगजेबास विन्मुख परत जावें लागलें.

प्रयागजी दगड व माती यांचेमध्यें गडप झाला होता तथापि त्यास विशेष इजा झाली नव्हती. त्याच्या लोकांनीं पुढें त्यास बाहेर काढलें, व तो कांहीं दिवस तसाच टिकाव धरून राहिला. परंतु अजीमशाहा पुढें किल्ल्यांत धान्य पाठविण्याचें कबूल करीना. तेव्हां निरुपाय होऊन इ० स० १७०० च्या एप्रिल महिन्यांत प्रयागजीनें अजीमशाहाचे मार्फत तो किल्ला औरंगजेबाचे स्वाधीन केला. अजीमशाहाचे द्वारें आपणास एवढा बळकट किल्ला प्राप्त झाला, म्हणून औरंगजेबानें तेव्हांपासून त्या किल्ल्याचें नांव अजीमतारा असें ठेविलें.

झुलपिकारखानानें राजारामाचा नेटानें पाठलाग केल्यामुळें तो पुण्यास आला, हें मागें सांगितलेंच आहे. पुण्यास आल्यावर कांहीं दिवसांनीं तो सिंहगडास गेला, व तेथें त्यास नवज्वर[1] होऊन तो इ० स० १७०० च्या प्रारंभींच मरण पावला. राजाराम मोठा उदार व शूर होता. त्यानें आपल्या कर्तबगारीनें औरंगजेबास बराच हात दाखविला. संताजी घोरपडे व धनाजी जाधव यांनीं त्याचे कारकी-

---

१ झुलपिकारखानानें पाठलाग केल्यामुळें राजारामास फार श्रम झाले, व त्यामुळें तो उरीं फुटून मरण पावला, असें ग्रांटडफ, एलफिन्स्टन वगैरे ग्रंथकार लिहितात.

दींत मोठमोठे पराक्रम केले, व मराठ्यांचा दरारा कायम राखिला. कांहीं कारणावरून त्या दोघांत पुढें तंटा उत्पन्न झाला, व राजारामानें संताजीस घालवून दिलें. त्याप्रमाणें तो निघून जात असतां म्हैसवाडीचा नागोजी माने या नांवाच्या मनुष्यानें त्यास ठार मारिलें. राजारामानें संताजीसारख्या शूर सरदारास घालवून दिलें, ही गोष्ट त्याचे हातून फार चुकीची झाली असें म्हणावें लागतें.

राजाराम वारला त्या वेळीं औरंगजेब साताराचा किल्ला घेण्याचे कामांत गुंतला होता. त्याला तें वर्तमान कळलें तेव्हां मोठा आनंद झाला, व आपण आतां हां हां म्हणतां मराठ्यांस जिंकून टाकूं असें वाटलें. परंतु त्याचा हा भ्रम पुढें लौकरच नाहींसा झाला. राजारामाची थोरली बायको ताराबाई ही मोठी हुशार व राजकारस्थानी बायको होती. राजाराम वारल्यावर तिनें परशुराम त्रिंबक, शंकराजी नारायण, धनाजी जाधव वगैरे मंडळी अनुकूल करून घेतली, व राजारामाची धाकटी बायको राजसबाई व तिचा पुत्र संभाजी यांस कैदेंत ठेवून आपला पुत्र शिवाजी यास गादीवर बसविलें. तो अज्ञान दहा वर्षांचा होता म्हणून सर्व राज्यकारभार ती स्वतः पाहूं लागली. ती औरंगजेबाच्या भीतीनें एके ठिकाणीं न राहतां निरनिराळे ठिकाणीं राहून आपला कारभार पहात असे.

सातारा घेतल्यावर औरंगजेबानें परळी किल्ल्यास वेढा दिला. या ठिकाणीं औरंगजेबाचें फार नुकसान झालें. परशुराम त्रिंबक यानें बरेच दिवस त्यास दाद दिली नाहीं. परंतु धान्याचा तोटा पडल्यामुळें त्याला किल्ला सोडून जावें लागलें. ह्या ठिकाणीं औरंगजेब असतां एकाएकीं भयंकर पाऊस पडून त्याचे पुष्कळ लोक, उंट, बैल वगैरे

गेले. नंतर डोंगराळ प्रदेश सोडून औरंगजेब माण नदीचे कांठीं कवासपूर येथें जाऊन राहिला. तो आपल्या निश्चयाप्रमाणें एकामागून एक सर्व किल्ले घेत पुढें चाललाच होता. प्रत्येक किल्ला घेत असतां मराठयांनीं त्यास अडथळा केला व त्याचें पुष्कळ नुकसान केलें. कांहीं कांहीं ठिकाणीं त्याला फारच श्रम पडले. एका बाजूस औरंगजेब अशा रीतीनें एकामागून एक असे किल्ले घेत पुढें जात होता, व दुसरे बाजूस धनाजी जाधव, निंबाळकर, भोंसले, दाभाडे वगैरे मराठे सरदार झुलपिकारखानास दाद न देतां मोंगलांचे मुलुखावर स्वाऱ्या करून चौथाई, सरदेशमुखी वगैरे हक्कांचा पैसा वसूल करीतच होते.

औरंगजेबानें मराठयांचे किल्ले घेतल्यावर तो कांहीं दिवस जुन्नर येथें छावणी देऊन राहिला. पुढें मराठयांनीं विजापुराकडे फारच गोंधळ उडवून दिल्यामुळें तो विजापुरास गेला. त्या वेळीं औरंगजेबाचा कनिष्ठ पुत्र कामबक्ष हा त्याचेबरोबर होता, व त्याचे मनांत विजापुरचा सुभा आपण स्वतंत्र रीतीनें पहावा असें होतें. मराठे लोकांचा नाश करण्याकरितां इतके प्रयत्न करूनही त्यांचा नाश न होतां ते वर डोकें काढूं लागले, असें पाहून त्यानें मराठयांशीं सल्ला करण्याची मसलत औरंगजेबास दिली, व तोही त्या गोष्टीस मान्य झाला. त्या वेळीं चौथाई व सरदेशमुखी या हक्कांबद्दल दक्षिणेच्या वसुलाचा दहावा हिस्सा मराठयांस देऊन त्यांस आपले अंकित करून ठेवावें, असा औरंगजेबाचा इरादा होता. परंतु धनाजी जाधव या गोष्टीस कबूल होईना. त्यानें बादशाहास असें कळविलें कीं, " चाकर म्हणवावयाचें नाहीं, तथापि तुमची मर्जी असेल तर शिवाजी राजे आमचे तुम्हापाशीं आहेत तेच

आमचे आम्हाकडे पाठवावे. ते व आम्ही एकत्र होऊन याचा विचार करून सांगूं. " अशा प्रकारचा हा कांहींसा उद्धट जबाब ऐकून औरंगजेबास मोठा राग आला. त्यानें पुनः मराठ्यांवर शिस्त धरिली, व वाकिनखेड्याचा किल्ला घेण्याकरितां तो आपल्या फौजेसह निघून गेला. तो किल्ला एका लुटारू लोकांच्या नाइकाचे ताब्यांत होता. त्याचा व धनाजी जाधव याचा अतिशय स्नेह असल्यामुळें तो आसपासच्या मोंगलांचे मुलुखास फार त्रास देत असे. औरंगजेबानें त्या किल्ल्यास वेढा दिला, परंतु बाहेरून धनाजी जाधव त्यास अतिशय उपद्रव देऊं लागला; तेव्हां त्यानें झुलपिकारखान वगैरे सरदारांस आपल्या मदतीस घेऊन शेवटीं तो किल्ला सर केला. हें औरंगजेबाचें शेवटचें युद्धकृत्य. ( इ० स० १७०५ ).

औरंगजेब विजापुराकडे गेला असें पाहून मराठ्यांनीं महाराष्ट्रांत मोठा कहर करून दिला. रामचंद्रपंतानें पन्हाळा व पावनगड हे किल्ले घेतले, व परशुराम त्रिंबक यानें वसंतगड व सातारा हे किल्ले सर केले. साताराचा किल्ला मराठ्यांनीं परत घेतला, त्या संबंधानें अशी गोष्ट आहे कीं, पूर्वी झुलपिकारखानानें जिंजी सर केली त्या-वेळीं ज्या लोकांस कैद केलें होतें, त्यांत आनाजीपंत नांवाचा एक ब्राह्मण होता. तो पुढें युक्तीनें कैदेंतून पळाला, व त्यानें बैराग्याचा वेष घेतला. पुढें दक्षिणेंत परत येत असतां वाटेंत त्याची व मोंगलाची एक टोळी साताराचे किल्ल्यावर येत होती तिची गांठ पडली. आमचे बैराग्यास गाण्याचे उत्कृष्ट चुटके व कांहीं मनोरंजक गोष्टी येत असल्यामुळें थोडकेच वेळांत तो त्या टोळींतील लोकांचा प्यारा झाला, व ते त्यास घेऊन साताराच्या किल्ल्यावर

गेले. किल्ल्यांतील **मोंगलांच्या** शिबंदीवर आपला पूर्ण अंमल बसला असें पाहून आपला **मराठी** कावा लढविण्याचा विचार त्याचे मनांत आला. त्या वेळीं किल्ल्यांत मोळ्या, गवताचे भारे वगैरे जिन्नस विकण्याकरितां खालून पुष्कळ मावळे येत असत. पुढें **आनाजीपंतानें परशुराम** त्रिंबक यास आपला बेत सांगितला, तेव्हां त्यानें आपल्या हाताखालच्या बरेच मावळे लोकांच्या डोक्यावर मोळ्या व गवताचे भारे देऊन व त्यांत त्यांचीं हत्यारें लपवून ठेवून किल्ल्यांत पाठवून दिलें. पुढें **मोंगल** बेसावध आहेत असें पाहून **आनाजीपंतानें** त्यांच्यावर छापा घालून त्या सर्वांस ठार मारिलें व किल्ला हस्तगत केला. नंतर **मराठ्यांनीं सिंहगड, राजगड, पांडवगड, परळी** वगैरे बहुतेक किल्ले **मोंगलांपासून** परत घेतले. लाखों मनुष्यांचे बळी देऊन व कोट्यवधि रुपायांचा चुराडा करून जे किल्ले **औरंगजेबानें** जिंकून घेतले होते, ते एका क्षणांत **मराठ्यांनीं** परत घेतले, व **औरंगजेबास** जसजशी ज्यास्त फौजेची जरूर पडत चालली तसतशी ती कमी होत चालली.

या वेळीं त्याचे राज्यांत सर्वत्र बखेडे माजले होते. उत्तर-**हिंदुस्थानांतील रजपूत** लोकांशीं त्याचे एकसारखे तंटे सुरू होतेच. इ० स० १६८३ चे सुमारास **उदेपुरचा** राणा **राजसिंग** याचा व **औरंगजेबाचा** तह झाल्यावर तो लौकरच मरण पावला. त्याचेमागून त्याचा पुत्र **जयसिंग** हा गादीवर बसला, व सुमारें पांच वर्षेपर्यंत विशेष म्हणण्यासारखी गोष्ट झाली नाहीं. इ० स० १६८८ चे सुमारास पुनः लढाई सुरू झाली, व **मोंगलांनीं जयसिंगास** त्याचे राज्यांतून हाकून दिलें. **जोधपुरकरांबरोबर** एकसारखी लढाई सुरू होतीच, व **दुर्गादासानें** ती मोठ्या शूरपणानें

चालविली होती. यशवंतसिंगाचा पुत्र अजितसिंग अद्याप लहान होता. परंतु दुर्गादासानें त्यास बरोबर घेऊन तो जोधपुरच्या निरनिराळे रजपूत संस्थानिकांकडे गेला, आणि आपल्या बालराजाच्या व आपल्या राज्याच्या रक्षणाकरितां ते सर्व एकत्र झाले. अजितसिंग जसजसा मोठा होत चालला तसतशी त्याच्या शौर्याची प्रसिद्धि होऊं लागली. औरंगजेबानें या वेळीं जोधपुरच्या गादीस वारस ह्मणून महमदशाहा नांवाचा एक मनुष्य उभा केला, व ' हा यशवंतसिंगाचा पुत्र ' ह्मणून त्याची सर्वत्र प्रसिद्धि केली, आणि जोधपुरचा सुभेदार इनायतखान यास त्याला जोधपुरच्या गादीवर बसवावें ह्मणून आज्ञा केली. परंतु तो तोतया जोधपुरास येत असतां वाटेंतच मरण पावला. पुढें औरंगजेबानें इनायतखान यास काढून सुजायतखानास जोधपुरचा सुभेदार नेमिलें. परंतु राठोड लोकांनीं हल्ला करून त्याचा पराभव केला, व मालपुरा व मंदील एथील मोंगल लोकांची कत्तल केली. औरंगजेबानें पुढें सेफीखान नांवाच्या सरदारास जोधपुरचा सुभेदार नेमिलें. त्यानें " तुम्हास तुमचे गादीवर बसविण्याविषयीं बादशाहांचा हुकूम झाला आहे, याकरितां आपण जोधपुरास यावें, " असें बनावट पत्र अजितसिंगास पाठवून दिलें, व तो आला म्हणजे त्याचा घात करण्याचा निश्चय केला. अजितसिंग सुमारें वीस हजार राठोड बरोबर घेऊन निघाला, व कांहीं दगाफटका आहे किंवा काय याची बातमी काढण्याकरितां त्यानें आपल्या मुकुंद चंपावत नांवाचे सरदारास पुढें पाठवून दिलें. मुकुंद चंपावत यास सेफीखानाच्या कृष्णकारस्थानाची बातमी लागून त्यानें तो सर्व वृत्तांत अजितसिंगास कळविला. तथापि अजितसिंग न



डगमगतां जोधपुरास गेला व त्यानें सेफीखानास वेढा देऊन कोंडून धरिलें. त्यामुळें त्यास दांतीं तृण धरून अजितसिंगास शरण यावें लागलें. तेव्हां त्यानें त्यास सोडून दिलें. रजपूत लोकांनीं यापूर्वी पुष्कळ प्रसंगीं मोंगलांस अशा प्रकारची फाजील दया दाखविलेली आहे. एलफिन्स्टनप्रभृति इतिहासकारांचें असें मत आहे कीं, रजपूत लोकांनीं अशा प्रकारचें फाजील दयेचें वर्तन मोंगलांशीं ठेविलें नसतें, तर त्यांनीं एकंदर मोंगलाई फार लौकर उलथीपालथी करून टाकिली असती.

इ० स० १६८१ त औरंगजेबाचा पुत्र अकबर संभाजीकडे पळून गेला, त्या वेळीं त्यानें आपल्या मुलीस दुर्गादास याचे स्वाधीन केलें होतें. अजितसिंग वयांत आला होता व तीही उपवर झाली होती. तेव्हां त्या दोघांचा कदाचित् विवाह झाला तर त्याच्या योगानें आपणास मोठा कमीपणा येईल असें औरंगजेबास वाटूं लागलें. त्यामुळें त्यानें दुर्गादासाकडे आठ हजार मोहोरा पाठवून देऊन व त्यास पांच हजार स्वारांची मनसबदारी देऊं करून तिला परत आपणाकडे पाठवून देण्याविषयीं त्याच्याशीं बोलणें सुरू केलें. दुर्गादासानें तिचें आपल्या कन्येप्रमाणें पालन केलें होतें. त्यानें " झालोर वगैरे रजपूत संस्थानें आपण सोडून देत असाल तर आपली नात पाठवून देतों " असा औरंगजेबास निरोप पाठविला. औरंगजेबानें ती अट कबूल केली, व तो आपल्या नातीस परत घेऊन गेला.

इ० स० १६९९ च्या सुमारास अजितसिंगानें मोंगलांचा पराभव करून जोधपुर घेतलें, व तो आपल्या वडिलोपार्जित गादीवर बसला. परंतु अजीमशाहानें त्याचा पराभव केल्यामुळें त्यास तेथून पुनः झालोर येथें पळून जावें लागलें.

पुढें ती लढाई सुरू होतीच. इ० स० १७०५ च्या सुमारास जोधपुरचा मोंगलांचा शूर सुभेदार इब्राहिमखान यास बादशाहानें परत बोलाविल्यामुळें रजपूत लोकांची पंढरी पिकली. अजितसिंगानें बरोबर मोठी फौज घेऊन पुनः जोधपुरावर हल्ला करून तें घेतलें. २६ वर्षेपर्यंत जोधपूर औरंगजेबाचे ताब्यांत असून रजपूत लोकांशीं त्याची एकसारखी लढाई सुरू होती, व २६ वर्षेपर्यंत दुर्गादास[१] व अजितसिंग आपल्या शूर राठोड शिपायांसह आपली राजधानी परत मिळविण्याचा यत्न करीत होते. शेवटीं इ० स० १७०६ मध्यें त्यांनीं ती कायमची परत घेतली. या वेळीं रजपूत लोकांनीं मोंगलांची फार त्रेधा उडवून दिली. रागानें बेफाम झालेले व फार दिवस मोंगलांचे जुलमामुळें गांजून गेलेले रजपूत लोक मोंगलांवर तुटून पडले, व त्यांनीं एका क्षणांत त्यांची धूळधाण करून टाकिली. हजारों लोक मेले व हजारों पळून गेले. पूर्वीं मोंगलांनीं

---

१ दुर्गादास हा लूनी नदीचे कांठीं द्रुनेरा नांवाचा एक प्रांत आहे तेथील ठाकूर जातीचा होता. उदेपुरचा राणा राजसिंग यानें त्याच्याकडे अजितसिंगाच्या संरक्षणाचें काम सोंपविलें होतें, व तें त्यानें शेवटपर्यंत योग्य रीतीनें बजावून शेवटीं अजितसिंगास मारवाडची गादी प्राप्त करून दिली, व त्याबद्दल मुसलमान इतिहासलेखक व भाट त्याची फारच स्तुति करितात. त्याच्या प्रामाणिकपणाबद्दल दुसरी अशी एक गोष्ट सांगतात कीं, औरंगजेबाचा पुत्र अकबर यानें त्याचा आश्रय केला, त्या वेळीं अजीमशाहानें दुर्गादासाकडे चाळीस हजार मोहोरा पाठवून दिल्या, व त्या लांचास भुलून जाऊन तो अकबर यास आपले स्वाधीन करील असें त्यास वाटलें होतें. दुर्गादासानें अजीमशाहाचा तो हेतु तेव्हांच ताडला, व त्याचा तो लांच झुगारून देऊन आपला इमानीपणा कायम ठेविला—टाड.

जोधपूर घेतलें होतें त्या वेळीं तेथच्या रजपूत लोकांची कत्तल करून त्यांचीं घरेंदारें व संपत्ति यांचे तेच मालक बनले होते, त्या गोष्टीचा या वेळीं रजपूत लोकांनीं पक्का सूड उगविला. त्यांनीं तेथें स्थाईक झालेल्या मोंगलांची कत्तल करून आपलीं घरेंदारें पुनः परत घेतलीं. असें सांगतात कीं, त्या वेळीं मोंगल लोक आपला संशय कोणास येऊं नये म्हणून दिवसास तोंडानें 'सीताराम' 'हरगोविंद' असें म्हणून भिक्षा मागत, व रात्रीस तेथून दूर पळून जात. अशा रीतीनें अजितसिंगानें जोधपुरची गादी स्वपराक्रमानें पुनः प्राप्त करून घेतली.

आग्र्याचे आसपास जाट लोक व मुलतान प्रांतांत शीक लोक यांनीं बरेच दिवस बखेडे सुरू केले होते. औरंगजेबानें ते मिटविण्याकरितां पुष्कळ उपाय केले, परंतु शेवटीं त्यांचा कांहीं उपयोग झाला नाहीं, व त्याच्या कारकीर्दीच्या अखेरीस ते बरेच प्रबल होऊन बसले. दक्षिणेंत मराठे व उत्तर–हिंदुस्थानांत रजपूत, जाट व शीख यांच्या बखेड्यांमुळें सर्व हिंदुस्थान देश त्या वेळीं औरंगजेबावर उलटला होता असें म्हटलें तरी हरकत नाहीं.

मागें सांगितलेल्या मोठमोठ्या स्वाऱ्या करण्यांत औरंगजेबाचा अपार खजिना रिता पडला होता, व त्यामुळें त्याची स्थिति फारच शोचनीय झाली होती. शिपाई लोकांचा पगार थकत चालला, व ते तो मागावयास आले म्हणजे त्याचा अतिशय संताप होई. तो कपाळास आंठ्या घालून "मला लष्कराची जरूर नाहीं, याकरितां तुमची खुशी नसेल तर तुम्ही नोकरी सोडून चालते व्हा," असें तो त्यांस सांगे. तसेंच पैशाची टंचाई कमी होण्याकरितां त्यानें आपण होऊन आपलीं कांहीं पथकें कमी केलीं. औरंगजेबाच्या

फौजेसारख्या फौजेस वेळच्या वेळीं वेतन मिळणें जरूर होतें, व तें मिळेनासें झालें, तेव्हां ते उघड बंडावा करूं लागले. त्या वेळीं त्यानें झुलपिकारखानास एक पत्र लिहिलें आहे त्यांत तो असें म्हणतो कीं, " या चांडाळ पायदळाच्या गोंगाटानें माझे कान किटून गेले आहेत. कावळ्याच्या घरव्यांत कोणी शत्रु आला असतां जसे ते कावकाव करूं लागतात, त्याप्रमाणें हे लोक ओरडत आहेत." दुसऱ्या एका पत्रांत तो त्यास असें लिहितो कीं, " हल्लीं मला पैशाचा फार तोटा पडला आहे; जर कोणीं आपलें द्रव्य लपवून ठेविलें असेल तर त्याचा शोध करावा, व कोणाच्या जवळ असेल तर तें सर्व त्याजपासून हरण करावें. " वरील मजकुरावरून पैशाचे संबंधानें औरंगजेबाची काय स्थिति झाली होती तें चांगलें ध्यानांत येईल.

अशा स्थितींत औरंगजेब विजापुराहून अहमदनगर येथें येण्याकरितां निघाला. जसजशी त्याची फौज कमी होत चालली, तसतसे मराठे त्याच्या फौजेशीं भिडत चालले. ते त्याच्या छावणीपर्यंतचा मुलूख लुटूं लागले, त्याची धान्यसामग्री पळवून नेऊं लागले, दाणावैरण आणणार लोकांस वाटेंतच कापून टाकूं लागले, खजिना मधल्यामध्येंच लुटूं लागले, व अशा रीतीनें त्यास तुच्छ मानूं लागले. त्याच्या लष्करांतील हिंदु लोक मराठ्यांकडे येऊन मेजवान्या झोडूं लागले व जातांना " अलहमदुल्लिल्ला, आमचा यजमान औरंगजेब यास परमेश्वर उदंड आयुष्य देवो, व अशीच आमची चैन चालो, " असें थट्टेनें म्हणूं लागले. वाटेच्या श्रमानें औरंगजेबाचे ओझीं वाहणारे बैल व उंट थकून गेले होते, व त्याचे फौजेंतील मोंगल लोक हतवीर्य होऊन गेले होते. ते अस्ताव्यस्त व नाउमेद असे घाई-

घाईनें कूच करूं लागले; मराठ्यांचे बरकनदाज लोक व घोडेस्वार यांच्या बंदुकांच्या आवाजांनीं औरंगजेबाचे कान किटून गेले; भालेवाल्या लोकांच्या आरोळ्यांची व हल्ल्यांची त्यास मोठी दहशत बसली, व प्रतिक्षणीं "मराठे आतां वाटेंतच आपला फडशा करतात कीं काय ?" असें त्यास वाटूं लागलें. तथापि त्यानें एवढें मोठें लटांवर अहमदनगरास परत आणिलें व त्याबद्दल त्याची तारीफच केली पाहिजे. औरंगजेब मोठा धार्मिक व पुण्यशील होता म्हणूनच मराठ्यांच्या त्या कचाट्यांतून तो अहमदनगर येथें सुखरूप परत आला, असें कांहीं देवभोळ्या मुसलमान इतिहासकारांनीं लिहून ठेविलें आहे.

औरंगजेबाची प्रकृति दिवसेंदिवस क्षीण होत चालली होती, तथापि प्रतिदिवशीं दरबारांत येऊन तो आपला कारभार पहात असे. परंतु आंतून रोगग्रस्त प्रकृति व बाहेरून मराठे लोकांची भीति यांचे खालीं तो दडपून गेला होता. तो अहमदनगरास येऊन पोहोंचला त्या वेळीं "मी आतां आपल्या अखेरीच्या मजलेस येऊन पोहोंचलों" असें तो म्हणाला. त्यानें शेवटीं शेवटीं जीं पत्रें लिहिलीं आहेत, त्यांवरून त्याच्या दुष्ट कृत्यांबद्दल त्याच्या मनास होणारे क्लेश, ऐहिक सुखाविषयीं झालेली त्याची निराशा, व परलोकीं होणाऱ्या यातनांची भीति यांचे योगानें त्याच्या मनाची काय स्थिति झाली होती तें स्पष्टपणें दिसून येतें. आपल्या पित्यास कैदेंत टाकल्याबद्दल त्याला पश्चात्ताप झाला होता, असें त्याच्या कोणत्याही कृत्यावरून जरी दिसत नाहीं, तरी आपले पुत्र आपली आपल्या पित्याप्रमाणेंच स्थिति करितील कीं काय अशी त्यास मोठी भीति बसली होती, असें

स्पष्ट दिसतें; व त्यामुळें अंतकालीं त्यानें कोणासही आपल्याजवळ राहूं दिलें नाहीं.

मोअजीम यास त्यानें काबुलच्या सुभेदारीवर पाठवून दिलें होतें. त्यानें तेथून बादशाहास पत्र पाठविलें त्यांत असें लिहिलें होतें कीं, "अशा शेवटच्या कठिण प्रसंगीं आपल्या विचारास येईल असा कांहीं तरी राज्याचा बंदोबस्त करावा." परंतु औरंगजेबानें त्याचा भलताच अर्थ करून आपण जिवंत असतांच आपलें राज्य बळकाविण्याचा त्याचा विचार आहे, अशी शंका त्याचे मनांत आली. अजीमशाहा त्या वेळीं गुजराथच्या सुभेदारीवर होता. त्यानेंही बादशाहास एक पत्र पाठविलें, व त्यांत "गुजराथच्या हवेनें माझी प्रकृति नादुरुस्त झाली आहे, याकरितां आपण मला अहमदनगर येथें येण्याची परवानगी द्यावी," असें लिहिलें होतें. परंतु औरंगजेबानें तें पत्र पाहिलें, त्या वेळीं "शहाजहान अजारी असतां मीं जें निमित्त योजिलें होतें तें हेंच! महत्त्वाकांक्षेच्या रोगानें हवा जितकी लौकर बिघडते तितकी दुसऱ्या कोणत्याही रोगानें बिघडत नाहीं!!" असें तो म्हणाला. त्यानें अजीमशाहास अहमदनगर येथें येण्याची परवानगी न देतां त्याची तेथून माळव्याच्या सुभेदारीवर बदली केली. पुढें माळव्यांत जात असतां "आपल्या भेटीची मला फार उत्कंठा लागली आहे, तर एकवार मला येण्यास परवानगी असावी" अशी त्यानें पुनः आपले पित्यास आग्रहपूर्वक विनंती केली. त्या वेळीं बादशाहानें त्यास परवानगी दिली. परंतु भेट होतांच त्यानें त्यास सक्तीनें तेथून घालवून दिलें. कामबक्ष यास तर त्यानें अगोदरच विजापुरच्या सुभ्यावर पाठवून दिलें होतें.

ज्या अहमदनगराहून वीस वर्षांपूर्वी तो मोठ्या थाटानें आपला अवाढव्य सेनासमुद्र बरोबर घेऊन मराठ्यांचीं पाळेंमुळें खणून काढण्याकरितां, व सर्व हिंदुस्थानांत मोंगलांचें एकछत्री राज्य करण्याकरितां निघाला होता, त्याच ठिकाणीं तो छिन्नवैभव, हताश, ज्याच्या फौजेचा विध्वंस झाला आहे, व ज्याला मराठे लोकांची अतिशय धास्ती बसली आहे, असा मृत्यूच्या द्वाराशीं येऊन पडला. आपला अंतकाळ आतां समीप आला आहे असें त्यास वाटलें, त्या वेळीं त्यानें अजीमशाहास एक पत्र लिहिलें तें येणें प्रमाणें:—

" चिरंजीव शहाअजीमशाहा यासः—आशीर्वाद. माझें अंतःकरण तुझ्याकडे आहे. मला तर वृद्धावस्था प्राप्त होऊन अशक्ततेनें अगदीं ग्रस्त केलें आहे. माझ्या अवयवांतील एकंदर शक्ति नष्ट झाली आहे. मी या जगांत जसा एकटाच व परस्थ म्हणून आलों, तसा एकटाच व परस्थ म्हणून येथून जाणार. मी कोण व कशाकरितां जन्मलों, आणि माझ्या प्रालब्धीं काय लिहून ठेविलें आहे, हें मला कांहींच माहीत नाहीं. जो क्षण सुखांत गेला त्यानें आपल्या पश्चात् दुःख मात्र राखून ठेविलें. मी माझ्या राज्याचा संरक्षकही झालों नाहीं आणि पालकही झालों नाहीं. माझें बहुमोल आयुष्य व्यर्थ गेलें. माझ्या अंतःकरणांत सदसद्बुद्धीनें जशी जशी प्रेरणा करावी, तसा तसा मी वर्तन करीत गेलों. माझ्यामध्यें सदसद्विचारशक्ति नसे असें नाहीं. परंतु तिचा कडक प्रकाश माझ्या धुंद दृष्टीनें मला दिसला नाहीं. आयुष्याची शाश्वति नाहीं, ही गोष्ट मीं आपले मनांत वागविली नाहीं. गेलेला श्वास परत येत नाहीं आणि यामुळें पुढें माझ्या शाश्वत कल्याणाची मला आशा

नाहीं. माझे शरीरांत जो ज्वर असे तो निघाला आहे; व आतां तरी पुढें अस्थि आणि चर्म हींच काय तीं अवशिष्ट रहावयाचीं आहेत. प्रियपुत्र कामबक्ष हा जरी विजापुराकडे गेला आहे, तरी तो माझे जवळ आहे असें मी समजतों. प्रिय पुत्रा ! तूं तर त्याच्याहूनही जवळ आहेस. परंतु मोअजीम मात्र फार दूर आहे. माझा लाडका नातू ( मोअजीम याचा द्वीतीय पुत्र अजीम उश्शान ) हा ईश्वरी कृपेनें हिंदुस्थानाजवळ येऊन पोहोंचला आहे. माझा फौजफांटा आणि बाजारबुणगें हीं आतां माझ्याप्रमाणेंच त्रासून निराधार आणि निश्शस्त्र झाल्यासारखीं होतील, व त्यांच्याही जीवास माझ्याप्रमाणेंच शांति व समाधान यांचा अभाव होऊन त्यांच्या जीविताची पाण्याचे बुडबुड्याप्रमाणें किंवा आरशाचे मागील कल्हईप्रमाणें शाश्वति नाहीं हें सिद्धच आहे. त्यांचा राजा ( मी ) नाहींसा झाल्यावर त्यांना कोणी धनी किंवा पोशिंदा मिळेल किंवा नाहीं, हें त्या बिचाऱ्यांस मुळींच माहीत नाहीं. मीं या जगांत कांहीं एक बरोबर आणिलें नाहीं, आणि आतां या जगांतून जातांना मनुष्याचे ठायीं असणारी प्रत्येक गोष्टीची अशाश्वति आणि अनियमितता हीं मात्र मी बरोबर नेत आहें. मला मुक्ति कशी मिळेल याची मला मोठी भीति वाटत आहे; आणि ईश्वराचे सन्निध मला कोणकोणत्या भयंकर शिक्षा व यातना भोगाव्या लागतील त्या कोणास माहीत ! ईश्वर हा कृपाळु आणि दयानिधि आहे, हें मला पूर्णपणें माहीत आहे, व त्यावर माझा दृढतर विश्वास आहे. परंतु मजकडून जीं अघोर व अक्षम्य पातकें घडलीं आहेत, त्यांबद्दल कृपाळू दयासागर परमेश्वरानें मजवर आपली प्रेमळ दृष्टि कशी ठेवावी, हें मला समजत नाहीं; आणि यामुळें माझें चित्त

भीतिग्रस्त झालें आहे. माझें प्राणोत्क्रमण झाल्यावर माझे पश्चात् माझें प्रतिबिंब म्हणून कांहींएक राहणार नाहीं. असो. मीं आपलें जहाज मृत्यूच्या अगाध समुद्रांत ढकललें आहे खरें; तें आतां कोणत्याही प्रकारच्या यातना, विपत्ति किंवा भीति यांच्या उंच लहरींवर जावो, चढो, कोठेंही आदळो किंवा पडो. ईश्वर माझे पश्चात् माझे मुलांस विजय व वैभव देण्यास समर्थ आहे. तथापि त्यांनीं आपलें आवश्यक कर्तव्य तें केलें पाहिजे. माझा लाडका नातू ( बेदर बख्त ) याचेवर ईश्वराची कृपा असावी म्हणून मी प्रार्थना करितों. बेदर बख्त याची व माझी आतां भेट होणार नाहीं, परंतु त्यास भेटावें अशी मला इच्छा होत आहे. माझी कन्या बेगम ही फार त्रस्त झाल्यासारखी दिसत आहे. परंतु ईश्वर हाच सर्वांच्या हृदयांत काय आहे याचा न्याय करण्यास समर्थ आहे. स्त्रियांचे मूर्खपणाचे व भलभलते विचार त्यांच्या निराशेशिवाय त्यांना दुसरें कांहीं प्राप्त होऊं देत नाहींत. हेंच कायतें माझें शेवटचें म्हणणें. आतां येतो ! येतों ! ! येतों ! ! ! "

कामबक्ष यासही त्या वेळीं त्यानें एक अशाच प्रकारचें पत्र लिहिलें होतें. तें येणेंप्रमाणें:—

" राजपुत्र कामबक्ष यास:—माझ्या जिवाच्या जिवलग पुत्रा ! माझ्या चालत्या काळांत ईश्वरी आज्ञेनें व त्याच्या इच्छेप्रमाणें, मीं तुला माझ्यांत सामर्थ्य होतें तितक्या रीतीनें सर्व प्रकारच्या शहाणपणाचा उपदेश आणि ज्ञानतत्त्वाच्या गोष्टी कळविल्या. परंतु तुझ्या अप्रौढ बुद्धीप्रमाणें तूं माझ्या सांगण्याकडे जितकें लक्ष्य द्यावयास पाहिजे होतें तितकें दिलें नाहींस. असो. मी आतां येथून

एखाद्या उतारूप्रमाणें जातों. मीं आपलें आयुष्य व्यर्थ घालविलें याबद्दल मला फार वाईट वाटतें, परंतु आतां त्याचा उपयोग काय ? मला माझ्या पातकांचें व अविचारांचें फल भोगिलें पाहिजे व तेंच शेवटीं मजबरोबर यावयाचें. मीं जन्मास येऊन कांहीं एक केलें नाहीं, याबद्दल परमेश्वर खचित आश्चर्य करीत असेल. मी एकटाच व्यर्थ आलों, आणि मी एकटाच जावयाचा. मी केलेल्या पापकर्मांचा वांटेकरी कोणीही होणार नाहीं. मीं आपला आत्मा अनेक दुष्कृत्यांनीं अत्यंत मलिन केला आहे. मला बारा दिवस सतत ज्वर येत होता, परंतु तो आतां गेला. जिकडे तिकडे मी पहातों तिकडे तिकडे मला ईश्वरी साक्षात्कार दिसतात. त्यांशिवाय दुसरें कांहीं दिसत नाहीं. माझ्या सैन्याचें, माझ्या बाजारबुणग्याचें आणि माझ्या पोटाचें आतां कसें होईल, ही जी मला चिंता आहे, तिचा उपयोग काय ? हाय हाय ! कोण हा दुर्वह लोभ आणि मायापाश ! माझी काय दशा होईल तें मला कांहींच दिसत नाहीं ! माझी कंबर जणूकाय मोडून गेली आहे; आणि माझे पाय केवळ तुटल्यासारखे होऊन मला चलनवलन देखील करण्याची शक्ति राहिली नाहीं. जो श्वास जातो तो बरा गेला असें प्रत्येक उच्छ्वासाला वाटत आहे. मी बहुत पातकें व घोरकृत्यें केलीं, त्यांबद्दल ईश्वर मला काय शासन करील तें कळत नाहीं. आतां माझे पश्चात् माझें सैन्य व शिबंदी यांचा माझे मुलांनीं बंदोबस्त ठेवावा. त्यांस मी इमानी आणि योग्य अधिकारी समजून त्यांच्या स्वाधीन माझा सर्व प्रकारचा वारसा व अधिकार परमेश्वरास साक्षी ठेवून सुपूर्त करितों. अजीमशाहा जवळच आहे. मजशीं जे प्रामाणि-

कपणानें वागले त्यांचा प्राणनाश मीं केला नाहीं, व त्यांच्याबद्दलचें अपयश माझे माथ्यावर येण्याचें कारण नाहीं. ज्या अर्थी आतां मी हा लोक सोडून जात आहें, त्या अर्थी मी तुला, तुझे आईला व तुझे मुलाला ईश्वराच्या पाखरेखालीं ठेवून जातों. तो तुमचें रक्षण करील. मरणकाळच्या यातना व क्लेश मला एका मागून एक भासूं लागल्या आहेत. बाहादुरशाहा अजून जेथें होता तेथेंच आहे. परंतु त्याचा पुत्र हिंदुस्थानाजवळ येऊन पोहोंचला आहे. बेदर बख्त हा गुजराथेंत आहे. हय्यत अल् निसा ( हा कोण होता तें कळत नाहीं ) यानें आजपर्यंत कोणत्याही प्रकारचा दुःखाचा अनुभव घेतला नव्हता, त्यावर हल्लीं दुःखसंकटांचा केवळ वर्षाव होत असून त्यांजमध्यें तो अगदीं बुडून गेला आहे. बेगमेची काळजी घे. उदेपुरी[१] हिनें माझ्या दुखण्याचे संबंधानें फार कष्ट घेऊन बहुत श्रम सोशिले, व ती माझ्याशीं सहगमन करण्याची इच्छा करिते. परंतु कोणतीही गोष्ट प्रसंगाप्रमाणें होणारी आहे. आपल्या कुटुंबांतले किंवा दरबारचे जे लोक असतील, मग ते अप्रामाणिकपणानें किंवा अविश्वासानें वागले तरी चिंता नाहीं, त्यांना वाईट रीतीनें वागवूं नकोस. आपले हेतु

---

१ उदेपुरी महाल ही जार्जिया येथील ख्रिस्ती जातीची होती तिला दारानें विकत घेतलें व त्याचा वध केल्यानंतर तिला औरंगजेबानें आपल्या जनानखान्यांत नेऊन ठेविलें असें हंटर साहेबांनीं मानूसी नामक इतिहासकर्त्याचा जो उतारा घेतला आहे त्यांत लिहिलें आहे. परंतु कीन साहेबांनीं अलमगीरनाम्याचा आधार देऊन ती रजपूत असून जोधपुरच्या सिसोदी वंशापैकीं होती असें लिहिलें आहे; व तिच्या नांवावरून ती रजपूत जातीची होती असें वाटतें.

आणि उद्देश सिद्धीस न्यावयाचे असतील तर सभ्यता आणि युक्ति यांनींच तुझें काम होईल, व याच गुणांची सर्वकाळ जरूर आहे. अंथरूण पाहून पाय पसरावे. आपल्या शक्तीप्रमाणेंच एखादें काम करण्यास हात घालावा; फौजेंतील लोकांचा मुशाहिरा देण्याचें राहिलें असून त्यांच्या तक्रारी आणि कुरकुरी अद्याप शिलक आहेतच. दारा यानें न्यायानें व सदिच्छेनें आपले लोकांस बैठे पगार देण्याचें ठरविलें होतें. तरी त्याजकडून त्यांना अगदींच थोडा पगार मिळत गेला, व त्यामुळें त्याचे लोक त्याच्यावर नाखुष असत. आतां मी जातों. जें कांहीं बरेंवाईट माझे हातून झालें, तें मी केवळ तुझ्याकरितां केलें. मजविषयीं तुझा भलताच कांहीं ग्रह होऊं देऊं नकोस, व तुला मजकडून कधीं दुःख व शिक्षा झाली असेल तर तिचें स्मरणही करूं नकोस. त्याबद्दलचा आतां हिशेबच नाहीं. असें समज कोणींही आपला जीव कुडींतून निघून जातांना पाहिला नाहीं, परंतु मला माझा जीव माझ्या कुडींतून कसा निघून जात आहे तें दिसत आहे ! हाय हाय ! ! ”

वरील दोन पत्रांवरून एवढा मी मी म्हणणारा औरंगजेब परंतु त्याची अंतकाळीं काय स्थिति झाली होती व त्यानें केलेलीं भयंकार पातकें मूर्तिमंत डोळ्यांपुढें उभीं राहून परलोकीं होणाऱ्या यातनांबद्दल तो किती भिऊन गेला होता, हें स्पष्टपणें दिसून येतें. ज्यांचे हातून दुष्ट कृत्यें झालेलीं असतात त्यांची अंतीं अशीच गति व्हावयाची.

---

१ टाडकृत राजस्थानचा इतिहास.

अशा रीतीनें वैभवाचा ऱ्हास होऊन व मनास व शरीरास अतिशय क्लेश होऊन औरंगजेब तारीख ४ मार्च इ० स० १७०७ रोजीं पन्नास वर्षें बादशाही भोगल्यानंतर आपल्या वयाच्या ८८ व्या वर्षी सकाळची प्रार्थना म्हणून व नमाज पढून अहमदनगर येथें मृत्यु पावला. " या मृन्मय शरीरास कफन न घालतां जवळच कोठें तरी नेऊन पुरा " या त्याच्या आज्ञेप्रमाणें त्याला दौलताबादेजवळ रोझें येथें मुसलमान साधुसंतांच्या थडग्यांच्या शेजारीं अगदीं साध्या रीतीनें मूठमाती दिली.

औरंगजेब वारला त्या वेळीं त्याचे उशाखालीं एक मृत्युपत्र सांपडलें. त्यांत त्यानें असें लिहून ठेविलें होतें कीं, " मोअजीम यास सर्वांनीं बादशाहा असें कबूल करावें, आणि तो व अजीमशाहा या दोघांनीं राज्याचे हिस्से पाडून घ्यावे. एकानें उत्तरेकडील व पूर्वेकडील विभाग घेऊन दिल्ली येथें रहावें, व दुसऱ्यानें दक्षिणेकडील व नैर्ऋत्येकडील विजापूर व गोवळकोंडें या दोन राज्यांखालीं मोडणारा मुलूख शिवाय करून बाकीचा विभाग घ्यावा, व आग्रयास राहून राज्यकारभार चालवावा; आणि विजापूर व गोवळकोंडें येथील राज्य कामबक्ष यानें करावें.

---

१ त्यानें दुसरें एक मृत्युपत्र केलें होतें, व तें, त्याचें मन अंतकाळच्या वेदनांनीं व्यग्र झालें नव्हतें अशा वेळीं केलें होतें, असें दिसतें. त्यांत त्यानें आपल्या राज्याची व्यवस्था करून शेवटीं आपल्या उत्तरकार्याचीही व्यवस्था करून ठेविली होती. तो लिहितो कीं, मीं स्वतः टोप्या करून विकल्या त्यांच्या उत्पन्नापैकीं ४॥ रुपये शिलक आहेत तेवढ्या रकमेनें माझें उत्तरकार्य करावें, व कुराणाच्या प्रती करून जे ८०५ रुपये मिळविले आहेत त्यांचा गोरगरिबांस दान-

(पुढें चालू.)

डाक्टर गेमेली क्यारेरी हा तारीख २१ मार्च इ० स० १६९९ रोजीं औरंगजेबास भेटावयास गेला होता. तो त्याचें असें वर्णन करतो कीं, तो ठेंगणा व सडपातळ होता, आणि वयातीत झाल्यामुळें त्याच्या पाठीस पोंक आलें होतें. त्याचें नाक लांब होतें. त्याची पांढरी शुभ्र वाटोळी दाढी त्याच्या पिंवळट अंगवर्णावर विशेष खुलत असे. त्याचा पोषाग साध्या पांढऱ्या मलमलीचा असून त्याच्या पागोट्यास सोनेरी फीत लाविलेली होती, व त्यावर एक मोठा पाचेचा खडा असून त्याच्या सभोंवार दुसरे चार लहान पाच होते. त्याच्या अंगरख्याचे बंद उजव्या हाताखालीं बांधलेले होते. त्याच्या कमरेस रेशमाचा पट्टा असून त्याला त्याचा खंजीर लटकत होता. त्याचा जोडा (आफ्रिकेंतील) मूर लोकांच्याप्रमाणें असून, त्याचे पाय उघडे होते. त्याच्या डोक्यावर हिरवें राजछत्र असून दोन्ही बाजूंस दोन नोकर चवऱ्या वारीत होते. तो काठीला टेंकून उभा राहून अर्ज वगैरे घेत होता, त्यांवर स्वतः शेरे मारीत होता, व त्या वेळीं त्याची मुद्रा हसतमुख होती.

या ठिकाणीं आम्हीं हातीं घेतलेल्या चरित्राचा शेवट झाला. आतां चरित्रकथनाच्या रीतीप्रमाणें थोडासा उपसंहार लिहून आम्हीं आमच्या तूर्तच्या कारागिरींतून मोकळे होतों.

---

(मागील पृष्ठावरून पुढें चालू.)

धर्म करावा.—एल्फिन्स्टन. [प्रत्येकानें आपल्या स्वतःच्या कमाईनें मिळविलेल्या द्रव्याचा उपयोग आपल्या उत्तरकार्याकरितां होईल अशी तजवीज ठेवावी अशी मुसलमानी धर्मशास्त्राची आज्ञा आहे.]

# उपसंहार.

राजपुत्रांस बालपणीं कोणत्या प्रकारचें शिक्षण पाहिजे या संबंधानें औरंगजेबाचे विचार.—औरंगजेबाचा गुरु मुल्ला शाहा त्यास भेटावयास येतो, व आपणास बालपणीं निरुपयोगी शिक्षण दिल्याबद्दल औरंगजेब त्याची निर्भर्त्सना करितो.–शहाण्या राज्यकर्त्याचें कर्तव्यकर्म काय या संबंधानें शहाजहान बादशाहास त्यानें पाठविलेलें पत्र.–औरंगजेबाची राजनिति शाब्दिक होती किंवा तो बोलल्याप्रमाणें चालत असे.–त्याचे बोल व कृति हीं अगदीं भिन्न होतीं.–राज्यप्राप्तीकरितां त्यानें आपल्या बंधूंचे केलेले खून, व त्या संबंधानें योग्यायोग्य विचार.—औरंगजेबाच्या हातून क्रूर कृत्यें झालीं किंवा नाहीं.–औरंगजेबाची धर्मसंबंधी वागणूक.–औरंगजेबाचा निग्रही, कंटक, व मेहनती स्वभाव.–राज्यकारभाराचे संबंधानें त्याचें कोत्या नेजरेचें वर्तन, व त्याचा संशयी व बेभरंवशी स्वभाव.–त्याची आपल्या सरदारांशीं वर्तणूक.–त्याची स्वतःच्या पुत्रांशीं वागणूक.–अजीमशाहानें बंड वगैरे करूं नये म्हणून त्यानें एके प्रसंगीं अजीमशाहाबरोवर केलेली वर्तणूक.—त्याचा धर्मसंबंधी दुराग्रह व त्याचें राज्यकारभाराशीं संमेलन.—औरंगजेबाचे संबधानें कर्नल टाड यांचें मत.–विजापूर व गोवळकोंडें हीं राज्यें बुडविण्यांत त्यानें केलेली चुकी.–शिवाजीचा अपमान केल्यामुळें त्याचें झालेलें नुकसान.—औरंगजेबाचे राज्याचा वसूल.—औरंगजेब कसा असता तर लोकप्रिय झाला असता.

औरंगजेबाचें जन्म इ० स० १६१८ त झालें, व आपले बंधु व त्यांचा कुटुंबवर्ग यांपैकीं कांहींचे खून करून व कांहींस देशोधडीस लावून, व आपल्या पित्यास

कारागृहांत ठेवून अन्यायानें प्राप्त करून घेतलेल्या मोंगल-पदपादशाहीवर तो दिल्ली येथें इ० स० १६५८ त आरूढ झाला. आपणास लहानपणीं योग्य असें शिक्षण मिळालें नाहीं म्हणून त्याला फार वाईट वाटत असे. ज्यांना पुढें राज्यसूत्रें चालवावयाचीं आहेत, त्यांचें शिक्षण कोणत्या धर्तीवर पाहिजे या संबंधानें औरंगजेबाचे विचार फार प्रगल्भ होते. बरनीर साहेब या संबंधानें असें लिहितात कीं, " ज्या अर्थी इतर लोकांच्या मानानें पहातां राजपुत्रांचें जनन उच्च कुलांत झालेलें असतें व त्यांचा दर्जाही उच्च असतो, त्या अर्थी त्यांचे अंगीं शहाणपण व सद्गुण हेही ज्यास्त प्रमाणानेंच वसले पाहिजेत. आशिया खंडांतील राजांची दुःखद स्थिति, गैरशिस्त राज्यव्यवस्था, व त्यामुळें त्यांचा शेवटीं होणारा नाश याचें मुख्य बीज राजपुत्रांस बाळपणीं मिळालेलें अपुतें व अतैव घातुक शिक्षण हें होय, असें औरंगजेबास वाटत असे. राजपुत्र म्हटले म्हणजे बाल्यावस्थेपासून जनानखान्यांत रशिया, सरकेशिया, मिंग्रेलिया, जार्जिया किंवा युटोपिया येथच्या गुलाम करून आणलेल्या दासदासींच्या स्वाधीन केलेले असावयाचे. वर सांगितलेलीं माणसें नीच धंद्यांत पडलेलीं असल्यामुळें त्यांचीं मनें नीच असावयाचींच—वरिष्ठांशीं हांजीहांजीपणा करावयाचा व नम्रता दाखवावयाची, व हाताखालच्या नोकरांशीं गर्विष्ठपणानें वागून त्यांच्यावर जुलूम करावयाचा. तेव्हां अशा स्थितींत लहानाचे थोर झालेले वर सांगितलेल्या प्रकारचे राजपुत्र राज्यपदारूढ होण्याकरितां जनानखाना सोडून बाहेर पडले म्हणजे त्यांचें खरें कर्तव्य त्यांस मुळींच कळत नसतें. आपण काय स्वर्गातून खालीं उतरलों किंवा पाताळांतून वर आलों असें त्यांस वाटूं लागतें, व त्यांच्यासभोंवार जी जी

गोष्ट त्याच्या नजरेस पडते तीबद्दल त्यांस मूळची कांहींच कल्पना नसल्यामुळें एखाद्या मूर्खाप्रमाणें तिचें त्यांस आश्चर्य वाटत असतें. "

औरंगजेब बादशाहा झाल्यावर त्याचा गुरु मुल्ला शाहा हा, आपणास आपला जुना शिष्य आतां खातरीनें उमराव करील या आशेनें त्याला भेटावयास गेला, व त्यानें त्या कामांत रोषनार बेगम हिला मध्यस्थीस घातलें. परंतु तीन महिनेपर्यंत औरंगजेबानें त्याची दाद घेतली नाहीं. पुढें एके दिवशीं दानिषमनखान व दुसरे तीन चार विद्वान् लोक बरोबर घेऊन तो आपल्या खासगी बैठकीच्या दिवाणखान्यांत गेला, व तेथें आपल्या गुरुवर्यास बोलावून आणून त्यानें त्याच्या पूजेस आरंभ केला. तो त्यास म्हणाला, " कसें काय, मुल्लाजी ! आपली काय इच्छा आहे ? आपले मनांत मी आपणास उमराव करावें असें आहे, परंतु तें पद मिळविण्यास योग्य असे गुण आपले अंगीं आहेत किंवा नाहींत तें मला अगोदर पाहिलें पाहिजे. लहाणपणीं तुम्हीं मला उत्कृष्ट शिक्षण दिलें असतें, तर मला तुम्हांस उमराव करणें भाग होतें.....परंतु तुम्हीं मला शिकविलें तें काय ?—फ्रांजिस्तान ( युरोप ) एक लहानसें बेट आहे; तेथें पूर्वीं पोर्तुगालचा राजा मोठा बलवान् होता, नंतर हालंडचा राजा मोठा बलवत्तर झाला, व मागून इंग्लंडचा राजा त्या सर्वांत बलिष्ठ झाला. फ्रांजिस्तानच्या दुसऱ्या राजांच्या संबंधानें आपण मला सांगितलें कीं, फ्रान्स व अंदालूशिया येथील राजे इकडील लहानसान राजेरजवाड्यांप्रमाणें आहेत; हिंदुस्थानच्या बादशाहांच्या तेजापुढें ते सर्व दिपून जात आहेत; जगामध्यें अतिशय सुखी, श्रेष्ठ, जगज्जेते व पृथ्वीपालक असे फक्त हुमायून,

अकबर, जहांगीर, व शहाजहान एवढे चार बादशाहा होऊन गेले; इराण, उसबेग, काशगार, काथे ( चीनच्या उत्तरेस एक राष्ट्र होतें ), पेगू, सयाम, चीन, महाचीन येथील राजे हिंदुस्थानच्या बादशाहांचें नांव ऐकून कंपायमान होतात;—हेंच कीं नाहीं ? वाः ! आपणास भूगोलाची फार चांगली माहिती आहे ! आपलें ऐतिहासिक ज्ञानही फार अगाध आहे ! ! पृथ्वीवरील प्रत्येक राष्ट्राच्या संबंधानें मुख्य मुख्य गोष्टींचे शिक्षण मला देणें ही गोष्ट माझ्या गुरुजींनीं करावयास पाहिजे होती कीं नाहीं ? त्याचप्रमाणें त्या राष्ट्राचें उत्पन्न, त्याची शक्ति, त्याची लढाई करण्याची रीति, त्याचा धर्म, त्याची राज्यव्यवस्था, व त्याचें खरें कल्याण कोणत्या गोष्टींत आहे, तसेंच निरनिराळे इतिहास वाचून निरनिराळीं राष्ट्रें कशीं निर्माण झालीं, त्यांचा उदय व अस्त कसा झाला, ज्यांच्या योगानें अशा प्रकारचे मोठमोठे फेरफार व उलाढाली झाल्या अशा मुख्य मुख्य गोष्टी, किंवा अकस्मात् घडून आलेल्या गोष्टी, किंवा चुक्या कोणाकडून काय झाल्या, इत्यादि गोष्टींचें शिक्षण तुम्हीं मला देणें जरूर होतें कीं नाहीं ? मानवी जातीच्या इतिहासाचें व्यापक व प्रगल्भ ज्ञान मिळण्याची गोष्ट तर लांबच राहिली, परंतु या माझ्या राज्याची स्थापना करणाऱ्या माझ्या थोर थोर सर्व पूर्वजांचीं नांवें सुद्धां तुम्हीं मला शिकविलीं नाहींत ! त्यांचीं चरित्रें, त्यांनीं केलेले पराक्रम, व मोठमोठे जय मिळविण्याचे कामीं खर्च झालेली त्यांची अचाट शक्ति व बुद्धिमत्ता या संबंधानें कांहीं तरी माहिती तुम्हीं मला सांगितली का ? कोणत्याही राजाला त्याच्या राज्याचा ज्या इतर राष्ट्रांशीं संबंध पोहोंचतो त्या सर्व राष्ट्रांच्या भाषा येणें जरूर आहे. तुम्हीं मला

फक्त आरबी भाषा शिकविली, व त्या भाषेंत विशारदत्व मिळविण्यास निदान दहा बारा तरी वर्षें लागतात, तेव्हां माझ्या आयुष्याचा एवढा मोठा भाग तुम्हीं व्यर्थ घालविला, एवढा मात्र माझ्यावर जन्माचा उपकार तुम्हीं केला. राजपुत्रास शिक्षण देणें आहे तर त्यांत कोणत्या विषयांचा समावेश झालाच पाहिजे, याचा विचार न करितां तुम्हीं मला व्याकरण वगैरे फार चांगलें शिकविलें, व अशा रीतीनें निरुपयोगी, त्रासदायक व ज्याचा अंत कधींच होणार नाहीं असें शाब्दिक ज्ञान मला शिकविण्यांत माझ्या तारुण्याचे बिनमोल दिवस व्यर्थ खर्च केले !.....कायरे लुच्चा ! राजा व प्रजा यांचें एकमेकांशीं काय नातें आहे व त्यांचे परस्पर धर्म कोणते, एवढी तरी गोष्ट तूं मला शिकविणें जरूर होतें कीं नाहीं ? पूर्वी हिंदुस्थानचे जे बादशाहा होऊन गेले त्यांच्या मुलांप्रमाणें मलाही केव्हां तरी हातांत तरवार घेऊन राज्यप्राप्तीकरितां व स्वतःचा जीव बचाविण्यासाठीं बंधूंशीं सामना देण्याकरितां रणांगणीं उभें रहावें लागेल, ही गोष्ट तुझ्या लक्ष्यांत आली नाहीं काय ? लढाई कशी करावी, वेढा कसा द्यावा, सैन्य कोणत्या रीतीनें उभें करावें, यापैकीं कांहीं तरी तूं मला शिकविलें का ? या कामीं तुझ्यापेक्षां अधिक शहाण्या लोकांची सल्ला घेण्याची मला बुद्धि झाली, हें माझें मोठें भाग्यच समजलें पाहिजे ! आतां आपण आपल्या गांवीं चालते व्हा. यापुढें, पूर्वी तुम्हीं कोण होतां, व पुढें तुमचें काय झालें तें कोणासही कळणार नाहीं तर फार चांगलें होईल ! " अशा रीतीनें यथासांग पूजा केल्यावर त्यानें आपल्या गुरुजींस घालवून दिलें. आतां अशा प्रकारें गुरूचा उपहास करणें म्हणजे थोरपणाचें चिन्ह आहे असें

नाहीं. परंतु राजपुत्रांचें शिक्षण कोणच्या पद्धतीवर पाहिजे या संबंधानें औरंगजेबाचे विचार खरोखरच फार पोक्तपणाचे होते असें त्याच्या वरील भाषणावरून स्पष्ट दिसून येईल. उपयुक्त ज्ञानाचें शिक्षण न देतां भलतेंच निरुपयोगी घोकींव शिक्षण देण्यापासून कांहीं एक फायदा नसून मुलांकडून ते श्रम व्यर्थ करविल्यासारखें होतें; तेव्हां त्याबद्दल तीं मुलें पुढें जाणतीं झालीं म्हणजे त्यांच्याकडून औरंगजेबाप्रमाणेंच आपल्या गुरूंचा निषेध व्हावयाचा ! त्याचप्रमाणें औरंगजेबाच्या वरील लेखावरून हेंही ध्यानांत ठेवावयाचें कीं, मुलांचा परभाषेचें अध्ययन करण्यांत किती काळ फुकट जातो, व त्यामुळें आवश्यक ज्ञान शिकण्यास त्यांस किती विलंब होतो; परभाषा शिकण्यांत कालव्यय करण्यापेक्षां त्या भाषेंतलें ज्ञान स्वभाषेच्या द्वारानें मुलांस दिल्यास त्यांचा किती काळ वांचेल बरें, व तोच दुसऱ्या उपयुक्त विद्याभ्यासाकडे आणि ज्ञान संपादनाकडे लाविला तर किती फायदा होईल बरें ? औरंगजेबाच्या वरील लेखाचें पर्यवसान आपल्या देशाच्या सद्यःस्थितीवर तर उत्तम प्रकारें लागू होण्यासारखें आहे. बुद्धिवान मुलाला इंग्रजी भाषेचा चांगला परिचय होण्यास कमींत कमी सात वर्षें तर लागतातच. तेव्हां मग त्या भाषेंतील अनेक ग्रंथावलोकनाचा अधिकार त्यांस येतो. आणि ह्याप्रमाणें सात वर्षें केवळ परभाषेचा अभ्यास करण्यांत दवडावीं लागतात. तेवढ्या काळांत देशभाषेमध्यें अनेक उपयुक्त विषय शिकून त्यांमध्यें प्रावीण्य मिळवितां येईल. ज्या अर्थी आपल्या देशांत इंग्रजी राज्य आहे, त्या अर्थी ती भाषा शिकणें अगत्याचें आहे. परंतु मनुष्याच्या ज्ञानतत्त्वाचें सर्व भांडार आणि साहित्य केवळ त्याच भाषेंत राखून ठेवून ती भाषा

शिकल्याशिवाय इतर नुसत्या देशभाषांतून तें विविध-विषयक ज्ञान एतद्देशीय लोकांस मिळूं नये, व त्यासाठीं कोणींही देशहितचिंतकांनीं व अभिमान्यांनीं यत्न करूं नये ही मोठी शोचनीय आणि लाजिरवाणी गोष्ट आहे ! सर्व ज्ञानप्राप्तीच्या वाटा परभाषाधीन असणें हेंच देशांतील मूर्तिमंत अज्ञान होय ! आमचे आधुनिक विद्वान् या गोष्टी-कडे लक्ष्य पुरवितील व स्वभाषेंत पुस्तकरूपानें उपयुक्त ज्ञानाचा सांठा करितील तर ते आमच्या कर्तव्यास जागले असें होऊन त्यांचे आपल्या मागसलेल्या देशभाषे-वर अतिशय उपकार होतील व त्याबद्दल होतकरू व पुढें होणारे विद्वान् लोक त्याचे अत्यंत ऋणी होतील यांत शंका नाहीं.

शहाण्या राज्यकर्त्याचें कर्तव्यकर्म काय, या संबंधाचेही औरंगजेबाचे विचार फार प्रौढ होते. एकदां एका मोठ्या उमरावानें औरंगजेबास असें सांगितलें कीं, " खाविंद ! आपण नेहमीं मोठमोठया कामांत व्यग्र असतां यामुळें आपली शरीरप्रकृति नीट राहणार नाहीं, व त्या कारणानें कदाचित् आपलें मानसिक स्थैर्य व धैर्य यांसही धक्का पोहों-चण्याचा बराच संभव आहे." त्या उमरावाचे हे शब्द न ऐक-ल्यासारखें करून औरंगजेब दुसऱ्या एका विद्वान् उमरावा-कडे वळला व त्याला म्हणाला:—" विद्वान् लोक हो ! कोणताही कठिण प्रसंग प्राप्त झाला असतां राज्यकर्त्यानें आपलें स्वतःचें आयुष्य धोक्यांत घातलें पाहिजे, व समय-विशेषीं तर आपल्या प्रजेच्या संरक्षणाकरितां हातांत तरवार घेऊन आपला प्राणही खर्ची घालण्यास तयार असलें पाहिजे, हेंच खऱ्या राज्यकर्त्याचें कर्तव्यकर्म आहे, यावि-षयीं तुमचें सर्वांचें एक मत असलेंच पाहिजे. असें असून

ह्या आमच्या थोर व विचारी उमरावाची अशी इच्छा दिसते कीं, मी माझ्या प्रजेचें कल्याण कोणत्या रीतीनें होईल याची मुळींच काळजी बाळगूं नये, तिचें दिवसें-दिवस ज्यास्त बरें होण्याकरितां काय केलें पाहिजे, त्याबद्दल उपाय योजण्यांत झोंपेशिवाय ज्या रात्रीच्या रात्री हल्लीं मी खर्च करीत आहें, तसें करूं नये, व आपले नीच व विषयपर मनोविकार अहर्निश तृप्त केल्याशिवाय राहूं नये. त्याला असें वाटतें कीं, मीं स्वशरीरसंरक्षणाकडे विशेष लक्ष्य द्यावें, व ज्या रीतीनें स्वतःची चैन चालेल व स्वतःस सुख होईल अशाच गोष्टी कराव्या,—म्हणजे अर्थात् या माझ्या अवाढव्य राज्याचीं सूत्रें एखाद्या वजिराच्या हातांत देऊन मी स्वस्थ बसावें ! ज्या अर्थी चक्रवर्ती बादशाहासारख्या थोर पुरुषाच्या पोटीं माझा जन्म झाला आहे, व ज्या अर्थी मी आज राज्यपदारूढ झालों आहें, त्या अर्थी परमेश्वरानें मला स्वतःकरितां श्रम करावे म्हणून उत्पन्न केलें नसून माझ्या प्रजेच्या कल्याणार्थ हा देह झिजविण्याकरितां त्यानें मला निर्माण केलें आहे ही गोष्ट त्याच्या लक्ष्यांतच येत नाहीं काय ? माझ्या प्रजेचें कल्याण करण्याकरितां मला आपल्या शरीरसंपत्तीची जितकी काळजी घेणें जरूर आहे, तितकी घेतलीच पाहिजे; परंतु त्यापलीकडे स्वतःच्या सुखाची मला पर्वा करतां कामा नये. माझ्या प्रजेमध्यें स्वस्थता कोणत्या रीतीनें राहील, व तिचा भरभराट कोणत्या उपायांनीं होईल याचा विचार मला अवश्य केला पाहिजे. न्यायानें राज्य चालविणें, बादशाही अधिकार कायम ठेवणें, व आपल्या राज्याचें रक्षण करणें ह्या तीन गोष्टी जितक्या महत्त्वाच्या आहेत, तितक्याच महत्त्वाची प्रजेचें पालन करण्यांत दक्ष असणें ही गोष्ट आहे.

ण्या गोष्टींत मीं लक्ष्य घालूं नये म्हणून हा गृहस्थ मला सांगत आहे तसें मीं केलें तर त्याचा परिणाम पुढें काय होईल, व दुसऱ्याच्या हातांत राज्यसूत्रें दिलीं तर त्यापासून काय अनर्थ ओढवतील, याची त्यास अद्याप कल्पनाच नाहीं! **सादीनें** ( हा एक नामांकित पर्शियन कवि होता ) " आपलें राज्य आपण स्वतः चालवूं असा तुमचा निश्चय नसेल तर राज्यकर्ते होऊंच नका, राज्यकर्ते होऊंच नका!" म्हणून जें मोठ्या जोरानें म्हटलें आहे तें कांहीं तरी अर्थानें म्हटलें आहे! तुम्ही आपल्या स्नेह्याला जाऊन सांगा कीं, मीं तुमची प्रतिष्ठा ठेवावी व तुमचा मान राखावा अशी तुमची इच्छा असेल तर तुम्हांला जो अधिकार दिलेला आहे तो योग्य रीतीनें बजावा; व राज्यकर्त्यानें ग्राह्य करण्यास अयोग्य असा उपदेश करण्याचें धाडस पुनः करूं नका. अरेरे! सुख व विलास भोगण्याकडे आमच्या मनाची मूळचीच प्रवृत्ति झालेली असते! तें सांगण्यास अशा प्रकारचे तोंडपुजे उपदेशक कशाला पाहिजेत? चैनीच्या व सुखाच्या कुसुमास्तरित मार्गावरून चालत जाण्यास आमच्या सहचरिणी आम्हांस खातरीनें मदत करितील!"

**औरंगजेबानें** शहाजहान यासही अशाच प्रकारचें एक पत्र पाठविलें होतें. त्यांत तो असें म्हणतो कीं, " माझ्या संबंधानें आपला समज चुकीचा व्हावा या गोष्टीचें मला फार वाईट वाटतें, व आपण मला दोष देऊं नये अशी माझी इच्छा आहे. मी गादीवर बसलों आहें तरी आपली कल्पना झाली आहे त्याप्रमाणें मी गर्विष्ठ झालों नाहीं, किंवा उद्दामही झालों नाहीं..........आपणांस असें वाटतें कीं, मी आपल्या

राज्यास स्थैर्य व बळकटी आणण्याचे उपाय योजण्यांत कमी वेळ खर्च करून राज्यवृद्धीचें काम प्रथमतः हातीं घ्यावें. मलाही असेंच वाटतें कीं, मोठमोठ्या राज्यकर्त्यांच्या कारकीर्दी मोठमोठ्या विजयांनीं सुशोभित झाल्या पाहि- जेत, व आपल्या हल्लींच्या राज्यविस्ताराची मर्यादा माझे हातून वाढली नाहीं, तर आपला परम थोर पूर्वज तैमुरलंग याच्या नांवास मीं काळिमा आणिली असें होईल, यांत काडीमात्र संदेह नाहीं. परंतु ज्या अर्थी माझी फौज दक्षिण व बंगाल येथें मोठमोठे पराक्रम करीत आहे, त्या अर्थी मी स्वस्थ बसलों आहें असें कोणीही म्हणणार नाहीं, किंवा आपणांसही तसें म्हणतां येणार नाहीं. मोठमोठे विजयी पुरुष हुशार राज्यकर्ते असतातच असें म्हणतां येत नाहीं, ही गोष्ट आपणांस माहीत आहेच. अशिक्षित रानटी लोकांनीं जगांतील पुष्कळ राष्ट्रें जिंकून घेतल्याचें आढळून येतें, व त्यांनीं मोठमोठे दिग्विजय केले असतांही थोडक्याच अवकाशांत त्यांचा मागमूसही राहिला नाहीं अशींही उदाहरणें आपल्या दृष्टीसमोर येतात. तेव्हां आपल्या प्रजेचें समदृष्टीनें व यथान्यायानें जो पालन करितो त्याच राज्यकर्त्याला 'थोर' ही पदवी साजते."

आतां वर सांगितलेल्या पत्रांत राज्यकर्त्यास भूषणास्पद अशा राजनीतीचा जो निर्देश केलेला आहे, तो केवळ शाब्दिक आहे किंवा औरंगजेब त्याप्रमाणें स्वतः वागत होता, ही गोष्ट पहाणें राहिलें आहे. बरनीर साहेबांनीं त्याच्या स्वभावाचें वर्णन करतांना "तो मोठा आंतल्या गांठीचा किंवा ज्याचें हृद्गत दुसऱ्यास कधींही कळणार नाहीं असा मोठा कावेबाज" होता असें म्हटलें आहे. तेव्हां अशा प्रकारचा अधिकारसंपन्न पुरुष ठिकाठिकाणीं आपली कावे-

बाजी लढविल्याशिवाय केवळ कानांत तुळशीपत्र घालून आपल्या प्रजेशीं तो वागला असेल असें संभवत नाहीं. परंतु **डा० हंटर** साहेब म्हणतात कीं, " ज्या उच्च राजनीतीच्या तत्त्वांचा **औरंगजेबानें** उल्लेख केला आहे, त्याच तत्त्वांवर तो आपला राज्यकारभार चालवीत असे, व मुसलमानी कायद्याच्या अनुरोधानें पाहतां त्याच्या हातून अन्यायाचें असें कोणतेंच कृत्य झालें नाहीं; " व त्यास **ओव्हिंगटन** व **गेमेली क्यारेरी** या ग्रंथकारांचे लेख आधार म्हणून त्यांनीं दिलेले आहेत. डाक्टर साहेबाचें मत चुकीचें आहे असें म्हणण्याचें धाडस आम्हीं कसें करावें ? परंतु **औरंगजे**बानें ठिकाठिकाणीं ' प्रजा ' या शब्दाचा जो उपयोग केला आहे, त्याच्या व्यापक अर्थांतून हिंदु लोक एका बाजूस काढले तर मात्र वरील म्हणणें अक्षरशः खरें आहे असें म्हणणें भाग आहे !

**औरंगजेबाचे** बोल व कृति हीं कांहीं कांहीं गोष्टींत परस्परांस अगदीं विरुद्ध होतीं असें दिसून येतें. त्यानें **शहाजहान** यास लिहिलेलें एक पत्र **बरनीर** साहेबांस मिळालें होतें, त्यांत त्यानें असें लिहिलें होतें कीं, " मीं सर्व जुन्या चालीरितींसच फक्त धरून चालावें, व राज्यांत जो कोणी मरण पावेल त्याच्या मालमत्तेचा वारस बादशाहा हा आहे, म्हणून ती आपले ताब्यांत घ्यावी, अशी आपली इच्छा दिसते. एखादा उमराव किंवा मातबर शेटसावकार मरण पावल्यावर किंवा कांहीं कांहीं प्रसंगीं त्याचें प्राणोत्क्रमण होण्यापूर्वींच त्याच्या तिजोरीवर मोहोरा कराव्या, त्याचा पैसा व जडजवाहीर कोठें आहे तें दाखवावें म्हणून त्याच्या चाकरनोकर लोकांस मारहाण करावी, किंवा त्यांस कैद करावें, अशी आह्मांस पूर्वींपासून संवय झालेली आहे. ह्या चालीपासून

पेशाच्या बाजूनें पाहतां अतिशय फायदा आहे, ही गोष्ट निर्विवाद आहे; परंतु ही चाल किती दुष्ट व अन्यायाची आहे याची कल्पना तरी करतां येईल काय?" हंटर साहेबही या संबंधानें असें लिहितात कीं, "खऱ्या वारसांच्या तोंडास पानें पुसून मयताची जिनगी सरकारांत जमा करण्याची जुनी मोंगलाई चाल होती तिचा औरंगजेब तिटकारा करीत असे, असें त्याच्या पत्रांवरून दिसतें." परंतु एल्फिन्स्टन साहेब या संबंधानें असें लिहितात कीं, 'जेव्हां जेव्हां त्याचे अति जुने आणि फार लग्याचे मित्र मरण पावल्याचें वर्तमान त्यास लागे, तेव्हां तेव्हां तो जी वर्तणूक करी, तिजवरून त्याचें अंतःकरण निर्दय होतें हें उघड दिसतें. तो पुष्कळ वर्षेंपर्यंत वांचला, तितक्या मुदतींत त्याला असे प्रसंग वारंवार आले. त्या वेळीं त्यानें कांहीं धर्मसंबंधी गोष्टी अथवा तत्त्वविचार पुढें आणून नंतर मयताची जिंदगी ताब्यांत घ्यावी, कोणी कांहीं अफरातफर न करील असा तिचा बंदोबस्त करावा, त्याच्या ठेवी उकरून काढाव्या, आणि त्याचें लोकांकडील येणें तजविजीनें वसूल करावें, असे तो सक्त हुकूम देत असे." तसेंच तो दक्षिणेंत असतां त्यानें झुलपिकारखानास जें एक पत्र पाठविलें होतें, त्यांत अतिशय आग्रहानें त्यानें त्यास असें लिहिलें होतें कीं, "कोणीं द्रव्य छपवून ठेविलें असेल तर त्याचा शोध करावा, व प्रत्यक्ष कोणाच्याजवळ असेल तर तें त्याजपासून हरण करावें." वरील गोष्टीचा विचार केला तर औरंगजेबाचें वर्तन दुटप्पी असून त्यानें केवळ न्यायानें राज्य केलें, असें कदापि ह्मणतां येणार नाहीं. काफीखान व दुसरे कांहीं इतिहासकार तो न्यायी होता असें लिहितात. परंतु त्याच्या अन्यायाच्या कृत्यांचा विचारच केला नाहीं तर

मात्र त्यांचीं बाकीचीं सर्व कृत्यें न्यायाचीं होतीं ही गोष्ट सत्य आहे !

औरंगजेबानें राज्यप्राप्तीकरितां आपल्या बंधूंचे जे खून केले त्या संबंधानें हंटर साहेब असें म्हणतात कीं, "औरंगजेबाच्या प्रतिस्पर्ध्यांचा मुख्य आक्षेप त्यानें आपल्या बंधूंचे जे खून केले त्यांवर आहे....परंतु राजाच्या कुटुंबांतील मनुष्यें हींच त्याचे खरे शत्रु आहेत याचीं उदाहरणें पूर्वेकडील (आशिया खंडांतील) इतिहासांत पुष्कळ घडून आलेलीं आहेत, व त्यांवरूनच औरंगजेबास धडा मिळाला होता,ही गोष्ट त्यांस कशी समजली नाहीं?.... पूर्वेकडील देशांतील राजपुत्रास राज्यप्राप्तीशिवाय कधींच सुख होणार नाहीं, यामुळें त्यास आपली महत्त्वाकांक्षा शेवटास नेण्याचा उद्योग करणें भाग पडतें. .... हल्लीं मुसलमानी राज्यांत अशी चाल आहे कीं, अशा प्रकारच्या गादीवर हक्क सांगणाऱ्या पुरुषास, तो बहकून जाईपर्यंत जनानखान्यांत कोंडून ठेवावयाचें; परंतु यापेक्षां ठार मारण्याची जुनी पद्धत फार चांगली."

"औरंगजेब मोठा दयाळू होता, परंतु त्याचे इतर बंधु अतिशय महत्त्वाकांक्षी असल्यामुळें त्यांची त्याला नेहमीं भीति असे. त्याच्या पूर्वजांना त्यांच्या नातेवाईकांनीं केलेल्या बंडांचा चांगला अनुभव आला होता. राज्यप्राप्तीकरितां अकबराला आपल्या भावाबरोबर लढाई करावी लागली. जहांगीर यानें अकबराविरुद्ध बंड केलें होतें...शहाजहान हा आपला भाऊ शहारियार यास ठार मारून गादीवर बसला होता. अशा प्रकारचीं उदाहरणें डोळ्यांपढें असतां, व दारा सुजा व मुराद हे डोळ्यांपुढें नांदत असतां, ते आपणास स्वस्थ राहूं देतील असें त्यास वाटेना. प्रत्येकाचा गादीवर सारखाच हक्क असल्यामुळें प्रत्येकास राज्यप्राप्तीची इच्छा

होतीच. औरंगजेबानें खरोखर राजसत्तेचा त्याग करून व बालपणीं घेतलेली फकिराची दीक्षा घेऊन संसाराचा त्याग केला असता. परंतु दारा व सुजा हे पाखंडी किंवा नास्तिक होते, व अशा प्रकारच्या मनुष्यांस गादीवरून हाकून देणें हें खऱ्या मुसलमानाचें कर्तव्यकर्म आहे, असें त्यास वाटलें. शिवाय त्याच्याही मनांत राजयधिकाराची जबरदस्त हांव उत्पन्न झाली होती. बरें, तो फकीर झाला असता तरी त्याच्या बंधूंनीं त्याच्या मानेवर सुरी ठेवावयास कधींही कमी केलें नसतें. राज्यावर ज्या इतर पुरुषांचा हक्क पोहोंचतो, त्यांच्या कपाळीं मृत्यु किंवा कैद यांपैकीं कांहीं तरी एक असावयाचेंच, तेव्हां औरंगजेबास अशा मंडळीस मृत्यूची शिक्षा देणें ज्यास्त पसंत वाटलें. असे खून करणें म्हणजे भयंकर तर खरेंच, परंतु तसें करण्यांत ज्यास्त दयाभूतपणा आहे, व राज्यकर्ताही भीतींतून कायमचा मोकळा होतो."

वर सांगितल्याप्रमाणें हंटर साहेबांनीं औरंगजेबाचा कैवार घेऊन त्याच्या घोर कृत्यांवर पांघरूण घालण्याचा जरी प्रयत्न केला आहे, तरी प्रांजलपणें वरील गोष्टींचा विचार केला तर त्याचें करणें दोषार्ह होतें, असें कोणासही कबूल करावें लागेल. आमच्या मतें औरंगजेबानें आपल्या बंधूंचे खून केले ही गोष्ट अति निंद्य असून कोणत्याही रीतीनें तिचें समर्थन करितां येणार नाहीं. पूर्वीच्या बादशाहांनीं आपल्या भावाबंदांस ठार मारिलें होतें, म्हणून औरंगजेबानेंही आपल्या बंधूंस ठार मारावें हा कांहीं सिद्धांत त्यापासून निघत नाहीं. त्यानें शहाजहान यास कैदेंत ठेविलें होतें, त्याप्रमाणें आपल्या बंधूंनाही नीट बंदोबस्तानें कैदेंत ठेविलें असतें, म्हणजे त्याचें काम भागलें असतें. दारा व

सुजा नास्तिक होते म्हणून औरंगजेबास त्यांचा गादीवरचा हक्क उडवावा लागला असें हंटर साहेब म्हणतात, ही गोष्ट कदाचित् खरी असेल; परंतु मुराद हा नास्तिक होता असें कोठेंच लिहिलेलें नाहीं. शिवाय 'तुला दिल्लीची गादी प्राप्त करून द्यावी एवढ्याकरितांच मी झटत आहें' असा बहाणा करून औरंगजेबानें त्यास प्रथमतः सामील करून घेतलें असून, पुढें आपला डाव साधला असें त्यास वाटल्यावर त्यानें त्यास कैद करून व पुढें त्याच्यावर चमत्कारिक रीतीनें खुनाचा आरोप ठेवून त्यास ठार मारिलें. या अत्यंत नीच कृत्याचा हंटर साहेबांनीं कांहींच उल्लेख केला नाहीं हें कसें? औरंगजेबास खरोखर फकीर व्हावयाचें होतें तर मुराद याच्या स्वाधीन सर्व राज्यसूत्रें करून त्याला विदेही बनतां आलें असतें. तेव्हां केवळ स्वतःची महत्त्वाकांक्षा तृप्त करण्याकरितां त्यानें तें निवळ ढोंग केलें होतें, व अथपासून इतिपर्यंत त्याचे सर्व प्रयत्न स्वतःसच राज्यप्राप्ति करून घ्यावी म्हणून चालले होते. असें म्हणणें भाग पडतें.

औरंगजेबाच्या लांबचलांब पन्नास वर्षांच्या कारकीर्दींत त्याच्या हातून क्रूरपणाचें असें कांहींच कृत्य झालें नाहीं असें हंटर, कीन, एल्फिन्स्टन इत्यादि इतिहासकारांचें मत आहे. परंतु त्यानें तुळापूर मुक्कामीं भयंकर रीतीनें केलेला संभाजीचा खून, झिजिया कर हिंदु लोकांवर बसविला त्या वेळीं दाद मागण्याकरितां दिल्लीच्या रस्त्यांत हजारों हिंदु लोक जमले असतां त्यांच्या अंगावर बेलाशक हत्ती घालून त्यांच्या पायांखालीं शेंकडों लोक तुडवून मारिले ही गोष्ट, यशवंतसिंगाचा पुत्र पृथुसिंग यास भेटीस बोलाविलें असतां केवळ त्याचे समयसूचक उत्तराचा मनांत विषाद उत्पन्न झाल्या

कारणानें त्यास विषाचा झगा घालवयास देऊन त्याचा केलेला खून, व विजापुरचा तरुण बाहशाहा शिकंदर यास खरबुजांत विष चारून ठार मारणें, इत्यादि गोष्टी डोळ्यांपुढें असतां त्याच्या हातून क्रूरपणाचें कांहींच कृत्य झालें नाहीं असें म्हणणें म्हणजे केवळ धाडस व सत्याचा अपलाप होय !

औरंगजेब सुनी पंथाचा होता. त्याला आपल्या धर्माचा पूर्ण अभिमान असून त्याचें आचरण एखाद्या कडकडीत इमामाप्रमाणें असे. त्याचें एवढें मोठें ऐश्वर्य असतां ऐहिक सुखाचा उपभोग न घेतां तो फकिराच्या वृत्तीनें राहत असे. तो मांस खात नसे व दारू पीत नसे. तो कुराणांत सांगितलेले सर्व उपवास करीत असे. ट्रॅव्हर्नियर नांवाचा फिरस्ता त्या वेळीं दिल्लीच्या दरबारीं होता तो असें लिहितो कीं, "इ० स० १६६५ त हिंदुस्थानांत एक फार मोठा धूमकेतु दिसूं लागला होता. तो एक महिनाभर होता. त्या वेळीं औरंगजेब फक्त लहानसा भाकरीचा तुकडा व थोडेंसें पाणी पिऊन राहत असे; तो उघड्या जमिनीवर निजून व्याघ्रचर्म पांघरीत असे; अशा प्रकारच्या वागणुकीमुळें त्याची प्रकृति बिघडून गेली होती. औरंगजेब अतिशय कृश व सडसडीत होता याचें मुख्य कारण त्याचे उपवास होत." प्रत्येक मनुष्यानें कांहीं तरी उद्योग करावा अशी पैगंबराची कुराणांत आज्ञा आहे, त्याप्रमाणें औरंगजेब डोकीस घालण्याच्या टोप्या स्वतः तयार करीत असे, व त्यानें केलेल्या टोप्या त्याचे अमीर-उमराव लोक मोठ्या उल्हासानें विकत घेत असत. त्यानें कुराणाच्या स्वहस्तें दोन प्रती करून त्या मक्का व मदिना येथें पाठवून दिल्या होत्या. फक्त कुराणांत सांगितलेल्या लावलांबच्या याला त्याच्या हातून झाल्या नाहींत; व त्यानें

त्या, आपण इतके लांब गेलों तर आपले राज्यांत एखादा खेळखंडोबा माजून आपण कदाचित् राज्यास मुकूं, या भीतीनें केल्या नाहींत. बरनीर साहेबांनीं कोलबर्ट साहेबांस जीं पत्रें पाठविलीं आहेत त्यांपैकीं एकांत ते असें लिहितात कीं, " अबुल मुजाफर मोहिदीन महमद औरंगजेब अलमगीर याची आपल्या धर्मावर अतिशय श्रद्धा आहे. तो इमाम अबू हनिफाच्या मतांचा अनुयायी आहे. स्नान केल्यावर परमेश्वराचे ध्यानधारणेंत त्याचा बराच वेळ जातो. दररोज पढावयाचे नमाज एकदां मशिदींत व एकदां घरीं असे तो पढतो. प्रत्येक शुक्रवारीं व दुसऱ्या पवित्र दिवशीं तो निराहार करितो. दर शुक्रवारीं जुम्मा मशिदींत तो नमाज पढावयास जातो. तो रात्रीस स्वतःकरितां बांधलेल्या मशिदींत मुल्लांबरोबर वादविवाद करीत बसतो. तो खासगी वेळांत सिंहासनावर बसत नाहीं. सर्व रमजान महिनाभर तो निराहार करितो, त्या महिन्यांत म्हणावयाचे रोजे स्वतः म्हणतो, कुराण वाचतो, व विद्वान् मंडळीशीं धर्मसंबंधी विषयांवर चर्चा करीत रात्रीचे आठनऊ तास बसतो. कांहीं अपरिहार्य अडचणींमुळें त्याला मक्केची यात्रा करतां येत नाहीं. तरी तिकडे जाणाऱ्या यात्रेकरू लोकांची तो जी व्यवस्था ठेवितो त्याचें श्रेय त्यास प्रत्यक्ष मक्केस जाण्या इतकेंच मिळतें. धर्मानें निषिद्ध मानलेला कपडा, व सोन्यारुप्याचीं भांडीं तो कधीं वापरीत नाहीं."

तथापि एल्फिन्स्टन साहेब या संबंधानें असें लिहितात कीं, " औरंगजेबाचीं पांचसातशें पत्रें बाळगून ठेविलेलीं आहेत, त्यांवरून त्याच्या स्वभावाविषयीं आपणास थोडेंसें ज्ञान होतें....त्याचा धर्मसंबंधांत अतिशय दुराग्रह होता, तरी तो देवभोळा नव्हता......त्यानें मशिदी किंवा इतर

धर्मादाय यांत आपला पैसा खर्च केला नाहीं. तो मुल्ला लोकांचे कबजाखालीं होता असें दिसत नाहीं, आणि फकीर व दरवेशी यांच्या ओढून ताणून आणलेल्या पवित्रतेस तो वारंवार तुच्छ मानीत असे." यावरून तो धर्मभोळा नसून त्यानें धर्माचे बाबतींत हिंदु लोकांचा जो छळ केला तो केवळ दुराग्रहानें केला असें सिद्ध होतें.

औरंगजेब मोठा निग्रही व दृढनिश्चयी होता; तसेंच तो मोठा कटक असून मेहनती होता. सर्व दक्षिण पादाक्रांत करण्याकरितां तो दिल्ली सोडून खालीं आला त्या वेळीं त्याचें वय ६९ वर्षांचें होतें, व ब्रह्मपुरी येथून मराठ्याचे डोंगरी किल्ले घेण्याकरितां त्यानें कूच केलें त्या वेळीं त्याचें वय ८१ वर्षांचें होतें. अशा वयांत मोठमोठ्या मजला करणें, किल्ल्यांस वेढे देणें, लढाईची सर्व व्यवस्था स्वतः पहाणें, इत्यादि गोष्टी करणें म्हणजे फार कठिण होय. अशा दगदगीनें एखादा धट्टाकट्टा जवानही थकून गेला असता. ब्रह्मपुरी येथें असतांना भिमेला अकस्मात पूर येऊन त्याच्या छावणीचा बराच भाग वाहून गेला, व त्याचे बारा हजार लोक व असंख्य जनावरें मरण पावलीं; तसेंच परळीचा किल्ला घेत असतां पुनः त्याचें असेंच नुकसान झालें होतें; तथापि तो मुळींच डगमगला नाहीं. मावळासारख्या डोंगराळ प्रदेशांत ऊन, वारा, पाऊस यांपासून त्यास फार ताप होत असे; आपल्या अवाढव्य फौजेसह त्या डोंगराळ प्रदेशांतून जात असतां वाटेनें उतार नाहीं असे नद्यानाले, पाण्यानें तुडुंब भरलेलीं दऱ्याखोरीं, चिखलट व दलदलीचा प्रदेश, व त्यांतून जाणाऱ्या अरुंद पायवाटा, यांच्या योगानें त्यास फार अडचणी येत असत. कित्येक प्रसंगीं धान्याचा तोटा,

पाण्याचा दुष्काळ, व उन्हाचा तडाका यांच्या योगानें त्याचे लष्करांत रोगांच्या भयंकर सांथी येत असत; महामारीचा फेरा तर हटकून यावयाचाच; याशिवाय, आज मराठ्यांनीं खानदेशांत अमका मुलूख जाळला, उद्यां गुजराथचा तमका भाग लुटून फस्त केला, परवां विजापुराकडील तिसराच एक किल्ला सर केला, अशा प्रकारच्या भयंकर बातम्यांची वर्दी त्यास नेहमीं येऊन लागत असे. इतक्या गोष्टी होत होत्या तरी काडीभरही न डगमगतां त्यानें हातीं घेतलेलें काम दृढनिश्चयानें तसेंच पुढें चालवून तें शेवटासही नेलें. या संबंधानें खरोखर त्याची तारीफ करावी तेवढी थोडीच आहे.

राज्यकारभाराचे संबंधानें पहातां राज्यांतील सर्व खात्यांचा बारीकसारीक कारभार सुद्धां तो पहात असे. लढाई करणें असल्यास तिचा सर्व बेत तो अगोदर घालून देत असे, व अमुक एक तऱ्हेनें लढाई करावी म्हणून लिहून पाठवी. त्याच्याजवळ सर्व किल्ल्यांचे नकाशे होते, व त्यांवरून ज्या ठिकाणीं हल्ला करावयाचा तें ठिकाण तो नेमून देई. अफगाण लोकांच्या मुलुखांतील रस्ते कसे खुले करावे, मुलतान येथील शीक लोकांचे व आग्र्याचे आसपास जाट लोकांचे बखेडे कसे मोडावे, कंदाहार प्रांत कोणच्या रीतीनें परत जिंकून घ्यावा, अशा मोठमोठ्या कामांपासून तों अमक्या टोळीनें अमक्या दिशेनें जावें, आपणास अमूक एक सामान पाहिजे, अमक्या फौजेनें अमक्या ठिकाणीं तळ द्यावा, एथपर्यंत त्याचे लेख स्वदस्तुरचे आहेत. परगण्यांतील एखाद्या महसूलसंबंधी हलक्या प्रतीच्या कामगाराची नेमणूक करणें, किंवा दुसऱ्या एखाद्या कामावर एखाद्या कारकुनाची योजना

करणें, हें काम आपल्या दर्जास कमीपणा आणणारें आहे, असें त्यास वाटत नसे. आतां एवढ्या मोठ्या बादशाहानें अगदीं क्षुल्लक बाबींतही आपलें लक्ष्य पोहोंचविणें म्हणजे एक प्रकारें हलकटपणाच आहे असें कोणी म्हणतील; परंतु त्यावरून औरंगजेबाच्या अचाट बुद्धीची कल्पना मनांत येऊन आश्चर्यानें प्रत्येक मनुष्याचें मन अगदीं थक्क होऊन गेल्याशिवाय राहणार नाहीं !

औरंगजेब एवढा मोठा पराक्रमी बादशाहा असून त्याचा असा फजितवाडा कां झाला, व मोंगलांचे राज्याची बळकट इमारत पोखरून जाऊन ती एकदम जमीनदोस्त होण्याचा प्रसंग कां आला, याचें सकृद्दर्शनीं आश्चर्य वाटण्यासारखें आहे. परंतु थोडासा विचार केला म्हणजे त्याचें खरें बीज औरंगजेबानें आपल्या हातानें पेरिलें होतें, व त्याचीं फळेंही त्यालाच भोगावीं लागलीं, असें दिसून येईल. त्याची कारकीर्द फसण्यास कारणीभूत अशा मुख्य गोष्टी दोन होत्या: एक, भावाबंदांचे खून केल्यामुळें व शहाजहान यास कैदेंत टाकून त्याचें राज्य बळकाविल्यामुळें आपलीही कोणी अशीच स्थिति करील कीं काय या भीतीनें झालेला त्याचा संशयी व बेभरंवशी स्वभाव, व दुसरी गोष्ट, धर्मसंबंधी दुराग्रह व त्याचें राज्यकारभाराशीं संमेलन.

पहिल्या गोष्टीच्या संबंधानें त्याचे मनांत जी भीति बसली होती तीमुळें त्यानें सर्व अधिकार, मोठमोठ्या जागा व देणग्या इत्यादि सर्व गोष्टी आपल्या हातांत ठेविल्या होत्या, व प्रत्येक क्षुल्लक बाबतींतही त्याला आपलें लक्ष्य पुरवावें लागत असे. आपले सरदार फार वेळ एकाच प्रांतांत राहिले तर कदाचित् ते प्रबल होऊन आपणावर

उठतील या भीतीनें तो वरचेवर त्यांच्या बदल्या करीत असे; आपले सरदार व अंमलदार काय करीत असतात याची बातमी कळण्याकरितां त्यानें पुष्कळ गुप्त हेर ठेविले होते; एखादे अंमलदाराचे संबंधानें त्यास कांहीं कुणकुण कळल्यास तो त्यास पत्रद्वारा उपदेश करीत असे; कोणास एखाद्या मोहिमेवर पाठविणें झालें तर सर्व अधिकार एक-ट्यासच न देतां त्याच्यावर देखरेख करण्याकरितां म्हणून त्याच्याबरोबर दुसरा कोणी तरी अधिकारी देत असे. सरदार लोकांच्या परिवारांत अगदीं हलक्या प्रतीच्या कामांवर सुद्धां गुप्त रीतीनें त्याचीं विश्वासु माणसें ठेवलेलीं असत. असें असतां त्यांना तो जीं पत्रें पाठवी त्यांत त्यांच्या इमानीपणाबद्दल त्यांच्या स्तुतीची रेलचेल केलेली असे, व त्यांस वारंवार नजराणे व देणग्या पाठवून खुश ठेवण्याचा तो प्रयत्न करीत असे. सारांश, ज्याप्रमाणें एखादा मनुष्य एखाद्याचे भजनीं लागावा त्याप्रमाणें त्याचें त्यांच्याशीं वाह्याचरण असे; परंतु अंतर्यामीं त्यांचेविषयीं नेहमीं संशय असे. कोणी सरदार आजारी पडला तर त्याची तो स्वतः शुश्रूषा ठेवी; एखाद्या सरदाराच्या नाते-वाइकांपैकीं कोणी मृत झालें, तर स्वतः जाऊन त्याचें सांत्वन करी; कोणास कधीं दोष देणें झालें तर त्यास वाईट वाटणार नाहीं अशा रीतीनें सौम्य शब्दांची योजना करी; स्वतःस शत्रु उत्पन्न होतील या भीतीनें, ज्या अप-राधांचा धर्माशीं किंवा त्याच्या बादशाही अधिकाराशीं संबंध पोहोंचत नसे अशा गुन्हेगारांवर तो मेहेरनजर करीत असे; इतकें करूनही त्याला लोकप्रीति संपादन करतां आली नाहीं. त्याच्या संशयी व दुटप्पी वर्तनामुळें त्याचे सर-दार नेहमीं त्यावर नाखुश असत, व कोणत्याही मोहिमेंत ते

करणें, हें काम आपल्या दर्जास कमीपणा आणणारें आहे, असें त्यास वाटत नसे. आतां एवढ्या मोठ्या बादशाहानें अगदीं क्षुल्लक बाबींतही आपलें लक्ष्य पोहोंचविणें म्हणजे एक प्रकारें हलकटपणाच आहे असें कोणी म्हणतील; परंतु त्यावरून औरंगजेबाच्या अचाट बुद्धीची कल्पना मनांत येऊन आश्चर्यानें प्रत्येक मनुष्याचें मन अगदीं थक्क होऊन गेल्याशिवाय राहणार नाहीं!

औरंगजेब एवढा मोठा पराक्रमी बादशाहा असून त्याचा असा फजितवाडा कां झाला, व मोंगलांचे राज्याची बळकट इमारत पोखरून जाऊन ती एकदम जमीनदोस्त होण्याचा प्रसंग कां आला, याचें सकृद्दर्शनीं आश्चर्य वाटण्यासारखें आहे. परंतु थोडासा विचार केला म्हणजे त्याचें खरें बीज औरंगजेबानें आपल्या हातानें पेरिलें होतें, व त्याचीं फळेंही त्यालाच भोगावीं लागलीं, असें दिसून येईल. त्याची कारकीर्द फसण्यास कारणीभूत अशा मुख्य गोष्टी दोन होत्या: एक, भावाबंदांचे खून केल्यामुळें व शहाजहान यास कैदेंत टाकून त्याचें राज्य बळकाविल्यामुळें आपलीही कोणी अशीच स्थिति करील कीं काय या भीतीनें झालेला त्याचा संशयी व बेभरंवशी स्वभाव, व दुसरी गोष्ट, धर्मसंबंधी दुराग्रह व त्याचें राज्यकारभाराशीं संमेलन.

पहिल्या गोष्टीच्या संबंधानें त्याचे मनांत जी भीति बसली होती तीमुळें त्यानें सर्व अधिकार, मोठमोठ्या जागा व देणग्या इत्यादि सर्व गोष्टी आपल्या हातांत ठेविल्या होत्या, व प्रत्येक क्षुल्लक बाबतींतही त्याला आपलें लक्ष्य पुरवावें लागत असे. आपले सरदार फार वेळ एकाच प्रांतांत राहिले तर कदाचित् ते प्रबल होऊन आपणावर

उठतील या भीतीनें तो वरचेवर त्यांच्या बदल्या करीत असे; आपले सरदार व अंमलदार काय करीत असतात याची बातमी कळण्याकरितां त्यानें पुष्कळ गुप्त हेर ठेविले होते; एखादे अंमलदाराचे संबंधानें त्यास कांहीं कुणकुण कळल्यास तो त्यास पत्रद्वारा उपदेश करीत असे; कोणास एखाद्या मोहिमेवर पाठविणें झालें तर सर्व अधिकार एक-ट्यासच न देतां त्याच्यावर देखरेख करण्याकरितां म्हणून त्याच्याबरोबर दुसरा कोणी तरी अधिकारी देत असे. सरदार लोकांच्या परिवारांत अगदीं हलक्या प्रतीच्या कामांवर सुद्धां गुप्त रीतीनें त्याचीं विश्वासु माणसें ठेवलेलीं असत. असें असतां त्यांना तो जीं पत्रें पाठवी त्यांत त्यांच्या इमानीपणाबद्दल त्यांच्या स्तुतीची रेलचेल केलेली असे, व त्यांस वारंवार नजराणे व देणग्या पाठवून खुश ठेवण्याचा तो प्रयत्न करीत असे. सारांश, ज्याप्रमाणें एखादा मनुष्य एखाद्याचे भजनीं लागावा त्याप्रमाणें त्याचें त्यांच्याशीं बाह्याचरण असे; परंतु अंतर्यामीं त्यांचेविषयीं नेहमीं संशय असे. कोणी सरदार आजारी पडला तर त्याची तो स्वतः शुश्रूषा ठेवी; एखाद्या सरदाराच्या नाते-वाइकांपैकीं कोणी मृत झालें, तर स्वतः जाऊन त्याचें सांत्वन करी; कोणास कधीं दोष देणें झालें तर त्यास वाईट वाटणार नाहीं अशा रीतीनें सौम्य शब्दांची योजना करी; स्वतःस शत्रु उत्पन्न होतील या भीतीनें, ज्या अप-राधांचा धर्माशीं किंवा त्याच्या बादशाही अधिकाराशीं संबंध पोहोंचत नसे अशा गुन्हेगारांवर तो मेहेरनजर करीत असे; इतकें करूनही त्याला लोकप्रीति संपादन करतां आली नाहीं. त्याच्या संशयी व दुटप्पी वर्तनामुळें त्याचे सर-दार नेहमीं त्यावर नाखुश असत, व कोणत्याही मोहिमेंत ते

मनापासून झटत नसत. याचें उत्कृष्ट उदाहरण, झुलपि-
कारखानास जिंजी घेण्यास प्रथमतः सांगून मागून काम-
बक्ष याची त्या कामावर योजना केली त्या वेळच्या झुल-
पिकारखानाच्या वर्तनावरून चांगलें ध्यानांत येण्या-
सारखें आहे.

ज्याप्रमाणें आपल्या कामदार व सरदार मंडळीच्या
संबंधानें औरंगजेबाचे मनांत संशय व बेभरंवसा असे
त्याचप्रमाणें स्वतःच्या मुलांविषयींही त्याचें मन शुद्ध नव्हतें.
त्यांचेविषयीं त्याचे मनांत प्रीतीपेक्षां भीति ज्यास्त होती.
त्याला एकंदर पांच पुत्र होते. वडील पुत्र महमद व दुसरा
मोअजीम हे एका रजपूत राजकन्येच्या पोटीं झाले होते;
तिसरा अजीमशाहा व चौथा अकबर हे शहानवाजखान
याच्या कन्येच्या पोटीं झाले होते; आणि पांचवा पुत्र
कामबक्ष याचें जन्म उदेपुरी महाल नांवाच्या रजपूत राज-
कन्येच्या पोटीं झालेलें होतें. आपले पुत्र नेहमीं आपल्या कह्यांत
राहतील अशा रीतीनें औरंगजेब त्यांच्याशीं वागत असे;
व आपला पिता प्रसंगीं आपला प्राणही घेण्यास मागें पुढें
पहाणार नाहीं अशी त्यांची खातरी असल्यामुळें तेही त्याला
निरंतर भिऊन वागत असत.

वडील पुत्र महमद हा मोठा शूर होता. त्यानेंच आग्र्याचा
किल्ला घेऊन शहाजहान यास कैद केलें होतें. पुढें
स्वपराक्रमाविषयीं त्यास थोडासा गर्व होऊन त्याचा व
मीर जुमला याचा बेबनाव झाला व तो कांहीं थोडा वेळ
सुजा याजकडे निघून गेला. परंतु सुजाकडे त्याच्या
इच्छेप्रमाणें त्यास सैन्यांत मोठासा अधिकार न मिळाल्या-
मुळें तो परत आला. औरंगजेबास त्याची मोठी दहशत
बसली होती. तेव्हां तो परत येतांच त्यानें त्यास एक-

दस कैद केलें; व ग्वाल्हेरच्या किल्ल्यांत नेऊन ठेविलें. त्या ठिकाणीं तो शूर राजपुत्र इ० स० १६७६ त मरण पावला. दुसरा पुत्र मोअज्जीम हा मोठा आज्ञाधारक, निगर्वी, गरीब व शूर होता. परंतु त्याचेविषयीं औरंगजेबाचे मनांत नेहमीं अप्रीति व अविश्वास हीं असत. गोवळकोंड्याचें राज्य औरंगजेबानें घेतलें त्या वेळीं ह्या शाहाजाद्याचा त्यास विनाकारण संशय येऊन त्यानें त्यास सात वर्षेंपर्यंत कैदेंत ठेविलें होतें (१६८७-९४). पुढें त्यानें त्याची मुक्तता केली. परंतु त्यास आपणाजवळ न राहूं देतां त्यानें त्याची काबुलच्या सुभेदारीवर नेमणूक करून त्यास हिंदुस्थानाबाहेर घालवून दिलें. " मला कांहीं वेळ हिंदुस्थानांत येण्याची परवानगी द्यावी " म्हणून त्यानें अनेक वेळां औरंगजेबास विनंति केली. परंतु " आपण जिवंत असतां आपलें राज्य घेण्याचा त्याचा विचार आहे " अशी शंका त्याचे मनांत येऊन ती त्याची विनंति त्यानें मान्य केली नाहीं; व जेणेंकरून आपल्या सुभ्यांत कोठें तरी दूरच्या पल्ल्यावर त्यास आपल्या सर्व शक्तीचा उपयोग करणें भाग पडेल अशी कांहीं तरी कामगिरी तो त्यास नेमून देत असे. तिसरा पुत्र अजीमशाहा याचेविषयीं औरंगजेबाचे मनांत प्रथमत: प्रीति होती. परंतु पुढें त्याचेविषयींही त्याचे मनांत संशय उत्पन्न झाला. त्यानें बंड वगैरे करण्याचे भानगडींत पडूं नये, व तसें केलें तर त्याचा परिणाम काय होईल याची कल्पना त्याचे मनांत येऊन त्यानें स्वस्थ बसावें, अशा हेतूनें त्या वेळीं औरंगजेबानें जी युक्ति केली त्या संबंधाची एक चमत्कारिक गोष्ट सांगतात. ती गोष्ट येणेंप्रमाणें:—अजीमशाहाचे मनांत स्वतंत्र होण्याचे विचार घोळत आहेत असा औरंगजेबास संशय

आल्यावरून त्यानें त्यास दरबारांत बोलाविलें. परंतु दरबारांत येण्यास आपणास भीति वाटते अशी अजीमशाहानें सबब सांगितल्यावरून औरंगजेबानें त्यास "मी थोड्या लोकांनिशीं शिकारीस जाणार आहें त्या वेळीं मला येऊन भेट" म्हणून निरोप पाठविला. पुढें ज्या जागीं भेट होण्याचें ठरलें होतें, त्या जागेस त्यानें आपल्या विश्वासु घोडेस्वारांचा गुप्त रीतीनें वेढा देऊन ठेविला. अजीमशाहा आपल्या लवाजम्यासह बादशाहास भेटावयास आला; परंतु जसजसा तो बादशाहाचे गोटाजवळ येऊं लागला तसतसा त्या म्हाताऱ्या कावेबाज बादशाहानें कांही तरी निमित्त काढून त्याचा परिवार कमी केला; व तो कमी होत होत इतका कमी झाला कीं, अजीमशाहा बादशाहाचे डेऱ्याजवळ गेला त्या वेळीं त्याचेजवळ फक्त तीन असामी शिल्लक राहिले. परंतु त्यांचे घोडे धरावयास कोणीच चाकरनोकर येईना, त्यामुळें त्यांपैकीं दोघे घोडे धरावयास बाहेर उभे राहिले. पुढें शिलक राहिलेल्या एका असामीस बरोबर घेऊन तो बादशाहाचे भेटीस निघाला. परंतु बादशाहाचे जवळ जाऊन पोहोंचेपर्यंत त्याचे लोकांनीं त्या दोघांचीं सर्व शस्त्रें छिनावून घेतलीं. त्या वेळीं अजीमशाहास, आज बादशाहानें कपटानें आपला घात केला, व आतां जन्मभर आपणास कारागृहवास भोगावा लागणार, असें वाटलें. परंतु तो बादशाहाजवळ गेला त्या वेळीं त्या मानभावी म्हाताऱ्यानें त्यास मोठ्या प्रेमानें आलिंगन दिलें. नंतर त्यानें आपली भरलेली बंदूक अजीमशाहाचे हातीं देऊन त्यास अगदीं एकीकडच्या डेऱ्यांत नेलें व तेथें त्यास एक चमत्कारिक तऱ्हेची फार जुनी तरवार दाखविली व ती नागवी करून त्याचे हातांत दिली. नंतर

आपणास उष्मा फार होतो असें निमित्त करून, आपले अंगांत चिलखत वगैरे कांहीं नाहीं अशी अजीमशाहाची खातरी होण्याकरितां त्यानें आपली छाती खुली केली; आणि अशा रीतीनें आपला त्याच्यावर पूर्ण भरंवसा आहे असें त्यास भासविलें. नंतर त्यानें अजीमशाहास मोठा नजराणा देऊन, " तुला मीं अटकेंत ठेविलें कीं काय असा तुझ्या लोकांस कदाचित् संशय येऊन घोटाळा होण्याचा संभव आहे, याकरितां तूं लौकर परत जा, " असें म्हणून त्यास निरोप दिला. अजीमशाहा परत येऊन पोहोंचतो तों त्याच्या सैन्यांत खरोखरच अतिशय गोंधळ होऊन गेला होता, व त्याच्या जनानखान्यांत मोठा आकांत चालला होता. परंतु या कृत्याचे संबंधानें अजीमशाहाचे मनांत आपले पित्याविषयीं पूज्यबुद्धि उत्पन्न झाला नाहीं इतकेंच नव्हे, तर जेव्हां जेव्हां औरंगजेबाचीं त्यास पत्रें येत, तेव्हां तेव्हां वरील गोष्टीचें स्मरण होऊन एकदम त्याचे मनांत भीति उत्पन्न होत असे.

तसेंच अजीमशाहा गुजराथच्या सुभेदारीवर असतां त्यानें हवापालट करण्याकरितां अहमदनगर येथें येण्याची परवानगी मागितली होती. परंतु " शहाजहान आजारी असतां मीं जें निमित्त योजिलें होतें तें हेंच " असें औरंगजेब म्हणाला व त्यानें त्यास परवानगी दिली नाहीं. चौथा पुत्र अकबर यानें तर त्याच्या विरुद्ध बंड केलेंच होतें; व पांचवा पुत्र कामबक्ष ह्याच्यावर जिंजीच्या वेढ्याचे वेळीं तो मराठ्यांस फितूर आहे असा आरोप ठेवून त्यास झुलपिकारखानानें कैद करून औरंगजेबाकडे पाठवून दिलें होतें. अशा रीतीनें औरंगजेब निरंतर संशयानें भरलेला असल्यामुळें त्यास

१ हंटर.

त्याच्या एकाही पुत्रापासून किंवा सरदारापासून सुख झालें नाहीं.

दुसरी गोष्ट ‘ धर्मसंबंधी दुराग्रह व त्याचें राज्यकारभाराशीं संमेलन ’ ही होय. अधिकाराच्या जोरावर आपण काय पाहिजे तें करूं असें औरंगजेबास वाटत होतें, व सारासार विचार न करतां तो हिंदुधर्माच्या छलास प्रवृत्त झाला होता, आणि हिंदु लोक त्यामुळें अतिशय चिडून गेले होते. त्यानें हिंदूंवर एकसारखा जुलूम चालविला होता. त्यानें त्यांस मोठमोठ्या सरकारी हुद्यांवरून काढून टाकिलें; त्यांच्यावर भलभलते कर बसवून त्यांची अप्रतिष्ठा केली; त्यांनीं आपल्या यात्रा भरूं नयेत म्हणून सक्तीचे हुकूम सोडले; त्यांच्या देवस्थानांचे विटे केले; शेंकडों देवालयांचा विध्वंस करून त्या ठिकाणीं मशिदी बांधल्या; लाखों मूर्ति फोडून टाकल्या; व अशा सर्व जुलमी कृत्यांवर मेरू असा झिजिया कर त्यांच्यावर बसविला. या सर्व गोष्टी त्यानें केवळ धर्मसंबंधी दुराग्रहानें केल्या होत्या, व त्याचा परिणामही त्यास लौकरच दिसून आला. झिजियासारखा जुलमी कर हिंदु लोकांवर बसविण्यांत औरंगजेबाचा मुख्य उद्देश असा होता कीं, पुष्कळ हिंदु लोकांस तो देण्याचें सामर्थ्य नसल्यामुळें ते त्या कराच्या बोजांतून मुक्त होण्याकरितां अनायासें मुसलमान होतील, व थोडक्याच वेळांत सर्व हिंदुस्थान यवनस्थान होऊन जाईल. औरंगजेबाच्या प्रजेपैकीं तीन चतुर्थांश लोक हिंदु होते; तेव्हां झिजिया कर बसविला म्हणजे ते मुसलमान होतील अशी कल्पना होण्याइतकी औरंगजेबाची कोती बुद्धि होती असें म्हणतां येत नाहीं. परंतु धर्मसंबंधी दुराग्रहाची धुंदी चढून त्याची दृष्टि इतकी अंध, व त्याची बुद्धि इतकी मंद झाली होती कीं, त्याचा

सारासारविचार नष्ट होऊन व केवळ दुराग्रहाचा बंदा गुलाम होऊन तो त्या हानिकारक छंदास लागला होता, व त्यामुळेंच मोंगलांच्या अत्राढय़ राज्याचा अकबरानें घातलेला बळकट पाया ढांसळून गेला. औरंगजेबाच्या या भयंकर चुकीचा शिवाजीनें फार चांगला फायदा करून घेतला, व त्यामुळें त्याला मराठ्यांची एकी करण्यास व आपली सत्ता वाढविण्यास फारसे आयास पडले नाहींत.

त्या काळीं औरंगजेबासारखा शूर व विद्वान् असा दुसरा कोणीही पुरुष नव्हता असें म्हटलें तरी चालेल; परंतु त्याचे अंगीं राज्याभिलाष, दुष्टपणा आणि पापबुद्धि इत्यादि दुर्गुण अमर्याद रीतीनें वास्तव्य करीत असल्यामुळें त्याच्या त्या शौर्याचा व विद्वत्तेचा राजकारणांत काडीभरही उपयोग झाला नाहीं. जो मनुष्य दुष्ट, भ्रष्ट व कपटपटु असतो त्याला सर्व जग आपणाप्रमाणेंच दिसत असतें. औरंगजेब स्वत: विश्वासघातकी व अप्रामाणिक असल्यामुळें त्याला दुसऱ्या कोणाचाच विश्वास येईना, व कोणीही प्रामाणिक मनुष्य आहे असें त्यास वाटेना; व हेच निंद्य गुण शेवटीं त्याच्या नाशास कारणीभूत झाले. तो जसजसा अधिकारापन्न होत गेला, तसतशी त्याची कपटबुद्धि अधिकाधिक वाढत चालली. त्याच्या अनावर राज्यलोभामुळें त्यानें जीं अघोर पातकें केलीं होतीं त्यांबद्दल आपल्या धर्माचे लोकांत आपली बेअब्रू व नाचक्की होऊं नये म्हणून, व मुसलमान लोकांस स्वपक्षाभिमानी राखावें म्हणून त्यानें हिंदु लोकांवर अत्यंत जुलूम चालवून त्यांस बाटविण्याचा सपाटा चालविला होता. अशा रीतीनें एक

---

१ औरंगजेबानें खानदेशांत बरेच लोक मुसलमान केले. साव-

(पुढें चालू.)

अन्याय छपविण्याकरितां तो दुसरे अन्याय करण्यास प्रवृत्त झाला. या संबंधानें आर्मी साहेब असें म्हणतात कीं, "त्याचे प्रांतांत सर्वत्र जमिनी पडून राहिल्या आणि साळी, कोष्टी वगैरे कारागीर व उद्योगी लोक यांचे धंदे बसल्यासारखे झाले. कोणाचाच जीव सुचित्त व बिनधास्त राहिला नव्हता. मग अर्थात् औरंगजेबाला जमिनीचें उत्पन्न कमी येऊन त्याचे खजिन्यांत पैशाची तूट पडूं लागली, तेव्हां त्यानें हिंदु लोकांवर झिजिया नांवाचा एक नवीनच कर बसवून तो सक्तीनें वसूल करण्याचा सपाटा चालविला."

औरंगजेबाच्या या जुलमी आचरणानें हिंदु व मुसलमान यांजमधील वैर ज्यास्त वाढत जाऊन मुसलमान बादशाहीविषयीं जिकडे तिकडे तिरस्कार व शाप ऐकूं येऊं लागले. मुसलमान धर्मसंस्थापक महंमद पैगंबर याचें धर्ममत म्हणजे केवळ समशेर आणि कुराण हेंच असून जगांतील सर्व लोकांस मुसलमान करण्याचा काय तो त्याचा उपदेश होता, व त्याच्या पोटीं कोणतींही व कशींही भयंकर पातकें झालीं तरी मुसलमानी धर्माचा प्रसार करणें हेंच त्या भयंकर पातकांचें प्रायश्चित्त होतें! हेंच तत्त्व

---

( मागील पृष्ठावरून पुढें चालू ).

ह्यास हल्लीं जे देशमुख नांवाचे ब्राह्मण इनामदार आहेत त्यांच्या मूळपुरुषास औरंगजेबानें बाटविलें. त्याचेविषयीं अशी गोष्ट ऐकिवांत आहे कीं, औरंगजेबानें त्यास मुसलमान केल्यावर तो आपल्या घरीं परत आला. परंतु त्यानें शहाणपणानें आपल्या कुटुंबाशीं सर्व संबंध तोडून टाकिला, व बाहेर देवडीवर बसून तो आपला सर्व कारभार पहात असे.

१ टॉडकृत राजस्थानचा इतिहास.

औरंगजेबानेंही मनांत धरून राज्यलोभानें जरी पितृहत्या, भ्रातृहत्या, पुत्रहत्या इत्यादि महान् महान् पातकें केलीं होतीं, तरी त्या घोर पातकांचें प्रक्षालन किंवा प्रायश्चित्त म्हटलें म्हणजे वर सांगितल्याप्रमाणें हिंदु लोकांस बाटविणें व आपल्या धर्माचा प्रसार करणें हेंच होतें असें तो समजत असे ! कोण तरी हा दुराग्रह ! परंतु इतक्या दुराग्रहांत जरी तो शिरला होता तरी वर सांगितलेलीं क्रूर कर्मे त्यास रात्रंदिवस जणू काय तोडतोडून खात होतीं ! त्याचे चित्तांतून शांति व सुख हीं अगदीं निघून गेलीं होतीं; व त्याचे बाप, भाऊ, पुत्र इत्यादि मंडळी त्याच्या अघोर कृत्यांची त्यास सतत आठवण देण्याकरितां त्याचे कानांत जसे काय मोठ्यानें घंटानाद करीत होती. तो आसन्नमरण होऊन पडला असतां त्यानें आपल्या अमदानींत जीं पातकें केलीं होतीं तीं मूर्तिमंत त्याच्यापुढें येऊन उभीं राहिलीं, व त्यांमुळें तो अतिशय विव्हल होऊन गेला. तशा अवस्थेंत त्यानें आपल्या पुत्रांस व नातवांस जीं पत्रें लिहिलीं आहेत त्यांत तो म्हणतो कीं, " मीं कोणत्याही दिशेकडे बघितलें तरी मला सर्वत्र देवदूत दिसत आहेत; व त्यांची चर्या शांत व सौम्य दिसत नसून जसा काय मीं त्यांचा अपराध केला आहे व ते क्रोधदृष्टीनें व भयंकर मुद्रेनें मजकडे पहात आहेत. " अशा रीतीनें अंतकालीं त्याची स्थिति अत्यंत शोचनीय झाली होती.

औरंगजेबाच्या प्रजेपैकीं तीन चतुर्थांस लोक हिंदु होते, हें मागें सांगितलेंच आहे; तसेंच अकबराचे वेळेपासून राज्यांतील मोठमोठे सरदार व सुभेदार हे बहुतेक शिया पंथाचे होते. औरंगजेब कट्टा मुस-

मराठी ग्रंथ संग्रहालय. ठाणे.



इसम व पक्का सुनी असल्यामुळें त्या दोघांचाही तो मनापासून द्वेष करीत असे. परंतु त्यांचाच भरणा ज्यास्त असल्यामुळें त्याला त्यांच्या मदतीनें राज्यकारभार चालविल्याखेरीज गत्यंतर नव्हतें. अरवली डोंगर व राजपुतान्यांतील वालुकामय प्रदेश यांच्या सभोंवार रहाणारे शेंकडों शूर रजपूत व दुसरे हिंदु राजे व संस्थानिक यांची त्यास निरंतर भीति असे. रजपूत लोकांचे आपसांत तंटे नसते तर त्यांनीं मोंगल लोकांस हिंदुस्थानांतून कधींच हुसकून दिलें असतें. परंतु आपसांत तंटे कसे लावावे ही विद्या औरंगजेबास चांगली अवगत होती. अकबरानें पूर्वींपासून त्यांस फार चांगल्या रीतीनें वागविल्यामुळें ते त्यास बरेच वश झाले होते, व त्यानें आपल्या राज्यास जी बळकटी आणली ती त्याच लोकांच्या मदतीनें आणली होती. अकबराचे सैन्यांत हिंदु सरदार पुष्कळ होते. राजा तोडरमल्ल, ज्यानें त्यास बंगाल प्रांत काबीज करून दिला, व ज्यानें त्याच्या राज्याच्या वसुलाची शिस्त फार उत्तम व भक्कम पायावर घातली, तो हिंदूच होता. ज्या खात्यांतून विद्येचें अंग विशेष लागत असे, अशा खात्यांत विशेष भरणा हिंदूंचाच असे. मुसलमान कवींप्रमाणें ब्राह्मण कवीही त्याच्या पदरीं असत. लढाईचे कामीं त्याची मुख्य भिस्त हिंदु सैन्यावर व विशेषतः रजपूत सैन्यावर असे. आपण कसे झालों तरी परकीय देशांतून आलेले, तेव्हां सर्व हिंदु एक झाले तर आपला मागमूसही हिंदुस्थानांत राहूं देणार नाहींत, अशी अकबराची पक्की खातरी होती, व याच कारणामुळें तो मुख्यत्वेंकरून हिंदु लोकांस फार चांगल्या रीतीनें वागवीत असे. औरंगजेब अकबराप्रमाणेंच शहाणा होता, व अकबराचे राजनीतीचें खरें

तत्त्व त्यास कळलेलें होतें. परंतु धर्मसंबंधी दुराग्रहामुळें तो इतका अंध होऊन गेला होता कीं, त्यापुढें आपलें व आपल्या राज्याचें खरें कल्याण कोणत्या गोष्टींत आहे त्या सुद्धां गोष्टी त्यास दिसत नाहींतशा झाल्या होत्या ! ज्या हिंदु लोकांवर त्याच्या राज्याचा मुख्य आधार होता त्यांस त्यानें दूर केलें, व त्यामुळें त्याच्या कारकीर्दीच्या अखेरीस त्याचे राज्याची अवाढव्य इमारत डळमळूं लागली, आणि त्याचेमागें थोडकेच वर्षांत ती जमीनदोस्त होऊन तिचा मागमूसही राहिला नाहीं !

**अकबरानें** ज्या धोरणावर रजपूत लोकांशीं सख्य ठेवून त्यांच्या मुलींशीं शरीरसंबंध केला होता, त्यांतील हेतु आणि तत्त्व हीं त्या वेळच्या इतिहासकर्त्यांस समजलीं नसावीं असें वाटतें. त्यांच्या लेखांवरून मुसलमान व रजपूत यांचा बेटीव्यवहार केवळ मुसलमानांच्या शिरजोरपणामुळें झाला, असें ध्वनित होतें; कारण **फेरिस्ता** वगैरे इतिहासलेखकांचे ग्रंथ पाहिले तर त्यांत अशा प्रकारच्या बेटीव्यवहारांत त्या बादशाहाचा कांहीं राजकारणसंबंधी हेतु होता असें कोठेंच लिहिलेलें नाहीं. रजपूत हे शूर व सच्चे आहेत अशी **अकबराची** बालंबाल खातरी झाली होती; तेव्हां असे लोक आपले आप्त व स्नेही झाले म्हणजे आपल्या राज्यास बळकटी येईल असें **अकबरास** वाटलें, व त्याच धोरणावर त्यानें रजपुतांशीं बेटीव्यवहार सुरू केला, व त्याचें प्रत्यंतरही पुढें लौकरच दिसूं लागलें. **अकबराचा** पुत्र **जहांगीर** हा **अंबेरच्या** रजपूत राजकन्येच्या पोटीं झाला होता, व त्याचा पुत्र **शहाजहान** हा **मारवाडच्या** राजकन्येच्या पोटीं झाला होता. परंतु **औरंगजेब** हा रजपूत राजकन्येच्या पोटीं झाला नसून त्याची

आई तार्तर जातीची होती—म्हणजे तो निव्वळ मुसलमानी रक्ताचाच होता. त्यामुळें जहांगीर व शहाजहान यांचा ओढा ज्याप्रमाणें रजपुतांकडे असे, त्याप्रमाणें औरंगजेबाचा ओढा त्यांच्याकडे नव्हता. तथापि त्याच्या पूर्वजांनीं ज्या तत्त्वावर रजपुतांशीं बेटीव्यवहार ठेविला होता, तें तत्त्व त्यास पूर्णपणें अवगत होतें असें वाटतें. कारण त्यानेंही आपले पुत्र मोअजीम व अजीमशाहा यांचीं लग्नें रजपूत राजकन्यांशींच केलीं होतीं. परंतु औरंगजेबास धर्माभिमानापुढें कसलेंही महत्त्वाचें राजकारण अगदीं तुच्छ वाटत असे, त्यामुळें त्यानें आपल्या वाडवडिलांचें वरील धोरण बाजूस ठेवून रजपूत लोकांस अतिशय गांजलें, व त्यामुळें शेवटीं मोंगल बादशाहीचा मात्र नाश झाला[1].

कर्नल टॉड साहेबांनीं राणा राजसिंग व औरंगजेब यांच्या स्वभावांची तुलना करीत असतां औरंगजेबावर फारच कडक रीतीनें टीका केली आहे. ते म्हणतात कीं, "मोंगलबादशाहा औरंगजेब हा अत्यंत अधमाधम आणि नीच वृत्तीचा होता हें त्याच्या कारकीर्दींत पावलोपावलीं दिसून येण्यासारखें आहे. इतिहासलेखक तर असें लिहितात कीं, त्याचे इतका दुष्ट, दुरात्मा, लोभी, हिंसक, क्रूर, निर्दय आणि विलक्षण बादशाहा आशिया खंडांतील कोणत्याही राष्ट्राच्या तख्तावर बसला नाहीं असें म्हटलें तरी चालेल. कोणत्याही प्रसंगीं औरंगजेबाकडून थोरपणाचें, उदारतेचें, व सुमनुष्यास शोभेल असें एकही कृत्य झाल्याचा दाखला सर्व इतिहासांत नाहीं. मनुष्य कसाही पापात्मा असला तरी त्याचे ठायीं कृतज्ञता म्हणून जो ईश्वरदत्त एक गुण आहे, त्याचा देखील त्याच्यामध्यें अभाव

---

१ टॉड.

होता ! त्यानें आपल्यावर उपकार करणाराचे आभार मानल्याचें उदाहरण त्याच्या एकंदर इतिहासांत सांपडणें दुरापस्तच. तो असा कृतघ्न स्वभावाचा होता कीं, त्याच्या शत्रूंनींही त्याच्यावर उपकृति केली असल्यास ती तो मुळींच मनांत न आणतां, ते त्यांचे उपकार फेडणें म्हणजे त्यांचा सर्वतोपरि कपटानें नाश करणें हेंच आपलें थोरपण व कर्तव्यकर्म असें तो समजत असे ! असला घोर, वनपशूहूनही नीच वृत्तीचा नराधम औरंगजेब हा मोंगल वंशांत उत्पन्न होऊन त्यानें मनुष्यस्वभावाच्या अत्यंत निंद्य व सदोष आचरणाची व कृत्यांची कमाल करून सोडली ! " टॉड साहेबांचा हा लेख, त्यांचा सर्व ओढा रजपुतांकडे असल्यामुळें बराच कडक झालेला आहे असें वाटतें. परंतु औरंगजेबाच्या कारकीर्दीचें सूक्ष्म रीतीनें अवलोकन करणारास असें स्पष्टपणें दिसून येईल कीं, वरील आक्षेपांपैकीं फारच थोड्या गोष्टींशिवाय बाकी सर्व गोष्टी औरंगजेबावर पूर्णपणें लागू पडण्यासारख्या आहेत, व ते आक्षेप केवळ धर्मसंबंधी दुराग्रहामुळें त्याच्यावर आलेले आहेत.

औरंगजेब ज्याप्रमाणें हिंदूंचा तिरस्कार करीत असे, त्याचप्रमाणें, तो सुनी असल्यामुळें शिया म्हणून मुसलमानांत जो दुसरा पंथ आहे, त्या पंथाचेही लोकांचा तिरस्कार करीत असे, हें मागें सांगितलेंच आहे. गोवळकोंडें व विजापूर हीं दक्षिणेंतील दोन मुसलमानी राज्यें शिया पंथांचीं होतीं, व म्हणूनच तीं त्यानें मोडून टाकिलीं. तो दक्षिण पादाक्रांत करण्याकरितां उत्तर-हिंदुस्थान सोडून खालीं आला, त्या वेळीं प्रथमतः त्यानें आपला मोर्चा या दोन राज्यांवर फिरविला. दुसरा एखादा राजकारस्थानी पुरुष असता तर त्यानें

१ राजस्थानचा इतिहास, उदेपूरवर्णन.—लोकहितवादी.

प्रथमतः आपला धर्मसंबंधी दुराग्रह जरा बाजूस ठेवून त्या दोन राज्यांशीं एकी केली असती, व जोरानें बळावत चाललेल्या मराठ्यांच्या जुटीचा नाश केला असता. परंतु औरंगजेब पडला दुराग्रही ! प्रथमतः तींच दोन राज्यें मोडावयाचीं हा त्याचा कृतसंकल्प ! तो टळावा कसा ? त्यानें आपल्या निश्चयाप्रमाणें तीं राज्यें मोडून टाकिलीं हें खरें; परंतु त्यामुळें त्याचा अतिशय तोटा होऊन मराठ्यांचा फार मोठा फायदा झाला. तीं राज्यें जिवंत होतीं तोंतर्यंत त्यांचा मराठ्यांवर बराच दाब होता, व पुष्कळ हिंदु सरदार त्यांचे पदरीं असल्यामुळें तेही मराठ्यांस विशेष जोर करूं देत नसत. परंतु औरंगजेबानें तीं राज्यें मोडून टाकिल्यामुळें तिकडील बहुतेक सरदार आपल्या फौजफांट्यासह मराठ्यांस येऊन मिळाले, व त्यांना लुटालूट करण्यास तो सर्व प्रांत अगदीं मोकळा सांपडला. अशा रीतीनें मराठे जोरावल्यामुळें पुढें औरंगजेबास त्यांना कह्यांत आणतां आलें नाहीं, व शेवटीं त्यांनींच त्याला चांगला हात दाखविला ! औरंगजेबाच्या राजनीतींत ज्या मोठमोठ्या चुक्या झाल्या त्यांपैकींच ही एक होय.

दुसऱ्या एका प्रसंगीं औरंगजेबाच्या हातून राजनीतींत आणखीं एक एवढा मोठा प्रमाद घडला, व त्याचें शहाणपण इतकें घसरलें कीं, त्याचीं फळें तो जिवंत असतां त्याला, व त्याच्यामागून त्याच्या पुत्रपौत्रांस भोगावीं लागलीं. इ० स० १६६६ त त्यानें शिवाजीस आपल्या भेटीस बोलाविल्यावरून तो दिल्लीस गेला होता. त्या वेळीं जर औरंगजेब त्याच्याशीं निष्कपटपणें वागता, व जयसिंग, मीर जुमला यांस ज्याप्रमाणें त्यानें आपले स्नेही करून ठेविलें होतें, त्यांप्रमाणें तो शिवाजीशींही स्नेह करून

त्याची आपल्या पहिल्या प्रतीच्या सरदारांत गणना करता, तर ज्या दक्षिणेंत त्याला आपलें सैन्य, खजिना, ऐश्वर्य, व शेवटीं आपला प्राणही खर्ची घालून पुरें पडलें नाहीं, तिकडे त्यास जाण्याचें मुळींच प्रयोजन न पडतां, त्या रणशूर गाजीनें दक्षिणेची उत्कृष्ट रीतीनें बाजू राखून विजापूर व गोवळकोंडें हीं राज्यें हां हां म्हणतां मोंगलांचे राज्यात सामील केलीं असतीं, व मोंगलपदपादशाहीचा झेंडा कन्याकुमारी केपापर्यंत नेऊन फडकाविला असता. परंतु औरंगजेबाचे धर्मसंबंधी विचार जसे कोते होते, तशीच राजनीतींतही त्याची कांहीं अंशीं स्थिति होती. त्वरित लाभाच्या आशेस्तव तो परिणामावर नजर देत नसे. दुराग्रह सोडून दुसऱ्याची आपणावर प्रीति बसेल अशा रीतीचें वर्तन ठेवण्याचें त्याचे अंगीं सामर्थ्यच नव्हतें. त्याला शिवाजीची खरी पारख न झाल्यामुळें त्याला तो एखाद्या भुरट्या चोराप्रमाणें समजत असे. तशांत शिवाजीनें पूर्वी मक्केचे यात्रेकरू लुटले होते, त्यामुळें तर त्याची त्याला विशेष चीड आलेली होती. " शिवाजी म्हणजे डोंगरांतील एक उंदीर आहे, त्यास मी पाहिजे तेव्हां चिरडून मारीन, " अशी त्यास मोठी घमेंड होती. परंतु तो उंदीर किती जबरदस्त होता याची त्यास कल्पना नव्हती; व शेवटीं त्याच उंदरानें त्याच्या राज्यरूपी इमारतीचा पाया चोहोंकडून इतका पोखरून टाकिला, व त्याला जागजागीं एवढालीं मोठीं बिळें पाडलीं कीं, त्याच्या कारकीर्दीच्या अखेरीस तिला जरा धक्का पोहोंचतांच ती जमीनदोस्त होण्याच्या स्थितीस येऊन पोहोंचली होती. शिवाजीचा भरदरबारांत अपमान केला म्हणजे त्याचा गर्व जिरून तो सहजच जेरीस येईल असें औरंगजेबास वाटलें होतें.

परंतु सर्पाच्या शेपटीवर पाय दिला तर तो चावल्याशिवाय कसा राहील, हें त्याच्या लक्ष्यांत आलें नाहीं ! त्यानें शिवाजीचा अपमान केला ही गोष्ट, त्यानें ज्या एकंदर मोठमोठ्या चुक्या केल्या त्यांत गणली पाहिजे असें आमचें मत आहे.

औरंगजेब गादीवर आला त्या वेळीं मोंगलांचे ताब्यांत हिंदुस्थानापैकीं १६ सुभे होते, व त्यानें आपल्या कारकीर्दीत आणखी ४ सुभ्यांची त्यांत भर घातली. त्यांचीं नांवें व वसूल येणेंप्रमाणें:—

| | सुभ्याचें नांव. | वसूल रुपये. |
|---|---|---|
| १ | बंगाल प्रांत ( ओढ्या प्रांत शिवाय करून ) सुमारें. .... .... | ४०००००० |
| २ | बहार. .... .... .... | १२१५०००० |
| ३ | ओढ्या. .... .... .... | ५७०७५०० |
| ४ | अयोध्या ( राजमहाल. ) .... | १००५०००० |
| ५ | दिल्ली. .... .... .... | १२५५०००० |
| ६ | आग्रा. .... .... .... | २२२०३५५० |
| ७ | अलाहाबाद. .... .... .... | ७७३८००० |
| ८ | लाहोर. .... .... .... | २३२०५००० |
| ९ | काबूल. .... .... .... | ३२०७२५० |
| १० | अजमीर. .... .... .... | १९००००० |
| ११ | मुलतान. .... .... .... | ५०२५००० |
| १२ | माळवा. .... .... .... | ९९०६२५० |
| १३ | गुजराथ. .... .... .... | २३२९५००० |
| १४ | खानदेश. .... .... .... | १११०५००० |
| १५ | वऱ्हाड. .... .... .... | १५८०७५०० |
| १६ | गोंडवण (याचें उत्पन्न दिलेलें नाहीं.) | |

१ कीन.

| | | |
|---|---|---|
| १७ | औरंगाबाद किंवा बागलाण. .... | ६८८५००० |
| १८ | विजापूर. .... .... .... | ५००००००० |
| १९ | हैदराबाद. .... .... .... | ५००००००० |
| २० | वेदर. .... .... .... | ७२००००० |
| | | ३१७९३५०५० |

शहाजहान यास पदच्युत केलें त्या वेळीं मोंगलांचे राज्याचा वसूल सुमारें २२ कोट रुपये होता; औरंगजेबाच्या कारकीर्दीच्या प्रारंभानंतर थोडकेच वर्षांत तो २४ कोट झाला, असें थामस नांवाचा ग्रंथकार म्हणतो; इ० स० १६६८ त तो २५ कोट होता असे थीवेनाट साहेब म्हणतो; यानंतर कांहीं वर्षांनीं मानूसीनें तो वसूल सुमारें ३२ कोट होता असें दिलें आहे; व हंटर साहेब तो ३८ कोट होता असें म्हणतात. परंतु औरंगजेबाची कारकीर्द संपण्यापूर्वीं हा वसूल बराच कमी झाला होता. औरंगजेबाच्या राज्याच्या वसुलाच्या संबंधानें निरनिराळ्या एतद्देशीय व युरोपियन ग्रंथकारांनीं निरनिराळ्या वेळीं निरनिराळे आंकडे दिले आहेत. त्या सर्वांचें मंथन करून हंटर साहेबांनीं मोंगलांचे राज्याचे वसुलाचे संबंधानें खालीं दिल्याप्रमाणें माहिती दिली आहे.

आसाम शिवायकरून सर्व उत्तर–हिंदुस्थान व दक्षिण–हिंदुस्थानचा बराच मोठा भाग इतक्या मुलुखाचा वसूल औरंगजेबास मिळत असे. सांप्रत ब्रिटिश सरका-

१ औरंगजेबाचे कारकीर्दीपर्यंत हे शेवटचे चार प्रांत मोंगलाचे राज्याला कायमचे जोडले गेले नव्हते. —कीन.

रच्या ताब्यांत जेवढा हिंदुस्थानचा भाग आहे, तेवढाच बहुतेक औरंगजेबाचे ताब्यांत होता. भेद इतकाच कीं, ब्रिटिशांच्या ताब्यांतल्या हिंदुस्थानांतील प्रांतावर त्यांच्या मुख्य गादीचा जितका साक्षात् अंमल आहे तितका साक्षात् अंमल त्याच्या ताब्यांतील प्रांतावर त्याच्या मुख्य गादीचा नव्हता. त्याच्या एकंदर मुलुखाची जी जमाबंदी ठरली होती तिचें निवळ उत्पन्न तीस कोटींपासून अड-तीस कोटी रुपयांपर्यंत होत असे, असा दप्तरीं दाखला आहे;—म्हणजे सांप्रत ब्रिटिश सरकारच्या ताब्यांत जो हिंदुस्थानचा मुलूख आहे त्याचा हल्लीं जो वसूल आहे त्याच्या रकमेच्या मोबदला दुसरा एखादा जिन्नस जितका मिळेल, त्याच्या तिपटीइतका जिन्नस मिळेल इतकी या रुपयांच्या रकमेची किंमत होती. परंतु औरंगजेबाला बहुत दिवस दक्षिणेमध्यें लढाया ज्या कराव्या लागल्या, त्या कर-ण्याकरितां तो दिल्लीहून निघाला त्यापूर्वीं जेव्हां त्याची सत्ता शिखरास जाऊन पोहोंचली होती, तेव्हां देखील एकसारखीं कांहीं वर्षेंपर्यंत ही एवढी अडतीस कोट रुपायांची रक्कम पुरी होत होती किंवा नाहीं याचा संशयच आहे. तो दक्षिणेमध्यें जाऊन २५ वर्षें झाल्यावर, म्हणजे त्याच्या कारकीर्दीच्या शेवटल्या वर्षीं, त्याच्या राज्याच्या वसुलाचा अंदाज फक्त तीस कोट रुपयांपर्यंत केला होता. वसूल घेण्याचे कामीं लोकांवर जुलूम होत असल्यामुळें केव्हां केव्हां लोक कांहीं तरी सबबी सांगून तो देण्याची टाळाटाळ करीत, व केव्हां केव्हां दंगे उपस्थित करीत.

रुपये ठरलेलें होतें; आणि जरी राज्याचे तुकडे तुकडे होऊन गेले तरी पुढील पन्नास वर्षांत हेंच परिमाण बादशाही खजिन्याच्या हिशेबांत, नांवाला खरें, परंतु कायमचें असें धरलेलें असे. इ० स० १७६१ मध्यें अहमदशाहा दुराणी हिंदुस्थानावर स्वारी करून दिल्लीस आला त्या वेळीं खजिन्यावरील अधिकाऱ्यांनीं वसुलाचा तक्ता त्याच्यापुढें हजर केला. त्यांत राज्याचा एकंदर वसूल ३४,९०,६६,४०० रुपये दाखविला होता. औरंगजेबानें दक्षिण—हिंदुस्थानांतील राज्यें खालसा केल्यानंतर, व त्याच्या राज्याला शेवटची उतरती कळा लागण्याच्यापूर्वीं, त्याच्या राज्यांतील जमिनीच्या वसुलाची परमावधि म्हटली म्हणजे ३८,९०,००,००० रुपये होती. यांपैकीं अडतीस कोटी रुपयांच्या जवळजवळ हिंदुस्थानांतील मुलुखाचें उत्पन्न असे, व बाकीचें उत्पन्न काश्मीर आणि काबूल या प्रांतांचें असे. इ० स० १६९५ मध्यें औरंगजेबाच्या राज्याच्या एकंदर वसुलाचा अंदाज ८०,००,००,००० रुपये केलेला होता, आणि इ० स० १६९७ मध्यें ८७,९०,००,००० रुपये केलेला होता.

वर सांगितलेल्या सुभ्यांशिवाय औरंगजेबाचे कारकीर्दीचे प्रारंभीं कंदाहार, बल्क आणि बुखारा या प्रांतांवर मोंगलांचा अंमल होता. परंतु त्याचे कारकीर्दीचे अखेरीस मोंगलांचा त्या प्रांतांवरचा हक्क नाहींसा झाला. तसेंच औरंगाबाद, विजापूर, बेदर व गोवळकोंडें या प्रांतांवर कांहीं थोडा वेळ औरंगजेबाचा अंमल होता. परंतु मराठ्यांनीं ... हैराणगत केली होती

चत असे; आणि काबूल व बंगाल या प्रांतांवरीलही त्याचा अंमल कमी कमी होत चालला होता.

वर सांगितलेले वसुलाचे आंकडे ठरावीक होते खरे, परंतु ते बरोबर रीतीनें वसूल होत होते असें म्हणतां येत नाहीं. हिंदु लोकांवर फक्त झिजिया कर बसविल्यामुळें त्यांना पूर्वीपेक्षां जवळजवळ दुप्पट कराचें ओझें द्यावें लागत असे. मग हा वसल सरकारी पोत्यास जमा होत असो किंवा वसूली अंमलदार तो मधल्यामध्येच घशाखालीं टाकीत असोत. परंतु ह्या करामुळें आपणावर सरकारदे-ण्याचें दुप्पट ओझें लादलें गेलें आहे, ही गोष्ट मनांत आल्यामुळें त्यांना फार चीड आली होती. औरंगजेबानें अशा रीतीनें अतिशय क्षुल्लक बाबतींत हिंदूंचा जो एक-सारखा छळ चालविला होता त्यामुळें ते लोक बेहोष होऊन गेले होते व त्या कारणानें त्याचे राज्यास जो धक्का बसला, तशा प्रकारचा धक्का, पूर्वींच्या कांहीं मुसलमान राज्यकर्त्यांनीं सारासार विचार बाजूस ठेवून भयंकर रक्त-पाताचीं जीं अनन्वित कृत्यें केलीं होतीं तशा प्रकारच्या कृत्यांपासूनही बसला नसता.

मोंगलांचे राज्यांतील बडे लोकांचे तीन वर्ग होते. पहिल्या वर्गांतील लोकांस अमीरउमराव [ अमीर हें एक वचन, व उमराव हें त्याचें अनेक वचन आहे. ], दुसऱ्या वर्गांतील लोकांस मनसबदार व तिसऱ्या वर्गांतील लोकांस रोजिनदार अशीं नांवें होतीं. अमीरउमराव मंडळींत मोड-णारे लोक पिढीजाद सरदार किंवा वतनदार नसून बादशा-हाच्या मनांत आल्यावर तो पाहिजे त्याला पाहिजे त्या वेळीं अमीर करीत असे. त्यांचें वैभव क्षणभंगुर असे, व बादशाहाची मर्जी जेणेंकरून निरंतर सुप्रसन्न राहील अशा

रीतीनें ते त्याच्याशीं वागत असत. त्यामुळें त्या लोकांत अगदीं नीच कुलांत उत्पन्न झालेली, अशिक्षित व पूर्वी गुलामाच्या स्थितींत असलेली अशी बरीच मंडळी असे. रंकाचा राव व रावाचा रंक बादशाहास एका क्षणांत करितां येत असे, यामुळें बादशाहाचा शब्द झेलून धरण्यास ही मंडळी निरंतर तयार असे व त्या कारणानें त्यांच्यांत हांजीहांजीपणा व तोंडपुजेपणा फार भरलेला असे. या प्रत्येकाजवळ बरीच शिबंदी असल्यामुळें बादशाहाचा पुष्कळ भरंवसा या मंडळीवर असे; व ते लोकही बादशाहीचे खरे आधारस्तंभ आपणच आहों असें आपणांस समजत असत.

वर सांगितलेल्या बडे लोकांस पांचशेंपासून तों बारा हजार स्वारांपर्यंत फौज ठेवण्याचा अधिकार असे. एक हजार स्वार ज्यास ठेवण्याचा अधिकार असे त्याच्यापासून वरील मंडळीस अमीर असें म्हणत असत, व त्याच्यापासून खालील मंडळीस मनसबदार असें ह्मणत असत. अमीर लोकांत एक हजारी, दोन हजारी, पांच हजारी, सात हजारी, दहा हजारी, बारा हजारी, अशा पायऱ्या होत्या. बादशाहाचे पुत्र हे बारा हजारी उमरावांपैकीं असत. कोणत्या अमिरानें किती फौज ठेवावी याचा निर्बंध बादशाहा ठरवीत असे, व वर जीं 'एक हजारी,' 'दोन हजारी' अशीं नांवें दिलीं आहेत तीं केवळ किताबादाखल असून त्यांच्याजवळ एक हजार किंवा दोन हजारच फौज असावयाची असा नियम नव्हता. ह्या लोकांचे तनखे फार मोठमोठे होते, व त्यांना जहागिरीदाखल कांहीं जमीनही तोडून दिलेली असे. परंतु त्यांस बादशाहास खुश ठेवण्याकरितां निरंतर मोठमोठया देणग्या व नजरनजराणे

द्यावे लागत असत. शिवाय त्यांचा स्वतःचाही खर्च वाजवीपेक्षां फाजील असे. त्यामुळें वरील मंडळींपैकीं बरीच मंडळी निरंतर कर्जबाजारी असे. राज्यांतील बड्या अधिकाराच्या सर्व जागा ह्या उमराव लोकांसच मिळत असत, व हे लोक एकदां आपल्या अधिकारावर जाऊन पोहोंचले म्हणजे प्रत्यक्ष दुसरे बादशाहाच बनत असत. ते आपल्या हाताखालील प्रजेस पाहिजे त्या रीतीनें वागवीत असत व त्यांच्यावर वाटेल तसा जुलूम करीत असत. असो. वर सांगितल्या प्रकारचे उमराव सर्व राज्यभर पसरलेले होते. प्रत्यक्ष बादशाहाचेजवळ निरंतर पंचवीसपासून तीसपर्यंत उमराव लोक असत, व त्यांस आठवड्यांतून एक दिवस, बादशाहा ज्या वाड्यांत किंवा किल्ल्यांत रहात असे त्याचा पहारा करावा लागत असे. अमीरउमराव लोकांच्या हाताखालीं जे स्वार असत त्यांस दर घोड्यास पंचवीस रुपये मिळत असत. परंतु ती सर्व रक्कम स्वारांच्या हातांत न जातां त्यांचे धनी मध्येंच तोंडांत टाकीत असत. याशिवाय ठरावीक संख्येपेक्षां कमी लोक पदरीं ठेवून त्यांचे पैसे ते खात असत ही गोष्ट अगदींच निराळी.

मनसबदार लोक अमीरउमराव लोकांपेक्षां खालच्या पायरीचे होते. अमिरीचा अधिकार मिळण्यास प्रथमतः मनसबदारीवर काम करावें लागत असे. ह्या मंडळीचा पगारही बराच मोठा असे—म्हणजे १५० रुपयांपासून ७०० रुपयांपर्यंत असे. ठरावीक फौजेशिवाय प्रत्येकाजवळ दोनपासून सहापर्यंत बादशाही शिक्क्याचे घोडे असत. बादशाहाशिवाय दुसऱ्या कोणाचाही अधिकार या लोकांवर नसे, व त्यांचा व उमराव लोकांचा दर्जा जवळजवळ सारखाच

असे. फक्त बादशाहाच्या दरबारीं या लोकांची संख्या दोनशेंपासून तीनशेंपर्यंत असे.

रोजिनदार हे मनसबदारांपेक्षां खालच्या पायरीचे लोक होते. त्यांना रोजच्या रोज पगार मिळत असे, म्हणून त्यांस रोजिनदार म्हणत असत. जरी हे लोक मनसबदारांपेक्षां खालच्या पायरीचे होते, तरी ह्यांपैकीं कांहीं मंडळीस मनसबदारांपेक्षांही ज्यास्त पगार मिळत असे. ह्या लोकांची संख्या फारच मोठी होती व ह्यांचा पेशा बहुधा कारकुनीचा असे. बादशाही शिक्कामोर्तब करणें, खजिन्यावर वराती पाठविणें वगैरे कामें ह्याच लोकांकडे होतीं, व आपापल्या अधिकाराच्या मगदुराप्रमाणें हे लोक कमीज्यास्त प्रमाणानें लांचखाऊ असत.

अकबराचे कारकीर्दीपासून वर सांगितलेल्या तिन्ही प्रकारच्या बडे लोकांच्या जागा सर्व जातींच्या व सर्व वर्णांच्या लोकांस त्यांच्या त्यांच्या हुशारीप्रमाणें मिळत असत; मग ते हिंदु असोत किंवा मुसलमान असोत किंवा दुसरे कोणी असोत. जहांगीर व शहाजहान यांनींही तीच शहाणपणाची पद्धत तशीच पुढें कायम राखिली होती. परंतु केवळ धर्मसंबंधी दुराग्रहामुळें औरंगजेबानें ती वहिवाट बंद केली; इतकेंच नव्हे, तर त्यानें हिंदु लोकांस नोकरीस ठेवूं नये असा सक्तीचा हुकूम फर्माविला होता; व ह्या त्याच्या अविचारी व जुलमी वर्तनाचा परिणामही त्याला चांगलाच भोगावा लागला.

औरंगजेब अतिशय शूर, हुशार, शहाणा, कारस्थानी, दूरदृष्टि असा असून त्याचा असा जो फजितवाडा झाला, व अकबरानें आपल्या शहाणपणानें मोंगलपदपादशाहीचा घातलेला भक्कम पाया जो खचला याचें मुख्य कारण

किंवा औरंगजेबाच्या कारकीर्दीचें खरें व्यंग त्याच्याच अंतःकरणांत होतें. जर त्याची बुद्धि कोती नसती, जर त्याचें मन फाजील संशयी नसतें, जर त्याच्या सरदारांशीं त्याची वर्तणूक बेभरंवशाची नसती, जर त्यानें आपल्या राज्यकारभाराशीं आपल्या धर्माची सांगड घातली नसती, जर त्यानें हिंदु लोकांचा विनाकारण छळ केला नसता, जर त्यानें शिवाजीचा अपमान केला नसता, व जर तो आपल्या एकंदर प्रजेशीं अकबराप्रमाणें उदार व मोकळ्या मनानें वागता, तर त्याचे कारकीर्दींत मोंगलांचे राज्याचा अतिशय भरभराट होऊन हिमाचलापासून तों कन्याकुमारी केपापर्यंत सर्व हिंदुस्थानभर त्याचें एकछत्री राज्य होऊन गेलें असतें, व तें फार दिवस टिकून औरंगजेबाचे कीर्तीनें सर्व भरतखंड—किंबहुना सर्व आशियाखंड—कित्येक शतकें दुमदुमून जाऊन थोर अकबराची कदाचित् लोकांस विस्मृतिही पडली असती.

# परिशिष्ट (अ).

## मयूरासन.

औरंगजेब बादशाहाजवळ एकंदर सात सिंहासनें होतीं. त्यांपैकीं एकावर फक्त हिऱ्यांचेंच काम केलेलें असून, बाकीच्या सहांवर हिरे, पाच, माणिक, मोतीं यांचीं कामें केलेलीं होतीं.

वरील सिंहासनांपैकीं मुख्य सिंहासनास मयूरासन असें म्हणत असत. तें मुख्य दरबारच्या ठिकाणीं ठेविलेलें असे. त्याची लांबी सुमारें ६ फूट व रुंदी सुमारें ४ फूट होती. या सिंहासनास वीसपासून पंचवीस इंच उंचीचे भक्कम चार पाय असून त्यांत चार गातें बसविलेलीं होतीं, व त्यांच्या आधारानें गादीची जागा तयार केलेली होती. वर सांगितलेल्या गातांपैकीं तीन बाजूंच्या म्हणजे उजव्या, डाव्या, व मागच्या बाजूंच्या अशा तीन गातांवर वरील मेघडंबरीस आधारभूत असे बारा खांब उभे केलेले होते. पुढची किंवा दरबाराच्या समोरची बाजू अगदीं खुली होती. पाय व गातें सोन्यानें मढविलेलीं असून त्यांवर उत्कृष्ट नक्षीचें काम केलेलें होतें. त्यांच्यांत जागजागीं हिरे, माणकें व पाच यांचे हजारों खडे बसविलेले होते. प्रत्येक गाताच्या मध्यभागीं एक मोठें बदकशाही माणीक बसविलेलें होतें, व त्याच्या चार बाजूंस चार पाच बसविलेले होते; व अशा रीतीनें गाताच्या दोन्ही टोंकांपर्यंत माणकांच्या चौकड्यामध्यें एक मोठा पाच, व पाचेच्या चौकड्यामध्यें एक मोठें माणीक असें उत्तम जडावाचें काम केलेलें होतें. तसेंच या चौकड्यांच्या मध्यंतरीं जी जागा खुली होती तिच्यांतून हिरे बसविलेले होते. या प्रत्येक हिऱ्याचें वजन दहापासून बारा कारातांपर्यंत होतें. हे हिरे कांहींसे चापट परंतु तेजःपुंज होते. सिंहासनाचे कांहीं भागावर सोन्याचे कोंदणांत पाणीदार मोत्यें बसविलेलीं होतीं. ह्या सिंहासनास चार पायऱ्या होत्या. सिंहासनावर भरजरी गाशा व त्यावर लोड व तिवाशा होत्या. तसेंच त्याचे एका बाजूस ढाल, तरवार, धनुष्य, बाणांचे भाते वगैरे आयुधें लटकलेलीं होतीं. हीं सर्व हत्यारें, गाशे, लोड, तिवाशा, व सिंहासनाच्या पायऱ्या हीं वर सांगितलेल्या सर्व प्रकारच्या रत्नांनीं विभूषित केलेलीं होतीं,

या सिंहासनास जडलेल्या माणकांमध्यें १०८ माणकें फारच मौल्यवान् होतीं. त्यांपैकीं अगदीं हलक्या माणकाचें वजन १०० कारात असून कांहीं कांहीं २०० कारातांहूनही ज्यास्त वजनाचीं होतीं. उत्कृष्ट पाणीदार पाचही पुष्कळ जडलेले होते, परंतु ते फुटलेले होते व त्यांचें वजन ३० पासून ६० कारातांपर्यंत होतें.

सिंहासनास माणकांपेक्षां पाच ज्यास्त बसविलेले होते. मेघडंबरीच्या आंतल्या बाजूस हिरे, मोत्यें वगैरे बसविलेलीं असून सभोंवार मोत्यांची झालर लाविलेली होती. मेघडंबरीचा घुमट चतुष्कोण असून त्यावर एक मयूराचें चित्र बसविलेलें होतें. त्याचें शेपूट उभारलेलें असून त्याच्यावर नीळ व दुसरे निरानिराळ्या रंगांचे उत्कृष्ट खडे बसविलेले होते. त्या मयूराचें सर्वांग सोन्यानें मढविलेलें होतें, व त्यांत उत्कृष्ट रत्नें बसविलेलीं होतीं. त्याच्या छातींत एक मोठें माणीक बसविलेले होतें, व तेथून एक पिवळट रंगाचें ५० कारात वजनाचें एक मोतीं खालीं लटकत ठेविलेलें होतें. मयूराच्या दोन्ही बाजूंस त्याच्या उंचीइतकेच दोन गुच्छ बसविलेले होते, व त्यांत सोन्याचीं फुलें बसविलीं असून त्या फुलांत निरनिराळीं रत्नें बसविलेलीं होतीं. सिंहासनाची जी बाजू दरबाराच्या समोर होती, तिच्यांत एक ८०।९० कारात वजनाचा तेजःपुंज हिरा अशा रीतीनें बसविलेला होता कीं, बादशाहा सिंहासनावर बसला म्हणजे त्या हिऱ्याचें तेज त्याजवर पडत असे. या हिऱ्याच्या सभोंवार माणकें व पाच बसविलेले होते. तथापि या सिंहासनाचा अतिशय मौल्यवान् भाग म्हटला म्हणजे मेघडंबरीच्या खालीं जे खांब होते ते होत. या खांबांसभोंवार उत्कृष्ट पाणीदार मोत्यांचे सर सोडलेले होते, व त्या प्रत्येक मोत्याचें वजन ६।१० कारातपर्यंत होतें. सिंहासनापासून चार फुटांच्या अंतरावर दोहों बाजूंस दोन छत्र्या उभ्या केलेल्या होत्या. या छत्र्यांच्या दांड्या ८ फूट उंचीच्या असून हिरे, माणकें व मोत्यें यांनीं त्या मढविलेल्या होत्या. छत्र्या तांबड्या किनखाबाच्या केलेल्या असून सभोंवार मोत्यांच्या झालरी सोडलेल्या होत्या.

हें सिंहासन तयार करण्यास तैमूरलंगानें सुरवात केली होती, व तें शाहाजहान बादशाहानें पुरें केलें. बादशाहाच्या जवाहीरखान्याचा हिशेब ठेवणारे, व या सिंहासनाच्या संबंधानें खर्च करणारे यांनीं या सिंहासनास १०,७०,००,००,००० रुपये खर्च झाला असें लिहून ठेविलेलें आहे. ट्रॅव्हरनियर नांवाचा फिरस्ता औरंगजेबाचे कारकीर्दींत दिल्ली येथें होता त्यानें हें सिंहासन स्वतः पाहिलेलें होतें, व त्यानें वर लिहिल्याप्रमाणें वर्णन केलेलें आहे. नादिरशाहानें इ० स० १७३९ त दिल्ली शहर लुटून नेलें त्या वेळीं तो हें सिंहासन घेऊन गेला. हल्लीं या सिंहासनाचा अवशिष्ट राहिलेला फारच थोडा भाग इराणचे शाहाचे जामदारखान्यांत आहे असें म्हणतात.

# परिशिष्ट ( ब ).

## कोहिनूर हिरा.

हा सकलरत्नसारभूत अमोलिक हिरा मूळ **कोलूर** नांवाच्या खाणींत सांपडला. **ट्राव्हरनियर** नांवाचा फिरस्ता **औरंगजेबाचे** वेळीं **दिल्लीचे** दरबारीं होता त्यानें दिलेल्या खाणाखुणांवरून, **डा॰ बाल** नामक गृहस्थ **हिंदुस्थानांत** भूगर्भशास्त्र किंवा जिओलाजिकल सर्वे-मध्यें असतां त्यांनीं या खाणीचा शोध लावून असें ठरविलें कीं, ती **कृष्णा** नदीचे कांठीं उत्तर अक्षांस १६° ४२' ३०" व पूर्व रेखांश ८०° ५' यांचेमध्यें असून **मच्छलीपट्टणाहून गोवळकोंड्यास** किंवा **हैदराबादेस** जो रस्ता येतो त्यावर आहे.

हा हिरा कधीं, कोणाला, कसा सांपडला याचा बरोबर असा कांहींच शोध लागत नाहीं. इ॰ स॰ १६५६ त **मीर जुमला गोव-ळकोंड्याच्या** राजाचा आश्रय सोडून **मोंगलांचे** आश्रयाखालीं आला तेव्हां त्यानें तो **शहाजहान** बादशाहास अर्पण केला. त्या-वेळीं त्याचें वजन ७५६ कारात* होतें.

**ट्राव्हरनियर** यास **औरंगजेबानें** आपलें सर्व जवाहीर पारखण्या-करितां बोलाविलें होतें. त्या वेळीं त्यानें ह्या हिऱ्याच्या आकारमानाचें **प्रमाण काढून** त्याचें वजन केलें. तेव्हां त्याचें **वजन** २६८$\frac{19}{80}$ कारात भरलें. एवढें मोठें वजन कमी झालें याचे संबधानें **ट्राव्हरनि-यर** ह्मणतो कीं, " जर हा हिरा **युरोप** खंडांत असता तर तो काप-ण्याची वगैरे व्यवस्था फार निराळ्या रीतीनें झाली असती. तो **दळून** काढल्यामुळें त्याचें पुष्कळ वजन कमी झालें आहे. परंतु

---

* त्या वेळीं एका काराताचे वजन ३·०३ ट्राय ग्रेन होतें, असें डा॰ **बाल** यांनीं सिद्ध केलें आहे. त्यावरून २॥ ग्रेन म्हणजे १ गुंज या प्रमाणानें पाहूं गेलें तर त्या वेळीं त्या हिऱ्याचें वजन साडे नऊ तोळ्यांहून ज्यास्त होतें असें सिद्ध होतें.

तसें न करतां तो कापला असता तर त्याचे कांहीं उत्कृष्ट खडे निघून शिवाय त्याचें वजनही ज्यास्त राहिलें असतें. " हा हिरा नीट करण्याचें काम हारटेनसो बोरजिओ नांवाच्या व्हेनिस येथील मनुष्यास सांगितलें होतें. त्यानें तो तयार करून आणल्यावर त्याच्या श्रमाबद्दल बादशाहानें त्याला फार चांगलें बक्षीस दिलें ! हारटेनसोनें त्या हिऱ्याचें वजन फारच कमी केलें असें पाहून बादशाहानें त्याची अतिशय निर्भर्त्सना केली, व त्याला एक कवडीही न देतां उलट त्याच्याकडून दंडादाखल दहा हजार रुपये घेतले, व त्याचेजवळ ज्यास्त पैसा असता तर त्या वेळीं बादशाहानें तोही त्याच्यापासून घेतला असता. हारटेनसो आपल्या धंद्यांत वाकबगार नव्हता. नाहीं तर त्याला तो हिरा दळून काढण्याचे श्रम न पडतां, व बादशाहाचें मन न दुखवितां, त्यांतून मोठा भाग काढतां आला असता. " त्यांतून मोठा भाग काढतां आला असता " या ट्रॅव्हरनियर याच्या वाक्याचा अर्थ किंग नांवाचा एक युरोपियन गृहस्थ व दुसरी कांहीं मंडळी असा करितात कीं, " हारटेनसोला त्या हिऱ्यापैकीं एक मोठा तुकडा काढून घेऊन बादशाहास फसवितां आलें असतें. " परंतु डा० बाल यांनीं ट्रॅव्हरनियर याच्या वरील वाक्याचा असा अर्थ धरिला आहे कीं, " हारटेनसो यानें तो हिरा न दळतां कापला असता तर त्याचे कांहीं तुकडे बादशाहास मिळून, त्याचें आकारमान व वजन हीं ज्यास्त राहिलीं असतीं. "

दिल्लीचा बादशाहा महंमदशाहा याच्या कारकीर्दीत इ० स० १७३९ मध्यें इराणचा बादशाहा नादिरशाहा यानें हिंदुस्थानावर स्वारी करून दिल्ली शहर लुटून फस्त केलें, त्या वेळीं त्यानें हा हिरा इराणास नेला. ज्या वेळीं हा हिरा त्याचे दृष्टीस पडला त्या वेळीं त्याची विलक्षण चमक व तेज पाहून त्यानें त्यास ' कोहिनूर ' ( प्रकाशपर्वत ) असें यथायोग्य नांव दिलें. ट्रॅव्हरनियर यानें या हिऱ्याचें असें वर्णन केलें आहे कीं, " हा हिरा फार मोठा असून त्याचें तेज फारच विलक्षण आहे. त्याची एक बाजू कांहींशी उंच आहे, व त्याचा आकार गुलाबाच्या फुलाप्रमाणें

वाटोळा आहे. " त्यावरून नादिरशाहानें त्या हिऱ्यास 'कोहिनूर' असें जें नांव दिलें तें अन्वर्थक आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं.

ह्या हिऱ्याचा पुढील वृत्तांत येणेंप्रमाणें:—इ० स० १७५१ त हा हिरा अहमदशहा अबदाली याचे ताब्यांत होता; इ० स० १७९३ त तो शाहाझमान याचे ताब्यांत होता; इ० स० १७९५ त तो शाहासुजा याचे ताब्यांत होता; इ० स० १८१३ त तो रणजितसिंग याचे ताब्यांत होता; व इ० स० १८४९ त ब्रिटिश सरकारानें पंजाब प्रांत खालसा केला त्या वेळीं तो इंग्लिशांचे ताब्यांत आला. कांहीं दिवस तो लार्ड लारेन्स याचे हवालीं केलेला होता. पुढें त्यानें तो महाराणी साहेब व्हिक्टोरिया यांचेकडे पाठवून दिला. त्या वेळीं त्याचें वजन १८६१⁄१६ कारात होतें. हें जें त्याचें वजन कमी झालें होतें तें निरनिराळ्या वेळीं त्याचे तुकडे काढल्यामुळें झालें होतें; व बहुधा शाहा रूख, शाहाझमान किंवा शाहासुजा यांचे कारकीर्दीत त्यांना पैशाची टंचाई पडल्यामुळें आपली गरज भागविण्याकरितां त्यांनीं तो कापला असावा.

इ० स० १८५१ त इंग्लंडामध्यें जें प्रचंड प्रदर्शन झालें त्यांत हा हिरा ठेविलेला होता. इ० स० १८५२ त वूरसंगर नांवाच्या आमस्टरडाम येथील प्रसिद्ध कारागिरास तो पुनः कापण्याचें काम सांगितलें. तें काम ३८ दिवस चाललें होतें, व तो कापण्यास ८०००० रुपये खर्च आला. हल्लीं या हिऱ्याचें वजन १०६१⁄१६ कारात आहे.—डा० बाल.

समाप्त.

PRINTED AT THE "INDIRA" PRESS POONA.